| | **(उप-बेरीज - ६+११)** | *(१००.०)* | *(१०३.३)* | *(१०७.२)* | *(११४.७)* | *(१२५.९)* | *(१३४.५)* |
| १३ | व्यापार, दुरूस्ती, हॉटेल्स व उपाहारगृहे | ८,८३,५८२ | ९,८१,६२० | १०,३४,५०६ | ११,३५,८४१ | १२,५९,०३९ | १३,७०,९०९ |
| १४ | रेल्वे | ६१,१५० | ६९,१६२ | ७३,६८५ | ८०,७२० | ८५,४५२ | ८४,५९४ |
| १५ | परिवहन (रेल्वे व्यतिरिक्त) | ३,३७,३४७ | ३,६०,१४० | ३,७८,५३५ | ४,०९,५५१ | ४,३६,८५७ | ४,६४,४५६ |
| १६ | साठवण | ५,१०८ | ५,७१६ | ५,२१० | ५,५२९ | ६,०६१ | ५,८६९ |
| १७ | दळणवळण व प्रसारणासंबंधित सेवा | १,२५,९३० | १,३४,५०५ | १,५६,०३१ | १,७६,०४७ | २,०६,२१८ | २,११,२७४ |
| १८ | वित्तीय सेवा | ४,८०,२२६ | ५,२९,७९२ | ५,७७,९१४ | ६,२७,२५५ | ६,७४,०२२ | ६,८२,५५३ |
| १९ | स्थावर मालमत्ता, राहत्या घरांची मालकी व व्यावसायिक सेवा | १०,५०,६५१ | ११,५०,२३९ | १२,८९,४९३ | १४,४६,४६० | १६,२५,८९१ | १७,५५,३०४ |
| २० | सार्वजनिक प्रशासन | ४,९१,१५५ | ५,०१,३८३ | ५,१०,०४६ | ५,४३,८५३ | ५,६५,०१९ | ६,३७,०५६ |
| २१ | इतर सेवा | ५,३४,८२७ | ५,६८,२६२ | ६,००,७४८ | ६,५९,२६२ | ७,११,६९२ | ७,७६,०४७ |
| **२२** | **तृतीय / सेवा क्षेत्र** | **३९,६९,९७६** | **४३,००,८१९** | **४६,२५,८६८** | **५०,८४,५७८** | **५५,७०,२५१** | **५९,८८,३६२** |
| | **(उप-बेरीज -१३ ते २१)** | *(१००.०)* | *(१०८.३)* | *(११६.५)* | *(१२८.१)* | *(१४०.३)* | *(१५०.८)* |
| **२३** | **मूळ किंमतींनुसार एकूण स्थूल मूल्यवृध्दी** | **८१,०६,९४६** | **८५,४६,२७५** | **९०,६३,६४९** | **९७,१२,१३३** | **१,०५,०३,३४८** | **१,१२,४७,६२९** |
| | **(५+१२+२२)** | *(१००.०)* | *(१०५.४)* | *(१११.८)* | *(११९.८)* | *(१२९.६)* | *(१३८.७)* |
| २४ | आयात शुल्कांसह उत्पादनावरील कर | ८,९०,०६० | ९,६०,८११ | १०,०८,९१३ | १०,९२,४३० | ११,५१,१९३ | १२,३०,७४६ |
| २५ | वजा उत्पादनावरील अनुदान | २,६०,६७७ | २,९४,०७० | २,७१,१९२ | २,७६,८८९ | २,६८,३९६ | २,८२,३७० |
| **२६** | **देशांतर्गत स्थूल उत्पन्न (जी.डी.पी) (२३+२४-२५)** | **८७,३६,३२९** | **९२,१३,०१७** | **९८,०१,३७०** | **१,०५,२७,६७४** | **१,१३,८६,१४५** | **१,२१,९६,००६** |
| २७ | परदेशातून प्राप्त प्राथमिक उत्पन्न | **(-)७६,८२४** | **(-)१,०८,३५४** | **(-)१,२२,३४३** | **(-)१,२४,६८७** | **(-)१,३४,७२५** | **(-)१,४४,४८०** |
| **२८** | **देशांतर्गत स्थूल उत्पन्न (जी.एन.आय) (२६+२७)** | **८६,५९,५०५** | **९१,०४,६६२** | **९६,७९,०२७** | **१,०४,०२,९८७** | **१,१२,५१,४२०** | **१,२०,५१,५२५** |
| **२९** | **दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्न (₹)** | **७०,९८०** | **७३,७२२** | **७७,३७०** | **८२,१०७** | **८७,६९६** | **९२,७७५** |

*आधार* — केंद्रिय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार  +++ तिसरे सुधारित अंदाज  ++ दुसरे सुधारित अंदाज  + पहिले सुधारित अंदाज

टीप - कंसातील आकडे स्तंभ (३) शी टक्केवारी दर्शवितात. आकडेवारी संक्षिप्तात दिल्यामुळे काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत.

# परिशिष्ट ३.७

## मूळ किंमतीनुसार देशांतर्गत निव्वळ मूल्यवृध्दी व बाजार किंमतीनुसार देशांतर्गत निव्वळ उत्पन्न

## चालू किंमतींनुसार

(₹ कोटी)

| अ.क्र. | उद्योग | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५+++ | २०१५-१६++ | २०१६-१७+ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | पीक | ९,००,९७५ | ९,९३,४८० | ११,३७,६०५ | ११,६८,०६१ | ११,९२,२६४ | १३,८२,५९८ |
| २ | पशुसंवर्धन | ३,२२,१८५ | ३,६२,७६९ | ४,१५,७६३ | ५,०२,७९८ | ५,७६,४५५ | ६,३१,७६६ |
| ३ | वने व लाकूड तोडणी | १,२३,०७० | १,३६,०४५ | १,५५,०४५ | १,७२,०४९ | १,८०,५१५ | १,७८,५९५ |
| ४ | मत्स्यव्यवसाय व मत्स्यशेती | ६०,०३९ | ७१,१०७ | ८८,२२० | १,०५,५९२ | १,१९,१२५ | १,२०,८६५ |
| **५** | **कृषि व संलग्न कार्ये (उप-बेरीज-१+२+३+४)** | **१४,०६,२६८** *(१९.६)* | **१५,६३,४०१** *(१९.२)* | **१७,९६,६३३** *(१९.६)* | **१९,४८,५००** *(१९.२)* | **२०,६८,३५९** *(१८.६)* | **२३,१३,८२३** *(१८.९)* |
| ६ | खाण व दगड खाणकाम | २,२९,१८६ | २,४९,७७१ | २,५२,७८५ | २,६१,७८७ | २,५१,८८९ | २,८१,६५७ |
| **७** | **प्राथमिक क्षेत्र (उप-बेरीज - ५+६)** | **१६,३५,४५४** | **१८,१३,१७२** | **२०,४९,४१८** | **२२,१०,२८७** | **२३,२०,२४८** | **२५,९५,४८०** |
| ८ | वस्तुनिर्माण | ११,४६,९२८ | १२,८९,१२५ | १४,११,६५७ | १५,५४,६५६ | १७,७३,०२४ | १९,६३,१७१ |
| ९ | वीज, वायू , पाणीपुरवठा व इतर उपयोगिता सेवा | १,२३,८११ | १,४०,१७८ | १,७३,५७४ | १,८२,७२८ | २,२७,६२७ | २,४२,८२५ |
| १० | बांधकाम | ७,३८,१७८ | ७,९६,८४९ | ८,६६,६१० | ९,२०,९४१ | ९,३३,३०६ | ९,६८,५४१ |
| **११** | **द्वितीय क्षेत्र (उप-बेरीज - ८+९+१०)** | **२०,०८,९१७** | **२२,२६,१५२** | **२४,५१,८४१** | **२६,५८,३२५** | **२९,३३,९५७** | **३१,७४,५३७** |
| **१२** | **उद्योग (उप-बेरीज - ६+११)** | **२२,३८,१०३** *(३१.१)* | **२४,७५,९२३** *(३०.४)* | **२७,०४,६२६** *(२९.५)* | **२९,२०,११२** *(२८.७)* | **३१,८५,८४६** *(२८.७)* | **३४,५६,१९४** *(२८.२)* |
| १३ | व्यापार, दुरूस्ती, हॉटेल्स व उपाहारगृहे | ८,३८,११४ | ९,९७,२५३ | ११,२०,४५१ | १२,४७,३७१ | १३,४७,६७१ | १४,९२,४६५ |
| १४ | रेल्वे | ४८,५३१ | ५७,२३१ | ६१,४६५ | ७०,४५६ | ७५,९८६ | ७८,३९६ |
| १५ | परिवहन (रेल्वे व्यतिरिक्त) | २,८८,०६० | ३,२९,३१५ | ३,६६,८१७ | ४,१८,६५४ | ४,५५,५९० | ४,९१,८२९ |
| १६ | साठवण | ४,३५१ | ५,३३८ | ५,१३७ | ५,३७० | ५,५३३ | ५,६८६ |
| १७ | दळणवळण व प्रसारणासंबंधित सेवा | १,०२,७७६ | १,१६,८२३ | १,३३,६०४ | १,५७,२८५ | १,८७,९६७ | १,९३,९५४ |
| १८ | वित्तीय सेवा | ४,७३,३९९ | ५,२८,३२९ | ५,८९,१३२ | ६,४९,२९५ | ७,१२,४७३ | ७,२५,५८१ |
| १९ | स्थावर मालमत्ता, राहत्या घरांची मालकी व व्यावसायिक सेवा | ८,९७,८९७ | १०,४८,८११ | १२,४४,०४६ | १४,२३,५७७ | १५,९६,९०४ | १७,७०,३२४ |
| २० | सार्वजनिक प्रशासन | ४,०५,५९२ | ४,५४,१४४ | ५,०३,१८८ | ५,७१,७५५ | ६,२३,२८८ | ७,४५,८९२ |
| २१ | इतर सेवा | ४,८६,६७७ | ५,६४,२१९ | ६,४१,०२५ | ७,४९,६१४ | ८,५६,८०६ | ९,८२,७२२ |
| **२२** | **तृतीय / सेवा क्षेत्र (उप-बेरीज -१३ ते २१)** | **३५,४५,४००** *(४९.३)* | **३५,९२,७५६** *(४४.१)* | **४०,९७,८४२** *(४४.७)* | **४६,४१,६१२** *(४५.७)* | **५१,३७,१४२** *(४६.२)* | **५७,१६,९८४** *(४६.६)* |
| **२३** | **मूळ किंमतींनुसार एकूण निव्वळ मूल्यवृध्दी (५+१२+२२)** | **७१,८९,७७१** *(१००.०)* | **८१,४१,७८७** *(१००.०)* | **९१,६७,१७८** *(१००.०)* | **१,०१,६१,९८८** *(१००.०)* | **१,११,१६,४२२** *(१००.०)* | **१,२२,५६,८६५** *(१००.०)* |
| २४ | आयात शुल्कांसह उत्पादनावरील कर | ८,९०,०६० | १०,५७,९७७ | ११,८०,४४४ | १२,९१,६६२ | १५,१८,५१२ | १७,५९,६१३ |
| २५ | वजा उत्पादनावरील अनुदान | २,६०,६७७ | ३,१६,६५६ | ३,१०,०७५ | ३,२७,९८२ | ३,२१,१२० | ३,४७,४९१ |
| **२६** | **देशांतर्गत निव्वळ उत्पन्न (एन.डी.पी) (२३+२४-२५)** | **७८,१९,१५४** | **८८,८३,१०८** | **१,००,३७,५४७** | **१,११,२५,६६८** | **१,२३,१३,८१४** | **१,३६,६८,९८७** |
| २७ | परदेशातून प्राप्त प्राथमिक उत्पन्न | **(-)७६,८२४** | **(-)१,१६,७६३** | **(-)१,३९,८८४** | **(-)१,४७,४३०** | **(-)१,५९,७७९** | **(-)१,७६,३३०** |
| **२८** | **देशांतर्गत निव्वळ उत्पन्न (एन.एन.आय) (२६+२७)** | **७७,४२,३३०** | **८७,६६,३४५** | **९८,९७,६६३** | **१,०९,७८,२३८** | **१,२१,५४,०३५** | **१,३४,९२,६५७** |
| **२९** | **दरडोई राष्ट्रीय उत्पन्न (₹)** | **६३,४६२** | **७०,९८३** | **७९,११८** | **८६,६४७** | **९४,७३१** | **१,०३,८७०** |

*आधार* — केंद्रिय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार    +++ तिसरे सुधारित अंदाज    ++ दुसरे सुधारित अंदाज    + पहिले सुधारित अंदाज

टीप - कंसातील आकडे निव्वळ मूल्यवृध्दीशी टक्केवारी दर्शवितात. आकडेवारी संक्षिप्तात दिल्यामुळे काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत.

## परिशिष्ट ३.८

## मूळ किंमतीनुसार देशांतर्गत निव्वळ मूल्यवृध्दी व बाजार किंमतीनुसार देशांतर्गत निव्वळ उत्पन्न स्थिर (२०११-१२) किंमतींनुसार

(₹ कोटी)

| अ.क्र. | उद्योग | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५+++ | २०१५-१६++ | २०१६-१७+ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | पीक | ९,००,९७५ | ८,९६,३६६ | ९,४१,९२४ | ८,९६,७८५ | ८,६०,५२९ | ९,२१,९४८ |
| २ | पशुसंवर्धन | ३,२२,१८५ | ३,३८,७८६ | ३,५७,४३८ | ३,८३,८६५ | ४,१४,५४६ | ४,४१,८२१ |
| ३ | वने व लाकूड तोडणी | १,२३,०७० | १,२३,३४३ | १,३०,६६१ | १,३३,१३४ | १,३५,४९२ | १,३७,१६४ |
| ४ | मत्स्यव्यवसाय व मत्स्यशेती | ६०,०३९ | ६२,९१५ | ६७,४३६ | ७२,५३५ | ८०,०५८ | ८४,७५६ |
| **५** | **कृषि व संलग्न कार्ये (उप-बेरीज-१+२+३+४)** | **१४,०६,२६८** *(१००.०)* | **१४,२१,४०९** *(१०१.१)* | **१४,९७,४५८** *(१०६.५)* | **१४,८६,३१९** *(१०५.७)* | **१४,९०,६२५** *(१०६.०)* | **१५,८५,६८९** *(११२.८)* |
| ६ | खाण व दगड खाणकाम | २,२९,१८६ | २,२८,४०५ | २,२४,३३२ | २,४८,४७९ | २,८७,१६० | ३,२८,८९४ |
| **७** | **प्राथमिक क्षेत्र (उप-बेरीज - ५+६)** | **१६,३५,४५४** | **१६,४९,८१४** | **१७,२१,७९०** | **१७,३४,७९८** | **१७,७७,७८५** | **१९,१४,५८३** |
| ८ | वस्तुनिर्माण | ११,४६,९२८ | १२,१३,९०३ | १२,७८,८३२ | १३,९३,१५८ | १५,९१,४२५ | १७,२०,३७८ |
| ९ | वीज, वायू , पाणीपुरवठा व इतर उपयोगिता सेवा | १,२३,८११ | १,१९,३३८ | १,१८,०७६ | १,२५,०८८ | १,२६,२४४ | १,३७,९१९ |
| १० | बांधकाम | ७,३८,१७८ | ७,२८,६९१ | ७,४७,२१० | ७,८१,२८९ | ८,११,४३२ | ८,२०,२१७ |
| **११** | **द्वितीय क्षेत्र (उप-बेरीज - ८+९+१०)** | **२०,०८,९१७** | **२०,६१,९३२** | **२१,४४,११८** | **२२,९९,५३५** | **२५,२९,१०१** | **२६,७८,५१४** |
| **१२** | **उद्योग (उप-बेरीज - ६+११)** | **२२,३८,१०३** *(१००.०)* | **२२,९०,३३७** *(१०२.३)* | **२३,६८,४५०** *(१०५.८)* | **२५,४८,०१४** *(११३.८)* | **२८,१६,२६१** *(१२५.८)* | **३०,०७,४०८** *(१३४.४)* |
| १३ | व्यापार, दुरूस्ती, हॉटेल्स व उपाहारगृहे | ८,३८,११४ | ९,२७,७४४ | ९,७६,६३७ | १०,७१,२८९ | ११,८४,४८९ | १२,८८,३८४ |
| १४ | रेल्वे | ४८,५३१ | ५४,७५१ | ५७,३११ | ६१,५७१ | ६४,१७५ | ६०,५४९ |
| १५ | परिवहन (रेल्वे व्यतिरिक्त) | २,८८,०६० | ३,०३,७८० | ३,२६,३६९ | ३,५१,६३५ | ३,७५,७३९ | ३,९७,९१४ |
| १६ | साठवण | ४,३५१ | ४,९२७ | ४,३८१ | ४,६२९ | ५,०६४ | ४,८१६ |
| १७ | दळणवळण व प्रसारणासंबंधित सेवा | १,०२,७७६ | १,०८,९७० | १,१२,८४७ | १,३३,५५३ | १,५९,३१७ | १,५७,८८२ |
| १८ | वित्तीय सेवा | ४,७३,३९९ | ५,२१,५८९ | ५,६८,३४८ | ६,१६,५८२ | ६,६१,१८७ | ६,६७,६२० |
| १९ | स्थावर मालमत्ता, राहत्या घरांची मालकी व व्यावसायिक सेवा | ८,९७,८९७ | ९,७१,३१५ | १०,८६,२८२ | १२,०८,९६१ | १३,६५,३६२ | १४,६८,९०९ |
| २० | सार्वजनिक प्रशासन | ४,०५,५९२ | ४,१३,२३४ | ४,१८,३८२ | ४,४८,७८७ | ४,६६,३५९ | ५,३३,९२४ |
| २१ | इतर सेवा | ४,८६,६७७ | ५,१७,६५२ | ५,४६,६८३ | ६,०२,१५१ | ६,४८,४०९ | ७,०४,६०२ |
| **२२** | **तृतीय / सेवा क्षेत्र (उप-बेरीज -१३ ते २१)** | **३५,४५,४००** *(१००.०)* | **३८,२३,६६८** *(१०७.९)* | **४०,९७,१३१** *(११५.६)* | **४४,९९,१५८** *(१२६.९)* | **४९,३०,१०१** *(१३९.१०)* | **५२,८४,६००** *(१४९.१)* |
| **२३** | **मूळ किंमतींनुसार एकूण निव्वळ मूल्यवृध्दी (५+१२+२२)** | **७१,८९,७७१** *(१००.०)* | **७५,३५,६१६** *(१०४.८)* | **७९,६३,०३९** *(११०.८)* | **८५,३३,४९१** *(११८.७)* | **९२,३६,९८७** *(१२८.५)* | **९८,७७,६९७** *(१३७.४)* |
| २४ | आयात शुल्कांसह उत्पादनावरील कर | ८,९०,०६० | ९,६०,८११ | १०,०८,९१३ | १०,९२,४३० | ११,५१,१९३ | १२,३०,७४६ |
| २५ | वजा उत्पादनावरील अनुदान | २,६०,६७७ | २,९४,०७० | २,७१,१९२ | २,७६,८८९ | २,६८,३९६ | २,८२,३७० |
| **२६** | **देशांतर्गत निव्वळ उत्पन्न (एन.डी.पी) (२३+२४-२५)** | **७८,१९,१५४** | **८२,०२,३५५** | **८,७०,७६०** | **९३,४९,०३२** | **१,०१,१९,७८४** | **१,०८,२६,०७३** |
| २७ | परदेशातून प्राप्त प्राथमिक उत्पन्न | **(-)७६,८२४** | **(-)१,०८,३५४** | **(-)१,२२,३४३** | **(-)१,२४,६८७** | **(-)१,३४,७२५** | **(-)१,४४,४८०** |
| **२८** | **देशांतर्गत निव्वळ उत्पन्न (एन.एन.आय) २६+२७)** | **७७,४२,३३०** | **८०,९४,००१** | **८५,७८,४१७** | **९२,२४,३४३** | **९९,८५,०६०** | **१,०६,८१,५९४** |
| **२९** | **दरडोई राष्ट्रीय उत्पन्न (₹)** | **६३,४६२** | **६५,५३८** | **७८,५७२** | **७२,८०५** | **७७,८२६** | **८२,२२९** |

*आधार* — केंद्रिय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार       +++ तिसरे सुधारित अंदाज    ++ दुसरे सुधारित अंदाज    + पहिले सुधारित अंदाज

टीप - कंसातील आकडे स्तंभ (३) शी टक्केवारी दर्शवितात.      आकडेवारी संक्षिप्तात दिल्यामुळे काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत.

# परिशिष्ट ३.९
## स्थूल जिल्हा मुल्यवृध्दी - चालू किंमतींनुसार

(₹ कोटी)

| अ.क्र. | जिल्हा | २०११-१२@ | २०१२-१३@ | २०१३-१४@ | २०१४-१५@ | २०१५-१६++ | २०१६-१७+ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | मुंबई# | २,२०,९७५ | २,५१,४७३ | २,८३,५९१ | ३,१३,९९० | ३,४६,३५४ | ३,८५,००७ |
| २ | ठाणे$ | १,६३,७६१ | १,८६,२०३ | २,०९,६८५ | २,३१,९४० | २,५५,३९८ | २,८४,६८५ |
| ३ | रायगड | २९,५७६ | ३३,६७९ | ३७,९९६ | ४२,९२९ | ४७,५१२ | ५१,५६८ |
| ४ | रत्नागिरी | १३,८४२ | १५,७२८ | १८,१७२ | २२,२५५ | २१,९७५ | २६,०७१ |
| ५ | सिंधुदुर्ग | ८,०३३ | ९,१५३ | १०,३१७ | ११,१८२ | १२,०७२ | १३,८८० |
| | **कोकण विभाग** | **४,३६,१८६** | **४,९६,२३६** | **५,५९,७६०** | **६,२२,२९६** | **६,८३,३११** | **७,६१,२११** |
| ६ | नाशिक | ५५,२८९ | ६६,४८१ | ७७,२२९ | ७८,५०१ | ८४,५३४ | ९२,५४५ |
| ७ | धुळे | १४,५६४ | १६,४०८ | १८,९०६ | २१,०८६ | २२,५२३ | २४,८८५ |
| ८ | नंदुरबार | ८,०१० | ८,९९६ | १०,३७५ | १०,०२६ | ११,१८१ | १३,५८० |
| ९ | जळगाव | २९,६५७ | ३१,९१२ | ३७,३८८ | ४०,५७१ | ४३,०५४ | ४९,४२५ |
| १० | अहमदनगर | ३७,२१९ | ४०,२१३ | ४७,००९ | ५२,००५ | ५६,९८४ | ६२,९१५ |
| | **नाशिक विभाग** | **१,४४,७४०** | **१,६४,०१०** | **१,९०,९०६** | **२,०२,१८९** | **२,१८,२७६** | **२,४३,३५०** |
| ११ | पुणे | १,३१,१४५ | १,४८,८२० | १,६७,७६१ | १,८४,७६६ | २,०३,१४८ | २,२५,८७३ |
| १२ | सातारा | २५,६८४ | २८,४३२ | ३२,४१६ | ३४,८९४ | ३९,०९९ | ४२,६४४ |
| १३ | सांगली | २६,०६६ | २८,२४४ | ३२,४६३ | ३५,६६७ | ३८,३५४ | ४३,४६२ |
| १४ | सोलापूर | ३९,४५९ | ४२,६३३ | ४७,४७५ | ५३,९६५ | ५८,७४१ | ६४,६५० |
| १५ | कोल्हापुर | ४०,७३२ | ४६,३१४ | ५१,३३७ | ५६,०२० | ६१,६२६ | ६८,६८९ |
| | **पुणे विभाग** | **२,६३,०८६** | **२,९४,४४४** | **३,३१,४५२** | **३,६५,३११** | **४,००,९६९** | **४,४५,३१८** |
| १६ | औरंगाबाद | ३१,५१९ | ३४,४७७ | ४०,३९६ | ४२,८४७ | ४८,०१४ | ५४,२३९ |
| १७ | जालना | १३,१७८ | १३,६३१ | १८,३२८ | १५,८९७ | १६,७७५ | २१,२६० |
| १८ | परभणी | १२,१५० | १३,९६२ | १५,५७६ | १५,९४६ | १५,८६८ | १९,९०२ |
| १९ | हिंगोली | ५,९९४ | ७,०९० | ७,५४० | ८,६९७ | ८,१८१ | १०,०२४ |
| २० | बीड | १५,७१० | १६,६३६ | १९,५९९ | १९,५०३ | २१,१३८ | २६,६४७ |
| २१ | नांदेड | २०,९९८ | २४,०६९ | २७,०७५ | २६,८२० | २९,९२३ | ३५,७८६ |
| २२ | उस्मानाबाद | ११,७३३ | ११,५५८ | १४,४४८ | १२,९५५ | १३,५८७ | १६,३८२ |
| २३ | लातूर | १६,८८५ | १९,८५८ | २२,८५६ | २१,३२३ | २२,७९४ | २९,६३१ |
| | **औरंगाबाद विभाग** | **१,२८,१६७** | **१,४१,२८०** | **१,६५,८१७** | **१,६३,९९०** | **१,७६,२८१** | **२,१३,८७०** |
| २४ | बुलढाणा | १२,९२४ | १४,७१७ | १७,७९२ | १६,६३९ | १८,३०० | २३,१९२ |
| २५ | अकोला | १३,०३० | १५,१६७ | १६,९५२ | १७,४२५ | १९,४५० | २३,६९२ |
| २६ | वाशिम | ६,२६२ | ७,०६७ | ७,९६८ | ७,०३४ | ८,२२९ | १०,०५२ |
| २७ | अमरावती | १८,८९३ | २२,३४७ | २५,०७१ | २७,०३५ | ३०,०३३ | ३६,१८५ |
| २८ | यवतमाळ | १५,६८२ | १८,७२९ | १९,३४६ | २०,२२१ | २३,७५८ | २८,७८६ |
| | **अमरावती विभाग** | **६६,७९१** | **७८,०२७** | **८७,१२९** | **८८,३५५** | **९९,७७०** | **१,२१,९०८** |
| २९ | वर्धा | १०,०६० | ११,६०४ | १२,४८१ | १३,५३१ | १५,८४४ | १८,४८० |
| ३० | नागपूर | ५६,०२८ | ६३,८३१ | ७१,७३४ | ७९,०६१ | ८८,५१७ | १,००,३९४ |
| ३१ | भंडारा | ८,०६१ | ९,१८९ | १०,३४९ | ११,२०३ | १२,००२ | १३,७६३ |
| ३२ | गोंदिया | ८,५३९ | १०,००५ | १०,९७० | १२,००८ | १२,९३७ | १५,०१४ |
| ३३ | चंद्रपुर | १६,९४० | १९,७६३ | २१,४६८ | २३,२३१ | २६,१४९ | ३०,०६३ |
| ३४ | गडचिरोली | ५,८२१ | ६,६५३ | ६,९४९ | ७,३४६ | ७,८९४ | ८,८४५ |
| | **नागपूर विभाग** | **१,०५,४४९** | **१,२१,०४४** | **१,३३,९५२** | **१,४६,३८०** | **१,६३,३४४** | **१,८६,५५९** |

*आधार* - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन @ प्राथमिक ++ दूसरे सुधारित अंदाज + पहिले सुधारित अंदाज

# - मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा $ पालघर अंतर्भूत

टीप - सुधारीत पायाभूत वर्ष २०११-१२ च्या कार्यपद्धती व परिभाषा मधील बदलामुळे स्थूल जिल्हा मूल्यवृद्धीचे अंदाज पायाभूत वर्ष २००४-०५ मालिकेतील परिगणित करण्यात आलेल्या अंदाजाशी तुलना करता येत नाही. आकडेवारी संक्षिप्तात दिल्यामुळे काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत.

## परिशिष्ट ३.१०
## स्थूल जिल्हा मुल्यवृध्दी - स्थिर किंमतींनुसार

(₹ कोटी)

| अ.क्र. | जिल्हा | २०११-१२@ | २०१२-१३@ | २०१३-१४@ | २०१४-१५@ | २०१५-१६++ | २०१६-१७+ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | मुंबई# | २,२०,९७५ | २,३६,३२५ | २,५०,६२७ | २,७२,८५८ | २,९३,६२६ | ३,१८,८०८ |
| २ | ठाणे$ | १,६३,७६१ | १,७४,९४३ | १,८५,२६६ | २,०१,२२२ | २,१६,२५४ | २,३४,५४६ |
| ३ | रायगड | २९,५७६ | ३१,५४० | ३३,३८७ | ३७,०३६ | ३९,७९७ | ४२,५१० |
| ४ | रत्नागिरी | १३,८४२ | १४,६८८ | १५,७४९ | १८,४२३ | १७,९१५ | २०,०५० |
| ५ | सिंधुदुर्ग | ८,०३३ | ८,४९५ | ८,९५५ | ९,२८८ | ९,७७० | १०,५३८ |
| | **कोकण विभाग** | **४,३६,१८६** | **४,६५,९९०** | **४,९३,९८४** | **५,३८,८२७** | **५,७७,३६२** | **६,२६,४५२** |
| ६ | नाशिक | ५५,२८९ | ६१,२२१ | ६६,०५० | ६८,५०६ | ७२,९७९ | ७९,३४८ |
| ७ | धुळे | १४,५६४ | १५,३६४ | १६,५९७ | १८,१८७ | १८,५४८ | २०,०९१ |
| ८ | नंदुरबार | ८,०१० | ८,५०६ | ९,४०० | ८,८७० | ९,५३२ | ११,२५५ |
| ९ | जळगाव | २९,६५७ | ३०,३५६ | ३३,८२४ | ३५,६२९ | ३५,९७९ | ४०,३९१ |
| १० | अहमदनगर | ३७,२१९ | ३८,१४५ | ४२,०३६ | ४४,८२३ | ४६,०९८ | ५०,६४५ |
| | **नाशिक विभाग** | **१,४४,७४०** | **१,५३,५९२** | **१,६७,९०८** | **१,७६,०१४** | **१,८३,१३७** | **२,०१,७२९** |
| ११ | पुणे | १,३१,१४५ | १,३९,३२९ | १,४८,०९४ | १,६०,२४१ | १,७१,१६४ | १,८५,३१६ |
| १२ | सातारा | २५,६८४ | २६,४८६ | २८,७४८ | ३०,०३७ | ३२,६११ | ३४,६५९ |
| १३ | सांगली | २६,०६६ | २६,५९८ | २८,८८४ | ३०,४५८ | ३१,८२२ | ३४,९३१ |
| १४ | सोलापूर | ३९,४५९ | ४०,११२ | ४२,५९७ | ४८,०८० | ४९,८८७ | ५२,९६४ |
| १५ | कोल्हापुर | ४०,७३२ | ४३,१५१ | ४५,२७९ | ४८,३४२ | ५१,५१३ | ५५,९८५ |
| | **पुणे विभाग** | **२,६३,०८६** | **२,७५,६७६** | **२,९३,६०२** | **३,१७,१५७** | **३,३६,९९६** | **३,६३,८५५** |
| १६ | औरंगाबाद | ३१,५१९ | ३२,२२७ | ३५,८०७ | ३७,२५६ | ४०,४८५ | ४४,५५९ |
| १७ | जालना | १३,१७८ | १२,७५७ | १६,६४८ | १३,४८६ | १४,२५४ | १६,९२० |
| १८ | परभणी | १२,१५० | १३,०७० | १३,७४८ | १३,८७४ | १३,३५९ | १६,३३७ |
| १९ | हिंगोली | ५,९९४ | ६,७७५ | ६,७४४ | ७,५०१ | ६,७७१ | ७,८५७ |
| २० | बीड | १५,७१० | १५,७२५ | १७,३८५ | १७,०२२ | १७,६८० | २१,२५७ |
| २१ | नांदेड | २०,९९८ | २२,३२९ | २३,७४६ | २३,२९५ | २५,१३६ | २८,७२८ |
| २२ | उस्मानाबाद | ११,७३३ | १०,९४६ | १२,८०६ | ११,३१६ | ११,५०५ | १३,१२० |
| २३ | लातूर | १६,८८५ | १८,२८६ | २०,००८ | १८,४९६ | १९,२१६ | २३,१६६ |
| | **औरंगाबाद विभाग** | **१,२८,१६७** | **१,३२,११४** | **१,४६,८९२** | **१,४२,२४५** | **१,४८,४०७** | **१,७१,९४४** |
| २४ | बुलढाणा | १२,९२४ | १३,५१० | १५,०९६ | १३,९९७ | १५,०८२ | १७,७९० |
| २५ | अकोला | १३,०३० | १४,२२५ | १५,००१ | १५,१८५ | १६,२८९ | १८,४८४ |
| २६ | वाशिम | ६,२६२ | ६,६३० | ७,१९१ | ६,०६० | ६,८११ | ८,४४२ |
| २७ | अमरावती | १८,८९३ | २०,९३९ | २२,०७१ | २३,७२३ | २५,५७५ | २९,२१२ |
| २८ | यवतमाळ | १५,६८२ | १७,३५९ | १६,९१४ | १७,६३२ | २०,१४६ | २२,९२२ |
| | **अमरावती विभाग** | **६६,७९१** | **७२,६६३** | **७६,२७२** | **७६,५९६** | **८३,९०३** | **९६,८५०** |
| २९ | वर्धा | १०,०६० | १०,८३२ | ११,००८ | ११,८१२ | १३,११७ | १४,८१४ |
| ३० | नागपूर | ५६,०२८ | ६०,००६ | ६३,२८० | ६८,६४५ | ७४,७९८ | ८२,८६१ |
| ३१ | भंडारा | ८,०६१ | ८,५६५ | ८,९५८ | ९,४८९ | ९,९७५ | ११,०४१ |
| ३२ | गोंदिया | ८,५३९ | ९,२७८ | ९,५०८ | १०,१७२ | १०,८२४ | १२,०५२ |
| ३३ | चंद्रपुर | १६,९४० | १८,४५० | १८,९४४ | २०,१७८ | २२,०१५ | २४,४०५ |
| ३४ | गडचिरोली | ५,८२१ | ६,२१६ | ६,०५७ | ६,३१५ | ६,७२४ | ७,१८५ |
| | **नागपूर विभाग** | **१,०५,४४९** | **१,१३,३४७** | **१,१७,७५६** | **१,२६,६०९** | **१,३७,४५२** | **१,५२,३५७** |

*आधार* - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन @ प्राथमिक ++ दूसरे सुधारित अंदाज + पहिले सुधारित अंदाज

# - मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा $ पालघर अंतर्भूत

टीप - सुधारीत पायाभूत वर्ष २०११-१२ च्या कार्यपद्धती व परिभाषा मधील बदलामुळे स्थूल जिल्हा मूल्यवृद्धीचे अंदाज पायाभूत वर्ष २००४-०५ मालिकेतील परिगणित करण्यात आलेल्या अंदाजाशी तुलना करता येत नाही. आकडेवारी संक्षिप्तात दिल्यामुळे काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत.

## परिशिष्ट ३.११
## दरडोई स्थूल जिल्हा मुल्यवृध्दी - चालू किंमतींनुसार

(₹)

| अ.क्र. | जिल्हा | २०११-१२@ | २०१२-१३@ | २०१३-१४@ | २०१४-१५@ | २०१५-१६++ | २०१६-१७+ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | मुंबई# | १,७५,७४२ | १,९६,४३३ | २,१७,५८० | २,३६,६२७ | २,५६,३९१ | २,७९,९६५ |
| २ | ठाणे$ | १,४६,७३८ | १,६४,२९५ | १,८२,१८६ | १,९८,४४६ | २,१५,१८० | २,३६,१९९ |
| ३ | रायगड | १,११,५६६ | १,२५,६६६ | १,४०,२३९ | १,५६,७२९ | १,७१,५८४ | १,८४,२१५ |
| ४ | रत्नागिरी | ८५,२७७ | ९६,०६८ | १,१०,०५३ | १,३३,६३५ | १,३०,८२९ | १,५३,८९९ |
| ५ | सिंधुदुर्ग | ९४,०९१ | १,०६,३४७ | १,१८,८९५ | १,२७,८२६ | १,३६,८९१ | १,५६,१२० |
| | **कोकण विभाग** | **१,५१,१३०** | **१,६९,२८७** | **१,८८,०१९** | **२,०५,८१०** | **२,२२,५१६** | **२,४४,०७८** |
| ६ | नाशिक | ८९,९२५ | १,०६,८८७ | १,२२,७४२ | १,२३,३३३ | १,३१,२८८ | १,४२,०८१ |
| ७ | धुळे | ७०,६०७ | ७८,७६३ | ८९,८६५ | ९९,२४३ | १,०४,९६५ | १,१४,८३४ |
| ८ | नंदुरबार | ४८,३५२ | ५३,८३९ | ६१,५५८ | ५८,९७८ | ६५,२११ | ७८,५३१ |
| ९ | जळगाव | ६९,६९२ | ७४,२२० | ८६,०६४ | ९२,४३५ | ९७,०८४ | १,१०,३०९ |
| १० | अहमदनगर | ८१,४९४ | ८७,२६२ | १,०१,०९५ | १,१०,८४० | १,२०,३६८ | १,३१,७११ |
| | **नाशिक विभाग** | **७७,४४१** | **८६,८६२** | **१,००,०८०** | **१,०४,९२१** | **१,१२,१२०** | **१,२३,७३४** |
| ११ | पुणे | १,३७,९८० | १,५४,४५९ | १,७१,७६२ | १,८६,६१६ | २,०२,४०७ | २,२२,००८ |
| १२ | सातारा | ८५,०६६ | ९३,३३६ | १,०५,४७४ | १,१२,५३५ | १,२४,९८८ | १,३५,१२२ |
| १३ | सांगली | ९१,८४६ | ९८,५६८ | १,१२,२११ | १,२२,१०६ | १,३०,०५३ | १,४५,९६९ |
| १४ | सोलापूर | ९०,८३५ | ९७,१२७ | १,०७,०४१ | १,२०,४१६ | १,२९,७२० | १,४१,२९२ |
| १५ | कोल्हापुर | १,०४,४५८ | १,१७,५५४ | १,२८,९६५ | १,३९,२८६ | १,५१,६५४ | १,६७,३०३ |
| | **पुणे विभाग** | **१,११,४५२** | **१,२३,३२३** | **१,३७,२५१** | **१,४९,५५८** | **१,६२,२९७** | **१,७८,२०७** |
| १६ | औरंगाबाद | ८४,५८० | ९१,४४२ | १,०५,८९७ | १,११,०१९ | १,२२,९६१ | १,३७,२९१ |
| १७ | जालना | ६६,९१७ | ६८,६०८ | ९१,४२९ | ७८,६०३ | ८२,२१० | १,०३,२६९ |
| १८ | परभणी | ६५,७७८ | ७४,८१९ | ८२,६१८ | ८३,७२३ | ८२,४६५ | १,०२,३७३ |
| १९ | हिंगोली | ५०,६५९ | ५९,४२२ | ६२,६६१ | ७१,६७६ | ६६,८५६ | ८१,२३५ |
| २० | बीड | ६०,४५५ | ६३,४४५ | ७४,०८१ | ७३,०६१ | ७८,४८० | ९८,०५२ |
| २१ | नांदेड | ६२,११३ | ७०,५०४ | ७८,५३५ | ७७,०३८ | ८५,११५ | १,००,७९९ |
| २२ | उस्मानाबाद | ७०,४२९ | ६८,७८० | ८५,२३८ | ७५,७७७ | ७८,७९३ | ९४,१८८ |
| २३ | लातूर | ६८,४१७ | ७९,६९१ | ९०,८५० | ८३,९४६ | ८८,८७९ | १,१४,४३६ |
| | **औरंगाबाद विभाग** | **६८,०३२** | **७४,२६२** | **८६,३१०** | **८४,५२८** | **८९,९७९** | **१,०८,१०४** |
| २४ | बुलढाणा | ४९,७०६ | ५६,०८९ | ६७,१९२ | ६२,२६९ | ६७,८६३ | ८५,२२७ |
| २५ | अकोला | ७१,३६८ | ८२,१४५ | ९०,७८६ | ९२,२८२ | १,०१,८५३ | १,२२,६८७ |
| २६ | वाशिम | ५२,०४२ | ५८,२२० | ६५,०७३ | ५६,९५१ | ६६,०४९ | ७९,९८५ |
| २७ | अमरावती | ६४,९९८ | ७६,०५५ | ८४,४१२ | ९०,०४९ | ९८,९६१ | १,१७,९५४ |
| २८ | यवतमाळ | ५६,२६६ | ६६,५८५ | ६८,१५१ | ७०,५८२ | ८२,१७६ | ९८,६६१ |
| | **अमरावती विभाग** | **५८,९८७** | **६८,२३४** | **७५,४४७** | **७५,७५८** | **८४,७०८** | **१,०२,४९१** |
| २९ | वर्धा | ७६,८७० | ८७,७४८ | ९३,४०५ | १,००,२१४ | १,१६,१३४ | १,३४,०५२ |
| ३० | नागपूर | १,१९,३८७ | १,३४,०६४ | १,४८,५०४ | १,६१,३२८ | १,७८,०३६ | १,९९,०३५ |
| ३१ | भंडारा | ६६,८०७ | ७५,४८० | ८४,२५५ | ९०,३९३ | ९५,९८९ | १,०९,०९७ |
| ३२ | गोंदिया | ६४,२३८ | ७४,६१९ | ८१,११३ | ८८,०३१ | ९४,०२२ | १,०८,१८२ |
| ३३ | चंद्रपुर | ७६,३७३ | ८८,१४९ | ९४,७३६ | १,०१,४२३ | १,१२,९४८ | १,२८,४७२ |
| ३४ | गडचिरोली | ५४,००४ | ६१,२२९ | ६३,४५१ | ६६,५४७ | ७०,९४७ | ७८,८६३ |
| | **नागपूर विभाग** | **८९,११०** | **१,०१,१२०** | **१,१०,६२४** | **१,१९,५०६** | **१,३१,८३१** | **१,४८,८४७** |

*आधार* - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन @ प्राथमिक ++ दूसरे सुधारित अंदाज + पहिले सुधारित अंदाज

\# - मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा $ पालघर अंतर्भूत

टीप - सुधारीत पायाभूत वर्ष २०११-१२ च्या कार्यपद्धती व परिभाषा मधील बदलामुळे स्थूल जिल्हा मूल्यवृद्धीचे अंदाज पायाभूत वर्ष २००४-०५ मालिकेतील परिगणित करण्यात आलेल्या अंदाजाशी तुलना करता येत नाही.

# ४

# किंमती व सार्वजनिक वितरण व्यवस्था









# ४. किंमती व सार्वजनिक वितरण व्यवस्था

४.१ किंमतीमधील मोठ्या प्रमाणातील बदलांचा राहणीमानावर प्रामुख्याने दोन प्रकारे परिणाम होतो. पहिला वस्तूंच्या वापराच्या प्रमाणातील बदल व दुसरा स्वरूपातील बदल होय. किंमतीतील प्रतिकूल बदलांवर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाकडून विविध उपाययोजना केल्या जातात. सार्वजनिक वितरण व्यवस्था हे त्याचे एक माध्यम आहे.

## किंमती

४.२ मागणी व पुरवठ्यातील तफावत, ग्राहकांच्या क्रयशक्तीतील बदल आणि आंतरराष्ट्रीय अरिष्ट यांचा चलनवाढीवर परिणाम होतो. अती प्रमाणामध्ये किंमतीत वाढ यामुळे केवळ सर्वसामान्यांचे दैनंदिन जीवनच नव्हे तर अर्थव्यवस्थेवरही दूरगामी परिणाम होतो. त्यामुळे शासन नियमितपणे चलनवाढीचे परिक्षण करते.

### राज्याचे ग्राहक किंमती निर्देशांक

४.३ ग्राहक किंमती निर्देशांकाच्या आधारे चलनवाढीचा दर मोजला जातो. अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन यांचेतर्फे राज्याच्या ग्रामीण व नागरी भागाकरिता स्वतंत्रपणे मासिक ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष २००३) परिगणित केले जातात. त्यासाठी ग्रामीण भागातील ६८ केंद्रांमधून १०६ बाबींच्या आणि नागरी भागातील ७४ केंद्रांमधून १२७ बाबींच्या किरकोळ किंमती नियमित संकलित केल्या जातात.

४.४ एप्रिल ते डिसेंबर, २०१७ या कालावधीत ग्रामीण व नागरी भागांकरिता सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे २७१.३ व २६०.७ होता. याच कालावधीत खाद्यपदार्थ गटाचा ग्रामीण व नागरी भागांकरिता सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे २७२.७ व २८१.४ होता, तर मागील वर्षी याच कालावधीमध्ये तो अनुक्रमे २७३.८ व २८०.८ होता. इंधन, वीज व दिवाबत्ती गटाचा ग्रामीण व नागरी भागांकरिता सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे ४९७.१ व ४५७.० होता, तर मागील वर्षी याच कालावधीमध्ये तो अनुक्रमे ४५५.६ व ४१८.५ होता. ग्रामीण व नागरी भागांकरिता गटनिहाय ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे परिशिष्ट ४.१ व परिशिष्ट ४.२ मध्ये दिले आहेत.

४.५ एप्रिल ते डिसेंबर, २०१७ या कालावधीतील सरासरी ग्राहक किंमती निर्देशांकावर आधारित वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचा दर ग्रामीण भागासाठी १.८ टक्के तर नागरी भागासाठी तो २.१ टक्के होता. एप्रिल ते डिसेंबर, २०१७ या कालावधीत खाद्यपदार्थ गटाचा वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचा दर ग्रामीण भागांसाठी (-)०.४ टक्के आणि नागरी भागासाठी ०.२ टक्के होता. ग्रामीण व नागरी भागांकरिता उपगट निहाय खाद्यपदार्थांतील वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचा दर तक्ता ४.१ मध्ये दिला आहे.

**तक्ता ४.१ सरासरी ग्राहक किंमती निर्देशांकावर आधारित खाद्यपदार्थ गटातील उपगटनिहाय चलनवाढ (एप्रिल - डिसेंबर)**

(टक्के)

| गट | ग्रामीण | | नागरी | |
|---|---|---|---|---|
| | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१६-१७ | २०१७-१८ |
| **खाद्यपदार्थ गट** | ४.६ | (-)०.४ | ४.६ | ०.२ |
| तृणधान्ये व उत्पादने | ४.३ | ३.५ | ३.१ | ४.० |
| कडधान्ये व उत्पादने | १२ | (-)३१.६ | १०.२ | (-)३३.९ |
| दूध व दुग्धजन्य पदार्थ | ३.८ | ५.७ | ३.८ | ५.३ |
| खाद्य तेल | ४.७ | १.५ | ६.२ | ०.१ |
| अंडी,मांस व मासे | २.५ | ४.० | ४.४ | १.५ |
| भाज्या व फळे | (-)६.२ | ५.९ | (-)२.१ | ६.८ |
| मसाले व मसाल्याचे पदार्थ | १३.३ | (-)६.५ | ११.७ | (-)११.६ |
| इतर खाद्यपदार्थ | १६.४ | ५.९ | ९.३ | ३.९ |

आधार: अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

**आलेख ४.१: राज्यातील नागरी भागाकरिता प्रमुख गटांसाठी गटनिहाय ग्राहक किंमती निर्देशांकावर आधारित चलनवाढ**




**आलेख ४.२ : राज्यातील ग्रामीण भागाकरिता प्रमुख गटांसाठी गटनिहाय ग्राहक किंमती निर्देशांकावर आधारित चलनवाढ**




## इतर संस्थांद्वारे परिगणित ग्राहक किंमती निर्देशांक

४.६ केंद्रिय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार यांचेमार्फत अखिल भारतीय आणि राज्य / केंद्रशासित प्रदेशाकरिता ग्रामीण, नागरी भागासाठी आणि एकत्रित मासिक ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष २०१२) परिगणित व प्रकाशित केले जातात. यासाठी १,१८१ ग्रामीण केंद्रांमधून २८१ बाबी व १,११४ नागरी केंद्रांमधून २८७ बाबींच्या किंमती संकलित केल्या जातात, त्यापैकी राज्याच्या ग्रामीण भागातील ६६ आणि नागरी भागातील ८६ केंद्रांचा यात समावेश आहे. एप्रिल ते डिसेंबर, २०१७ या कालावधीतील महाराष्ट्रासाठी परिगणित केलेले ग्रामीण, नागरी आणि एकत्रित सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे १३९.९, १२८.१ आणि १३२.१ असून त्यांच्या चलनवाढीचा दर अनुक्रमे ५.१ टक्के, ३.१ टक्के व ३.८ टक्के होता.

४.७ श्रम केंद्र, भारत सरकार यांचेमार्फत पायाभूत वर्ष १९८६-८७ वर आधारित शेत मजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक व ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक दरमहा प्रकाशित केले जातात. किंमतींचे संकलन ६०० केंद्रांमधून केले जाते, त्यापैकी ५४ केंद्रे राज्यातील आहेत. एप्रिल ते डिसेंबर, २०१७ करिता राज्यासाठी शेत मजुरांकरिता सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक आणि ग्रामीण मजुरांकरिता सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे ९५९.८ आणि ९५३.८ होते, गतवर्षीच्या तत्सम कालावधीच्या तुलनेत चलनवाढीचा दर अनुक्रमे ०.९ टक्के आणि एक टक्का होता. राज्यासाठी शेत मजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक व ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक परिशिष्ट ४.४ मध्ये दिले आहेत.

४.८ औद्योगिक कामगारांकरिताचा ग्राहक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष २००१) हा मुख्यत: मजुरी व वेतनामधील महागाई भत्ता निर्धारित करण्यासाठी वापरला जातो तसेच नियत कार्यक्षेत्रातील किमान मजुरी दर निश्चिती व पुनर्रचना यासाठी वापरला जातो. सदर निर्देशांक हा श्रम केंद्र, भारत सरकार यांचेमार्फत दरमहा परिगणित व प्रकाशित केला जातो. औद्योगिक कामगारांकरिताचा ग्राहक किंमती निर्देशांक हा भारतातील औद्योगिकदृष्ट्या विकसित अशा निवडक ७८ केंद्रांमधील जीवनावश्यक वस्तू आणि सेवा यांच्या किरकोळ किंमतींवर आधारित असून त्यामध्ये राज्यातील पाच केंद्रांचा समावेश आहे. या पाच केंद्रांबरोबरच राज्यातील पाच अतिरिक्त केंद्रांसाठी

कामगार आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र शासन यांच्याकडून औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक स्वतंत्रपणे तयार करण्यात येतात. राज्यातील केंद्रांसाठी औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक परिशिष्ट ४.७ मध्ये दिला आहे.

## अखिल भारतीय ग्राहक किंमती निर्देशांक

४.९ एप्रिल ते डिसेंबर, २०१७ या कालावधीतील केंद्रिय सांख्यिकी कार्यालयाने परिगणित केलेले अखिल भारतीय ग्रामीण, नागरी आणि एकत्रित सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे १३६.६, १३२.० आणि १३४.५ असून त्यांच्या चलनवाढीचा दर अनुक्रमे ३.२ टक्के, ३.३ टक्के आणि ३.३ टक्के होता. सर्व राज्यांसाठी ग्रामीण, नागरी आणि एकत्रित ग्राहक किंमती निर्देशांक परिशिष्ट ४.३ मध्ये दिले आहेत.

४.१० एप्रिल ते डिसेंबर, २०१७ या कालावधीतील श्रम केंद्र, भारत सरकार यांच्याकडून परिगणित केलेले अखिल भारतीय शेत मजुरांकरिता सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक आणि ग्रामीण मजुरांकरिता सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे ८८८.४ आणि ८९४.४ असून त्यांच्या चलनवाढीचा दर अनुक्रमे २.१ टक्के आणि २.२ टक्के होता. अखिल भारतीय शेत मजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक आणि ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक परिशिष्ट ४.४ मध्ये दिले आहेत.

४.११ एप्रिल ते डिसेंबर, २०१७ या कालावधीतील अखिल भारतीय औद्योगिक कामगारांकरिता सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक २८३.४ असून तो २.५ टक्के चलनवाढ दर्शवितो. अखिल भारतीय औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक व केंद्रिय केंद्रांसाठीचा औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे परिशिष्ट ४.५ व परिशिष्ट ४.६ मध्ये दिले आहेत.

## अखिल भारतीय घाऊक किंमती निर्देशांक

४.१२ घाऊक किंमती निर्देशांक हा ठराविक कालावधीतील देशांतर्गत सर्व वस्तूंच्या घाऊक व्यवहारांच्या किंमतींतील बदलांचे मापन करतो. आर्थिक सल्लागार यांचे कार्यालय, वाणिज्य व उद्योग मंत्रालय, भारत सरकार यांचेमार्फत निर्देशांक परिगणित व प्रकाशित केले जातात. घाऊक किंमती निर्देशांक परिगणित करण्याकरिता विचारात घेतल्या जाणाऱ्या विविध वस्तूंचे वर्गीकरण प्राथमिक वस्तू, इंधन व वीज आणि निर्मित वस्तू या गटांत केले जाते.

४.१३ सर्व वस्तूंसाठी घाऊक किंमती निर्देशांक (पायाभूत वर्ष २०११-१२) एप्रिल, २०१७ मधील ११३.२ वरुन डिसेंबर, २०१७ मध्ये ११५.७ पर्यंत वाढला. याच कालावधीत प्राथमिक वस्तू गटाच्या निर्देशांकात १२७.४ वरुन १३१.७ पर्यंत, इंधन व वीज या गटात ९१.७ वरुन ९६.५ पर्यंत आणि निर्मित वस्तू गटात ११२.६ वरुन ११४.० पर्यंत वाढ झाली. गटनिहाय घाऊक किंमती निर्देशांक परिशिष्ट ४.८ मध्ये दिले आहेत.

४.१४ घाऊक किंमती निर्देशांकावर आधारित वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचा दर एप्रिल, २०१७ मधील ३.९ टक्क्यांवरून डिसेंबर, २०१७ मध्ये ३.६ टक्क्यांपर्यंत घटला. प्राथमिक वस्तू गटातील वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचा दर एप्रिल, २०१७ मधील एक टक्क्यावरून डिसेंबर, २०१७ मध्ये तो ३.९ टक्क्यांपर्यंत वाढला. निर्मित वस्तू गटातील वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचा दर एप्रिल, २०१७ मधील ३.१ टक्क्यांवरून डिसेंबर, २०१७ मध्ये २.६ टक्क्यांपर्यंत घटला. इंधन व वीज गटातील वर्ष-ते-वर्ष चलनवाढीचा दर एप्रिल, २०१७ मधील १७.१ टक्क्यांवरून डिसेंबर, २०१७ मध्ये ९.२ टक्क्यांपर्यंत घटला. प्राथमिक वस्तू गटातील खाद्यपदार्थ उपगटाचा चलनवाढीचा दर एप्रिल, २०१७ मधील ०.६ टक्क्यांवरून वाढ होऊन तो डिसेंबर, २०१७ मध्ये ४.७ टक्के झाला. अखिल भारतीय स्तराकरिता महत्त्वाच्या किंमतींच्या निर्देशांकांवर आधारित चलनवाढीचे दर परिशिष्ट ४.९ मध्ये दिले आहेत.

**आलेख ४.३ : अखिल भारतीय घाऊक किंमती निर्देशांकाची चलनवाढ**



# सार्वजनिक वितरण व्यवस्था

४.१५ दारिद्र्य उच्चाटन, विश्व संरक्षण व समस्त मानवास शांतता व समृध्दीचा लाभ याची खात्री यांचा शाश्वत विकासाच्या ध्येयांमध्ये समावेश आहे. ही १७ ध्येये परस्परांशी निगडीत असून भागीदारी व व्यवहारीकतेच्या भावनेतून योग्य निवडीद्वारे जीवनमान उंचावण्याचा दृष्टिकोन आहे. दारिद्र्य निर्मूलन अजेंडा २०३० च्या केंद्रस्थानी आहे. शाश्वत विकासाची ध्येय साध्य करण्यासाठी सहाय्यभूत ठरणारी सार्वजनिक वितरण व्यवस्था ही एक प्रभावी यंत्रणा आहे. या व्यवस्थेमध्ये लाभार्थ्यांच्या सुनिश्चित गटांकरिता जीवनावश्यक वस्तूंच्या खरेदी प्रक्रियेचे व्यवस्थापन व अनुदानीत किंमतींमध्ये वितरण यांचा समावेश आहे.

४.१५.१ वस्तूंची खरेदी, साठवणूक व घाऊक वितरणाची जबाबदारी केंद्र शासनाची असून दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे निश्चित करणे, शिधापत्रिका वाटप करणे, रास्तभाव दुकानांमार्फत लाभार्थी कुटुंबांना वस्तूंचे वितरण करणे आणि रास्तभाव दुकानांच्या कार्यप्रणालीवर देखरेख व संनियंत्रण ठेवणे ही जबाबदारी राज्य शासनाची आहे. रास्त भाव दुकानांमार्फत वितरीत केल्या जाणाऱ्या वस्तूंमध्ये प्रामुख्याने गहू, तांदूळ, साखर व केरोसीन यांचा समावेश आहे. रास्तभाव दुकान स्थापन करताना व चालविताना शिधापत्रिकाधारकांची सोय आणि क्षेत्राच्या भौगोलिक रचनेचा विचार करून सुदूर क्षेत्रातदेखील अन्नधान्याची उपलब्धता निश्चित करण्याच्या दृष्टीने विचार केला जातो.

४.१६ राज्यात ३१ डिसेंबर, २०१७ रोजी ५१,२७३ रास्त भाव दुकाने कार्यरत आहेत. त्यापैकी ५,४२७ आदिवासी भागात व २८ फिरती रास्त भाव दुकाने आहेत. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमानुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे कार्य प्रभावीपणे होण्याकरिता रास्त भाव दुकानांना परवाने देताना सार्वजनिक संस्थांना प्राधान्य देण्यात आले आहे. मालकीच्या प्रकारानुसार रास्त भाव दुकानांची संख्या तक्ता ४.२ मध्ये देण्यात आली आहे, तर निवडक राज्यांमधील रास्त भाव दुकाने तक्ता ४.३ मध्ये दिली आहेत.

**तक्ता ४.२ मालकीच्या प्रकारानुसार रास्त भाव दुकाने**

(३१ डिसेंबर, २०१७ रोजी)

| मालकीचा प्रकार | रास्त भाव दुकाने (संख्या) |
|---|---|
| वैयक्तिक (सर्वसाधारण) | ३०,०१० |
| अनुसूचित जाती | ३,३५६ |
| अनुसूचित जमाती | ३,४८६ |
| माजी सैनिक | २४९ |
| महिला स्व-सहाय्यता गट | ४,५२० |
| पुरुष स्व-सहाय्यता गट | १०५ |
| ग्रामपंचायत | १६३ |
| नागरी स्थानिक संस्था | १६९ |
| सहकारी | ८,००६ |
| इतर | १,२०९ |
| **एकूण** | **५१,२७३** |

*आधार* : अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

**तक्ता ४.३ निवडक राज्यांमधील रास्त भाव दुकाने**

(३१ डिसेंबर, २०१७ रोजी)

| राज्य | रास्त भाव दुकाने (संख्या) |
|---|---|
| आंध्र प्रदेश | २८,५४६ |
| गुजरात | १७,२३७ |
| कर्नाटक | २०,४९७ |
| केरळ | १४,३३५ |
| मध्य प्रदेश | २२,४०१ |
| **महाराष्ट्र** | **५१,२५९** |
| राजस्थान | २५,६८५ |
| तेलंगणा | १७,१६९ |
| उत्तर प्रदेश | ७९,४०२ |
| **अखिल भारत** | **५,२६,३७७** |

*आधार* : अन्न व सार्वजनिक वितरण विभाग, केंद्र शासन

४.१६.१ पुरविण्यात आलेल्या अन्नधान्याच्या गुणवत्तेची खात्री करण्यासाठी आणि गैरव्यवहार रोखण्यासाठी रास्त भाव दुकानांची निरिक्षणे नियमित घेतली जातात. जानेवारी ते डिसेंबर, २०१७ या कालावधीत निरिक्षणांच्या १.०३ लाख लक्ष्याच्या तुलनेत ०.८७ लाख निरिक्षणे घेण्यात आली. एकूण २०९ रास्त भाव दुकानांचे परवाने रद्द, २९९ दुकानांचे परवाने निलंबित केले व ₹ १०१.७३ लाख दंड वसूल करण्यात आला. याबरोबरच सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत जीवनावश्यक वस्तूंच्या वितरणावर आणि संनियंत्रणामध्ये जनतेचा खात्रीशीर सहभाग असण्यासाठी राज्यात निरनिराळ्या स्तरावर दक्षता समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. सन २०१७-१८ मध्ये डिसेंबर अखेर गठीत करण्यात आलेल्या दक्षता समित्यांची संख्या महानगरपालिका स्तरावर २७, नगरपालिका स्तरावर १७२, जिल्हा स्तरावर ३२, तालुका स्तरावर ३२१ आणि गाव स्तरावर २७,९२८ असून मागील वर्षी याच कालावधीत दक्षता समित्यांची संख्या महानगरपालिका स्तरावर २५, नगरपालिका स्तरावर १४४, जिल्हा स्तरावर ३१ आणि तालुका स्तरावर २८८ होती.

४.१७ डिसेंबर, २०१७ अखेर एकूण २.५६ कोटी शिधापत्रिकाधारक असून त्यापैकी सुमारे ०.४५ कोटी दारिद्र्य रेषेखालील आणि सुमारे ०.२५ कोटी 'अंत्योदय अन्न योजना' (अंअयो) शिधापत्रिकाधारक होते. केंद्रपुरस्कृत अन्नपूर्णा योजना ही राज्यामार्फत राबविली जात आहे. राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन अथवा राज्य निवृत्ती वेतन या योजनांतर्गत लाभ मिळत नसलेल्या ६५ वर्ष व त्यावरील वयाच्या निराधार वृद्धांना या योजनेअंतर्गत दरमहा १० किलो धान्य मोफत पुरविले जाते. डिसेंबर, २०१७ अखेर अन्नपूर्णा शिधापत्रिकाधारकांची संख्या ०.४८ लाख होती. शिधापत्रिकांची पडताळणी मोहीम घेण्यात आली आणि २०१७-१८ मध्ये डिसेंबर अखेर २.२३ लाख शिधापत्रिका रद्द करण्यात आल्या. शिधापत्रिकाधारकांची प्रकारानुसार संख्या तक्ता ४.४ मध्ये आणि जिल्हानिहाय शिधापत्रिकाधारकांची संख्या परिशिष्ट ४.१० मध्ये देण्यात आली आहे.

**आलेख ४.४ : ३१ डिसेंबर, २०१७ रोजी प्रकारानुसार शिधापत्रिकाधारकांचे प्रमाण**




**आलेख ४.५ : ३१ डिसेंबर, २०१७ रोजी विभागनिहाय शिधापत्रिका**




**तक्ता ४.४ प्रकारानुसार शिधापत्रिकाधारकांची संख्या**

(३१ डिसेंबर रोजी)

| वर्ष | शिधापत्रिकांची संख्या (लाख) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पिवळी | | केशरी दारिद्र्य रेषेवरील | अन्नपूर्णा | शुभ्र | एकूण |
| | दारिद्र्य रेषेखालील | अंत्योदय अन्न योजना | | | | |
| २०१५ | ४८.६६ | २५.०५ | १५१.७९ | ०.६२ | २०.९७ | २४७.०९ |
| २०१६ | ४२.९५ | २५.०२ | १५८.०९ | ०.५१ | २१.३६ | २४७.९३ |
| २०१७ | ४५.१५ | २५.१५ | १६३.४५ | ०.४८ | २२.१३ | २५६.३६ |

*आधार :* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

## राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमाअंतर्गत लाभार्थी

४.१८ केंद्र शासनाने राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम २०१३ अंमलात आणला. सदर अधिनियमाचा उद्देश नागरिकांच्या अन्नाची गरज भागविण्याकरिता पुरेसे दर्जेदार अन्नधान्य रास्त दराने उपलब्ध होण्याच्या हमीने अन्न व पोषण सुरक्षा पुरविणे असा आहे. राज्यात २०१४ पासून राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमाची अंमलबजावणी करण्यात येत असून त्यानुसार राज्यातील सुमारे सात कोटी (६२.३ टक्के) लोकसंख्या अनुदानित दराने धान्य मिळण्यास पात्र आहे. यापैकी सुमारे ४.७ कोटी लोकसंख्या ग्रामीण भागातील व सुमारे २.३ कोटी लोकसंख्या नागरी भागातील आहे. या अधिनियमांतर्गत लाभार्थ्यांचे अंत्योदय अन्न योजना लाभार्थी आणि प्राधान्य कुटुंब लाभार्थी असे गट करण्यात आले आहेत. दारिद्र्य रेषेखालील सर्व कुटुंब आणि दारिद्र्य रेषेवरील कुटुंबांपैकी (केशरी शिधापत्रिकाधारक) ग्रामीण भागातील २१६.८५ लाख कुटुंब (वार्षिक उत्पन्न ₹ ४४,००० पर्यंत असणारी) व नागरी भागातील १८३.२२ लाख (वार्षिक उत्पन्न ₹ ५९,००० पर्यंत असणारी) यांना प्राधान्य गटातील कुटुंब संबोधण्यात येते.

४.१८.१ या अधिनियमानुसार अंत्योदय अन्न योजनेखालील लाभार्थ्यांना पूर्वीप्रमाणे प्रतिमाह प्रति कुटुंब ३५ किलो धान्य मिळते आणि प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना (५.९२ कोटी लाभार्थी) प्रति व्यक्ति प्रतिमाह पाच किलोप्रमाणे धान्य मिळते. सदर अधिनियमानुसार लाभार्थ्यांना तीन रुपये प्रति किलो दराने तांदूळ, दोन रुपये प्रति किलो दराने गहू व एक रुपया प्रति किलो दराने भरडधान्य देणे बंधनकारक

आहे. प्राधान्य कुटुंब व अंत्योदय अन्न योजना लाभार्थ्यांकरिता अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना केलेले वाटप तक्ता ४.५ मध्ये दिले आहे आणि सन २०१६-१७ व सन २०१७-१८ मध्ये डिसेंबरपर्यंत अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत अन्नधान्याचे विभागनिहाय नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना केलेले वाटप अनुक्रमे परिशिष्ट ४.१४ व ४.१५ मध्ये दिले आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत समाविष्ट व्यक्ती आणि शिधापत्रिकांची संख्या तक्ता ४.६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ४.५ राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना केलेले वाटप**

(लाख मे.टन)

| लाभार्थी | वर्ष | तांदूळ | | | गहू | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना केलेले वाटप | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना केलेले वाटप |
| प्राधान्य कुटुंब | २०१५-१६ | १५.१७ | १३.३१ | १५.७० | २०.६० | १८.०१ | १८.८६ |
| | २०१६-१७ | १५.१७ | १४.१८ | १४.११ | २०.३६ | १९.०४ | १८.९५ |
| | २०१७-१८+ | ११.६६ | १०.६० | १०.७७ | १४.९५ | १३.८० | ११.७० |
| अंअयो | २०१५-१६ | ५.१३ | ४.९७ | ४.९२ | ५.२८ | ४.९८ | ४.९७ |
| | २०१६-१७ | ५.०४ | ४.८७ | ४.८३ | ५.४८ | ५.२२ | ५.२१ |
| | २०१७-१८+ | ३.५० | ३.२८ | ३.२८ | ४.३८ | ४.१४ | ३.५६ |

*आधार:* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

**तक्ता ४.६ राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत समाविष्ट व्यक्ती आणि शिधापत्रिकांची संख्या**

(लाख )

| राज्य | समाविष्ट व्यक्ती | | | शिधापत्रिका (३१ मार्च, २०१७ रोजी) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | एकूण | अंअयो | प्राधान्य कुटुंब | एकूण |
| आंध्र प्रदेश | २००.२० | ६८.०३ | २६८.२३ | ९.२४ | ८५.१२ | ९४.३६ |
| गुजरात | २५८.७८ | १२४.०६ | ३८२.८५ | ८.१२ | ६४.१९ | ७२.३० |
| कर्नाटक | २८५.५५ | ११६.३८ | ४०१.९३ | ७.९५ | ९७.५३ | १०५.४८ |
| केरळ | ९१.८७ | ६२.९३ | १५४.८० | ५.९६ | २८.३७ | ३४.३३ |
| मध्य प्रदेश | ४२०.८३ | १२५.५९ | ५४६.४२ | १४.०४ | १०१.३३ | ११५.३८ |
| **महाराष्ट्र** | **४६९.७१** | **२३०.४५** | **७००.१७** | **२५.०५** | **१२३.२३** | **१४८.२८** |
| राजस्थान | ३५६.०९ | ९०.५३ | ४४६.६२ | ६.६२ | ९५.४४ | १०२.०५ |
| तेलंगणा | १४३.०८ | ४८.६२ | १९१.७० | ५.५६ | ४३.७२ | ४९.२८ |
| उत्तर प्रदेश | १,२३४.०६ | २८६.५२ | १,५२०.५९ | ४०.९५ | ३००.२६ | ३४१.२० |
| **अखिल भारत** | **६,२४९.३०** | **१,८८५.६१** | **८,१३४.९१** | **२६६.८०** | **२,०५३.२०** | **२,३२०.००** |

*आधार* : अन्न व सार्वजनिक वितरण विभाग,केंद्र शासन टिप : आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे एकूण बेरजा जुळतीलच असे नाही

## राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत समाविष्ट नसलेले लाभार्थी

४.१९ राज्यातील राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत समाविष्ट नसलेले औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व जिल्हे आणि नागपूर विभागातील वर्धा जिल्हा या जिल्ह्यांमधील दारिद्र्य रेषेवरील शेतकऱ्यांना (सुमारे ६८ लाख केशरी शिधापत्रिकाधारक) ऑगस्ट, २०१५ पासून प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना लागू असलेल्या दराने व परिमाणानुसार अन्नधान्याचा पुरवठा राज्य शासनाच्या खर्चाने करण्यात येत आहे. दारिद्र्य रेषेवरील केशरी शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांसाठी अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना केलेले वाटप तक्ता ४.७ मध्ये दिले आहे.

**तक्ता ४.७ दारिद्र्य रेषेवरील केशरी शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांसाठी अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना केलेले वाटप**

(लाख मे.टन )

| वर्ष | तांदूळ | | | गहू | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना केलेले वाटप | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना केलेले वाटप |
| २०१५-१६ | १.०० | ०.८५ | ०.८१ | १.४९ | १.३२ | १.२६ |
| २०१६-१७ | १.३५ | १.२४ | १.२१ | २.१६ | २.०२ | १.९२ |
| २०१७-१८+ | १.२३ | १.०५ | ०.९१ | १.९६ | १.६८ | १.३९ |

*आधार:* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

४.१९.१ राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमाअंतर्गत समाविष्ट नसलेल्या राज्यातील एकूण १.७७ कोटी लाभार्थ्यांना शिधापत्रिकांची पडताळणी आणि आधार जोडणीचे काम पूर्ण झाल्यावर राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमाअंतर्गत दराने अन्नधान्य पुरविण्यात येत आहे.

४.१९.२ राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमाअंतर्गत योग्य व गरजू लाभार्थ्यांचा समावेश करण्याकरिता सद्यस्थितीतील राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमाअंतर्गत लाभार्थ्यांपैकी सवलतीच्या दराने अन्नधान्याची आवश्यकता नसलेल्या लाभार्थ्यांना अधिनियमाअंतर्गत लाभ स्वेच्छेने सोडून देण्याबाबत आवाहन करुन 'अनुदानातून बाहेर पडा' ही योजना ऑक्टोबर, २०१६ पासून सुरु करण्यात आली.

## भरड धान्याचे वितरण

४.२० राज्यातील प्राधान्य कुटुंब व अंत्योदय अन्न योजना लाभार्थ्यांना तांदुळ आणि गव्हाव्यतिरिक्त भरड धान्यही वितरीत करण्यात येते. भरड धान्याचे नियतन, उचल व रास्तभाव दुकानांना केलेले वाटप तक्ता ४.८ मध्ये दिले आहे.

**तक्ता ४.८ भरड धान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना केलेले वाटप**

('००० मे.टन)

| वर्ष | ज्वारी | | | मका | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना केलेले वाटप | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना केलेले वाटप |
| २०१६-१७ | १६.५७ | १४.२७ | १४.०३ | ०.०१ | ०.००५ | ०.००५ |
| २०१७-१८+ | ३.७३ | २.४० | २.४० | १२.१६ | ०.५३ | ०.५३ |

*आधार:* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## शिधापत्रिकाधारक आस्थापनांना अन्नधान्य वितरण

४.२१ राज्यातील विविध कुटंबांकरिता रास्त भाव दुकानांना वितरणाव्यतिरिक्त शिधापत्रिकाधारक आस्थापनांना (आश्रमशाळा, वसतिगृह इ. कल्याणकारी संस्था) केंद्र शासनामार्फत अन्नधान्याचे नियतन मंजूर करण्यात येते. अन्नधान्याचे (१५ किलो परिमाण प्रति निवासी) दरमहा तांदूळ सहा रुपये प्रति किलो आणि गहू पाच रुपये प्रति किलो या दराने वाटप करण्यात येते. शिधापत्रिकाधारक आस्थापनांची संख्या ४,९१० असून त्यातील निवासी संख्या ५.१५ लाख आहे. शिधापत्रिकाधारक आस्थापनांकरिता अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना केलेले वाटप तक्ता ४.९ मध्ये दिले आहे.

**तक्ता ४.९ शिधापत्रिकाधारक आस्थापनांकरिता अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना केलेले वाटप**

('००० मे.टन)

| वर्ष | तांदूळ | | | गहू | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना केलेले वाटप | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना केलेले वाटप |
| २०१५-१६ | ११.४० | ७.५० | ७.०० | २७.०० | १६.०८ | १३.३१ |
| २०१६-१७ | ३९.२१ | २५.१३ | १५.६१ | १७.१२ | १३.३२ | १९.०० |

*आधार:* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

## साखर

४.२२ सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत सन २०१७-१८ मध्ये जूनपर्यंत दारिद्र्य रेषेखालील शिधापत्रिकाधारक आणि अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिकाधारकांना साखर वितरीत करण्यात आली. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जुलै, २०१७ पासून फक्त अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिकाधारकांना साखरेचे वाटप करण्यात येत आहे. केंद्र शासनाने राज्यास प्रतिमाह २,५०५ मे. टन साखरेचे नियतन करण्याचे निश्चित केले आहे. साखरेची विक्री किंमत ₹ २० प्रति किलो आहे आणि प्रत्येक कुटुंबास प्रतिमाह एक किलो साखर वाटप करण्यात येते. केंद्र शासनाकडून साखरेसाठी सन २०१६-१७ मध्ये ₹ ३१३.२८ कोटी अनुदान प्राप्त झाले. साखरेचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना केलेले वाटप तक्ता ४.१० मध्ये दिले आहे.

**तक्ता ४.१० साखरेचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना केलेले वाटप**

(लाख मे.टन)

| वर्ष | केंद्र शासनाकडून नियतन | राज्य शासनाने केलेली उचल | रास्त भाव दुकानांना केलेले वाटप |
|---|---|---|---|
| २०१५-१६ | १.७५ | १.७४ | १.७४ |
| २०१६-१७ | १.७३ | १.७३ | १.७३ |
| २०१७-१८+ | ०.७१ | ०.६९ | ०.६९ |

+ नोव्हेंबरपर्यंत

*आधार:* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

## केरोसिन

४.२३ सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत गॅस जोडणी असलेले सर्व शिधापत्रिकाधारक वगळून उर्वरित शिधापत्रिकाधारकांना केरोसिनचा पुरवठा केला जातो. महाराष्ट्र अनुसूचित वस्तू किरकोळ व्यापार परवाना आदेश, १९७९ अन्वये केरोसिनचा साठा व व्यापार करण्याकरीता परवाना आवश्यक आहे. राज्यात ६१,७४१ केरोसिन विक्री परवानाधारक आहेत. त्यापैकी ६६९ घाऊक, १,५३७ अर्धघाऊक आणि ५९,५३५ किरकोळ विक्रेते आहेत.

४.२३.१ एक, दोन आणि तीन व त्यापेक्षा जास्त सदस्य असलेल्या शिधापत्रिकाधारकांना पुरविण्यात येणाऱ्या केरोसिनचे परिमाण अनुक्रमे दोन, तीन व चार लिटर आहे. राज्यातील निरनिराळ्या जिल्ह्यांमध्ये केरोसिनची किरकोळ विक्री किंमत ₹ २३.२९ ते ₹ २५.९५ प्रति लिटर या दरम्यान आहे. केरोसिनचे नियतन व उचल तक्ता ४.११ मध्ये दिले आहे.

**तक्ता ४.११ केरोसिनचे नियतन व उचल**

(लाख किलो लिटर)

| वर्ष | नियतन | उचल |
|---|---|---|
| २०१५-१६ | ६.२१ | ४.४२ |
| २०१६-१७ | ५.३४ | ५.२२ |
| २०१७-१८+ | २.८९ | २.८५ |

+ डिसेंबरपर्यंत

*आधार:* अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

## खरेदीचे विकेंद्रीकरण

४.२४ सार्वजनिक वितरण व्यवस्थेकरिता खरेदीची कार्यक्षमता वाढविण्यासाठी तसेच स्थानिक शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमतीचा फायदा होण्याच्या दृष्टीकोनातून केंद्र शासनाने अन्नधान्याच्या खरेदीचे विकेंद्रीकरण ही योजना सुरु केली. या योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या वतीने राज्यांकडून भात व भरड धान्याची खरेदी केली जाते. या धान्याची साठवणूक व वितरण सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत व इतर कल्याणकारी योजनांतर्गत केली जाते.

## गोदामे

४.२५ सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरित करावयाच्या अन्नधान्याची उचल भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामांमधून करण्यात येते आणि राज्याच्या स्वत:च्या अथवा भाड्याने घेतलेल्या गोदामांमध्ये साठवणूक केली जाते. सन २०१७ मध्ये राज्य शासनाच्या मालकीची एकूण १,१०२ गोदामे असून त्यांची साठवणूक क्षमता ६.९४ लाख मे. टन आहे. यापैकी ०.९९ लाख मे. टन क्षमतेची २२५ गोदामे वापरासाठी अयोग्य असून ०.०९ लाख मे. टन क्षमतेची १८ गोदामे भाडे तत्वावर देण्यात आली आहेत. राज्याने अन्नधान्याच्या साठवणुकीसाठी ०.७३ लाख मे. टन क्षमतेची १०६ गोदामे भाडे तत्वावर घेतली आहेत. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत गोदामांच्या साठवणूक क्षमतेत वाढ करण्यासाठी व अन्नधान्याची नासाडी टाळण्याकरिता नाबार्डच्या अर्थ सहाय्याने राज्य शासनाने नवीन गोदामे बांधण्याच्या कामास सुरुवात केली असून त्यांची साठवणूक क्षमता ५.९५ लाख मे. टन आहे. या कार्यक्रमाअंतर्गत डिसेंबर, २०१७ पर्यंत २३७ गोदामे (३.३३ लाख मे.टन) बांधण्याकरिता प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून २१७ गोदामांच्या बांधकामाकरिता ₹ २७७.२६ कोटी निधी उपलब्ध करुन दिला आहे. जिल्हानिहाय उपलब्ध गोदामांची संख्या व त्यांची क्षमता परिशिष्ट ४.१३ मध्ये देण्यात आली आहे.

## अन्नधान्याकरिता अनुदान

४.२६ अन्नधान्याकरीता अनुदान हे सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अन्नधान्याच्या वितरणासाठी देण्यात येणारे अनुदान, प्रतिकूल काळाशी सामना करण्याकरिता ठेवावयाच्या राखीव साठ्याच्या देखभालीचा खर्च आणि अन्नधान्य खरेदीची किंमत व विक्रीची किंमत यातील तफावतीमुळे राज्य शासनास सहन करावी लागणारी तूट यासाठीचे अर्थसहाय्य आहे. सन २०१७-१८ साठी अर्थसंकल्पीय अंदाजानुसार अन्नधान्याकरिता अनुदान सुमारे ₹ १,३७० कोटी आहे.

आलेख ४.६ : अन्नधान्याकरिता अनुदान




## जीवनावश्यक वस्तू कायद्याची अंमलबजावणी

४.२७ जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ अंतर्गत जीवनावश्यक वस्तुंचे उत्पादन, वितरण, व्यापार व वाणिज्य नियंत्रित करण्याकरिता आदेश जारी करण्यास राज्य शासन सक्षम आहे. केंद्र शासनाने खाद्यतेल आणि खाद्य तेलबिया यांच्या साठा निर्बंधास ३० सप्टेंबर, २०१८ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार महाराष्ट्र अनुसूचित वस्तू किरकोळ व्यापार परवाना आदेश, १९७९ अन्वये राज्याने सोयाबिन वगळून, खाद्यतेल आणि खाद्य तेलबिया यावर साठा निर्बंध ३० सप्टेंबर, २०१८ पर्यंत लागू केले आहेत.

## सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण

४.२८ योग्य आणि पात्र लाभार्थ्यांना योग्य प्रमाणात पारदर्शकतेने नियमित अन्नधान्य वितरित करण्यास मदत होण्याच्या दृष्टीने राज्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या संगणकीकरणाचा प्रकल्प राबविण्यात येत आहे. सुमारे २.४२ कोटी शिधापत्रिकांचे संगणकीकरण पूर्ण झाले आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमाअंतर्गत ८७ टक्के शिधापत्रिकाधारकांची तसेच १४ दुष्काळग्रस्त जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेवरील शेतकरी लाभार्थ्यांच्या ९३ टक्के शिधापत्रिकाधारकांच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या आधार संलग्नतेची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. तसेच आधार सक्षम सार्वजनिक वितरण भरणा पथदर्शी प्रणाली सुरु केल्यामुळे आधार सत्यापित व्यवहारांच्या संख्येमध्ये वाढ झाली आहे. या प्रकल्पांतर्गत, लाभार्थ्यांची बायोमेट्रिक ओळख पडताळणी, ई-पीओएस उपकरणाची सर्व रास्त भाव दुकानांमध्ये अंमलबजावणी याद्वारे सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वस्तूंचे वितरण करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. डिसेंबर, २०१७ मध्ये विक्री केंद्रांद्वारे अन्नधान्याचे वितरण २.६३ लाख मे. टन (एकूण वितरणाच्या ६९ टक्के) होते. पीओएस उपकरणाच्या माध्यमातून अन्नधान्याचे वाटप केल्याने एकूण अन्नधान्याची उचल १० टक्के कमी झाली आहे. तसेच ऑनलाईन शिधापत्रिका अर्ज आणि ट्रॅकिंग सिस्टिम देखील विकसित करण्यात आली आहे.

## राज्य अन्न आयोग

४.२९ राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता राज्याने अधिनियमातील कलम १६ (१) अन्वये, राज्य अन्न आयोगाची स्थापना केली. अधिनियमानुसार आयोगाची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.

- अधिनियमाच्या अंमलबजावणीचे संनियत्रण व मूल्यमापन करणे
- स्वाधिकार अथवा अधिनियमातील प्रकरण दोननुसार हक्कांच्या उल्लंघनाबाबत प्राप्त तक्रारींची चौकशी करणे
- राज्यास अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता सल्ला देणे
- अन्न व पोषणाशी संबंधित योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता सल्ला देणे
- जिल्हा तक्रार निवारण अधिकाऱ्याच्या विरोधातील अपिलाची सुनावणी घेणे

## राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग

४.३० राज्याने ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्याकरिता राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग स्थापन केला आहे. आयोगाचे मुख्यालय मुंबई येथे असून औरंगाबाद आणि नागपूर या दोन ठिकाणी खंडपीठे आहेत. राज्यात प्रत्येक जिल्ह्याकरिता जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी तसेच त्या व्यतिरिक्त तक्रारींचा ओघ विचारात घेऊन मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पुणे आणि नागपूर येथे जिल्हा मंच स्थापन करण्यात आले आहेत. राज्य आयोगाकडून ₹ २० लाख ते ₹ एक कोटीपर्यंतच्या रकमेच्या तक्रारींचे निवारण केले जाते. तर जिल्हा मंचांकडून ₹ २० लाख व त्यापेक्षा कमी रकमेच्या तक्रारींचे निवारण केले जाते. आयोगाच्या स्थापनेपासून डिसेंबर, २०१७ अखेर आयोग व ३४ जिल्हा मंचांकडे ४,८८,१९९ तक्रारी प्राप्त झाल्या, त्यापैकी ४,३३,८०७ तक्रारींचे निवारण करण्यात आले.

* * * * *

## परिशिष्ट ४.१

## महाराष्ट्रातील ग्रामीण भागाकरिता ग्राहक किंमतींचे गटवार निर्देशांक

(पायाभूत वर्ष -२००३)

| वर्ष/ महिना | खाद्यपदार्थ | पान, सुपारी व मादक पदार्थ | इंधन, वीज व दिवाबत्ती | कापड, बिछाना व पादत्राणे | संकीर्ण | सर्व वस्तू | वर्ष-ते-वर्ष चलन वाढीचा दर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **भारांक** | **५२.८५** | **२.१५** | **१०.६७** | **८.५३** | **२५.८०** | **१००.००** | -- |
| २००५-०६ | १०९ | १०९ | १०८ | १०३ | १०५ | १०७ | ३.८ |
| २००६-०७ | ११८ | ११७ | १३२ | १०५ | १०८ | ११६ | ७.८ |
(पायाभूत वर्ष २०११-१२=१००)

| गट | भार | औद्योगिक उत्पादनांचे निर्देशांक (एप्रिल ते डिसेंबर) | | टक्केवारीतील बदल |
|---|---|---|---|---|
| | | २०१६-१७ | २०१७-१८ | |
| सर्वसाधारण निर्देशांक | १००.०० | ११८.२ | १२२.६ | ३.७ |
| खाणकाम | १४.३७ | ९७.५ | १००.२ | २.८ |
| वस्तुनिर्माण | ७७.६३ | ११९.५ | १२४.० | ३.७ |
| वीज | ७.९९ | १४२.५ | १४९.७ | ५.१ |

*आधार* : सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, भारत सरकार

**आलेख ८.३ : अखिल भारताचे क्षेत्रनिहाय मासिक औद्योगिक उत्पादनाचे निर्देशांक**



## सहकार

८.२३ सहकारी चळवळ ही ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासाचे व राज्यातील वंचित घटकांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावण्याचे एक परिणामकारक साधन आहे. सहकारी संस्थांचा मूलमंत्र स्वयंसहाय्यता, लोकशाही, समानता व एकता इ. तत्वांना प्रोत्साहन देणे हा आहे. कृषि वित्तपुरवठा क्षेत्रापुरती मर्यादीत असणारी ही चळवळ आता कृषि प्रक्रिया, कृषि पणन, गृहनिर्माण, दुग्ध व्यवसाय, साठवण, वस्त्रोद्योग, ग्राहक भांडारे अशा विविध क्षेत्रात फोफावली आहे.

८.२४ राज्यात ३१ मार्च, २०१७ रोजी सुमारे १.९५ लाख सहकारी संस्था कार्यरत होत्या व त्यामध्ये सुमारे ५२५ लाख सभासद होते. सहकारी संस्थांची संक्षिप्त माहिती तक्ता ८.१२ मध्ये दिली आहे व महाराष्ट्रातील सहकारी संस्थाची माहिती परिशिष्ट ८.४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१२ सहकारी संस्थांची संक्षिप्त माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | २०१६ च्या तुलनेत २०१७ मधील शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| | २०१५ | २०१६ | २०१७* | |
| संस्था (संख्या) | २,२५,७२१ | १,९६,९०७ | १,९५,३०१ | (-)०.८ |
| सभासद (लाख) | ५३५ | ५३० | ५२५ | (-)०.९ |
| भरणा भाग भांडवल | २०,७२१ | १९,९४६ | १९,७१४ | (-)१.२ |
| *यापैकी,* राज्य शासनाचे | ३,६३५ | ३,६०१ | ३,८९८ | ८.३ |
| खेळते भांडवल | ३,४३,६९१ | ३,६३,२५६ | ३,६३,८७८ | ०.२ |
| ठेवी | १,६७,११४ | १,६९,४२५ | १,७४,१९६ | २.८ |
| स्थूल कर्ज | १,३९,३६० | १,४७,३७६ | १,४०,०४४ | (-)५.० |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ५३,९८२ | ३६,३२९ | ३६,४९६ | ०.५ |
| तोटा | ९,२९४ | ९,००८ | ८,३४४ | (-)७.४ |
| येणे कर्ज | १,४४,७४८ | १,५१,४३२ | १,४५,७४२ | (-)३.८ |

*आधार :* सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

**आलेख ८.४ : सहकारी संस्था व त्यांचे खेळते भांडवल**




**(३१ मार्च, २०१७ रोजी)**

## सहकारी संस्थांद्वारे कृषि पतपुरवठा

८.२५ राज्यातील कृषि पतपुरवठा सहकारी बँकांची संरचना त्रिस्तरीय असून, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित ही शिखर संस्था आहे. जिल्हा स्तरावर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका तर गाव पातळीवर प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था कार्यरत आहेत.कृषि व संलग्न कार्यांना पतपुरवठा व चालना देण्यात या संस्था प्रमुख भूमिका बजावतात. महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक मर्या. व जिल्हास्तरीय सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँका (२९) या अवसायानात गेलेल्या आहेत. कृषि सहकारी बँकांची माहिती तक्ता ८.१३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१३ कृषि सहकारी बँकांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | २०१६ च्या तुलनेत २०१७ मधील शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| | २०१५ | २०१६ | २०१७* | |
| **महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित** | | | | |
| सभासद ( संख्या) | २,११५ | २,००० | २,००० | ०.० |
| खेळते भांडवल | २०,९४७ | २३,३०० | २९,४२२ | २६.३ |
| ठेवी | ९,९९३ | ११,२६८ | १६,३७७ | ४५.३ |
| स्थूल कर्ज | ११,७४३ | १५,०८६ | १५,५२१ | २.९ |
| येणे कर्ज | १२,००७ | १४,४२४ | १६,३३६ | १३.३ |
| थकीत कर्ज | १,२५९ | १,२३५ | १,२६९ | २.७५ |
| **जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका (३१)** | | | | |
| सभासद (लाखात) | १.८२ | १.९६ | १.९८ | १.० |
| खेळते भांडवल | ८४,५२८ | ९१,४१५ | १,०१,२०५ | १०.७ |
| ठेवी | ६१,५२९ | ६६,३८२ | ७१,४२७ | ७.६ |
| स्थूल कर्ज | ४४,२३१ | ४३,२६६ | ४३,३६८ | ०.२ |
| येणे कर्ज | ४८,१४७ | ४७,४५४ | ४८,९४६ | ३.१ |
| थकीत कर्ज | १०,६७४ | ११,९९९ | १६,१६३ | ३४.७ |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

* अस्थायी

८.२६ प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्था (प्राकृपसं) मुख्यत: शेतीच्या हंगामातील कामांकरिता अल्प मुदतीसाठी कृषि पतपुरवठा करतात. राज्यात ३१ मार्च, २०१७ रोजी २१,०८९ प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्था असून यामध्ये २१ कृषक सेवा संस्था व ८८९ आदिवासी सहकारी संस्थांचाही समावेश असून त्यांची सभासद संख्या अनुक्रमे ०.५५लाख व ७.४९ लाख आहे. त्यापेकी सुमारे ५६.३३ टक्के प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्था तोट्यात होत्या. गतवर्षीच्या तुलनेत तोट्यातील प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्थाच्या संख्येत किरकोळ प्रमाणात म्हणजे ०.२ टक्क्यांनी घट झाली असून कर्ज घेणाऱ्यांच्या संख्येत सुमारे २.४ टक्क्याने वाढ झाली आहे. सन २०१७ मध्ये प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्थानी अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना वितरीत केलेल्या कर्जात ६.४ टक्के वाढ झाली. प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्थाची माहिती तक्ता ८.१४ मध्ये दिली आहे.

**आलेख ८.५ : विभागनिहाय प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्था**




**३१ मार्च, २०१७ रोजी**

**तक्ता ८.१४ प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्थांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | २०१६ च्या तुलनेत २०१७ मधील शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| | २०१५ | २०१६ | २०१७* | |
| संस्था (संख्या) | २१,०६४ | २१,१०२ | २१,०८९ | (-)०.१ |
| सभासद (लाख) | १५१ | १५९ | १६८ | ५.७ |
| खेळते भांडवल | १९,१४५ | १९,२६५ | १८,७०१ | (-)२.९ |
| स्वनिधी | ३,०५२ | ३,४१७ | ३,१२२ | (-)८.६ |
| भाग भांडवल | २,१६४ | २,४४७ | २,१६२ | (-)११.६ |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | ६ | ६ | ६ | ०.० |
| कर्जदार सभासद (लाख) | ३६.८९ | ३७.६२ | ३८.५३ | २.४ |
| *त्यापैकी,* १) अत्यल्प भूधारक (१ हेक्टर पर्यंत) | ९.९२ | ९.७० | ९.२३ | (-)४.८ |
| २) अल्प भूधारक (१ ते २ हेक्टर पर्यंत) | ८.७४ | ८.९३ | ८.९५ | ०.२ |
| स्थूल कर्ज | १३,७७७ | १४,६११ | १५,४६१ | ५.८ |
| *त्यापैकी,* अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना दिलेले | ५,९६१ | ५,९३३ | ६,३१४ | ६.४ |
| येणे कर्ज | १२,२०९ | १५,६७७ | १३,८२४ | (-)११.८ |
| कर्ज वसुली | १०,९६१ | ११,१२८ | ११,३३३ | १.८ |
| थकीत कर्ज | ५,१८२ | ४,९६९ | ५,०११ | ०.८ |
| तोट्यातील संस्था | ११,७७३ | ११,९०० | ११,८८० | (-)०.२ |

*आधार :* सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

## डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना

८.२७ अल्प मुदतीच्या पीक कर्जाचा परतावा वेळेवर व्हावा याकरिता शेतकऱ्यांना प्रवृत्त करण्यासाठी व्याजात सवलत दिली जाते. या योजनेअंतर्गत ₹ एक लाखापर्यंतच्या कर्जावर तीन टक्के तसेच ₹ एक लाखापेक्षा अधिक व ₹ तीन लाखांपर्यंतच्या कर्जावर एक टक्का व्याज सवलत दिली जाते. शेतकऱ्यांनी दरवर्षी ३० जून पर्यंत कर्जाची नियमित परतफेड करणे आवश्यक आहे. या योजनेंतर्गत २०१६-१७ मध्ये १३.८७ लाख लाभार्थ्यांना ₹ १८४.८९ कोटी अनुदान देण्यात आले, तर डिसेंबर २०१८ अखेर ६.९४ लाख लाभार्थ्यांना ₹ १००.५० कोटी अनुदान देण्यात आले.

## कृषि प्रक्रिया सहकारी संस्था

८.२८ कृषि प्रक्रिया सहकारी संस्था ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासात रोजगार निर्मिती व शेतक-यांना योग्य मोबदला मिळावा याकरिता महत्वाची भूमिका पार पाडतात. राज्य शासन सहकारी संस्थांना कृषि प्रक्रिया केंद्र स्थापन करण्यासाठी अर्थसहाय्य पुरविते. सहकारी साखर कारखाने, कापूस पिंजणी व गासड्या बांधणी, सूत गिरण्या, हातमाग व यंत्रमाग संस्था, दुग्ध संस्था व दुग्ध संघ आणि मत्स्य व्यवसाय संस्था हे कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांचे घटक आहेत. राज्यात ३१ मार्च, २०१७ रोजी १७,५८२ कृषि प्रक्रिया संस्था कार्यरत असून त्यांची सभासद संख्या ४६.२८ लाख आहे.

## सहकारी साखर कारखाने

८.२८.१ भारतातील एकूण साखर कारखान्यांपैकी सर्वाधिक (३१ टक्के) कारखाने राज्यात असून त्या खालोखाल २४ टक्के कारखाने उत्तर प्रदेशात आहेत. सहकारी साखर कारखान्यांची माहिती तक्ता ८.१५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१५ सहकारी साखर कारखान्यांची माहिती**

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | २०१६ च्या तुलनेत शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| | २०१५ | २०१६ | २०१७* | |
| नोंदणीकृत सहकारी कारखाने (संख्या) | २०२ | २०२ | १७९ | (-)११.४ |
| उत्पादन चालू असलेले कारखाने (संख्या) | ९९ | ९९ | ८७ | (-)१२.१ |
| सभासद ('००) | २५,१६० | २५,५५० | २६,७७० | ४.८ |
| राज्य शासनाचे भाग भांडवल (₹ कोटी) | १,२५३.८३ | १,२८४.०७ | १,२९९.४७ | १.२ |
| प्रतिदिन सरासरी गाळप क्षमता (# लाख मे. टन) | ३.४ | ३.५२ | ३.१४ | (-)१०.८ |
| गाळप झालेला ऊस (लाख मे. टन) @ | ५८९.४७ | ४८३.४९ | २६८.२ | (-)४४.५ |
| साखर उत्पादन (लाख मे. टन) @ | ६७.७९ | ५५.८१ | ३०.६५ | (-)४५.१ |
| सरासरी उतारा (टक्के) | ११.५ | ११.५५ | ११.४३ | (-)१.० |
| उसाची सरासरी किंमत (₹ प्रति मे. टन ) | | | | |
| अ) खरेदी (रास्त दराने मोबदला) | २,२०० | २,३०० | २,३०० | ०.० |
| ब) कारखान्यांनी प्रत्यक्षात अदा केलेली | २,५४० | २,७३४ | २,७३१ | (-)०.१ |
| मळी (लाख मे. टन) | ३७.२ | १९.३६ | १०.७ | (-)४४.७ |
| कारखान्यांची संख्या | | | | |
| अ) आसवनी प्रकल्प असलेल्या | ६९ | ६९ | ६९ | ०.० |
| ब) सह-वीज निर्मिती प्रकल्प असलेल्या | ४७ | ५१ | ५७ | ११.८ |
| सह वीज निर्मिती क्षमता (मेगावॅट) | ८४३ | ९९७.४ | ११३५.४ | १३.८ |
| तोट्यातील कारखाने (संख्या) | ६० | १०२ | ४६ | (-)५४.९ |

*आधार :* साखर आयुक्त, महाराष्ट्र शासन    # प्रतिदिन गाळप क्षमता    @ ऑक्टोबर ते सप्टेंबरकरिता    * अस्थायी

## सहकारी दुग्ध संस्था व दुग्ध संघ

८.२८.२ राज्यातील ११,५९७ सहकारी दुग्ध संस्था व ७४ सहकारी दुग्ध संघांपैकी सुमारे ४२.९ टक्के सहकारी दुग्ध संस्था व २८.४ टक्के दुग्ध संघ ३१ मार्च, २०१७ अखेर तोट्यात होते. सहकारी दुग्ध संस्था व दुग्ध संघ यांची माहिती तक्ता ८.१६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१६ सहकारी दुग्ध संस्था व दुग्ध संघ यांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सहकारी दुग्ध संस्था | | | सहकारी दुग्ध संघ | | |
| | २०१६ | २०१७* | शेकडा बदल | २०१६ | २०१७* | शेकडा बदल |
| संस्था (संख्या) | १४,९२१ | ११,५९७ | (-)२२.३ | ८५ | ७४ | (-)१२.९ |
| सभासद (लाख) | ११.६ | ९.१५ | (-)२१.१ | १.४३ | १.०५ | (-)२६.६ |
| भाग भांडवल | १२.८९ | १०.७५ | (-)१६.६ | ८५.९७ | ८१.७८ | (-)४.९ |
| खेळते भांडवल | २८.५५ | २५.१६ | (-)११.९ | ९२.४ | ८९.०६ | (-)३.६ |
| दूध खरेदी (किंमत) | २७८.५६ | २८५.६ | २.५ | ७०२.३५ | ९८०.४५ | ३९.६ |
| दूध व दुग्धजन्य पदार्थांची विक्री (किंमत) | ३७०.५ | ४३०.५ | १६.२ | ९०६.३३ | १,२१५.२० | ३४.१ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ५,६१२ | ४,९७३ | (-)११.४ | २५ | २१ | (-)१६.० |
| तोटा | ६८.४ | ५९.२ | (-)१३.५ | ५६.८३ | ४९.७२ | (-)१२.५ |

*आधार* : आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास विभाग, महाराष्ट्र शासन    * अस्थायी

८.२८.३ राज्यात ३१ मार्च, २०१७ रोजी ८५ कापूस पिंजणी व गासड्या बांधणाऱ्या सहकारी संस्था होत्या. उत्पादन चालू असलेल्या संस्थांपैकी सुमारे ४९.३ टक्के संस्था तोट्यात होत्या. कापूस पिंजणी व गासड्या बांधणाऱ्या सहकारी संस्थांची माहिती तक्ता ८.१७ मध्ये दिली आहे.

८.२८.४ राज्यात ३१ मार्च, २०१७ रोजी २८१ सहकारी सूत गिरण्या होत्या. उत्पादन चालू असलेल्या सूत गिरण्यांपैकी सुमारे ९४ टक्के सूत गिरण्या तोट्यात होत्या. सहकारी सूत गिरण्यांची माहिती तक्ता ८.१८ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१७ कापूस पिंजणी व गासड्या बांधणाऱ्या सहकारी संस्थांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१६ | २०१७* | |
| संस्था (संख्या) | ८३ | ८५ | २.४ |
| *त्यापैकी,* उत्पादन चालू असलेल्या | ६९ | ७१ | २. ९ |
| सभासद ('००) | ६२४ | ६४३ | ३.० |
| भाग भांडवल | ६ | ६ | ०.० |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | २ | २ | ०.० |
| खेळते भांडवल | १७ | १८ | ५.९ |
| पिंजणी केलेला कापूस (मे. टन) | १४ | १५ | ७.१ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ३४ | ३५ | २.९ |
| तोटा | १ | १ | ०.० |

* अस्थायी

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

**तक्ता ८.१८ सहकारी सूत गिरण्यांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१६ | २०१७* | |
| गिरण्यांची संख्या | २७८ | २८१ | १.१ |
| *त्यापैकी,* उत्पादन चालू असलेल्या | ६८ | ६७ | (-)१.५ |
| सभासद ('००) | ५,२०० | ३,९९४ | (-)२३.२ |
| भाग भांडवल | १,९७० | २,००७ | १.९ |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | १,७२७ | १,८०७ | ४.६ |
| चात्यांची संख्या (लाख) | १४.८४ | १४.७८ | (-)०.४ |
| उत्पादित सूताचे मूल्य | २,८५७ | २,२७५ | (-)२०.४ |
| तोट्यातील गिरण्या (संख्या) | ६० | ६३ | ५.० |
| तोटा | १५९४.५ | १९७०.६ | २३.६ |

*आधार* : वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

८.२८.५ राज्यात ३१ मार्च, २०१७ रोजी ६६४ सहकारी हातमाग व १,४३९ यंत्रमाग संस्था होत्या. सुमारे ४९.१ टक्के सहकारी हातमाग व ९०.६ टक्के यंत्रमाग संस्था तोट्यात होत्या.सहकारी हातमाग व यंत्रमाग संस्थांमधील भाग भांडवलात राज्य शासनाचा हिस्सा अनुक्रमे २१.७ टक्के व ७७.२ टक्के होता. सहकारी हातमाग व यंत्रमाग संस्थांची माहिती तक्ता ८.१९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१९ सहकारी हातमाग व यंत्रमाग संस्थांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | हातमाग | | | यंत्रमाग | | |
| | २०१६ | २०१७* | शेकडा बदल | २०१६ | २०१७* | शेकडा बदल |
| संस्था (संख्या) | ६६५ | ६६४ | (-)०.२ | १,४१० | १,४३९ | २.१ |
| सभासद ('००) | ७१२.१४ | ५७९.०७ | (-)१८.७ | ७०७.४ | ७२३.४५ | २.३ |
| भाग भांडवल | ८.०२ | ८.०२ | ०.० | १४५.०४ | १६६.९३ | १५.१ |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | १.७४ | १.७४ | ०.० | ११२.४२ | १२८.९ | १४.७ |
| मागांची संख्या ('०००) | ३.६१ | ३.६१ | ०.० | १२.३१ | १२.३६ | ०.४ |
| उत्पादनाचे मूल्य | ६२.९ | ५.७५ | (-)९०.९ | ६७.५३ | ६९.४७ | २.९ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ३२५ | ३२६ | ०.३ | १,२७८ | १,३०४ | २.० |
| तोटा | ३.८९ | ६.१ | ५६.८ | ११.२७ | १३.०९ | १६.१ |

*आधार* : वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

## मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था

८.२९ राज्यात ३१ मार्च २०१७ अखेर ३,२६३ प्राथमिक मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था कार्यरत होत्या. त्याव्यतिरिक्त ३६ मत्स्यव्यवसाय सहकारी संघ आणि दोन महासंघ या क्षेत्रात कार्यरत होते. गतवर्षीच्या तुलनेत मासे व मत्स्योत्पादनाच्या विक्रीत १८.८ टक्के वाढ झाली असून तोटा ६.६ टक्क्यांनी कमी झाला आहे. मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांची माहिती तक्ता ८.२० मध्ये दिली आहे.

## सहकारी पणन संस्था

८.३० सहकारी पणन संस्थांची संरचना त्रिस्तरीय आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या. ही शिखर संस्था असून जिल्हास्तरावर जिल्हा सहकारी पणन संस्था तर ग्रामस्तरावर प्राथमिक सहकारी पणन संस्था कार्यरत आहेत. मार्च २०१७ अखेर सुमारे ४२.१ टक्के सहकारी पणन संस्था तोट्यात होत्या तर मागील वर्षी सुमारे ३९.४ टक्के संस्था तोट्यात होत्या. सहकारी पणन संस्थांची माहिती तक्ता ८.२१ मध्ये दिली आहे.

## बिगर कृषि सहकारी पतपुरवठा संस्था

८.३१ राज्यात ३१ मार्च २०१७ अखेर २०,४६५ बिगर कृषि पतसंस्थांपैकी १३,४४५ नागरी सहकारी पतपुरवठा संस्था, ६,५३५ वेतनधारकांच्या सहकारी पतपुरवठा संस्था व ४८५ नागरी सहकारी बँका होत्या. सुमारे २१.८ टक्के बिगर कृषि सहकारी पतपुरवठा संस्था तोट्यात होत्या. 23 टक्के नागरी सहकारी बँका अवसायनात आहेत. बिगर कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांची माहिती तक्ता ८.२२ मध्ये दिली आहे.

## इतर सहकारी संस्था

८.३२ राज्यात ३१ मार्च, २०१७ रोजी १,०१,५४२ सहकारी गृहनिर्माण संस्था असून सभासद संख्या ३०.१६ लाख होती. तसेच १०,८९८ मजूर कंत्राटी संस्था होत्या त्यातील सभासद संख्या ६.४७ लाख होती. एकूण ६१,१५२ सदस्य संख्या असलेल्या २५० श्रमिक वन संस्था होत्या.

**तक्ता ८.२० मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१६ | २०१७* | |
| संस्था (संख्या) | ३,४६३ | ३,२६३ | (-)५.८ |
| सभासद (लाख) | ३.४५ | ३.३७ | (-)२.३ |
| भाग भांडवल | ८०.६५ | ७६.८६ | (-)४.७ |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | ६८.९३ | ६६.१७ | (-)४.० |
| खेळते भांडवल | २६९.११ | २६७.१० | (-)०.८ |
| मासे व मत्स्य उत्पादन विक्री | ६३२.७५ | ७५१.५१ | १८.८ |
| तोट्यातील संस्था(संख्या) | १,१७९ | १,१५० | (-)२.५ |
| तोटा | ४८.३२ | ४५.१५ | (-)६.६ |

*आधार :* आयुक्त, मत्स्यव्यवसाय महाराष्ट्र शासन *अस्थायी

**तक्ता ८.२१ सहकारी पणन संस्थांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१६ | २०१७* | |
| संस्था (संख्या) | १,१८३ | १,२०७ | २.० |
| सभासद (लाख) | १२.१४ | १२.८७ | ६ |
| भाग भांडवल | ८४ | ९३ | १०.७ |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | २६ | २५ | (-)३.८ |
| खेळते भांडवल | १,१२० | १,१८८ | ६.१ |
| विक्री | | | |
| (अ) शेतमाल | १,२०७ | २,१७४ | ८०.१ |
| (ब) खते | ६२३ | ७१० | १४.० |
| (क) बियाणे | ७५ | ८८ | १७.३ |
| (ड) ग्राहकोपयोगी वस्तू | ११३ | १२२ | ८.० |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ४६६ | ५०८ | ९.० |
| तोटा | १३ | १७ | ३०.८ |

*आधार :* सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन *अस्थायी

**तक्ता ८.२२ बिगर कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१६ | २०१७* | |
| संस्था (संख्या) | २०,८०५ | २०,४६५ | (-)१.६ |
| सभासद (लाख) | २३७.०६ | २२५.५१ | (-)४.९ |
| ठेवी | ८८,९९८ | ८४,४२६ | (-)५.१ |
| स्वनिधी | २१,६४६ | २०,७९४ | (-)३.९ |
| भाग भांडवल | ८,०२१ | ७,५१० | (-)६.४ |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | ०.८४ | ०.७१ | (-)१५.५ |
| खेळते भांडवल | १,६७,९४४ | १,५८,३३९ | (-)५.३ |
| कर्ज वाटप | ७१,८१३ | ६२,६६८ | (-)१२.७ |
| येणे कर्ज | ६८,२६९ | ६१,७६४ | (-)९.५ |
| थकीत कर्ज | ८,२८२ | ८,०६१ | (-)२.७ |
| कर्ज वसुली | ६८,१२८ | ६०,८६५ | (-)१०.७ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ४,६८३ | ४,४६२ | (-)४.७ |
| तोटा | १,७७५ | १,४२७ | (-)१९.६ |

*आधार :* सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

## महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्यादित

८.३३ महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्यादित ही राज्यातील गृहनिर्माण पतपुरवठा करणारी मध्यवर्ती संस्था आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्यादित संस्थेची माहिती तक्ता ८.२३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२३ महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्यादित संस्थेची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१६ | २०१७* | |
| सभासद (संख्या) | १०,४४१ | १०,३४९ | (-)०.९ |
| खेळते भांडवल | ९०.१७ | ८६.७१ | (-)३.८ |
| स्थूल कर्ज | ६४४ | ६४४ | ०.० |
| येणे कर्ज | ५५.८४ | ५३.१२ | (-)४.९ |
| थकीत कर्ज | २५.९८ | २२.४५ | (-)१३.६ |
| कर्ज वसुली | ३.६५ | २.७२ | (-)२५.५ |

*आधार :* महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण महामंडळ मर्यादित * अस्थायी

## सहकारी ग्राहक भांडारे

८.३४ महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक महासंघ ही शिखर संस्था असून ती जिल्हास्तरावर कार्यरत असलेल्या घाऊक ग्राहक भांडारांच्या कार्यावर नियंत्रण ठेवते. ही घाऊक ग्राहक भांडारे गाव पातळीवर कार्यरत असणाऱ्या प्राथमिक ग्राहक भांडारांना माल वितरीत करतात. राज्यात ३१ मार्च, २०१७ रोजी शिखर ग्राहक महासंघाव्यतिरिक्त १२६ घाऊक ग्राहक भांडारे व १,६५३ प्राथमिक ग्राहक भांडारे कार्यरत होती. ग्राहक महासंघ, घाऊक व प्राथमिक सहकारी ग्राहक भांडारांची माहिती तक्ता ८.२४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२४ ग्राहक महासंघ, घाऊक व प्राथमिक सहकारी ग्राहक भांडारांची माहिती**

(₹ कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ग्राहक महासंघ | | घाऊक ग्राहक भांडार | | प्राथमिक ग्राहक भांडार | |
| | २०१६ | २०१७* | २०१६ | २०१७* | २०१६ | २०१७* |
| संख्या | १ | १ | १२८ | १२६ | १,७०२ | १,६५३ |
| सभासद ('००) | ६ | ६ | ३,३०५ | ३,२५३ | ११,१५२ | १०,६९९ |
| भाग भांडवल | ०.५८ | ०.५१ | १५.५८ | १४.०३ | ५६.९४ | ३६.५५ |
| *त्यापैकी,* राज्य शासनाचे | - | - | २.७३ | २.७ | १.६९ | १.३७ |
| तोटा | ०.२ | ०.२७ | ३.२७ | ३.० | ६.५ | ४.०४ |
| तोट्यातील ग्राहक भांडारे (संख्या) | - | - | ५१ | ६३ | ४४३ | ४३५ |

*आधार :* महाराष्ट्र स्टेट को-ऑप कन्झ्युमर फेडरेशन लि., मुंबई व सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

## परवानाधारक सावकार

८.३५ कृषि व बिगर कृषि पतपुरवठा संस्थांव्यतिरिक्त परवानाधारक सावकारांना, वैयक्तिक कर्जाचे वाटप करण्यास राज्य शासनाने अनुमती दिली आहे. यासाठी सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालयामार्फत परवाने दिले जातात. परवानाधारक सावकारांची माहिती तक्ता ८.२५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२५ परवानाधारक सावकारांची माहिती**

(संख्या)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१६ | २०१७* | |
| परवाना धारक | १२,२०८ | १२,२१४ | नगण्य |
| कर्जदारांची संख्या | १०,५६,२७३ | १०,९५,७०१ | ३.७ |
| वाटप केलेले कर्ज (₹ कोटी) | १२५४.९७ | १६१४.८ | २८.७ |

* अस्थायी

*आधार :* सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

* * * * *

## परिशिष्ट ८.१

## महाराष्ट्रातील उद्योगांच्या महत्त्वाच्या बाबी
## (वार्षिक उद्योग पाहणीवर आधारीत)

(₹ कोटी)

| कार्य (दोन अंकी) राष्ट्रीय औद्योगिक वर्गीकरण २००८ | वर्ष | उद्योगांची संख्या | स्थिर भांडवल | खेळते भांडवल | कामगारांचे वेतन | एकूण उत्पादन | वापरलेला माल | एकूण निविष्टी | निव्वळ मूल्यवृद्धी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| (१) कापूस पिंजणी, सफाई | २०१३-१४ | ५९४ | ८८२ | १,८०५ | ७५ | १५,०७९ | ११,६७६ | १३,९२३ | १,०५९ |
| इत्यादि. (०१) | २०१४-१५ | ६६४ | ८७८ | १,३५३ | ६१ | १६,३०१ | ८,३५८ | ९,८८३ | ६,२९५ |
| (२) मीठ उत्पादन (०८) | २०१३-१४ | ४३ | २ | ७ | ६ | १४ | २ | ५ | ९ |
| | २०१४-१५ | ४४ | १ | ४ | २ | ५ | १ | २ | ३ |
| (३) खाद्य उत्पादने व पेये (१०, ११) | २०१३-१४ | ३,०३८ | ३२,४४५ | ११,२३५ | २,०४६ | १,३०,५५६ | ८२,१९७ | १,१६,२३७ | ११,९४१ |
| | २०१४-१५ | ३,०१३ | ३५,११६ | ९,५१८ | २,१९८ | १,५६,८९२ | ९७,४२५ | १,३७,२९३ | १६,८५१ |
| (४) तंबाखू उत्पादने (१२) | २०१३-१४ | ११० | १,३०१ | १,८४२ | १५६ | ५,०३२ | १,४०८ | २,३४४ | २,५४५ |
| | २०१४-१५ | १०९ | १,३१६ | १,०५१ | २४१ | ६,१९७ | १,८५१ | ३,६७३ | २,३८५ |
| (५) वस्त्रे (१३) | २०१३-१४ | २,०६८ | १२,२१३ | ४,०१७ | १,३३४ | ३७,५०३ | २१,४९५ | ३१,७०७ | ४,५१२ |
| | २०१४-१५ | १,९१३ | १४,५४० | ३,१७८ | १,६५७ | ४१,२२६ | २४,९११ | ३४,१४६ | ५,५९८ |
| (६) वस्त्र प्रावरणे (१४) | २०१३-१४ | १,०४५ | १,७०५ | १,९९६ | ४८० | ११,१७६ | ६,१६६ | ८,८९० | २,१३३ |
| | २०१४-१५ | १,०४१ | २,२७६ | २,०५३ | ३६२ | ९,८७५ | ४,५२७ | ८,१०३ | १,६२५ |
| (७) चामडे व त्यासंबंधित | २०१३-१४ | ११६ | १८२ | ४९० | ३६ | १,७४७ | ७२१ | १,१३८ | ५८५ |
| उत्पादने (१५) | २०१४-१५ | ११९ | १३५ | १६९ | ४९ | ७५९ | ४२३ | ५८२ | १६६ |
| (८) लाकूड व लाकडाची उत्पादने | २०१३-१४ | २५९ | २५३ | २१८ | २९ | ९२७ | ४४५ | ६५८ | २४५ |
| आणि बूच (फर्निचर वगळून) (१६) | २०१४-१५ | २३९ | २८८ | १६७ | ४० | १,५१० | ७९४ | १,२४१ | २२६ |
| (९) कागद व कागदाची उत्पादने (१७) | २०१३-१४ | १,००० | ८,५२८ | ६९३ | ३३१ | १४,०८१ | ८,५४३ | ११,४६५ | २,१०४ |
| | २०१४-१५ | ८९२ | ८,६६६ | १,७६६ | ३१८ | १४,४१५ | ८,६६३ | ११,१३८ | २,६५० |
| (१०) छपाई व मुद्रित माध्यमांचे | २०१३-१४ | ९८८ | ३,४६५ | (-) ११,७७८ | ३६६ | ६,४६७ | ३,६९७ | ५,४९० | ६२४ |
| पुनरुत्पादन (१८) | २०१४-१५ | ९८० | ३,५४६ | ८८३ | ४३३ | १०,७९६ | ४,९२४ | ७,५३५ | २,७५२ |
| (११) कोळसा, शुद्ध पेट्रोलियम | २०१३-१४ | १९७ | २१,३७५ | ४,५४९ | ४५७ | १,६२,३१६ | १,०२,४५६ | १,०७,५५५ | ५३,८४२ |
| यांची उत्पादने (१९) | २०१४-१५ | १८४ | १३,८४२ | (-) २,१२१ | ८९६ | १,४५,८६६ | ९६,१६६ | १,०३,४०१ | ४१,३५४ |
| (१२) रसायने व रासायनिक उत्पादने, | २०१३-१४ | २,७५२ | ४५,६८२ | ४३,६१९ | २,४८० | १,४६,०७५ | ७३,८७० | १,०४,७४० | ३६,५९८ |
| औषध, वैद्यकीय रसायने व | २०१४-१५ | २,७०२ | ४२,२५८ | २४,११६ | २,५६४ | १,४०,८५१ | ७३,०५९ | १,०५,१२० | ३१,३७८ |
| जैविक उत्पादने (२०,२१) | | | | | | | | | |
| (१३) रबर आणि प्लास्टिक उत्पादने (२२) | २०१३-१४ | १,९१२ | २१,९२४ | ९,४८८ | १,०६४ | ४८,०९७ | २९,५१७ | ३६,२०० | १०,४९२ |
| | २०१४-१५ | १,७९२ | १५,७४६ | १६,२८७ | १,०५७ | ४७,०३७ | २८,९५३ | ३५,८६३ | ९,५१५ |
| (१४) इतर अधातू खनिज उत्पादने (२३) | २०१३-१४ | ९९२ | ७,८९६ | १,९८७ | ३६६ | १२,८०१ | ६,०४० | ९,६९३ | २,४६४ |
| | २०१४-१५ | १,०३२ | १७,२६४ | १७,८१५ | ४५४ | २३,६७८ | ८,३२३ | १६,०३२ | ६,४४३ |
| (१५) मूलभूत धातू (२४) | २०१३-१४ | १,५१७ | ५०,२७० | १३,५३२ | १,४७२ | १,१६,३५६ | ७८,०४७ | १,००,९१५ | १२,२७६ |
| | २०१४-१५ | १,५१४ | ४६,९८६ | ११,८६६ | १,५२५ | १,१३,६६९ | ७६,०९१ | १,०१,५८४ | ९,०९० |

(पुढे चालू)

# परिशिष्ट ८.१ (समाप्त)

| कार्य (दोन अंकी) राष्ट्रीय औद्योगिक वर्गीकरण २००८ | वर्ष | उद्योगांची संख्या | स्थिर भांडवल | खेळते भांडवल | कामगारांचे वेतन | एकूण उत्पादन | वापरलेला माल | एकूण निविष्टी | निव्वळ मूल्यवृद्धी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| (१६) धातूच्या वस्तूंची उत्पादने | २०१३-१४ | ३,५८० | ११,४८६ | (-) १,०४१ | १,३९४ | ३८,९६२ | २२,१८८ | २९,४२१ | ८,४१२ |
| यंत्रे व यंत्रसामग्री वगळून (२५) | २०१४-१५ | ३,४८६ | ११,८७१ | (-) ४,३५४ | १,४४० | ४२,९६५ | २४,१७९ | ३२,३४१ | ९,३२७ |
| (१७) संगणक. विद्युत आणि | २०१३-१४ | ५७० | ५,३११ | १०,२८२ | ५२६ | २०,७९६ | ११,००४ | १६,७०७ | ३,७३३ |
| ऑप्टीकल उत्पादने (२६) | २०१४-१५ | ४८० | ७,२३३ | १०,७६२ | ४२६ | १७,७६९ | ८,२९९ | १३,८६७ | ३,५४४ |
| (१८) विद्युत सामग्री (२७) | २०१३-१४ | १,३३४ | ८,९९८ | ६,०३१ | ९४५ | ४१,७८१ | २६,३११ | ३२,७०९ | ८,०१८ |
| | २०१४-१५ | १,३७४ | ८,५०९ | ५,१२१ | ९०९ | ४०,००४ | २४,८५१ | ३०,८१० | ८,०३३ |
| (१९) यंत्रे व यंत्रसामग्री (इतरत्र वर्गीकृत नसलेले), दुरुस्ती आणि यंत्र व यंत्रसामग्री उभारणी (२८,३३) | २०१३-१४ | २,३६० | १९,१५४ | ७,०९४ | २,०२० | ५९,८१५ | ३२,१२० | ४४,९४७ | १३,०२३ |
| | २०१४-१५ | २,४१४ | २७,८७२ | १३,०७० | २,४०६ | ७७,०८२ | ३७,८८९ | ५४,५५१ | १९,५१९ |
| (२०) मोटार वाहने, ट्रेलर्स व | २०१३-१४ | १,४१४ | ३०,१३१ | (-) ९,००२ | २,५०३ | ८०,१२८ | ४८,४०६ | ६४,९१० | ९,८९४ |
| निम ट्रेलर्स (२९) | २०१४-१५ | १,४११ | ३१,५२३ | (-) १६,५५४ | ३,०७६ | १,००,०९० | ५८,९५५ | ८२,१०५ | १३,९८७ |
| (२१) इतर परिवहन सामग्री (३०) | २०१३-१४ | ३६९ | ७,३४८ | ८०९ | ५३१ | २८,४९७ | १९,६११ | २२,१३३ | ५,८९७ |
| | २०१४-१५ | ३३९ | ९,३०६ | १४० | ६३४ | ३६,४८७ | २३,१५७ | २७,०९५ | ८,५४४ |
| (२२) फर्निचर उत्पादने व इतर | २०१३-१४ | १,३२३ | ४,६०८ | २०,०४९ | ८११ | ५०,२४५ | ३८,४७४ | ४५,००८ | ४,८४४ |
| वस्तुनिर्माण (३१,३२) | २०१४-१५ | १,३५८ | ६,१३६ | १२,८५७ | ७७३ | ३६,११७ | २४,८२८ | ३१,०६० | ४,४७६ |
| (२३) इतर (टाकाऊ वस्तुंचे संचयन, | २०१३-१४ | १,५४२ | ३१,२०३ | २,४९३ | ८९३ | ३७,५२२ | ६,०९२ | ३०,६०२ | ५,२६७ |
| प्रक्रिया व विल्हेवाट संबंधी कार्य, वस्तुंचा पुनर्वापर, प्रकाशन कार्य, इतर उद्योग) (३८,५८, इतर) | २०१४-१५ | १,५०१ | ३१,८३६ | ८१८ | ५३४ | ४०,०२८ | ६,९५६ | ३३,११९ | ५,०६८ |
| **एकूण** | **२०१३-१४** | **२९,१२३** | **३,२६,३६२** | **१,२०,४१८** | **२०,३२१** | **१०,६५,९७१** | **६,३०,४८७** | **८,३७,३९६** | **२,००,५१६** |
| | **२०१४-१५** | **२८,६०१** | **३,३७,१४४** | **१,०९,९७१** | **२२,०५२** | **११,१९,६१८** | **६,४३,५८९** | **८,८०,५४२** | **२,०८,८३१** |

*आधार -* वार्षिक उद्योग पाहणी, केंद्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार

## परिशिष्ट ८.२

## भारतातील औद्योगिक उत्पादनांचे निर्देशांक

(पायाभूत वर्ष २०११-१२=१००)

| अ.क्र. | बाब | भार | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८++* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| **I** | **सर्वसाधारण निर्देशांक** | **१००.००** | **१०३.३** | **१०६.७** | **१११.०** | **११४.७** | **१२०.०** | **१२२.६** |
| **II** | **खाणकाम व दगड खाणकाम** | **१४.३७** | **९४.७** | **९४.६** | **९३.३** | **९७.३** | **१०२.५** | **१००.२** |
| **III** | **वस्तुनिर्माण** | **७७.६३** | **१०४.८** | **१०८.६** | **११२.७** | **११५.९** | **१२१.०** | **१२४.०** |
| | **उद्योग गट** | | | | | | | |
| १ | खाद्य उत्पादने | ५.३० | १०३.३ | १०४.६ | ११०.९ | १०४.७ | ९८.९ | १००.७ |
| २ | पेय | १.०४ | १०६.७ | १०४.८ | १०८.२ | १०९.७ | १०६.३ | १०२.७ |
| ३ | तंबाखू उत्पादने | ०.८० | १०७.५ | ११६.४ | १३१.१ | १३६.३ | ११५.९ | ९६.६ |
| ४ | कापड उत्पादने | ३.२९ | १०८.० | ११२.६ | ११६.९ | ११९.४ | ११७.४ | ११६.४ |
| ५ | वस्त्रप्रावरणे | १.३२ | ९९.० | ११४.८ | ११४.४ | १३१.० | १५१.७ | १३२.६ |
| ६ | चामडे व संबंधित उत्पादने | ०.५० | ११०.६ | ११३.० | १२३.० | १२३.६ | १२२.३ | १२२.८ |
| ७ | लाकुड व लाकडाची उत्पादने आणि बूच (फर्निचर वगळता), काड्यापासून बनविलेल्या व मुलामा दिलेल्या वस्तु | ०.१९ | ९७.० | ९४.६ | ९५.३ | ९७.५ | ९३.१ | ९१.७ |
| ८ | कागद आणि कागदाची उत्पादने | ०.८७ | १०३.३ | ११४.२ | ११५.१ | ११६.५ | ११४.० | १०९.४ |
| ९ | छपाई आणि प्रसार माध्यमे यांची प्रतिलिपी नोंद ठेवणे | ०.६८ | ९६.८ | १०५.८ | १००.० | १०३.८ | १०६.० | १०१.८ |
| १० | कोळसा आणि शुध्द पेट्रोलियम उत्पादने | ११.७७ | १०५.९ | १०८.० | १०८.६ | ११३.७ | ११९.१ | १२२.४ |
| ११ | रसायने व रासायनिक उत्पादने | ७.८७ | १०३.९ | १०८.८ | १०९.२ | ११३.७ | ११६.५ | ११४.९ |
| १२ | औषध,वैद्यकीय रसायने व जैविक उत्पादने | ४.९८ | १०८.१ | ११४.३ | ११६.९ | १३२.१ | १७२.३ | २०७.२ |
| १३ | रबर आणि प्लॅस्टिक उत्पादने | २.४२ | १०१.० | ११२.४ | ११७.७ | ११८.३ | १२०.५ | १११.२ |
| १४ | अधातू खनिज उत्पादने | ४.०९ | १०२.९ | १०३.१ | १०८.२ | ११०.४ | १०९.९ | ११०.५ |
| १५ | मूलभूत धातू | १२.८० | १०७.८ | ११२.५ | १२३.५ | १२४.३ | १३०.६ | १३५.३ |
| १६ | धातूंच्या वस्तुंची उत्पादने (यंत्र व सामग्री वगळून) | २.६५ | ९७.० | १०१.५ | १०५.९ | १०३.४ | १०५.५ | १०३.७ |
| १७ | संगणक, विद्युत आणि ऑप्टिकल उत्पादने | १.५७ | १००.६ | ११५.२ | ११७.६ | १२३.६ | १२६.७ | १४५.९ |
| १८ | विद्युत सामग्री | ३.०० | ११३.० | ११७.४ | १२२.० | १२८.४ | १२२.६ | १०६.६ |
| १९ | यंत्रे व यंत्रसामग्री , इतरत्र वर्गीकृत नसलेले | ४.७७ | १०२.९ | १०३.३ | १०२.६ | १०५.९ | ११४.१ | ११५.७ |
| २० | मोटार वाहने, ट्रेलर्स आणि सेमी ट्रेलर्स | ४.८६ | १००.१ | ९९.१ | १०२.६ | १०१.१ | १०१.७ | ११०.५ |
| २१ | इतर परिवहन सामग्री | १.७८ | ९९.२ | १०३.५ | ११०.० | ११२.५ | ११७.५ | १३३.० |
| २२ | फर्निचर | ०.१३ | ११२.९ | १२५.४ | ११५.६ | १६३.९ | १७६.२ | १८०.७ |
| २३ | इतर वस्तुनिर्माण | ०.९४ | ११३.१ | १०५.२ | १०५.७ | ११९.९ | १२५.६ | १०९.६ |
| **IV** | **वीज** | **७.९९** | **१०४.०** | **११०.३** | **१२६.६** | **१३३.८** | **१४१.६** | **१४९.७** |

*आधार* - केंद्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार * अस्थायी ++ डिसेंबर पर्यंत

# परिशिष्ट ८.३

## महाराष्ट्रातील खनिजांचे उत्पादन

(उत्पादन: '००० टनात)
(मूल्य: ₹ लाख)

| अ. क्र. | खनिज पदार्थ | उत्पादन/ मूल्य | १९६१$ | १९७१$ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१६-१७* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | मीठ | उत्पादन | ३८४ | ४७२ | ५४० | २२९ | १४८ | १८० | १५४ |
| २ | कोळसा | उत्पादन | ८५६ | २,०८५ | ५,७७० | १६,८४८ | २८,७५४ | ३६,९३२ | ४०,५५९ |
| | | मूल्य | १८६ | ७४५ | ६,६८१ | ४७,२४४ | २,१०,१९२ | ५,०८,२४९ | ७,४९,४५१ |
| ३ | क्रोमाईट | उत्पादन | १ | ३ | २ | -- | ०.६ | -- | ०.००१ |
| | | मूल्य | १ | ५ | ५ | -- | ८ | -- | ०.०४२ |
| ४ | कच्चे लोखंड | उत्पादन | ३६२ | ६१३ | १,४५६ | ६४५ | २२ | १,०१८ | १,११८ |
| | | मूल्य | ५१ | ६९ | ६५७ | ३८४ | ३१ | ७,१५४ | ७,१७७ |
| ५ | चुनखडी | उत्पादन | ५५ | ३६३ | ७१५ | ५,१३५ | ६,०६६ | १०,४३१ | ११,११८ |
| | | मूल्य | २ | ३३ | १६३ | १,९६८ | ५,२६६ | १५,६४७ | ४४,९९३ |
| ६ | कच्चे मँगनीज | उत्पादन | १७९ | २१८ | २३२ | २७६ | ३६३ | ५८९ | ४१७ |
| | | मूल्य | २०६ | १४८ | ५५३ | १,६१५ | ६,२८० | ५४,१०९ | ४६,९८८ |
| ७ | केओलिन (नैसर्गिक) | उत्पादन | २ | ३ | ५ | ३ | ०.२ | -- | -- |
| | | मूल्य | ०.१३ | ०.१६ | १ | १ | ०.२९ | -- | -- |
| ८ | बॉक्साईट | उत्पादन | २७ | ३०२ | ३६५ | ५४३ | १,०२७ | २,४९२ | १,८९३ |
| | | मूल्य | २ | २१ | १३७ | ४४३ | १,७०५ | ४,५८५ | २२,९८४ |
| ९ | डोलोमाईट | उत्पादन | ६ | ५ | २७ | २८ | ६५ | ७९ | -- |
| | | मूल्य | ०.३८ | १ | ८ | २७ | १४५ | ७१ | -- |
| १० | सिलिका सँड | उत्पादन | ५ | २७ | ८९ | १९७ | १६८ | ३२७ | -- |
| | | मूल्य | ०.३४ | ३ | ३ | ८७ | २२८ | ९८२ | -- |
| ११ | फ्लोराईट (ग्रेडेड) | उत्पादन | -- | -- | -- | ३ | ३ | २८४ | १ |
| | | मूल्य | -- | -- | -- | -- | २४ | १२,४५७ | -- |
| १२ | लॅटेराईट | उत्पादन | -- | -- | -- | ८५ | ८३ | ४९ | -- |
| | | मूल्य | -- | -- | -- | ७६ | १०७ | ५८ | -- |
| १३ | कायनाईट | उत्पादन | -- | ५ | २२ | १५ | ०.२ | ३ | ३ |
| | | मूल्य | -- | ११ | ५३ | ८५ | १ | २४ | ९३ |
| १४ | इतर$$ | उत्पादन | -- | ४ | ५४४ | ९१२ | ३०६ | ४,०३४ | ६१० |
| | | मूल्य | -- | ०.३६ | २७ | १९६ | ४९ | ५,२५८ | ६४९ |

*आधार* - (१) भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र शासन, नागपूर     * अस्थायी

(२) सहाय्यक मीठ आयुक्त, भारत सरकार, मुंबई (फक्त मीठाकरिता).

$ आकडे कॅलेन्डर वर्षाकरिता आहेत.

$$ सॅन्ड स्टोविंग व सिलीमानाईट हे इतर खनिजांमध्ये अंतर्भूत आहेत.

## परिशिष्ट ८.४

## महाराष्ट्रातील सहकारी संस्थांचा तपशील

| बाब | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१५-१६ | २०१६-१७* |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **१. सहकारी संस्थांची संख्या** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | २९ | ३१ | ३४ | ३४ | ३४ | ३४ | ३४ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | २०,४२०$ | १८,५७७ | १९,५६५ | २०,५५१ | २१,४५१ | २१,१०२ | २१,०८९ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | २,९६४ | ५,४७४ | ११,२९१ | २२,०१४ | २३,४३४ | २०,८०५ | २०,४६५ |
| (४) पणन संस्था | ४१० | ४२३ | ९३१ | १,११५ | १,७१९ | १,१८३ | १,२०७ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम @ | ६,८१० | १४,३२७ | २८,९५४ | ३९,०७० | ४८,८४८ | २७,४१२ | २५,३४४ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था @ | ११,९६४ | २१,९१५ | ४३,८४५ | ७५,२३२ | १,२८,७६० | १,२६,३७१ | १,२७,१६२ |
| **एकूण** | **४२,५९७** | **६०,७४७** | **१,०४,६२०** | **१,५८,०१६** | **२,२४,३०६** | **१,९६,९०७** | **१९५,३०१** |
| **२. सभासदांची संख्या ('०००)** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था $$ | ७० | १,०१४ | १,४८५ | १,३७१ | २४७ | २०९ | २११ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | ३,७९४ | ५,४१६ | ७,९४२ | १०,१२५ | १५,००१ | १५,९२२ | १६,८१४ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | २,४३८ | ३,७५९ | ९,३०२ | १८,४६७ | २१,६१८ | २३,७०६ | २२,५५१ |
| (४) पणन संस्था | २८२ | ४७१ | ७४५ | ८४० | १,३३७ | १,२१४ | १,२८७ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | ९५९ | २,१२४ | ३,९७४ | ६,३३९ | ८,०१० | ५,५९४ | ५,३७४ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | १,०३८ | १,९९९ | ३,४५५ | ५,८८० | ६,८०९ | ६,३८५ | ६,२६५ |
| **एकूण** | **८,५८१** | **१४,७८३** | **२६,९०३** | **४३,०२२** | **५३,०२२** | **५३,०३०** | **५२,५०२** |
| **३. खेळते भांडवल (₹ कोटी)** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ६१३ | १,८३१ | ८,८०६ | ३९,२६७ | ८९,७१९ | १,१६,९१६ | १,३२,८०३ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | ३४३ | ५२७ | १,८५१ | ६,९८८ | १८,९८७ | १९,२६५ | १८,७०१ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | १६८ | १,२०९ | ७,५०८ | ६६,८८७ | १,०४,८१४ | १,६७,९४४ | १,५८,३३९ |
| (४) पणन संस्था | ३९ | १८८ | ३४० | १,५१८ | १,३०० | १,१२० | १,१८८ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | २१९ | १,०२९ | ४,५८८ | १३,२८८ | २८,७१७ | ४९,२९२ | ४४,२२१ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | १०७ | ४२६ | १,१९१ | ६,४९२ | ४,८९७ | ८,७१९ | ८,६२६ |
| **एकूण** | **१,४८९** | **५,२१०** | **२४,२८४** | **१,३४,४४०** | **२,४८,४३४** | **३,६३,२५६** | **३,६३,८७८** |
| **४. स्थूल कर्ज (₹ कोटी)** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ७५१ | १,५२८ | ९,०८५ | २८,७०९ | ४०,४३६ | ५८,९९६ | ५९,५३३ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | १३३ | २५० | ८०० | ३,७३४ | ८,०६० | १४,६११ | १५,४६१ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | २०४ | १,१२९ | ५,१७८ | ३९,२६८ | ४९,९०७ | ७१,८१३ | ६२,६६८ |
| (४) पणन संस्था | ३ | ३ | ८ | १८ | ११ | १ | ४ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | ३ | १२ | १७ | १०३ | २,०५२ | १,७१५ | २,१२८ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | ४ | १२ | ६० | २३५ | २१५ | २४० | २५० |
| **एकूण** | **१,०९८** | **२,९३४** | **१५,१४८** | **७२,०६७** | **१,००,६८१** | **१,४७,३७६** | **१,४०,०४४** |

(पुढे चालू)

## परिशिष्ट ८.४ (समाप्त)

| बाब | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१५-१६ | २०१६-१७* |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **५. येणे कर्जे (₹ कोटी)** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ४७८ | १,१३७ | ५,८८९ | २३,१२० | ४२,३८५ | ६३,०१३ | ६६,४२३ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | २८४ | ३८४ | १,३१० | ५,३०८ | १२,०२४ | १५,६७७ | १३,८२४ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | १०५ | ७३१ | ४,५९४ | ३५,९०८ | ४७,८६३ | ६८,२६९ | ६१,७६४ |
| (४) पणन संस्था | २ | ४ | ९ | १८२ | ५,०३२ | १८ | २२ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | ६ | ३० | ६९ | २३६ | ३,७२४ | ३,५३४ | २,९९७ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | ८ | २५ | १९१ | २,८९९ | ८३४ | ९२१ | ७१२ |
| **एकूण** | **८८३** | **२,३११** | **१२,०६२** | **६७,६५३** | **१,११,८६२** | **१,५१,४३२** | **१,४५,७४२** |
| **६. उलाढाल-तयार मालाच्या विक्रीचे मूल्य (₹ कोटी)** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ला.ना. | ला.ना. | ला.ना. | ला.ना. | ला.ना. | ला.ना. | ला.ना. |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | ५१ | १४६ | २३९ | १,०१२ | ५९३ | ९४१ | ८२६ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | ३ | १० | -- | ३८ | ७६ | -- | -- |
| (४) पणन संस्था | २१४ | ९७९ | २,६०२ | ३,२०५ | १,३६८ | २,०१८ | ३,०९४ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | १९४ | १,०३१ | ३,४६७ | ७,४९६ | ४६,११२ | २१,९१६ | २१,१४२ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | ६९ | १८७ | ३३० | १,५८८ | ४,०७६ | १,३८३ | ३,७७८ |
| **एकूण** | **५३१** | **२,३५३** | **६,६३८** | **१३,३३९** | **५२,२२५** | **२६,२५८** | **२८,८४०** |

*आधार -* सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी ला.ना. - लागू नाही

टीप - १९९०-९१ पर्यंतची आकडेवारी जून अखेरपर्यंतची आहे.

$ यात प्राथमिक कृषि पतसंस्था, प्राथमिक भू-विकास बँका आणि धान्य बँका यांचा १९७०-७१ पर्यंत समावेश आहे.

$$ नाममात्र सभासद वगळून

@ २०००-०१ या वर्षापासून उपसा सिंचन संस्थांचा समावेश उत्पादक ऐवजी सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था या प्रकारात करण्यात आला आहे.

१

# पायाभूत सुविधा



# ९. पायाभूत सुविधा

९.१ जागतिकीकरण हे नवीन युगाचे वास्तव असून प्रगती साध्य करण्यासाठी दर्जेदार पायाभूत सुविधा अपरिहार्य आहेत. संतुलित, सर्वसमावेशक आणि शाश्वत आर्थिक वाढ साध्य करण्यासाठी संवेदनक्षम पायाभूत सुविधांची प्राथमिक गरज आहे. पायाभूत सुविधांचे ऊर्जा, वाहतूक (भूपृष्ठ, रेल्वे, जल आणि हवाई), दळणवळण, इत्यादी घटक आहेत.

## ऊर्जा

९.२ जीवनमान उंचावण्यासाठी आणि शाश्वत आर्थिक वाढीकरीता ऊर्जा अत्यावश्यक आहे. पायाभूत सुविधांच्या विकासाकरीता पुरेशी, खात्रिशीर आणि स्थिर ऊर्जा हा एक अत्यंत महत्वाचा घटक आहे.

## वीज

९.३ वीज हे ऊर्जेचे महत्वाचे स्वरुप आहे आणि जीवनाच्या सर्व पैलूंसाठी आवश्यक आहे. सर्वांना वीज पुरवठा करण्याच्या महत्वकांक्षी योजनेचा शुभारंभ राज्याने केला आहे.

### स्थापित क्षमता

९.४ राज्यातील एकूण स्थापित क्षमता ३१ मार्च, २०१७ रोजी ३५,१६६ मेगावॅट असून त्यात सार्वजनिक क्षेत्राचा ३९.३ टक्के, खाजगी क्षेत्राचा ५४.४ टक्के (त्यापैकी पारंपरिक ३३ टक्के व नवीकरणीय २१.४ टक्के) आणि सार्वजनिक-खाजगी भागीदारी प्रकल्पाचा (रत्नागिरी गॅस पॉवर प्रोजेक्ट मर्या.) ६.३ टक्के वाटा होता. राज्यातील वीज निर्मितीची स्थापित क्षमता ३१ मार्च, २०१६ रोजी देशात सर्वाधिक होती. आधीच्या वर्षाच्या तुलनेत राज्यातील स्थापित क्षमतेत २०१६-१७ मध्ये ७.९ टक्के वाढ झाली, तर केंद्रिय क्षेत्राकडून राज्यासाठीच्या वाटपात १.३ टक्के वाढ झाली. स्रोतनिहाय स्थापित क्षमता तक्ता ९.१ मध्ये दिली आहे.

**आलेख ९.१ : राज्यातील सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील स्थापित क्षमता**




**तक्ता ९.१ स्रोतनिहाय स्थापित क्षमता**

(मेगावॅट)

| स्रोत | ३१ मार्च रोजी | | | ३१ डिसेंबर, २०१७ रोजी | २०१६-१७ मध्ये २०१५-१६ च्या तुलनेत शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|
| | २०१५ | २०१६ | २०१७ | | |
| **राज्याअंतर्गत** | **३१,२९१** | **३२,६०४** | **३५,१६६** | **३५,४६८** | **७.९** |
| औष्णिक | १८,४३६ | १९,०६६ | २१,४९६ | २१,४९६ | १२.७ |
| नवीकरणीय | ६,७१७ | ७,४०० | ७,५३२ | ७,८३९ | १.८ |
| जलजन्य | ३,०६६ | ३,०६६ | ३,०६६ | ३,०६१ | ०.० |
| नैसर्गिक वायुजन्य | ३,०७२ | ३,०७२ | ३,०७२ | ३,०७२ | ०.० |
| **केंद्रिय क्षेत्राकडून वाटप** | **६,६२७** | **७,०२६** | **७,११४** | **७,४२२** | **१.३** |

*आधार :* महानिर्मिती, टाटा पॉवर, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, महाऊर्जा, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन, केंद्रिय विद्युत प्राधिकरण, केंद्र शासन

## वीज निर्मिती

९.५ राज्यात २०१६-१७ मध्ये एकूण वीज निर्मिती (नवीकरणीय स्त्रोतासह) १,१५,०४६ दशलक्ष युनिटस् तर २०१७-१८ मध्ये डिसेंबरपर्यंत एकूण ७४,९६८ दशलक्ष युनिटस् झाली. त्यात सार्वजनिक क्षेत्र, खाजगी क्षेत्र आणि सार्वजनिक-खाजगी भागीदारी क्षेत्रातून २०१६-१७ मध्ये वीजनिर्मितीत अनुक्रमे ४३.३ टक्के, ५२.७ टक्के आणि चार टक्के वाटा होता. स्त्रोतनिहाय वीज निर्मिती तक्ता ९.२ मध्ये दिली आहे.

**आलेख ९.२ : राज्यातील सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील वीज निर्मिती**




**तक्ता ९.२ स्त्रोतनिहाय वीज निर्मिती**

(दशलक्ष युनिटस्)

| स्त्रोत | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८+* | २०१६-१७ मध्ये २०१५-१६च्या तुलनेत शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|
| **राज्याअंतर्गत** | **१,०३,७७९** | **१,१३,७८७** | **१,१५,०४६** | **७४,९६८** | **१.१** |
| औष्णिक | ८४,८८२ | ९४,४८२ | ८९,०८४ | ५९,४४० | (-)५.७ |
| नैसर्गिक वायुजन्य | ४,६२६ | ५,३०२ | ९,४८१ | ६,२२९ | ७८.८ |
| जलजन्य | ५,८५६ | ५,०४५ | ५,९७८ | ३,११२ | १८.५ |
| नवीकरणीय $ | ८,४१५ | ८,९५८ | १०,५०२ | ६,१८७ | १७.२ |
| **केंद्रिय क्षेत्राकडून प्राप्त** | **३०,४०१** | **२९,१७९** | **३२,५८२** | **१८,६२६** | **११.७** |

टीप : १ युनिट = १ किलो वॅट तास  $ बंदिस्त विजेसह  * अस्थायी  + डिसेंबरपर्यंत

*आधार* : महानिर्मिती, टाटा पॉवर, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, महावितरण, केंद्रिय विद्युत प्राधिकरण, केंद्र शासन

## वीज खरेदी

९.६ सन २०१६-१७ मध्ये महावितरणने खरेदी केलेल्या विजेचा सरासरी प्रती युनिट दर ₹ ४.०६ आणि बेस्टने खरेदी केलेल्या विजेचा सरासरी प्रती युनिट दर ₹ ४.९७ होता. महावितरण आणि बेस्ट यांनी खरेदी केलेल्या विजेचा तपशील तक्ता ९.३ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.३ महावितरण आणि बेस्ट यांनी खरेदी केलेली वीज**

| वर्ष | महावितरण | | बेस्ट | |
|---|---|---|---|---|
| | खरेदी केलेली वीज (दशलक्ष युनिटस्) | एकूण किंमत (₹ कोटी) | खरेदी केलेली वीज (दशलक्ष युनिटस्) | एकूण किंमत (₹ कोटी) |
| २०१५-१६ | १,१६,३२५ | ४७,६९६ | ४,८६० | २,७०० |
| २०१६-१७ | १,१७,६०० | ४७,७६१ | ४,६५५ | २,३१४ |
| २०१७-१८+ | ८३,२६० | ३३,७०९ | २,९९८ | १,३४९ |

*आधार* : महावितरण, बेस्ट  + ऑक्टोबरपर्यंत

## विजेचा वापर

९.७ राज्यात २०१६-१७ मध्ये विजेचा एकूण वापर १,०८,४५५ दशलक्ष युनिटस् झाला असून २०१५-१६ मध्ये विजेचा एकूण वापर १,१६,७४३ दशलक्ष युनिटस् होता. राज्यातील विजेचा सर्वाधिक वापर औद्योगिक क्षेत्रात (३१.२ टक्के) तर त्या खालोखाल कृषि क्षेत्रात (२६.१ टक्के) आणि घरगुती क्षेत्रात (२४.८ टक्के) होता. क्षेत्रनिहाय विजेचा वापर तक्ता ९.४ मध्ये दिला आहे.

**आलेख ९.३ : क्षेत्रनिहाय वीज वापर**




**तक्ता ९.४ क्षेत्रनिहाय विजेचा वापर**

(दशलक्ष युनिटस्)

| क्षेत्र | एप्रिल-मार्च | | | एप्रिल-ऑक्टोबर* | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१७-१८ मध्ये २०१६-१७ च्या तुलनेत शेकडा बदल |
| औद्योगिक | ४१,५२२ | ४०,२३१ | ३३,८३३ | १९,३०२ | २२,३१३ | १५.६ |
| कृषि | २६,४०७ | २८,२३६ | २८,२७२ | ११,१७४ | १३,२४५ | १८.५ |
| घरगुती | २५,४२८ | २७,००१ | २६,८७४ | १७,२४० | १८,००९ | ४.५ |
| वाणिज्यिक | १२,५०४ | १३,१८२ | १२,८७२ | ७,८०७ | ८,२८८ | ६.२ |
| सार्वजनिक सेवा@ | ४,१८३ | ४,२८७ | ४,५०४ | २,६०८ | २,७३१ | ४.७ |
| रेल्वे | २,४४३ | १,७९५ | ११३ | ७२ | ९१ | २६.४ |
| इतर | ३६८ | २,०११ | १,९८७ | १,२०४ | १,३०३ | ८.२ |
| **सर्व** | **१,१२,८५५** | **१,१६,७४३** | **१,०८,४५५** | **५९,४०७** | **६५,९८०** | **११.१** |

@ सार्वजनिक दिवाबत्ती व पाणी पुरवठा * अस्थायी

*आधार :* महावितरण, टाटा पॉवर, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, बेस्ट

९.८ भारतातील आणि महाराष्ट्रातील दरडोई विजेचा अंतिम वापर तक्ता ९.५ मध्ये दिला आहे.

९.९ कोकण विभागात एकूण वीज वापर सर्वाधिक बृहन्मुंबईसह (३४.७ टक्के) असून त्याखालोखाल पुणे (२५.८ टक्के), नाशिक (१४.२ टक्के), औरंगाबाद (१२.४ टक्के), नागपूर (७.५ टक्के) व अमरावती (५.४ टक्के) आहे. विभागनिहाय विजेचा वापर तक्ता ९.६ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.५ दरडोई विजेचा अंतिम वापर**

(युनिटस्)

| क्षेत्र | २०१५-१६ | | २०१६-१७ | |
|---|---|---|---|---|
| | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र |
| **सर्व** | **६८३.६** | **९६५.२** | **७१२.०** | **९०७.०** |
| औद्योगिक | २२६.२ | २८६.४ | २३३.६ | २८२.३ |
| कृषि | १३७.१ | २३७.६ | १५१.३ | २३६.० |
| घरगुती | १८९.१ | २३३.७ | २०३.१ | २२४.८ |
| वाणिज्यिक | ६८.१ | ११६.१ | ६९.९ | १११.९ |

*आधार :* केंद्रिय विद्युत प्राधिकरण, केंद्र शासन

**तक्ता ९.६ विभागनिहाय विजेचा वापर**

(दशलक्ष युनिटस्)

| विभाग | वर्ष | क्षेत्र | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | घरगुती | वाणिज्यिक | औद्योगिक | कृषि | इतर@ | |
| कोकण (बृहन्मुंबईसह) | २०१५-१६ | १३,९७५ | ८,८९४ | १६,३८९ | १४० | २,८६९ | ४२,२६७ |
| | २०१६-१७ | १३,८५९ | ८,६५७ | १२,९९५ | १३६ | १,९५५ | ३७,६०३ |
| नाशिक | २०१५-१६ | १,२०० | ४०७ | ३,०८८ | ५,०७९ | ६३४ | १०,४०८ |
| | २०१६-१७ | १,९७७ | ६०१ | ३,४४३ | ८,४२७ | ९४५ | १५,३९२ |
| पुणे | २०१५-१६ | ५,०६६ | २,४८६ | ११,८६१ | ८,८२६ | १,६९० | २९,९२९ |
| | २०१६-१७ | ५,०८७ | २,३३५ | १०,३०१ | ८,४८४ | १,७३४ | २७,९४१ |
| औरंगाबाद | २०१५-१६ | २,६३७ | ५५६ | ४,७३१ | ९,७४७ | १,३३९ | १९,०१० |
| | २०१६-१७ | १,७८१ | ४३९ | ३,४८० | ६,९७६ | ७९५ | १३,४७२ |
| अमरावती | २०१५-१६ | १,४८२ | २३० | ६८७ | ३,२०० | ५९० | ६,१८९ |
| | २०१६-१७ | १,४९४ | २४१ | ६७१ | ३,०२१ | ४५२ | ५,८७९ |
| नागपूर | २०१५-१६ | २,६४१ | ६०९ | ३,४७५ | १,२४४ | ९७१ | ८,९४० |
| | २०१६-१७ | २,६७६ | ५९९ | २,९४२ | १,२२८ | ७२२ | ८,१६८ |
| **एकूण** | **२०१५-१६** | **२७,००१** | **१३,१८२** | **४०,२३१** | **२८,२३६** | **८,०९३** | **१,१६,७४३** |
| | **२०१६-१७** | **२६,८७४** | **१२,८७२** | **३३,८३३** | **२८,२७२** | **६,६०३** | **१,०८,४५५** |

*आधार :* महावितरण, टाटा पॉवर, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, बेस्ट

@ सार्वजनिक पाणीपुरवठा, सार्वजनिक दिवाबत्ती, रेल्वे व इतर बाबी समाविष्ट

९.१० स्थापित क्षमता, विद्युत निर्मिती, क्षेत्रनिहाय विजेचा वापर आणि दरडोई विजेचा अंतिम वापर यासंबंधीची मालिका परिशिष्ट ९.१ मध्ये दिली आहे.

## विजेची मागणी व पुरवठा

९.११ राज्यातील क्षमता वाढ, पारेषण व वितरण जाळ्यातील सुधारणा आणि ऊर्जा संवर्धनाच्या विविध उपाययोजनांमुळे वीज पुरवठ्यात सुधारणा झाली आहे. महावितरणची २०१६-१७ मध्ये १६,९०३ मेगावॅट विजेची सरासरी कमाल मागणी ३७ मेगावॅट तुटीचे भारनियमन करुन भागविण्यात आली, तर २०१७-१८ मध्ये नोव्हेंबर पर्यंतची १७,१२१ मेगावॅटची सरासरी कमाल मागणी ८२ मेगावॅट भारनियमन करुन भागविण्यात आली. सरासरी कमाल मागणीच्या वेळी विजेचा पुरवठा व तूट तक्ता ९.७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.७ सरासरी कमाल मागणीच्या वेळी विजेचा पुरवठा व तूट**

(मेगावॅट)

| वर्ष | सरासरी कमाल मागणी | पुरवठा | तूट |
|---|---|---|---|
| २०१३-१४ | १४,४०६ | १३,८३० | ५७६ |
| २०१४-१५ | १५,८१२ | १५,३९२ | ४२० |
| २०१५-१६ | १५,९४८ | १५,८५० | ९८ |
| २०१६-१७ | १६,९०३ | १६,८६६ | ३७ |
| २०१७-१८+ | १७,१२१ | १७,०३९ | ८२ |

*आधार :* महावितरण

\+ नोव्हेंबरपर्यंत

## पारेषण व वितरणाचे पायाभूत जाळे

९.१२ पारेषण व वितरणाच्या पायाभूत जाळ्यामध्ये सुधारणा ही सातत्यपूर्ण प्रक्रिया असून त्यात अति उच्च दाब (इएचव्ही) उपकेंद्रांचे आधुनिकीकरण, सदोष मीटर बदलणे, अत्याधिक भार असलेल्या उच्च व कमी दाबाच्या वाहिन्यांवरील भार अतिरिक्त रोहित्रे पुरवून कमी करणे, नवीन उपकेंद्रे उभारणे व कार्यान्वित करणे, तारा टाकणे यांसह वीजचोरी विरुद्ध मोहीम अशा महापारेषण व महावितरण यांच्याद्वारे हाती घेतलेल्या उपाययोजनांचा समावेश आहे.

९.१३ महापारेषण कंपनीची ४४,६८५ सर्किट किमीचे जाळे व ६५२ उपकेंद्रे यांसह २०१६-१७ पर्यंतची पारेषण क्षमता सुमारे १,१९,२६३ मेगा व्होल्ट ॲम्पिअर (एमव्हीए) होती. सन २०१६-१७ मध्ये पारेषण क्षमतेत ९८५ सर्किट किमी जाळे व १९ उपकेंद्रांसह ८,३९८ एमव्हीए वाढ झाली. तर २०१७-१८ मध्ये डिसेंबरपर्यंत पारेषण क्षमतेत १,०१७ सर्किट किमी जाळे व आठ उपकेंद्रांसह २,११० एमव्हीए वाढ झाली. महापारेषण कंपनीची २०१६-१७ ची पारेषण हानी ३.६३ टक्के आणि २०१७-१८ मध्ये नोव्हेंबरपर्यंत ३.३५ टक्के होती.

९.१४ महावितरण कंपनीच्या वितरण जाळ्यात २०१६-१७ मध्ये ३,२५७ उपकेंद्रे, ९,९२,९८९ सर्किट किमी वाहिन्या व ५,८३,७२५ वितरण ट्रान्सफॉर्मर्स होते. सन २०१७-१८ डिसेंबर पर्यंत १४७ उपकेंद्रे, ६,९०० सर्किट किमी वाहिन्या व ७,५१० वितरण ट्रान्सफॉर्मर्सची भर घालण्यात आली. सन २०१६-१७ मध्ये १६,७२,३४२ व २०१७-१८ मध्ये ऑक्टोबरपर्यंत ५,३८,८९९ जुने मीटर्स बदलून नवीन बसविण्यात आले. वीजचोरी विरुद्ध चालविण्यात येत असलेल्या मोहिमेत २०१६-१७ मध्ये ४६,५३० प्रकरणे आढळली त्यातून ₹ १७.०३ कोटी रक्कम वसूल झाली. तर २०१७-१८ मध्ये ऑक्टोबरपर्यंत आढळलेल्या ३२,२४० प्रकरणांतून ₹ ११.२७ कोटी रक्कम वसूल करण्यात आली. सन २०१७-१८ मध्ये ऑक्टोबरपर्यंतची एकूण तांत्रिक व वाणिज्यिक (एटी ॲन्ड सी) हानी महावितरण कंपनीची २२.१ टक्के, टाटा पॉवर ०.९३ टक्के व रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर ३.६३ टक्के होती.

**आलेख ९.४ : महावितरणाची एकूण तांत्रिक व वाणिज्यिक हानी आणि वितरण हानी**




९.१५ राज्यातील वीज वितरण यंत्रणांमध्ये २०१६-१७ करिता महावितरणचा वाटा ८४.५ टक्के असून त्या पाठोपाठ रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर ७.३ टक्के, टाटा पॉवर ४.१ टक्के आणि बेस्टचा ४.१ टक्के होता. वितरण हानी तक्ता ९.८ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.८ वितरण हानी**

(टक्के)

| परवानाधारक | वितरण हानी | | | |
|---|---|---|---|---|
| | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८+ |
| महावितरण | १६.४ | १७.४ | १४.७ | १४.६ |
| टाटा पॉवर | १.०८ | ०.६३ | ०.८५ | ०.७५ |
| रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर | ९.४७ | ९.२४ | ८.७७ | ८.८६ |
| बेस्ट | ६.५३ | ५.८३ | ५.४२ | ५.०० |

*आधार* : महावितरण, टाटा पॉवर, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर, बेस्ट + सप्टेंबरपर्यंत

९.१६ उज्वल डिस्कॉम अॅश्युरन्स योजना (उदय) : राज्य शासनाच्या मालकीच्या वीज वितरण कंपन्यांच्या आर्थिक परिवर्तनासाठी केंद्र शासनाने २०१५ मध्ये राज्य वितरण यंत्रणांच्या नवीन कार्यान्वयन व वित्तीय कार्यक्षमतेत सुधारणा करण्याच्या उद्देशाने ही योजना मंजूर केली. राज्य शासनाकडून २०१६-१७ मध्ये ₹ ४,९५९.७५ कोटी महावितरणला सदर योजनेसाठी वर्ग करण्यात आले आहेत. राज्यात फिडर मीटरिंग, ग्रामीण फिडर ऑडिट आणि एलईडी दिवे वितरण पूर्ण झाले आहे तर वितरण ट्रान्सफॉर्मर्स मीटरिंगचे काम प्रगतीपथावर आहे.

९.१७ एकात्मिक वीज विकास योजना : केंद्र शासनाने २०१५ मध्ये नागरी क्षेत्रासाठी (संविधानिक नगरे) योजना घोषित केली. जनगणना २०११ नुसार १५,००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या एकूण २५४ शहरांचा या योजनेत विचार करण्यात आला आहे. उप-पारेषण वितरण जाळे यांचे बळकटीकरण, वितरण ट्रान्सफॉर्मर्स/ फिडर्स/ ग्राहक यांचे मीटरिंग आणि वितरण क्षेत्रात माहिती तंत्रज्ञानाचा वापर ही योजनेची उद्दिष्टे आहेत. केंद्र शासनाने ₹ २,३००.४३ कोटी रकमेच्या प्रकल्पांना मान्यता दिली असून ₹ २५८.०५ कोटी राज्यास वितरीत केले आहेत व त्यापैकी ₹ १०४ कोटी डिसेंबर, २०१७ पर्यंत खर्च झाले आहेत.

## क्षमता वाढ

९.१८ **औष्णिक ऊर्जा** : महाराष्ट्र राज्य वीज निर्मीती कंपनी लि. ने महानिर्मितीच्या विविध औष्णिक ऊर्जा निर्मिती केंद्रांत फ्ल्यु- गॅस डिसल्फरायझेशन(एफजीडी) प्रकल्पांची स्थापना व कार्यान्वयन करण्याच्या कृती आराखड्याची अंमलबजावणी करण्यास मान्यता दिली आहे. चंद्रपूर २,५०० मेगावॅट, भुसावळ १,००० मेगावॅट, पारस १,२५० मेगावॅट, खापरखेडा ५०० मेगावॅट आणि कोराडी १,३२० मेगावॅट या प्रकल्पांसाठी क्षमतावाढीची प्रक्रिया सुरू आहे.

९.१९ **नवीकरणीय ऊर्जा** : पवन, सौर, जैविक, बायोगॅस, सागरी लाटा, भू-औष्णिक, इ. स्वच्छ आणि पर्यावरण पूरक नवीकरणीय ऊर्जेचे स्रोत आहेत. समन्वयन, विनिमय व ऊर्जा संवर्धन कायदा, २००१ मधील तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी अधिकृत यंत्रणा म्हणून राज्य शासनाने महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) या संस्थेस अधिसूचित केले आहे. नवीकरणीय ऊर्जेचा प्रचार व प्रसार आणि ऊर्जा संवर्धन कार्यक्रमांची अंमलबजावणी यासाठी महाऊर्जा सक्रीय आहे.

९.२० केंद्र शासनाप्रमाणे नवीकरणीय ऊर्जा स्रोतांमधून १० टक्के पर्यंत वीज खरेदीचे बंधन साध्य करण्याचे धोरण राज्य शासनाने स्विकारले आहे. त्यास अनुसरुन नवीकरणीय ऊर्जा स्रोतांद्वारे निर्मित वीज ग्रीड जोडणीमध्ये आणण्यासाठी धोरणे जाहीर केलेली आहेत. नवीकरणीय ऊर्जेच्या संभाव्य क्षमतेनुसार राजस्थान व जम्मू-काश्मीर नंतर राज्य देशात तिसऱ्या क्रमांकावर आहे तर नवीकरणीय ऊर्जा स्रोतांद्वारे वीज निर्मिती प्रकल्पांच्या स्थापित क्षमतेनुसार राज्याचा देशात तामिळनाडू नंतर दुसरा क्रमांक आहे. नवीकरणीय ऊर्जेची संभाव्य क्षमता व स्थापित क्षमता तक्ता ९.९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.९ नवीकरणीय ऊर्जेची संभाव्य क्षमता व स्थापित क्षमता**

(मेगावॅट)

| स्रोत | संभाव्य क्षमता | स्थापित क्षमता | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ३१ मार्च रोजी | | | ३१ ऑक्टोबर, २०१७ रोजी |
| | | २०१५ | २०१६ | २०१७ | |
| पवन | ९,४०० | ४,४४४ | ४,६६२ | ४,७६९ | ४,७७५ |
| चिपाडांपासून वीज सहनिर्मिती | २,५०० | १,४१५ | १,४१५ | १,८४९ | १,८४९ |
| लघु जल विद्युत प्रकल्प# | ७३२ | २९४ | ३०२ | ३०४ | ३०४ |
| कृषि अवशेष | ८३१ | २०० | २०० | २१५ | २१५ |
| शहरी घनकचरा | २८७ | ३ | ३ | ३ | ३ |
| औद्योगिक कचरा | २०० | ३२ | ३४ | ९ | ९ |
| सौर | ७,५०० | ३२९ | ३६२ | ३८३ | ६२४ |
| **एकूण** | **२१,४५०** | **६,७१७** | **६,९७८** | **७,५३२** | **७,७७९** |

*आधार* : महाऊर्जा, 'ऊर्जा सांख्यिकी २०१६' अहवाल, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन # जलसंपदा विभागाने स्थापित केलेले २५ मेगावॅट पेक्षा कमी क्षमतेचे प्रकल्प

## नियामक उपाययोजना व वीज दर

९.२१ महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाची स्थापना वीज दर निश्चिती, वीज खरेदी आणि पारेषण व वितरण यंत्रणांच्या प्रापण प्रक्रियांचे नियमन, वीज क्षेत्रामधे स्पर्धा, कार्यक्षमता व काटकसरीस उत्तेजन यासाठी करण्यात आली आहे. सन २०१७-१८ मधील सरासरी वीज दर तक्ता ९.१० मध्ये दिले आहेत.

**तक्ता ९.१० सन २०१७-१८ मधील सरासरी वीज दर**

(₹ प्रति युनिट)

| ग्राहक गट | महावितरण | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर | टाटा पॉवर | बेस्ट |
|---|---|---|---|---|
| **लघु दाब - घरगुती/निवासी** | | | | |
| दारिद्र्यरेषेखालील | १.५४ | @ | @ | २.५१ |
| ० ते १०० युनिट्स | ४.८७ | ४.१४ | १.५५ | ३.५० |
| १०१ ते ३०० युनिट्स | ८.५१ | ८.४३ | ४.०० | ५.९५ |
| ३०१ ते ५०० युनिट्स | ११.५० | ९.७९ | ७.३७ | ८.४७ |
| ५०१ ते १,००० युनिट्स | १३.०८ | ११.६४ | ९.९२ | १०.३४ |
| १,००० युनिट्स पेक्षा अधिक | १४.३४ | ११.६४ | ९.९२ | १०.३४ |
| **लघु दाब - व्यावसायिक/अनिवासी** | | | | |
| ०- २० किलोवॅट | १०.३३ | १०.२९ | ७.६८ | ९.८६ |
| > २० किलोवॅट आणि < = ५० किलोवॅट | १३.३२ | १०.३९ | ८.२५ | ९.७७ |
| ५० किलोवॅट पेक्षा अधिक | १५.७९ | १०.९३ | ९.४९ | १०.३७ |
| **लघु दाब - उद्योग** | | | | |
| २० किलोवॅट पेक्षा कमी भार | ६.३५ | ८.७४ | ७.२७ | ९.२१ |
| २० किलोवॅट पेक्षा अधिक भार | ९.२३ | ९.४६ | ८.७८ | ९.२० |
| **लघु दाब - कृषि** | | | | |
| कृषि पंप (मीटर शिवाय) | ३.९५ | -- | -- | -- |
| कृषि पंप (मीटर सह) | ३.२८ | ४.८७ | -- | -- |
| इतर (मीटर सह) | ५.०१ | -- | -- | -- |
| **लघु दाब - पथदिवे (सार्वजनिक दिवाबत्ती)** | | | | |
| ग्रामपंचायत आणि अ, ब व क वर्ग नगरपालिका | ५.६१ | -- | -- | -- |
| महानगरपालिका क्षेत्रे | ६.८८ | ८.८१ | ७.८३ | ८.७३ |
| **लघु दाब - सार्वजनिक सेवा** | | | | |
| शासकीय शैक्षणिक संस्था व रुग्णालये | ८.६७ | ८.२८ | ७.८९ | ८.६७ |
| इतर | ९.०६ | ८.५५ | ९.२६ | ९.३८ |
| **उच्च दाब - उद्योग** | ८.६१ | ९.८० | ८.५५ | ९.१३ |
| **उच्च दाब – रेल्वे/मेट्रो/मोनोरेल** | ९.१६ | ७.९९ | ७.८८ | @ |
| **उच्च दाब - सार्वजनिक सेवा** | | | | |
| शासकीय शैक्षणिक संस्था व रुग्णालये | ८.५७ | ९.२१ | ७.७७ | ८.०२ |
| इतर | १०.५६ | १०.१३ | ९.०३ | ९.४० |
| **उच्च दाब - कृषि पंप** | ४.१९ | -- | -- | -- |

*आधार*: महाराष्ट्र वीज नियामक आयोग @ ग्राहकांची संख्या निरंक वा अत्यंत कमी असल्याने सरासरी दर दर्शविले नाहीत -- लागू नाही

९.२२ छतावरील सौर पीव्ही नेट मीटरिंग नियमन २०१५ अधिसूचित केल्यानंतर ऑक्टोबर, २०१७ पर्यंत ३,१०० ग्राहकांना एकूण ३१.५ मेगावॅट क्षमतेची वीज उपलब्ध झाली आहे.

९.२३ **ऊर्जा अक्षय्यता कार्यक्रम व नवीकरणीय ऊर्जेसंबंधीच्या इतर उपाययोजना** : नवीकरणीय ऊर्जेची स्वतंत्रपणे कार्यरत असलेली उपकरणे मोठ्या प्रमाणात अनुदानित तत्वावर वितरीत करण्यात आली आहेत. राज्यात खुल्या बाजाराद्वारे १२.२४ लाख चौ.मी. सौर ऊर्जा एकत्रिकरण क्षेत्र (सौर उष्मीकरण पध्दती), १.६२ लाख सौर कंदील, ०.४५ लाख सौर घरगुती दिवे, १.१६ लाख सौर पथदिवे स्थापित करण्यात आले आहेत. ऊर्जा अक्षय्यता कार्यक्रम व इतर उपाययोजना अंतर्गत साध्य तक्ता ९.११ मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता ९.११ ऊर्जा अक्षय्यता कार्यक्रम व इतर उपाययोजना अंतर्गत साध्य**

(संख्या)

| तपशील | साध्य | | |
|---|---|---|---|
| | २०१५-१६ | २०१६-१७ | मार्च, २०१७ अखेर संचयी |
| **ऊर्जा अक्षय्यता कार्यक्रम** | | | |
| अ) ऊर्जा लेखा परिक्षण | ७२ | ९५ | ९८० |
| ब) संक्षिप्त ऊर्जा लेखा परिक्षण | ० | ० | २,२४७ |
| क) अपव्ययित उष्म्याचा पुनर्वापर | ० | ० | ११ |
| ड) ग्रामपंचायत क्षेत्रात सीएफएल दिवे बदलणे | ११,६९६ | ० | १,५३,०६६ |
| इ) शासकीय/निमशासकीय कार्यालयांच्या इमारतींमध्ये ऊर्जा संवर्धन पथदर्शी प्रकल्प | ६ | २३ | ८७ |
| ई) नगरपालिकांमध्ये ऊर्जा संवर्धन संयंत्रे बसविणे | १० | ० | ३४ |
| वारा मापन केंद्रे | ३ | ० | ४०९ |
| सौर किरणोत्सार निर्धारण केंद्रे | १ | १ | ७ |
| सामायिक अभ्यासिकेत सौर दिवे | ० | ० | १८,६०३ |
| ग्रामीण विद्युतीकरण अ) गावे | ० | ४३ | ५८६ |
| ब) पाडे-वस्त्या | ० | १० | ७०३ |
| शासकीय इमारतीतील सौर ऊर्जा प्रकल्प | ११ | १७ | ४१ |
| जैविक कांडी कोळसा (ब्रिक्वेटींग) प्रकल्प | १७ | ३२ | १५२ |
| पवन-सौर संकरित संयंत्रे अ) संख्या | ० | १० | २८६ |
| ब) क्षमता (किलोवॅट) | ० | १०० | २,१७४ |
| *आश्रमशाळा* व वसतीगृहातील पवन-सौर संकरित यंत्रणा | ० | ० | २० |
| प्रदर्शने | २० | १६ | २७७ |
| *आश्रमशाळांतील* सौर ऊर्जा संयंत्रे (सौर घरगुती दिवे, पथदिवे, जल उष्मीकरण यंत्रणा आणि ऊर्जा संच) | ० | ० | १० |

*आधार* : महाऊर्जा

९.२४ **ग्रामीण विद्युतीकरण, जाळयांची सुधारणा आणि ऊर्जा अक्षय्यता** : राज्यातील वस्ती असलेल्या एकूण ४०,९५९ गावांपैकी (जनगणना २०११ नुसार) ४०,९१३ गावांचे डिसेंबर, २०१७ पर्यंत पारंपारिक ऊर्जेद्वारे विद्युतीकरण झाले आहे. ग्रामीण विद्युतीकरण, जाळयांची सुधारणा आणि ऊर्जा अक्षय्यतेसाठी राबविण्यात येत असलेल्या योजना खालीलप्रमाणे आहेत.

९.२४.१ दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना : केंद्र शासनाने २०१५ पासून ग्रामीण भागासाठी हि (१०० टक्के केंद्रपुरस्कृत) योजना सुरु केली असून राज्यासाठी ₹ २,१६४.१५ कोटी रक्कम मंजूर करण्यात आली आहे. एकूण १२.४८ लाख ग्रामीण कुटुंबांना (त्यापैकी ३.९६ लाख दारिद्र्य रेषेखालील) वीज जोडणी देण्याचे प्रस्तावित आहे.

९.२४.२ कृषि पंपांचे विद्युतीकरण : सन २०१६-१७ मध्ये १,२५,५२२ कृषि पंपांचे व सन २०१७-१८ मध्ये डिसेंबर पर्यंत ४७,१४० कृषि पंपांचे विद्युतीकरण पूर्ण झाले आहे. कृषि पंपांच्या विद्युतीकरणाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी २०१७-१८ मध्ये ₹ ८७.३ कोटी अनुदान मंजूर करण्यात आले आहे. 'मागेल त्याला वीज जोडणी' ही स्थिती गाठण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

९.२४.२.१ राज्यात सुमारे ४०.८२ लाख कृषि पंप आहेत. कृषि पंपांना वीज पुरवठा करण्यासाठी अनुदान दिले जाते. सन २०१७-१८ मध्ये कृषि पंपांना वीज पुरवठा करण्यासाठी ₹ ६,२४५ कोटी व २०१६-१७ मध्ये ₹ ४,५१०.३९ कोटीचे अनुदान देण्यात आले होते.

९.२४.३ अटल सौर कृषि पंप योजना : सदर योजना राज्यात २०१५ पासून सुरु करण्यात आली असून राज्यात ७,५४० सौर कृषि पंप स्थापित करण्याच्या उद्दिष्टाच्या तुलनेत सुमारे ४,५७६ सौर कृषि पंप डिसेंबर, २०१७ पर्यंत कार्यान्वित करण्यात आले.

९.२४.४ मुख्यमंत्री सौर कृषि वाहिनी योजना : सदर योजना नव्याने जाहीर करण्यात आली असून शेतकऱ्यांना कमी दरात सौर ऊर्जा उपलब्ध करून देऊन कृषि पंप चालविणे आणि अखंड १२ तास वीज पुरवठा करणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे.

९.२४.५ घरगुती कार्यक्षम दिव्यांसाठी कार्यक्रम : जून, २०१५ मध्ये घोषित करण्यात आलेल्या या कार्यक्रमांतर्गत घरगुती ग्राहकांकडील सद्यस्थितीतील सीएफएल व इनकॅन्डेसन्ट दिव्यांच्या ऐवजी एलईडी दिवे बदलून देण्यात येत आहेत. हा कार्यक्रम एनर्जी एफिशियन्ट सर्व्हिसेस लि. या केंद्रिय वीज मंत्रालयाच्या सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांच्या संयुक्त उपक्रमाद्वारे राबविण्यात येत असून राज्यात महावितरण व्दारे कार्यरत आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने मंजुरी दिलेल्या आराखड्यानुसार महावितरणला ३.८६ कोटी एलईडी दिवे वितरणासाठी ₹ ५५३.९३ कोटी खर्च अंदाजित असून याद्वारे अंदाजित ७५० दशलक्ष युनिट्सची वार्षिक बचत व मागणीत सुमारे २९३ मेगावॅट घट अपेक्षित आहे. पुढील दोन आर्थिक वर्षात तीन कोटी एलईडी दिवे वितरित करण्याचे उद्दिष्ट आहे. राज्यात ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत सुमारे २.१७ कोटी एलईडी दिव्यांचे वितरण करण्यात आले आहे.

९.२५ **नवीकरणीय ऊर्जा खरेदी बंधन (‘आरपीओ’) व नवीकरणीय ऊर्जा प्रमाणपत्रे (‘आरईसी’) पध्दती** : नवीकरणीय ऊर्जा खरेदी बंधन हे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने कायद्याद्वारे बंधनकारक केले असून बांधील यंत्रणेद्वारे (वितरण परवानाधारक, ग्रीडला जोडलेले बंदिस्त वीज निर्मिती प्रकल्प व वितरण मुक्त प्रवेश असलेले ग्राहक) वापर केलेल्या एकूण विजेपैकी किमान मर्यादेपर्यंत नवीकरणीय ऊर्जा खरेदी करणे बंधनकारक आहे.

९.२६ नवीकरणीय ऊर्जेस चालना देण्यासाठी आणि उपलब्ध असलेले नवीकरणीय ऊर्जा स्रोत व बांधील यंत्रणांना साध्य करावयाचे नवीकरणीय ऊर्जा खरेदी बंधन यांच्यात असलेली तफावत दूर करण्याकरिताचे ‘आरईसी’ हे बाजाराधारीत साधन आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने महाऊर्जा या यंत्रणेस ‘आरपीओ’, त्याचे अनुपालन व ‘आरईसी’ पध्दतीची अंमलबजावणी यासाठी राज्य यंत्रणा म्हणून घोषित केले आहे. बांधील यंत्रणांना त्यांच्या एकूण वीज वापराच्या किमान पातळीपर्यंत नवीकरणीय ऊर्जा खरेदी करणे अनिवार्य आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या ‘आरपीओ-आरईसी नियमन २०१०’ (२०१७-१८ पर्यंत) अनुसार नवीकरणीय ऊर्जा स्रोतांमधून किमान खरेदी करावयाची ऊर्जा (१ युनिट विजेच्या समतुल्य) सौर ऊर्जेसाठी दोन टक्के व इतर नवीकरणीय ऊर्जेसाठी १०.५ टक्के इतके उद्दिष्ट आहे. नवीकरणीय ऊर्जा बंधन (आरपीओ) चे साध्य तक्ता ९.१२ मध्ये दिले आहे.

**तक्ता ९.१२ नवीकरणीय ऊर्जा बंधन (आरपीओ) चे साध्य**

(टक्के)

| वितरण परवानाधारक | साध्य* | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सौर | | इतर नवीकरणीय ऊर्जा | | एकूण | |
| | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१६-१७ | २०१७-१८ |
| महावितरण | ०.३८ | ०.३३ | ८.३६ | ७.४५ | ८.७४ | ७.७८ |
| टाटा पॉवर | १.०९ | १.७७ | १०.१६ | ९.७० | ११.२५ | ११.४७ |
| रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर | ०.७३ | ०.६५ | ७.३४ | ३.२१ | ८.०७ | ३.८६ |
| बेस्ट | ०.९८ | ०.६० | ९.०८ | ३.७३ | १०.०६ | ४.३३ |

*आधार* : महाऊर्जा * अस्थायी

## ऊर्जेचे इतर प्रकार

### पेट्रोलियम व नैसर्गिक वायू

९.२७ पेट्रोलियम उत्पादनांच्या एकूण वापराची आकडेवारी वाढीचा कल दर्शविते. भारतात व महाराष्ट्रात प्रमुख पेट्रोलियम उत्पादनांमध्ये मागील वर्षीच्या तुलनेत २०१६-१७ मध्ये अनुक्रमे ३.२ टक्के व ६.१ टक्के वाढ झाली. भारतात व महाराष्ट्रात प्रमुख पेट्रोलियम उत्पादनांचा झालेल्या वापराचा तपशील तक्ता ९.१३ मध्ये दिला आहे.

**आलेख ९.५ : पेट्रोलियम उत्पादनांची दरडोई विक्री**



**तक्ता ९.१३ प्रमुख पेट्रोलियम उत्पादनांचा वापर**

('००० टन)

| पेट्रोलियम उत्पादने | २०१५-१६ | | २०१६-१७* | |
|---|---|---|---|---|
| | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र |
| नॅप्था | १३,२७१ | २९७ | १३,१७४ | ४०१ |
| द्रवरुप पेट्रोलियम गॅस (एलपीजी) | १९,६२३ | २,४२५ | २१,५३७ | २,६३५ |
| मोटर स्पिरीट/गॅसोलिन (एमएस) | २१,८४७ | २,८३७ | २३,७६५ | ३,०२५ |
| सुपिरीयर केरोसिन ऑईल (एसकेओ) | ६,८२६ | ४८६ | ५,३९७ | ४१३ |
| एव्हीएशन टर्बाईन इंधन (एटीएफ) | ६,२६२ | १,३७४ | ६,९९८ | १,४६६ |
| हाय स्पीड डिझेल (एचएसडी) | ७४,६४७ | ७,८१४ | ७६,०१५ | ८,०७१ |
| लाईट डिझेल ऑईल (एलडीओ) | ४०७ | ८८ | ४४९ | ९८ |
| फर्नेस ऑईल (एफओ) | ६,४८२ | ८२३ | ७,०७७ | ८५८ |
| हॉट हेवी स्टॉक (एचएचएस)/ लो सल्फर हेवी स्टॉक (एलएसएचएस) | १५० | १८ | १०४ | २७ |
| लुब्रीकन्ट /वंगण | ३,५७१ | ३१७ | ३,३५३ | ३०७ |
| बिटुमेन | ५,९३८ | ४६८ | ५,९३९ | ५०० |
| इतर | २,८०२ | १,२८१ | ३,१३७ | १,५३७ |
| **एकूण** | **१,६१,८२६** | **१८,२२८** | **१,६६,९४५** | **१९,३३८** |

*आधार* : 'भारतीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू सांख्यिकी २०१५-१६ व २०१६-१७' अहवाल * अस्थायी

९.२८ एलपीजी घरगुती ग्राहक, वितरक, उच्च दर्जाचे केरोसिन तेल (एसकेओ)/ कमी प्रतीचे डीझेल तेल (एलडीओ) वितरक आणि किरकोळ विक्री केंद्रे तक्ता ९.१४ मध्ये दिली आहेत.

**तक्ता ९.१४ एलपीजी घरगुती ग्राहक, वितरक, केरोसिन/एलडीओ वितरक आणि किरकोळ विक्री केंद्रे**

| तपशील | २०१४-१५ | | २०१५-१६ | | २०१६-१७ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र |
| एलपीजी घरगुती ग्राहक (संख्या लाखात) | १,८१९ | २१७.९ | २,०१७.८९ | २३४.५९ | २,३४६.०५ | २५६.५० |
| एलपीजी वितरक (संख्या) | १५,९३० | १,५४९ | १७,९१६ | १,६९७ | १८,७८६ | १,७५६ |
| केरोसीन/एलडीओ वितरक (संख्या) | ६,५५८ | ७६९ | ६,५४८ | ७६७ | ६,५४३ | ७६७ |
| किरकोळ विक्री केंद्रे (संख्या) | ५३,४१९ | ५,२०७ | ५६,१९० | ५,४१९ | ५९,५९५ | ५,६८४ |
| सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी केरोसीनचे वाटप (००० मे.टन) | ६,९७९.८ | ५,४१.५ | ६,७५९.०५ | ४८७.३६ | ८,९०८.९* | ७२४.३* |
| सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी केरोसीनची उचल (००० मे.टन) | ६,९९६.५ | ५६८.२ | ६,६४३.४ | ४७७.८ | ५,१९७.२* | ४०३.१* |

*आधार* : 'भारतीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू सांख्यिकी २०१४-१५ , २०१५-१६ व २०१६-१७' अहवाल * अस्थायी

९.२९ महानगर गॅस लि., महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. आणि गॅस ॲथॉरटी ऑफ इंडिया लि. (गेल). या पाईपद्वारे नैसर्गिक वायू (पीएनजी) जोडणी, कॅाम्प्रेस्ड नैसर्गिक वायू (सीएनजी) केंद्रे व सीएनजी वरील वाहने यासंदर्भात राज्यात कार्यरत यंत्रणा आहेत. देशात मार्च, २०१७ अखेर १,२३३ सीएनजी केंद्रे व सुमारे ३०.४५ लाख सीएनजी वाहने असून त्यापैकी २४५ सीएनजी केंद्रे व ६.८६ लाख सीएनजी वाहने राज्यात आहेत. त्याचप्रमाणे भारतात ३६.१४ लाख पीएनजी जोडण्या असून त्यापैकी १०.०३ लाख जोडण्या राज्यात आहेत.

९.३० ***प्रधानमंत्री उज्ज्वला योजना*** : या योजनेचा मुख्य उद्देश स्त्रीया व मुले यांच्या आरोग्य सुरक्षिततेसाठी स्वयंपाकाकरिता स्वच्छ इंधन - एलपीजी चा पुरवठा करणे, त्यामुळे त्यांच्या आरोग्याशी कुठलीही तडजोड न करता, प्रदुषित स्वयंपाक घर किंवा असुरक्षित ठिकाणी जळावू लाकडे गोळा करण्यास त्यांना जावे लागणार नाही. या योजनेअंतर्गत पुढील तीन वर्षात दारिद्र्य रेषेखालील कुटूंबांना एलपीजी जोडणी करीता प्रत्येक जोडणी मागे ₹ १,६०० सहाय्य देण्यात येईल. महिला सबलीकरण, विशेषत: ग्रामीण भारतात घरातील स्त्रीच्या नावाने एलपीजी जोडणी उपलब्ध करून देण्यात येईल. सामाजिक आर्थिक जात गणनेच्या आकडेवारीनुसार दारिद्र्य रेषेखालील कुटूंबे निश्चित करण्यात येतील.

## एलपीजी ग्राहकांसाठी सुधारित थेट लाभ हस्तांतर योजना

९.३१ राज्यात सुमारे २.६३ कोटी घरगुती एलपीजी ग्राहक आहेत. त्यापैकी सुमारे १.३४ कोटी एक सिलेंडर जोडणीधारक आणि १.२८ कोटी दुहेरी सिलेंडर जोडणीधारक आहेत. केंद्र शासनाच्या धोरणानुसार अनुदानित एलपीजी सिलेंडरची संख्या वार्षिक १२ सिलेंडर प्रति एलपीजी जोडणी सिमीत आहे. राज्यात एलपीजी ग्राहकांसाठी सुधारीत थेट लाभ हस्तांतर योजना नोव्हेंबर, २०१४ पासून लागू करण्यात आली आहे. राज्यात ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत सुमारे २.३७ कोटी सक्रिय एलपीजी ग्राहक, २.०८ कोटी एलपीजी आधार जोडणी केलेले ग्राहक आहेत. या योजनेअंतर्गत ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत स्वेच्छेने अनुदानाचा लाभ सोडलेले १६.९० लाख ग्राहक आहेत.

# वाहतूक व दळणवळण

९.३२ कार्यक्षम वाहतूक व दळणवळण व्यवस्था उत्पादकता वाढविण्याबरोबर सामाजिक व आर्थिक शाश्वत विकासासाठी आवश्यक आहे. भूपृष्ठ, जल व हवाई हे वाहतुकीचे व पोस्ट, दूरध्वनी, भ्रमणध्वनी आणि इंटरनेट सेवा हे दळणवळणाची माध्यमे आहेत. या सेवा सुलभतेने उपलब्ध होण्यास वाहतूक व दळणवळण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण व प्रगत तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणावर सहाय्यभूत ठरले आहे.

## भूपृष्ठ वाहतूक

### रस्त्यांचे जाळे

९.३३ रस्त्यांच्या जाळ्यामध्ये महामार्ग, जिल्हा रस्ते, ग्रामीण रस्ते व शहरांतर्गत रस्ते यांचा समावेश आहे. राज्यात ३.३७ लाख किमी लांबीच्या रस्त्यांच्या विकासाचे उद्दिष्ट ठेवून रस्ते विकास आराखडा २००१-२१ ची अंमलबजावणी सुरु आहे. मार्च, २०१७ अखेर सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्त्यांची एकत्रित लांबी (इतर यंत्रणांच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी वगळून) ३.०३ लाख किमी होती. सन २०१६-१७ मध्ये ₹ ४,०५० कोटी नियतव्यय मंजूर होता व ₹ ३,९९८.०१ कोटी खर्च झाला. सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी तक्ता ९.१५ मध्ये दिली आहे. रस्त्यांच्या प्रकारानुसार वर्षनिहाय लांबी परिशिष्ट ९.२ आणि सन २०१६ व २०१७ मधील जिल्हानिहाय रस्त्यांच्या लांबीचे रुंदीनुसार वर्गीकरण परिशिष्ट ९.३ मध्ये दिले आहे.

**आलेख ९.६ : रस्ते विकास आराखड्यानुसार (२००१-२१) साध्य**




**तक्ता ९.१५ सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी**

(३१ मार्च रोजी)

| वर्ष | रस्त्यांचे प्रकार | | | | | (किमी) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | राष्ट्रीय महामार्ग | प्रमुख राज्य महामार्ग | राज्य महामार्ग | प्रमुख जिल्हा रस्ते | इतर जिल्हा रस्ते | ग्रामीण रस्ते | एकूण |
| २०१४-१५ | ४,७६६ | ६,१६३ | ३३,८६० | ५०,५८५ | ५८,११५ | १,४५,८७९ | २,९९,३६८ |
| २०१५-१६ | ७,४३८ | ५,१८० | ३३,३३० | ५०,८४४ | ५८,११६ | १,४५,८८१ | ३,००,७८९ |
| २०१६-१७ | १२,२७५ | ३,८६१ | ३०,५८९ | ५२,६३७ | ५८,११६ | १,४५,८८१ | ३,०३,३५९ |

आधार : सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन

### केंद्रीय रस्ते निधी

९.३४ राष्ट्रीय महामार्ग, ग्रामीण रस्ते आणि राज्य रस्ते (आंतरराज्य जोडणीसाठी चालना देणारे व आर्थिक दृष्ट्या महत्वपूर्ण) यांचा विकास व देखभाल दुरुस्ती करणे तसेच रेल्वे रुळ ओलांडण्यासाठी उड्डाण पूल व भुयारी मार्ग बांधणे आणि निर्मनुष्य रेल्वे क्रॉसिंगच्या ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक ती कामे करणे यासाठी केंद्र शासनाने २००१-०२ पासून केंद्रीय रस्ते निधी ही योजना कार्यान्वित केली असून त्याद्वारे निधीचे वाटप व वितरण करण्यात येते. केंद्रीय रस्ते निधी योजनेची राज्यातील प्रगती तक्ता ९.१६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.१६ केंद्रीय रस्ते निधी योजनेची राज्यातील प्रगती**

| वर्ष | मंजूर कामे (संख्या) | मंजूर लांबी (किमी) | मंजूर रक्कम (₹ कोटी) | कामे (संख्या) | | पूर्ण झालेल्या रस्त्यांची लांबी (किमी) | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | प्रगतिपथावर | पूर्ण | | |
| २०१५-१६ पर्यंत $ | ८३२ | ८,३२८.१९ | ४,७४१.८३ | ९१ | ७३६ | ८,१०३.३५ | ३,८१०.६४ |
| २०१६-१७ | १७० | १,२३३.६३ | ३,१०६.४० | १५० | ४ | ३४९.९६ | ६८१.८४ |
| २०१७-१८+ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **एकूण** | **१,००२** | **९,५६१.८२** | **७,८४८.२३** | **२४१** | **७४०** | **८,४५३.३१** | **४,४९२.४८** |

टिपः एकूण २१ कामे रद्द करण्यात आली असून त्यापैकी १६ कामे सन २०१६-१७ मधील व ५ कामे आधीच्या वर्षातील आहेत. $ २००१-०२ पासून + जानेवारीपर्यंत

*आधार* : सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन

## प्रधान मंत्री ग्राम सडक योजना

९.३५ ग्रामीण भागामध्ये ५०० व अधिक (आदिवासी भागातील २५० व अधिक) लोकसंख्या असलेल्या तसेच रस्त्याने न जोडलेल्या वस्त्यांना बारमाही रस्त्यांनी जोडणे हा प्रधान मंत्री ग्राम सडक योजनेचा मूळ उद्देश आहे आणि या योजनेची सन २००० पासून अंमलबजावणी करण्यात येत आहे. ज्या राज्यांनी लक्ष्याच्या तुलनेत लोकवस्त्या जोडणीची १०० टक्के व रस्त्यांचा दर्जा सुधारण्याची ७५ टक्के कामे पूर्ण केली आहेत त्या राज्यांसाठी केंद्र शासनाने प्रधानमंत्री ग्राम सडक योजना भाग दोन (केंद्र शासन ६० टक्के व राज्य शासन ४० टक्के हिस्सा) सन २०१३ पासून मंजूर केली आहे. या योजनेअंतर्गत केवळ रस्त्यांचा दर्जा सुधारण्याची कामे घेता येतात व केंद्र शासनाने राज्यासाठी २,६२० किमी रस्ते लांबीच्या रस्त्यांचा दर्जा सुधारण्याचे उद्दिष्ट ठरवून दिले आहे.

९. ३५.१ या योजनेंतर्गत सन २०१७-१८ करिता, २७,२०७ किमी लांबीच्या रस्त्यांनी ८,८०८ लोकवस्त्यांना जोडण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. एकूण उद्दिष्टापैकी नोव्हेंबर, २०१७ पर्यंत ८,५८४ वस्त्यांना जोडलेल्या रस्त्यांची लांबी २५,६६५ किमी आहे. प्रधान मंत्री ग्राम सडक योजनेची प्रगती तक्ता ९.१७ मध्ये आणि सुरुवातीपासून बांधलेल्या व / किंवा दर्जा सुधारणा केलेल्या रस्त्यांची लांबी व जोडलेल्या लोकवस्त्यांची संख्या तक्ता ९.१८ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.१७ प्रधान मंत्री ग्राम सडक योजनेची प्रगती**

| वर्ष | जोडलेल्या लोकवस्त्या (संख्या) | रस्त्याची लांबी (किमी) | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|
| २०१५-१६ | २२० | ३१८ | २५८.२६ |
| २०१६-१७ | १५७ | ५१२ | ६८१.४६ |
| २०१७-१८+ | ५२ | १७६ | ३६७.०० |

*आधार* : ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन + ऑक्टोबर अखेर

**तक्ता ९.१८ प्रधान मंत्री ग्राम सडक योजनेच्या सुरुवातीपासून बांधलेल्या व / किंवा दर्जा सुधारणा केलेल्या रस्त्यांची संचित लांबी व जोडलेल्या वस्त्यांची संख्या**

(३१ मार्च रोजी)

| वर्ष | भौतिक लक्ष्य | | संचित भौतिक साध्य + | |
|---|---|---|---|---|
| | रस्त्याची लांबी (किमी) | लोकवस्त्या (संख्या) | रस्त्याची लांबी (किमी) | जोडलेल्या लोकवस्त्या (संख्या) |
| २०१६ | २४,४३९ | ८,३१५ | २२,८९८ (९४) | ८,००९ (९६) |
| २०१७ | २४,४३९ | ८,३१५ | २३,१९८ (९५) | ८,२१८ (९९) |
| २०१८+ | २७,२०७ | ८,८०८ | २५,६६५ (९४) | ८,५८४ (९७) |

*आधार* : ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन टिपः कंसातील आकडेवारी भौतिक लक्ष्याशी टक्केवारी दर्शवते + नोव्हेंबर अखेर

## मुख्यमंत्री ग्राम सडक योजना

९.३६ रस्त्यांनी न जोडलेल्या वस्त्यांना जोडणे व ग्रामीण रस्त्यांचा दर्जा सुधारणे याकरिता २८ ऑक्टोबर, २०१५ पासून राज्यात मुख्यमंत्री ग्राम सडक योजना कार्यान्वित करण्यात आली. मार्च, २०१७ पर्यंत ८,६३४ किमी लांबीच्या रस्त्यांचा दर्जा सुधारण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे. सन २०१७-१८ मध्ये डिसेंबरपर्यंत १,६१४ किमी लांबीच्या रस्त्याचा दर्जा सुधारण्यात आला आहे व ₹ २,२५० कोटी खर्च झाला आहे.

## महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे प्रकल्प

९.३७ महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने अंदाजित ₹ ८,०८१ कोटी खर्च असलेले १९ प्रकल्प पूर्ण केले असून, त्यावर ऑक्टोबर, २०१७ अखेर ₹ ७,८७४ कोटी खर्च झाला आहे. अंशत: व पूर्ण झालेल्या प्रकल्पांवरील एकूण ₹ ८,७१० कोटी खर्चाच्या तुलनेत एकूण टोल वसूलीची रक्कम ऑक्टोबर, २०१७ अखेर ₹ ७,६३६ कोटी होती. महामंडळाच्या प्रकल्पांची सद्यस्थिती तक्ता ९.१९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.१९ महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या प्रकल्पांची सद्यस्थिती**

| प्रकल्पाचे नाव | प्रकल्प सुरु झाल्याचे वर्ष | प्रकल्पाची अंदाजे किंमत (₹ कोटी) | खर्च+ (₹ कोटी) | काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष |
|---|---|---|---|---|
| पुणे चक्राकार मार्ग | २०१६-१७ | ४,२००.०० | ७.२१ | उना |
| महाराष्ट्र समृध्दी महामार्ग | २०१६-१७ | ४६,०००.०० | ४३८.५६ | उना |
| ठाणे- घोडबंदर उन्नत मार्ग | २०१६-१७ | ३,०००.०० | ०.८९ | उना |
| भिवंडी- कल्याण-शिळफाटा उन्नत मार्ग | २०१६-१७ | २,६००.०० | ३.३० | उना |
| विदर्भातील रेल्वे वरील पूल | २०१६-१७ | ८७०.०० | २.९६ | उना |
| ठाणे खाडी पूल- टप्पा तीन | २०१६-१७ | ७७५.०० | ०.३३ | उना |
| मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गास संलग्न सोई-सुविधा | २०१४-१५ | २००.०० | ३.२६ | २०१७-१८ |
| मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गाची क्षमता वाढ | २००९-१० | ५,०००.०० | १७.०३ | २०१९-२० |
| मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प- विस्तारीत | २००८-०९ | २,०६५.०० | ६६३.७७ | २०१७-१८ |
| सीमा तपासणी नाक्यांचे आधुनिकीकरण | २००८-०९ | १,०००.०० | ५०.८७ | उना |
| नागपूर-काटोल-जलालखेडा रस्त्याचे रुंदीकरण | २००८-०९ | ३१.०० | ४.६५ | २०१७-१८ |
| वर्सोवा - वांद्रे सागरी सेतू प्रकल्प | २००७-०८ | ४,४१९.०० | १८.८९ | उना |
| मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प | २००५-०६ | ३९३.४० | १६८.०१ | २०१७-१८ |
| मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प | २००३-०४ | ४७१.७३ | ७१८.१६ | २०१७-१८ |
| एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम | | | | |
| नागपूर | २००१-०२ | ४२२.०० | ५१४.८५ | २०१७-१८ |
| औरंगाबाद | २००१-०२ | १४२.०० | ३४०.५५ | २०१७-१८ |

*आधार :* महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ उना - उपलब्ध नाही + ऑक्टोबर, २०१७ अखेर

## महाराष्ट्र समृद्धी महामार्ग

९.३८ प्रस्तावित मुंबई ते नागपूर महामार्ग हा ७०१ किमी लांब व १२० मी रुंद आठ पदरी द्रुतगती महामार्ग असून हे अंतर आठ तासांत गाठता येईल. हा महामार्ग १० जिल्हे, २६ तालुके व ३९० गावांमधून जाणार आहे व त्यामूळे २४ जिल्हे जोडले जातील. राज्य मार्ग व राष्ट्रीय महामार्ग एकत्र येणा-या ठिकाणी २४ 'कृषी समृद्धी केंद्राचा' विकास करण्याची नाविन्यपूर्ण कल्पना योजिली आहे. हा महामार्ग बुटीबोरी, वर्धा, अमरावती, जालना, चिकलठाणा, शेंद्रा, वाळूज व सिन्नर या औद्योगिक स्थळांना तर सेवाग्राम, कारंजा(लाड), लोणार, सिंदखेडराजा, वेरुळ व शिर्डी या पर्यटन स्थळ व तीर्थक्षेत्रांना जोडेल. या प्रकल्पाचे काम अभियांत्रिकी, खरेदी, बांधकाम तत्वावर करण्याचे प्रस्तावित आहे. एकूण ८,५१३.१९ हेक्टर आवश्यक जमिनीपैकी १,१३०.०५ हेक्टर शासकिय जमिनीसह ५,१६५.२८ हेक्टरचे भूसंपादन झाले आहे. या प्रकल्पावर एकूण ₹ ४६,००० कोटी खर्च अपेक्षित असून ऑक्टोबर, २०१७ अखेर ₹ ४३८.५६ कोटी खर्च झाला आहे.

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे प्रकल्प

९.३९ मुंबई महानगर प्रदेशात आठ महानगरपालिका, नऊ नगरपरिषदा आणि ठाणे व रायगड जिल्ह्यातील सुमारे एक हजार गावातील क्षेत्रांचा समावेश आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई महानगर प्रदेशात विविध पायाभूत सुविधा प्रकल्प हाती घेतले आहेत. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा मार्फत सुरु असलेल्या वाहतूक प्रकल्पांची माहिती तक्ता ९.२० मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२० मुंबई महानगर प्रदेशात सुरु असलेल्या वाहतूक प्रकल्पांची सद्यस्थिती**

(₹ कोटी)

| प्रकल्पाचे नांव | प्रकल्प सुरु झाल्याचे वर्ष | प्रकल्पाची किंमत | खर्च+ | काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| **विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प :** | | | | | |
| टप्पा - एक, दोन व तीन :३५ उप प्रकल्प (टप्पा एक व दोन - १७ रस्ते, १८ उड्डाणपूल टप्पा तीन - ३२ पूल, तीन बोगदे, १३३ किमी लांबीचे १८ रस्ते) | २००७ | ६,२३५.१२ | २,४०४.४८ | २०१९ | टप्पा एक व दोन मधील ११ रस्ते व आठ उड्डाणपूल पूर्ण |
| **मिठी नदी कामे टप्पा २** खोलीकरण, रुंदीकरण, खडक खोदाई, सुशोभीकरण, सेवारस्ते, इत्यादी | २००७ | ५७०.७६ | ५२४.०९ | २०१७ | अंतिम टप्प्यात |
| **बहुविध विरार ते अलिबाग मार्ग:** वाहनांसाठी आठ मार्गिका व फक्त बसेस करिता राखीव मार्गिका असलेला खुला मार्ग बांधणे (१२६ किमी) | २०१० | ९,५००@ | १०.९० | २०२३ | सल्लागार नियुक्त |
| **वांद्रे-कुर्ला संकुल (जी-ब्लॉक) ते पूर्व द्रुतगती महामार्ग** यांच्या दरम्यान उन्नत मार्ग बांधणे | २०१५ | १५५.७० | ६९.९२ | २०१८ | काम प्रगतीपथावर |
| **कुर्ला ते वाकोला टप्पा एक** | २०१६ | ४४९.०० | ३१.७५ | २०१९ | कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत |
| **भारत डायमंड बोर्स ते वाकोला जंकशन टप्पा दोन,** सांताक्रूज चेंबूर लिंक रोड अंतर्गत विस्तारीत | २०१७ | २२०.८० | उना | २०२० | कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत |
| **मुंबई ट्रान्स हार्बर लिंक :** शिवडी ते न्हावा सागरी सेतू (२२ किमी) | २०१७ | १७,८४३ | १५९.५४ | २०२२ | संबंधित परवाने प्राप्त, कार्यारंभ आदेश देण्यात येणार आहेत |

*आधार* : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण @ भूसंपादनावरील खर्च वगळून उना उपलब्ध नाही + ऑक्टोबर, २०१७ अखेर

## मोटार वाहने

९.४० राज्यात १ जानेवारी, २०१८ रोजी एकूण ३.१४ कोटी मोटार वाहने (दर लाख लोकसंख्येमागे २५,८५९ वाहने) वापरात होती, ती मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे ७.६ टक्क्यांनी जास्त आहे. राज्यातील एकूण वाहनांपैकी ३१.७९ लाख (७.७ टक्के) वाहने बृहन्मुंबईत होती. राज्यात सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभाली खालील असलेल्या प्रति किमी रस्त्यावरील वाहनांची सरासरी संख्या १०४ आहे. वर्षनिहाय वापरात असलेल्या मोटार वाहनांची प्रकारनिहाय संख्या तक्ता ९.२१ मध्ये आणि वापरात असलेल्या मोटार वाहनांची संख्या परिशिष्ट ९.४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२१ वापरात असलेल्या मोटार वाहनांची प्रकारनिहाय संख्या**

('०००)

| प्रकार | १ जानेवारी रोजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | | | बृहन्मुंबई | | |
| | २०१७ | २०१८* | शेकडा बदल | २०१७ | २०१८* | शेकडा बदल |
| दुचाकी (मोटार सायकली, स्कूटर्स, मोपेड्स) | २१,३९०.३ | २३,००८.७ | ७.६ | १,७४०.६ | १,८८९.९ | ८.६ |
| ऑटो रिक्षा | ७२०.४ | ७४७.३ | ३.७ | १२५.५ | १३९.६ | ११.२ |
| हलकी मोटार वाहने (कार, जीप्स, स्टेशन वॅगन्स व टॅक्सी) | ४,४४६.० | ४,८१०.२ | ८.२ | १,०१९.७ | १,०८१.८ | ६.१ |
| बसेस (स्टेज कॅरेजेस, कॉन्ट्रॅक्ट कॅरेजेस, शालेय बसेस व पीएसव्ही) | १२१.१ | १२८.७ | ६.३ | ११.४ | १३.० | १४.० |
| माल मोटारी {आर्टीक्युलेटेड/मल्टी एक्सल वाहने, ट्रक्स व लॉरीज, टँकर्स, डिलीव्हरी व्हॅन्स (तीन व चार चाकी), इ.} | १,४७६.९ | १,५८२.८ | ७.२ | ५०.८ | ५१.७ | १.८ |
| ट्रॅक्टर्स | ६१६.२ | ६५१.१ | ५.७ | ०.२ | ०.२ | ०.० |
| ट्रेलर्स | ३४८.६ | ४०९.४ | १७.४ | ०.१ | ०.१ | ०.० |
| रूग्णवाहिका | १२.७ | १५.० | १८.१ | १.२ | १.३ | ८.३ |
| इतर वाहने | ५३.७ | ६१.८ | १५.१ | १.३ | १.४ | ७.७ |
| **एकूण** | **२९,१८५.९** | **३१,४१५.०** | **७.६** | **२,९५०.८** | **३,१७९.०** | **७.७** |

*आधार :* परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र शासन पीएसव्ही - सार्वजनिक सेवा वाहने * अस्थायी

९.४१ वाहन चालक परवाना 'सारथी' सॉफ्टवेअर आणि वाहन नोंदणी प्रमाणपत्र *'वाहन'* सॉफ्टवेअर द्वारे स्मार्ट कार्डच्या स्वरुपात दिले जाते. मार्च, २०१७ अखेर मोटार वाहने चालविण्याच्या वैध परवान्यांची संख्या ३२९.५९ लाख होती जी मागील वर्षाच्या तुलनेत ९.९ टक्क्यांनी जास्त आहे. राज्यात २०१६-१७ या वर्षात २५.५ लाख शिकाऊ परवाने देण्यात आले आहेत.

९.४२ राज्यामध्ये दरवर्षी ब्रीद वाक्यावर आधारित रस्ता सुरक्षाविषयक विविध पथनाट्ये आणि व्याख्याने आयोजित करण्यात येतात. राज्यात प्रति दहा हजार वाहनांमागे २०१७ मध्ये झालेल्या अपघातांची संख्या ११ होती. राज्य व बृहन्मुंबईतील रस्ते अपघात, त्यामध्ये मृत व जखमी व्यक्तींविषयक आकडेवारी तक्ता ९.२२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२२ राज्य व बृहन्मुंबईतील रस्ते अपघात, मृत व जखमी व्यक्तींविषयक आकडेवारी**

| वर्ष | अपघातांची संख्या | | मृत व्यक्तींची संख्या | | | जखमी व्यक्तींची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | राज्य | बृहन्मुंबई | राज्य | बृहन्मुंबई | टक्केवारी@ | राज्य | बृहन्मुंबई | टक्केवारी@ |
| २०१५ | ६३,८०५$ | २३,३४७$ | १३,२१२ | ५२० | ३.९ | ३९,६०६ | ४,०३७ | १०.२ |
| २०१६ | ३९,८४८# | ३,३४९# | १२,८८३ | ५१० | ४.० | ३५,८९४ | ३,५३२ | ९.८ |
| २०१७ | ३५,८५३# | ३,१६०# | १२,२६४ | ४९० | ४.० | ३२,१२८ | ३,२८७ | १०.२ |

$ नोंदवलेले सर्व अपघात # फक्त गुन्हा नोंदवलेले अपघात @ बृहन्मुंबईची राज्याशी

*आधार :* अतिरिक्त पोलिस महासंचालक यांचे कार्यालय (वाहतूक), महाराष्ट्र शासन

# सार्वजनिक प्रवासी रस्ते वाहतूक सुविधा

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

९.४३ महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन (मरामाप) महामंडळाकडे ३१ मार्च, २०१७ रोजी केंद्र व राज्य शासनाचे भागभांडवल अनुक्रमे ₹ ५६.७७ कोटी व ₹ १,३४१.२१ कोटी आहे. मरामाप महामंडळाने २०१६-१७ या वर्षात प्रतिदिन सरासरी ६६.९५ लाख प्रवासी वाहतूक केली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत सार्थ किमी वाहतूक सुमारे १.४ टक्क्यांनी कमी झाली असून मार्गस्थ गाड्यांचे सरासरी भारमान (सवलतींच्या रकमेसह) ०.८ टक्के बिंदूंनी कमी झाले आहे. ग्रामीण, वातानुकूलित व शहरी वाहतुकीच्या प्रवासी उत्पन्नावर ३१ मार्च, २०१७ रोजी प्रवासी कराचा दर अनुक्रमे १७.५ टक्के, ५.५ टक्के व ३.५ टक्के होता. मरामाप महामंडळातर्फे सेवा पुरविण्यात आलेली गावांची व लोकसंख्येची टक्केवारी तक्ता ९.२३ आणि वाहतूक विषयक सांख्यिकी तक्ता ९.२४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२३ मरामाप महामंडळातर्फे सेवा पुरविण्यात आलेली गावे आणि लोकसंख्या**

(टक्के)

| जोडणी | गावे | | लोकसंख्या | |
|---|---|---|---|---|
| | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१५-१६ | २०१६-१७ |
| थेट जोडलेली | ७४.५ | ७५.६ | ९१.२ | ९१.७ |
| ३ किमीपर्यंत | १५.७ | १५.१ | ५.८ | ५.६ |
| ३ ते ५ किमीपर्यंत | ५.६ | ५.४ | १.७ | १.६ |
| ५ किमीपेक्षा अधिक | ४.२ | ३.९ | १.३ | १.१ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

**तक्ता ९.२४ मरामाप महामंडळाची वाहतूक विषयक सांख्यिकी**

| बाब | २०१५-१६ | २०१६-१७ | शेकडा बदल | २०१७-१८+ |
|---|---|---|---|---|
| ताब्यातील एकूण वाहने | १८,५१४ | १८,७१० | १.१ | १८,५६९ |
| मार्गस्थ बसगाड्यांची प्रतिदिन सरासरी संख्या | १६,९८१ | १६,८३४ | (-)०.९ | १६,४४७ |
| एकूण कर्मचारी (३१ मार्च रोजी) | १,०५,६७९ | १,०३,०४३ | (-)२.५ | १,०१,३७३ |
| प्रतिदिन सरासरी सार्थ किमी (लाख) | ५७.३९ | ५६.६१ | (-)१.४ | ५५.८२ |
| वाहतूक केलेल्या प्रवाशांची प्रतिदिन सरासरी संख्या (लाख) | ६७.११ | ६६.९५ | (-)०.२ | ६६.३१ |
| वाहन उत्पादकता (किमी) | ३१०.०१ | ३०२.५४ | (-)२.४ | ३००.५९ |
| प्रति दहा लिटर डिझेल मागे किमीचे प्रमाण (मानक ४८.५०) | ४७.६२ | ४७.६५ | ०.११ | ४७.२८ |
| चालक-वाहक उत्पादकता (किमी) | २१४.७६ | २१३.०१ | (-)०.८ | २१६.३० |
| प्रति वाहन कर्मचाऱ्यांचे प्रमाण (मार्गस्थ वाहनांच्या आधारे) | ६.२२ | ६.१२ | (-)१.६ | ६.१८ |
| सरासरी आसन क्षमता | ४३.७१ | ४३.३५ | (-)०.८ | ४३.४० |
| भारमान (सवलतीच्या रकमेशिवाय) टक्के@ | ५५.७१ | ५४.६३ | (-)१.१ | ५६.३७ |
| भारमान (सवलतीच्या रकमेसह) टक्के@ | ६९.६० | ६८.७५ | (-)०.८ | ७०.६२ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ @ बिंदू + डिसेंबर अखेर

९.४४ नियमित वाहतुकी शिवाय मरामाप महामंडळ यात्रा व नैमित्तिक करार तत्वावर विशेष वाहतूक सेवा पुरविते. यात्रा व नैमित्तिक करारांची वाहतूक विषयक सांख्यिकी तक्ता ९.२५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२५ मरामाप महामंडळाची यात्रा व नैमित्तिक करारांची वाहतूक विषयक सांख्यिकी**

| विवरण | यात्रा | | नैमित्तिक करार | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २०१५-१६ | | | २०१६-१७ | | |
| | २०१५-१६ | २०१६-१७ | सवलतीत | विना-सवलतीत | एकूण | सवलतीत | विना-सवलतीत | एकूण |
| सार्थ किमी (लाख) | १९६.३७ | १९२.६२ | १२५.५२ | ६४.८० | १९०.३२ | ११५.१२ | ५७.६४ | १७२.७६ |
| प्राप्त उत्पन्न (₹ लाख) | ५,९२४.४५ | ६,६४६.०७ | ३,१२५.९९ | ३,३३७.५० | ६,४६३.४९ | २,८७७.३८ | २,९८२.८६ | ५,८६०.२० |
| प्रति किमी उत्पन्न (₹) | ३०.१७ | ३४.५० | २४.९० | ५१.५० | ३३.९६ | २४.९९ | ५१.७५ | ३३.९२ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

९.४५ मरामाप महामंडळ विद्यार्थी, वरिष्ठ नागरिक (६५ वर्षांपेक्षा अधिक वय असलेले), कर्क रुग्ण, स्वातंत्र्यसैनिक, इ. प्रवाशांना बस भाड्यात सवलत देते. सवलतीच्या रकमेची प्रतिपूर्ती राज्य शासनाकडून केली जाते. सन २०१६-१७ मध्ये सवलतीची रक्कम ₹ १,३५२.७० कोटी होती. मरामाप महामंडळाची वित्तीय स्थिती तक्ता ९.२६ मध्ये दिली आहे.

**आलेख ९.७ : मरामापम-प्रति किमी मिळकत आणि प्रति किमी खर्च**




**तक्ता ९.२६ मरामाप महामंडळाची वित्तीय स्थिती**

(₹ कोटी)

| विवरण | २०१५-१६ | २०१६-१७$ |
|---|---|---|
| (अ) जमा | | |
| प्रवासी महसूल | ७,०६९.२८ | ६,७९०.९७ |
| इतर महसूल | २१५.२० | २६५.२५ |
| **एकूण (अ)** | **७,२८४.४८** | **७,०५६.२२** |
| (ब) खर्च | | |
| प्रवासी, मोटार वाहने व महापालिका कर व जकात | ९१५.४१ | ८८१.६५ |
| महापालिका कर व जकात | | |
| घसारा | ३५४.६६ | ३०७.४२ |
| इतर | ६,१९७.१७ | ६,३९४.६९ |
| **एकूण (ब)** | **७,४६७.२४९६** | **७,५८३.७६** |
| (१) नफा (अ - ब) | (-)१८२.७६ | (-)५२७.५४ |
| (२) मागील ताळमेळ | ६०.८७ | २२.०५ |
| (३) निव्वळ नफा (१ + २) | (-)१२१.८९ | (-)५०५.४९ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ $ अलेखापरिक्षित

९.४६ मरामाप महामंडळाने सन २०१५-१६ व २०१६-१७ करिता अनुक्रमे ₹ १२३ कोटी व ₹ १०९ कोटी टोल रक्कम अदा केली. अपघातांची संख्या व मरामाप महामंडळाकडून दिलेली भरपाई तक्ता ९.२७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२७ अपघातांची संख्या व मरामाप महामंडळाकडून दिलेली भरपाई**

| विवरण | २०१५-१६ | २०१६-१७ |
|---|---|---|
| अपघातांची संख्या | २,९२० | २,७७२ |
| मृत व्यक्तींची संख्या | ४४५ | ४४५ |
| जखमी व्यक्तींची संख्या | ५,२१३ | ४,७४५ |
| दर लाख किमी मागे अपघात | ०.१४ | ०.१३ |
| घटनास्थळी दिलेली रक्कम (₹ लाख) | ५०.५५ | ३३.३१ |
| अंतिम भरपाई (₹ लाख) | ७,१६०.२१ | ७,८३१.७७ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

## शहरी सार्वजनिक प्रवासी वाहतूक

९.४७ सार्वजनिक प्रवासी रस्ते वाहतूक व्यवस्था हे शहरातील प्रवासी वाहतुकीचे प्रमुख साधनांपैकी एक साधन आहे. राज्यातील २१ शहरात ही सुविधा उपलब्ध आहे. यापैकी सात शहरात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (मरामापम), बृहन्मुंबईत बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट), पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात पुणे महानगर परिवहन महामंडळ (पीएमपीएमएल) आणि उर्वरित ११ शहरात संबंधित महानगरपालिका / नगरपरिषद प्रवासी वाहतूक सेवा पुरवितात. शहरी सार्वजनिक प्रवासी वाहतूक सेवा विषयक सांख्यिकी तक्ता ९.२८ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२८ शहरी सार्वजनिक प्रवासी वाहतूक सेवा विषयक सांख्यिकी**

(३१ मार्च रोजी)

| वाहतूक सेवा पुरविणारी यंत्रणा | मार्गस्थ वाहनांची प्रतिदिन सरासरी संख्या | | प्रतिदिन सरासरी प्रवासी वाहतूक (लाख) | | प्रतिदिन सरासरी सार्थ वाहतूक (लाख किमी) | | निव्वळ नफा /तोटा (₹ लाख) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०१६ | २०१७ | २०१६ | २०१७ | २०१६ | २०१७ | २०१६ | २०१७ |
| मरामापम (शहर वाहतूक) | ४८५ | ४६७ | २.४० | २.३५ | ०.८९ | ०.८४ | (-)२,२७१ | (-)३,०८० |
| बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम | ३,४६६ | ३,२६७ | २८.९९ | २८.३४ | ६.४० | ५.८६ | (-)१,०६,१९२ | (-)९९,०१० |
| पुणे महानगर परिवहन महामंडळ | १,४४७ | १,३८२ | ११.२४ | १०.७९ | ३.१३ | २.९९ | (-)१५,१८१ | (-)२१,०४२ |
| नवी मुंबई महानगरपालिका परिवहन | २५७ | ३०९ | २.३१ | २.७९ | ०.७२ | ०.८५ | (-)४,१५९ | (-)४,१४७ |
| नागपूर महानगरपालिका परिवहन | २४० | २२९ | १.२४ | १.५७ | ०.४३ | ०.४६ | (-)२,४४० | (-)७# |
| ठाणे महानगरपालिका परिवहन | १९२ | १९५ | १.५८ | १.२९ | ०.३६ | ०.३३ | (-)४,३५३ | (-)४,७४६ |
| कोल्हापूर महानगरपालिका परिवहन | १०१ | १०७ | ०.६० | ०.६६ | ०.२४ | ०.२४ | (-)६९२ | (-)४१८ |
| सोलापूर महानगरपालिका परिवहन | ९६ | ५९ | ०.७२ | ०.३१ | ०.२३ | ०.१४ | (-)५८२ | (-)८३७ |
| कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिवहन | ८३ | ७५ | ०. ४६ | ०.४२ | ०.१६ | ०.१३ | (-)१,२१६ | (-)१,३४८ |
| अमरावती महानगरपालिका परिवहन | ३३ | २५ | ०.२८ | ०.२५ | ०.०८ | ०.०४ | ७ | (-)६३ |
| मिरा-भाईंदर महानगरपालिका परिवहन | ३० | ३२ | ०.१९ | ०.२३ | ०.०५ | ०.०७ | (-)३१० | (-)४६० |
| अहमदनगर महानगरपालिका परिवहन | १८ | १५ | ०.११ | ०.०८ | ०.०२ | ०.०२ | (-)७२ | (-)७ |
| अकोला महानगरपालिका परिवहन | - | ५ | - | ०.०२ | - | ०.०१ | - | - |
| खोपोली नगरपालिका परिवहन | १३ | १४ | ०.०४ | ०.०५ | ०.०२ | ०.०२ | १२ | १६ |

# एप्रिल, २०१६ ते फेब्रुवारी, २०१७ पर्यंतचा निव्वळ नफा/तोटा वगळून

*आधार :* मरामाप महामंडळ , बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम, पुणे महानगर परिवहन महामंडळ व संबधित महानगरपालिका / नगरपालिका

## रेल्वे

९.४८ रेल्वे ही प्रमुख जन वाहतूक व्यवस्था आहे. प्रवासी व मालवाहतूक हे रेल्वे वाहतूकीचे दोन प्रमुख भाग आहेत. राज्यातील लोहमार्गाची ३१ मार्च, २०१७ रोजी एकूण लांबी ६,१६५ किमी (कोकण रेल्वेच्या ३८१ किमी लांबीसह) भारतातील एकूण (६७,३६८ किमी) लांबीच्या ९.२ टक्के एवढी आहे. पनवेल-पेण ३५ किमी लांबीच्या दुपदरी मार्गाचे काम पूर्ण झाले आहे. राज्यात सुरु असलेल्या रेल्वे कामांची सद्यस्थिती तक्ता ९.२९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२९ राज्यात सुरु असलेल्या रेल्वे कामांची सद्यस्थिती**

(३० जून,२०१७ रोजी)

| मार्गाचे नाव | मार्गाची लांबी (किमी) | प्रकल्पाची एकूण किंमत (₹ कोटी) | कामाची भौतिक प्रगती (टक्के) |
|---|---|---|---|
| पेण - रोहा (दुपदरीकरण) | ४० | १६३.०० | ९५ |
| बारामती - लोणंद (नवीन मार्ग) | ६४ | ७३६.४४ | ५० |
| बेलापूर - सीवूड- उरण (नवीन मार्ग) | २७ | १,७८१.९८ | ४८ |
| अहमदनगर-नारायणडोह-बीड-परळी-वैजनाथ | २६१ | २,२७१.०० | ४० |
| भुसावळ-जळगांव तिसरा मार्ग (दुपदरीकरण) | २४ | १९९.१२ | ३१ |
| वर्धा-सेवाग्राम-नागपूर तिसरा मार्ग (दुपदरीकरण) | ७६ | ५४०.०२ | १६ |
| टीगाव चिचोंडा तिसरा मार्ग (दुपदरीकरण) | १७ | १७५.६६ | १३ |
| कल्याण-कसारा तिसरा मार्ग (दुपदरीकरण) | ६८ | ७९२.८९ | ९ |
| पुसद-यवतमाळ मार्गे वर्धा - नांदेड, (नवीन मार्ग) | २८४ | २,४९१.४३ | ८ |

*आधार :* दक्षिण पूर्व, मध्य, दक्षिण मध्य व पश्चिम रेल्वे आणि कोकण रेल्वे महामंडळ

## मुंबई उपनगर रेल्वे

९.४९ उपनगरीय रेल्वे हे मुंबईमध्ये जन वाहतूकीचे प्रमुख साधन आहे. मुंबईची उपनगरीय रेल्वे सेवा पश्चिम रेल्वे आणि मध्य रेल्वे या दोन विभागीय रेल्वे द्वारे चालविली जाते. हार्बर व ट्रान्स हार्बर मार्ग हे मध्य रेल्वेचा भाग आहेत. दर दिवशी एकूण २५८ गाड्यांच्या ताफ्याने २,९७९ फेऱ्यांद्वारे सरासरी ७६.५ लाख प्रवाशांची वाहतूक केली जाते. मुंबई उपनगरीय रेल्वे मार्गावरील अपघाती मृत्यु व जखमींची (कारणनिहाय) संख्या तक्ता ९.३० मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३० मुंबई उपनगरीय रेल्वे मार्गावरील अपघाती मृत्यु व जखमींची (कारणनिहाय) संख्या**

| अपघाताचे कारण | २०१५ | | २०१६ | | २०१७ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मृत्यु | जखमी | मृत्यु | जखमी | मृत्यु | जखमी |
| रुळ ओलांडतांना | १,८०१ | ४६८ | १,७९८ | ३७९ | १,६५१ | ३७६ |
| रेल्वे व फलाट दरम्यान पडून | ४० | २६ | १३ | १९ | १८ | ६ |
| रेल्वेमधून पडून | ८०६ | १,६९७ | ६५७ | १,४९८ | ६५४ | १,४३४ |
| रेल्वेच्या खांबांना धक्का लागून | १३ | ८९ | ८ | ८५ | १२ | ९० |
| अन्य $ | ६४४ | १,०६९ | ७२६ | १,३८२ | ६७९ | १,४३९ |
| **एकूण** | **३,३०४** | **३,३४९** | **३,२०२** | **३,३६३** | **३,०१४** | **३,३४५** |

$ विजेचा धक्का लागून, आत्महत्या, नैसर्गिक मृत्यु, रासायनिक प्रयोगशाळेकडे संदर्भित केलेली प्रकरणे, इत्यादी.

*आधार* : मुंबई लोहमार्ग पोलिस आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

९.५० मुंबई नागरी वाहतूक प्रकल्पातील रेल्वे मार्गाची कामे मुंबई रेल्वे विकास महामंडळ, मर्यादित करीत आहे. अंधेरी - गोरेगाव हार्बर मार्गाच्या विस्ताराचे काम पुर्ण झाले आहे. हार्बर मार्गावरील १२ डब्यांच्या गाड्यांसाठी फलाटांची लांबी वाढविण्यात आली व १५३ रेल्वे डब्यांची खरेदी प्रक्रिया पुर्ण झाली आहे. मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प टप्पा दोन अंतर्गत सुरु असलेल्या प्रकल्पांची सद्यस्थिती तक्ता ९.३१ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३१ एमयुटीपी टप्पा दोन अंतर्गत सुरु असलेल्या प्रकल्पांची सद्यस्थिती**

(३१ जानेवारी,२०१८ रोजी)

| प्रकल्पाचे नाव | काम सुरु झाल्याचे वर्ष | मार्गिकेची लांबी (मार्ग किमी) | अंदाजित किंमत (₹ कोटी) | खर्च (₹ कोटी) | भौतिक प्रगती (टक्के) | काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| ठाणे-दिवा (अतिरिक्त पाचवा व सहावा मार्ग) | २००८-०९ | ९.४४ | ४४० | २६५.१७ | ६९ | २०१९ |
| मुंबई सेंट्रल-बोरीवली (अतिरिक्त सहावा मार्ग) | २००८-०९ | २९.५० | ९१९ | १९३.३४ | १७ | २०२१ |
| सीएसटी-कुर्ला (अतिरिक्त पाचवा व सहावा मार्ग) | २००८-०९ | १५.३९ | ८९१ | ६९.१३ | ३ | २०२१ |

*आधार* : मुंबई रेल्वे विकास महामंडळ

## मुंबई मेट्रो रेल प्रकल्प

९.५१ मुंबई मेट्रो रेल प्रकल्प हा सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर राबविण्यात येणारा सामुहिक शीघ्र वाहतूक व्यवस्था प्रकल्प आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा मार्फत सुरु असलेल्या मेट्रो रेल प्रकल्पांची माहिती तक्ता ९.३२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३२ मुंबई महानगर प्रदेशात सुरु असलेल्या वाहतूक प्रकल्पांची सद्यस्थिती**

(₹ कोटी)

| प्रकल्पाचे नांव | प्रकल्प सुरु झाल्याचे वर्ष | प्रकल्पाची किंमत | खर्च + | काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| अंधेरी (पू.) - दहिसर (पू.) (१६.५ किमी) | २०१६ | ६,२०८ | ४४८.०७ | २०१९-२० | ४० टक्के स्थापत्य कामे पूर्ण |
| दहिसर - डी. एन. नगर (१८.६ किमी) | २०१६ | ६,४१० | १२४.२१ | २०१९-२० | ३२ टक्के काम प्रगतिपथावर |
| कुलाबा - वांद्रे - सीप्झ (३३.५ किमी) | २०१५ | २३,१३६ | ३,६४४.०० | २०२०-२१ | स्थापत्य कामे प्रगतिपथावर |
| डी. एन. नगर-मंडाळे (२३.६ किमी) | २०१७ | १०,९८६ | ५९.६९ | २०२०-२१ | निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर |
| वडाळा - घाटकोपर - ठाणे - कासारवडवली (३२ किमी) | २०१७ | १४,५४९ | ३.८१ | २०२१-२२ | निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर |

*आधार*: मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण    +ऑक्टोबर, २०१७ अखेर

## नवी मुंबई मेट्रो रेल प्रकल्प

९.५२ सिडकोने चार मेट्रोरेल मार्गिकांचा टप्प्या-टप्प्याने विकास करण्याचे निश्चित केले आहे. यापैकी, पहिल्या टप्प्याचे सीबीडी बेलापूर ते पेंधर (११.१० किमी) चे काम प्रगतीपथावर आहे. सदर कामाचा अंदाजित खर्च ₹ ३,०६३.६३ कोटी आहे. ऑक्टोबर, २०१७ अखेर ₹ १,३१५.३७ कोटी खर्च झाला आहे.

## नागपूर मेट्रो रेल प्रकल्प

९.५३ नागपूर मेट्रो रेल प्रकल्पामध्ये ३८.२२ किमी लांबी व ३६ स्थानकांचा समावेश आहे. या प्रकल्पाचा संपूर्ण विस्तार उत्तर-दक्षिण मार्ग (१९.६६ किमी व १७ स्थानके) व पुर्व पश्चिम मार्ग (१८.५६ किमी व १९ स्थानके) या दोन मार्गामध्ये विभागला आहे. या प्रकल्पाची अंदाजित किंमत ₹ ८,६८० कोटी आहे. या प्रकल्पासाठी ८७.९५ हेक्टर आवश्यक असून त्यापैकी ७९.३९ हेक्टर जमिनीचे संपादन करण्यात आले आहे. डिसेंबर, २०१७ अखेर ₹ २,७८७.३९ कोटी खर्च झाला आहे.

## पुणे मेट्रो रेल प्रकल्प

९.५४ पुणे मेट्रो रेल प्रकल्पामध्ये चिंचवड ते स्वारगेट (१६.५९ किमी) व वनाज ते रामवाडी (१४.६६ किमी) असे दोन मार्ग आहेत. या प्रकल्पाचा अंदाजित खर्च ₹ ११,४२० कोटी आहे. सदर प्रकल्प सन २०२१ पर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे. या प्रकल्पासाठी ३१.५७ हेक्टर शासकिय जमिनीसह ४४.२५ हेक्टर जमिन आवश्यक असून त्यापैकी २० हेक्टर शासकिय जमिनीचे संपादन करण्यात आले आहे. डिसेंबर, २०१७ अखेर ₹ २०७ कोटी खर्च झाला आहे.

# जलवाहतूक

९.५५ व्यापाराच्या शाश्वत वृद्धीसाठी जलवाहतूक क्षेत्राचा महत्वपूर्ण वाटा आहे. महाराष्ट्र बंदर विकास धोरण सन २०१६ पासून राज्यात राबविण्यात येत आहे. या धोरणांतर्गत ७२० किमी सागरी किनाऱ्यावरील उद्योगांना चालना देण्यासह बंदरांचा सर्वांगीण विकास करण्यावर भर आहे. तसेच पायाभूत सुविधांचे उन्नतीकरण करणे, रेल्वे व रस्त्यांची बंदराशी जोडणी करणे व किनारपट्टीवरील जहाज निर्मिती व दुरुस्ती उद्योगांना प्रोत्साहन देणे हे या धोरणात समाविष्ठ आहे.अंर्तगत जलवाहतूक प्रकल्पार्तंगत राज्याने प्रवासी सुविधांचे बांधकाम व अस्तित्वात असलेल्या सुविधांच्या नूतनीकरणा साठी विवीध प्रकल्प हाती घेतले आहेत.

## मोठी बंदरे

९.५६ राज्यात मुंबई पोर्ट ट्रस्ट व जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट द्वारे परिचालित केली जाणारी दोन मोठी बंदरे आहेत. सन २०१६-१७ मध्ये, मुंबई पोर्ट ट्रस्ट व जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट यांनी अनुक्रमे ६३०.४८ लाख मे.टन व ६२१.५१ लाख मे.टन मालाची वाहतूक केली. मोठ्या बंदरांची वाहतूक विषयक सांख्यिकी तक्ता ९.३३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३३ मोठ्या बंदरांची वाहतूक विषयक सांख्यिकी**

| बाब | मुंबई पोर्ट ट्रस्ट | | | जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१५-१६ | २०१६-१७ | शेकडा बदल | २०१५-१६ | २०१६-१७ | शेकडा बदल |
| एकूण माल वाहतूक क्षमता (लाख मे.टन) | **५०२.५०** | **५०२.५०** | **०.०** | **७९३.७०** | **८९३.७०** | **१२.६** |
| कर्मचारी (संख्या) | १०, १६६ | ९,४४५ | (-)७.१ | १,६३८ | १,६१५ | (-)१.४ |
| माल वाहतूक (लाख मे.टन) | **६११.१०** | **६३०.४८** | **३.२** | **६४०.२७** | **६२१.५१** | **(-)२.९** |
| पैकी अ) आयात | ४१२.९४ | ४२७.२५ | ३.५ | ३५०.७५ | ३४७.५६ | (-)०.९ |
| ब) निर्यात | १९८.१६ | २०३.२३ | २.६ | २८९.५२ | २७३.९५ | (-)५.४ |
| प्रवासी वाहतूक (हजार) | ३.१८ | १७.४४ | ४४८.४ | लाना | लाना | लाना |
| बंदरात आलेल्या बोटी (संख्या) | ५,१६९ | ५,४२७ | ५.० | २,७८० | २,७२० | (-)२.२ |
| परिचालन उत्पन्न (₹ कोटी) | १,४७८.१८ | १,४७७.८० | ०.० | १,६६५.१० | १,७००.९७ | २.२ |
| परिचालन खर्च (₹ कोटी) | १,०७५.६९ | १,१११.६७ | ३.३ | ६९३.१२ | ८०४.९७ | १६.१ |
| परिचालन अधिक्य (₹ कोटी) | ४०२.४९ | ३६६.१३ | (-)९.० | ९७१.९८ | ८९६.०० | (-)७.८ |

*आधार* : मुंबई पोर्ट ट्रस्ट व जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट लाना लागू नाही

## लहान बंदरे

९.५७ धामणखोल-जयगड, दिघी आणि लवगण-जयगड (आंग्रे बंदर) ही बंदरे कार्यान्वित झाली आहेत. रेवस-आवरे, विजयदुर्ग आणि रेडी या बंदरांची बांधकाम-पूर्व कामे प्रगतीपथावर आहेत. याशिवाय, लहान बंदरांच्या परिसरात अनेक बंदिस्त व बहुउद्देशीय थांबे असून तेथे देखील मालाची वाहतूक केली जाते. लहान बंदरांची वाहतूक विषयक सांख्यिकी तक्ता ९.३४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३४ लहान बंदरांची वाहतूक विषयक सांख्यिकी**

| बाब | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८+ |
|---|---|---|---|
| **माल वाहतूक (लाख मे. टन)** | **२८८.४९** | **३४८.९४** | **२२७.९२** |
| *पैकी* अ) आयात | २४४.७४ | २९०.०९ | १९४.३३ |
| ब) निर्यात | ४३.७५ | ५८.८५ | ३३.५९ |
| **प्रवासी वाहतूक (लाख)** | **१८०.७२** | **१८२.८२** | **११८.३७** |
| *पैकी* अ) यांत्रिकी बोटीतून | १६९.८० | १७३.१८ | ११४.६० |
| ब) बिगर - यांत्रिकी बोटीतून | १०.९२ | ९.६४ | ३.७७ |

*आधार* : महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड + नोव्हेंबर अखेर

## सागरमाला कार्यक्रम

९.५८ बंदरामुळे होणा-या विकासास चालना देणे या कार्यक्रमाचा उद्देश आहे. किमान पायाभूत गुंतवणूकीमधून आयात निर्यात तसेच अंर्तगत व्यापाराच्या वाहतूकीवरिल खर्च कमी करणे या दृष्टीने हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सागरमाला कार्यक्रमार्तंगत बंदराचे आधुनिकीकरण, नवीन बंदर विकास, बंदर जोडणी, बंदरविकासाअंर्तगत औद्योगिकीकरण व सामाजिक विकास या प्रमुख बाबी आहेत. मांडवा येथील ब्रेकवॉटर बंधा-याचे बांधकाम, तसेच रो-रो सेवेचे काम प्रगतीपथावर आहे. या कार्यक्रमाअंर्तगत रो-रो सेवेचे बांधकाम गोराई, वसई, भाईंदर, नारंगी, खारवडेश्वरी, मनोरी आणि घोडबंदर या ठिकाणी प्रस्तावित आहे.

## मरीना

९.५९ मरीनामुळे अनधिकृत व असंघटीत नांगरवाडयांमुळे जलक्षेत्रामध्ये झालेली दाटी कमी होण्यास मदत होईल. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात ३० बोटी ठेवण्याकरिता पनवेल जवळील बेलापूर खाडी येथे पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येणार असून हा प्रकल्प डिसेंबर, २०१९ पर्यंत पूर्ण होईल. या मरिनामुळे गेटवे ऑफ इंडिया नजिकच्या समुद्रात नांगरुन ठेवलेल्या यॉटस व स्पीड बोटी मरिनामध्ये सुरक्षित ठेवता येतील. गेटवे ऑफ इंडिया ते बेलापूर,नवी मुंबई येथे १५ मिनीटात पोहचता येईल.

## विमान वाहतूक

९.६० मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मर्यादित यांच्यासह भारतीय विमानतळ प्राधिकरणाने छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबईच्या आधुनिकीकरणांतर्गत प्रतिवर्ष ४० दशलक्ष प्रवासी वाहतूक हाताळण्याची क्षमता असलेले नवीन टी २ टर्मिनल बांधण्यात आले आहे. राज्यात तीन आंतरराष्ट्रीय व १३ देशांतर्गत विमानतळे आहेत. बारामती, कोल्हापूर, सोलापूर नांदेड, उस्मानाबाद, लातूर व यवतमाळ येथील प्रवासी व माल वाहतूक नगण्य आहे. ओझर विमानतळ, नाशिक येथून २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये (डिसेंबर पर्यंत) अनुक्रमे १,७३,१५१ मे.टन आणि १,०१,७८३ मे.टन मालाची वाहतूक केली आहे. निवडक विमानतळनिहाय प्रवासी व मालवाहतूक विषयक सांख्यिकी तक्ता ९.३५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३५ निवडक विमानतळनिहाय प्रवासी व मालवाहतूक विषयक सांख्यिकी**

(३१ मार्च रोजी)

| विमानतळ | प्रवासी वाहतूक (लाख) | | | माल वाहतूक (मे.टन) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१६ | २०१७ | शेकडा बदल | २०१६ | २०१७ | शेकडा बदल |
| **अ) देशांतर्गत** | **३७२.१६** | **४१५.०५** | **११.५** | **२,४८,५१३** | **२,७८,०९६** | **११.९** |
| मुंबई | ३००.४६ | ३२७.१२ | ८.९ | २,०९,००३ | २,३४,९१७ | १२.४ |
| पुणे | ५१.७६ | ६५.१२ | २५.८ | ३१,७६५ | ३४,६४५ | ९.१ |
| नागपूर | १५.२१ | १७.८२ | १७.२ | ५,९५८ | ६,७२६ | १२.९ |
| औरंगाबाद | २.९९ | ३.२४ | ८.४ | १,४०६ | १,४३६ | २.१ |
| जुहू | १.७४ | १.७५ | ०.६ | ३८१ | ३७२ | (-)२.४ |
| **ब) आंतरराष्ट्रीय** | **११९.३८** | **१२८.९१** | **८.०** | **४,९६,६७९** | **५,४७,७९१** | **१०.३** |
| मुंबई | ११६.२४ | १२४.४२ | ७.० | ४,९६,२४६ | ५,४७,३७२ | १०.३ |
| पुणे | २.४० | २.५७ | ७.१ | ० | ० | - |
| नागपूर | ०.७४ | १.९२ | १५९.५ | ४३३ | ४१९ | (-)३.२ |
| **एकूण (अ + ब)** | **४९१.५४** | **५४३.९६** | **१०.७** | **७,४५,१९२** | **८,२५,८८७** | **१०.८** |

*आधार :* भारतीय विमानतळ प्राधिकरण

९.६०.१ नांदेड ते हैद्राबाद दैनंदिन उड्डाण दि.२७ एप्रिल, २०१७ व नांदेड ते मुंबई दि. १६ नोव्हेंबर, २०१७ पासून कार्यान्वित झाली आहेत.

९.६०.२ छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळावरिल वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी नवी मुंबई येथे अतिरिक्त विमानतळाचे काम सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर चार टप्प्यात प्रस्तावित असून ₹ १६,७०४ कोटी खर्च अपेक्षित आहे. हे विमानतळ प्रतिवर्ष ६० दशलक्ष प्रवासी क्षमतेने वाहतूक करण्यासाठी नियोजित असून पहिल्या टप्प्यात किमान १० दशलक्ष प्रवासी प्रतिवर्ष हाताळण्यास विकसित करण्यात येत आहे.

९.६०.३ नागपूर येथील बहुआयामी आंतरराष्ट्रीय प्रवासी व कार्गो हब विमानतळ (मिहान) प्रकल्पामध्ये सध्याच्या विमानतळाचा आंतरराष्ट्रीय प्रवासी व कार्गो हब विमानतळामध्ये विकसीत करण्याचा समावेश आहे. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित व भारतीय विमानतळ प्राधिकरण यांच्या संयुक्त उपक्रमाद्वारे मिहान इंडीया मर्यादित प्रकल्प राबविण्यात येत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ, नागपूर चे उन्नयन व आधुनिकीकरण करण्यासाठी, सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर आरेखन, बांधकाम, वित्तपुरवठा, कार्यान्वयन व हस्तांतरण तत्वाद्वारे प्रस्ताव विनंती तयार करण्यात आली आहे.

## दळणवळण

९.६१ टपाल, दूरध्वनी, दृकश्राव्य व माहिती दूरसंचार हे दळणवळण व्यवस्थेचे प्रमुख घटक आहेत. डाक सेवेबाबतची सांख्यिकी तक्ता ९.३६ मध्ये दिली आहे.

९.६२ राज्यात ३० सप्टेंबर, २०१७ रोजी इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या ५.४५ कोटी होती, जी सर्व राज्यांच्या तुलनेत सर्वात जास्त आहे

९.६३ सप्टेंबर, २०१७ अखेर राज्यात एकूण दूरध्वनी जोडण्यांची संख्या ४८.३८ लाख होती. दर लाख लोकसंख्येमागे दूरध्वनी व भ्रमणध्वनी जोडण्यांची संख्या अनुक्रमे ३,९८५ व १,०८,८७४ होती. दूरध्वनी जोडण्या व भ्रमणध्वनींची आकडेवारी तक्ता ९.३७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३६ डाक सेवेबाबतची सांख्यिकी**

(संख्या)

| बाब | क्षेत्र | २०१५-१६ | २०१६-१७ |
|---|---|---|---|
| डाक कार्यालये | ग्रामीण | ११,३६८ | ११,३६६ |
| | नागरी | १,२३३ | १,२३६ |
| | **एकूण** | **१२,६०१** | **१२,६०२** |
| टपाल पेट्या | ग्रामीण | ४०,७२० | ३७,३५५ |
| | नागरी | ७,६१६ | ७,५७९ |
| | **एकूण** | **४८,३३६** | **४४,९३४** |
| डिलिव्हरी पोस्टमेन (डाक सेवकांसह) | ग्रामीण | २०,०३७ | १६,६२६ |
| | नागरी | १४,१८१ | ७,४४७ |
| | **एकूण** | **३४,२१८** | **२४,०७३** |

*आधार :* मुख्य डाक कार्यालय, मुंबई

**तक्ता ९.३७ दूरध्वनी व भ्रमणध्वनी जोडण्या**

(लाख)

| सेवापुरवठादार | २०१५-१६ | | २०१६-१७ | | २०१७-१८+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | दूरध्वनी | भ्रमणध्वनी | दूरध्वनी | भ्रमणध्वनी | दूरध्वनी | भ्रमणध्वनी |
| एमटीएनएल | १८.८९ | १२.४२ | १८.६१ | १३.०० | १८.३४ | १३.९४ |
| बीएसएनएल | १५.३५ | ५८.५० | १४.१९ | ६५.०२ | १३.२६ | ६७.९७ |
| भारती | ४.२४ | १९२.१९ | ४.३७ | २०८.७३ | ४.३९ | २१६.६८ |
| आयडीया/स्पाईस | लाना | २७५.६५ | लाना | ३०८.५५ | लाना | ३१३.९९ |
| रिलायंस | ३.३३ | ११३.७१ | ३.३९ | २१४.३३ | ३.३१ | २३९.७३ |
| टाटा | ८.१८ | ९८.८४ | ८.२९ | ७८.५३ | ८.६३ | ७०.३१ |
| वोडाफोन | ०.२७ | २७१.३५ | ०.३७ | २८३.७४ | ०.४० | २८३.८६ |
| एअरसेल-डिशनेट | लाना | ५४.६८ | लाना | ५५.८७ | ०.०५ | ४९.४० |
| टेलिनॉर | लाना | ८१.६३ | लाना | ७७.०३ | लाना | ६५.८५ |
| **एकूण** | **५०.२६** | **१,१५८.९७** | **४९.२२** | **१,३०४.८०** | **४८.३८** | **१,३२१.७३** |

*आधार :* भारतीय दूरसंचार विनीयामक प्राधिकरण    लाना लागू नाही    + सप्टेंबर अखेर

* * * * *

## परिशिष्ट ९.१

## राज्यातील विजेचा पुरवठा व वापर

| बाब | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **अ. स्थापित क्षमता (मेगावॅट)** | | | | | | | |
| अ-१ राज्यातील स्थापित क्षमता- | | | | | | | |
| (१) औष्णिक | ४७७$ | १,०६५$ | २,७७१ | ६,४६२ | ८,०७५ | ९,६६५ | २१,४९६ |
| (२) नवीकरणीय ऊर्जा | -- | -- | -- | -- | -- | ३,४०८ | ७,५३२ |
| (३) जलजन्य | २८२ | ८४४ | १,३१७ | १,५५२ | २,८७४ | ३,०६६ | ३,०६६ |
| (४) नैसर्गिक वायुजन्य | -- | -- | -- | ६७२ | १,८२० | २,७१४ | ३,०७२ |
| **एकूण (अ-१)** | **७५९** | **१,९०९** | **४,०८८** | **८,६८६** | **१२,७६९** | **१८,८५३** | **३५,१६६** |
| अ-२ स्थापित क्षमतेत महाराष्ट्राचा हिस्सा | | | | | | | |
| (१) राष्ट्रीय औष्णि ऊर्जा महामंडळ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | २,०४८@ | ४,६८६ | ६,४२४ |
| (२) अणुशक्ती महामंडळ | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | उ.ना. | १३७ | ६९० | ६९० |
| **एकूण (अ-२)** | **उ.ना.** | **उ.ना.** | **उ.ना.** | **उ.ना.** | **२,१८५** | **५,३७६** | **७,११४** |
| **एकूण (अ-१ + अ-२)** | **७५९** | **१,९०९** | **४,०८८** | **८,६८६** | **१४,९५४** | **२४,२२९** | **४२,२८०** |
| **ब. निर्मिती (दशलक्ष युनिट)** | | | | | | | |
| (१) औष्णिक | १,९०३$ | ३,३९२ | ११,४१६ | २८,०८५ | ४९,३७७ | ५२,७९६ | ८९,०८४ |
| (२) नैसर्गिक वायुजन्य | -- | -- | -- | २,७३० | ६,९४३ | १८,७२९ | ९,४८१ |
| (३) जलजन्य | १,३६५ | ४,५३३ | ६,४४८ | ५,६१५ | ४,८८९ | ६,३७४ | ५,९७८ |
| (४) नवीकरणीय ऊर्जा # | -- | -- | -- | -- | -- | ५,११८ | १०,५०२ |
| **एकूण** | **३,२६८** | **७,९२५** | **१७,८६४** | **३६,४३०** | **६१,२०९#** | **८३,०१७** | **१,१५,०४६** |
| **क. वापर (दशलक्ष युनिट)** | | | | | | | |
| (१) औद्योगिक | १,८५३ | ५,३१२ | ८,१३० | १४,७०६ | १८,३६३ | ३४,४१६ | ३३,८३३ |
| (२) घरगुती | २६० | ७३२ | १,७७९ | ५,०६५ | ११,१७२ | १९,५४६ | २६,८७४ |
| (३)कृषि | १५ | ३५६ | १,७२३ | ६,६०४ | ९,९४० | १६,२५७ | २८,२७२ |
| (४) वाणिज्यिक | १९८ | ५४७ | ९४९ | २,०६८ | ४,१०५ | ११,५२७ | १२,८७२ |
| (५) रेल्वे | ३३९ | ४२१ | ७६६ | ९७० | १,५८१ | २,१८८ | ११३ |
| (६) सार्वजनिक पाणी पुरवठा | ३५ | १४६ | ३३० | उ.ना. | १,१९९ | १,९८३ | २,४९४ |
| (७)सार्वजनिक दिवाबत्ती | २० | ७४ | १५९ | २९१ | ५५१ | ८४६ | २,०१० |
| (८) संकीर्ण | -- | ६२ | १९८ | २६७ | ३७८ | ६३३ | १,९८७ |
| **एकूण** | **२,७२०** | **७,६५०** | **१४,०३४** | **२९,९७१** | **४७,२८९** | **८७,३९६** | **१,०८,४५५** |
| **ड. दरडोई विजेचा अंतिम वापर (युनिट)** | | | | | | | |
| (१) औद्योगिक | ४६.८ | १०५.४ | १२९.५ | १९५.४ | १९१.२ | ३०७.२ | २८२.३ |
| (२) वाणिज्यिक | ५.० | १०.९ | १५.१ | २७.५ | ४२.७ | १०२.९ | १११.९ |

*आधार* - (१) केंद्रीय विद्युत प्राधिकरण
(२) महानिर्मिती
(३) महावितरण
(४) बेस्ट
(५) टाटा पॉवर
(६) रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर

उ.ना. - उपलब्ध नाही

टीप - (१) उपलब्ध आकडेवारी केवळ सार्वजनिक विद्युत व्यवसायी यंत्रणेची आहे.
(२) @ यात राष्ट्रीय औष्णिक ऊर्जा महामंडळ व अणुशक्ती महामंडळाकडील वाटप न झालेला तसेच गोवा राज्याचा शिलकी ३२३ मेगावॅटचा अतिरिक्त हिस्सा समाविष्ट आहे.
(३) # यात बंदिस्त वीज व नवीकरणीय ऊर्जेची (महावितरणला विकलेली) आकडेवारी समाविष्ट आहे.
(४) $ यात तेलजन्य ऊर्जेची आकडेवारी औष्णिक ऊर्जेत समाविष्ट आहे.
(५) टाटा पॉवर व रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर वगळून इतर खाजगी कंपन्यांची स्थापित क्षमता व निर्मिती सीइएच्या वेबसाईट अहवालानुसार दिली आहे.
(६) १ युनिट = एक किलो वॅट तास

# परिशिष्ट ९.२

## महाराष्ट्र राज्यातील रस्त्यांची प्रकारांनुसार लांबी
## (सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदा यांच्या देखभालीखालील)

(किमी)

| अ.क्र. | वर्ष | राष्ट्रीय महामार्ग | प्रमुख राज्य महामार्ग | राज्य महामार्ग | रस्ते | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रमुख जिल्हा | इतर जिल्हा | ग्रामीण | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | १९६५-६६ | २,३६४ | -- | १०,५२८ | १२,६२८ | ८,७४४ | १७,५२४ | ५१,७८८ |
| २ | १९७०-७१ | २,४४५ | -- | १४,२०३ | १७,६८४ | ११,०१२ | २०,०२० | ६५,३६४ |
| ३ | १९८०-८१ | २,९४५ | -- | १८,९४९ | २५,२३३ | २५,४०४ | ६८,६०० | १,४१,१३१ |
| ४ | १९९०-९१ | २,९५९ | -- | ३०,९७५ | ३८,९३६ | ३८,५७३ | ६१,५२२ | १,७२,९६५ |
| ५ | २०००-०१ | ३,६८८ | -- | ३३,२१२ | ४६,७५१ | ४३,६९६ | ८९,५९९ | २,१६,९४६ |
| ६ | २००५-०६ | ४,३६७ | -- | ३३,५७१ | ४८,९८७ | ४५,२२६ | ९९,२७९ | २,३१,४३० |
| ७ | २००६-०७ | ४,३६७ | -- | ३३,६७५ | ४९,१४७ | ४५,६७४ | १,००,८०१ | २,३३,६६४ |
| ८ | २००७-०८ | ४,३६७ | -- | ३३,८०० | ४९,३९३ | ४५,८८६ | १,०२,१४९ | २,३५,५९५ |
| ९ | २००८-०९ | ४,३६७ | -- | ३३,९३३ | ४९,६२१ | ४६,१४३ | १,०३,६०४ | २,३७,६६८ |
| १० | २००९-१० | ४,३७६ | -- | ३४,१०२ | ४९,९०१ | ४६,८१७ | १,०४,८४४ | २,४०,०४० |
| ११ | २०१०-११ | ४,३७६ | -- | ३४,१०३ | ४९,९३६ | ४६,८९७ | १,०६,४०० | २,४१,७१२ |
| १२ | २०११-१२ | ४,३७६ | -- | ३४,१५७ | ५०,२५६ | ४७,५२९ | १,०६,६०१ | २,४२,९१९ |
| १३ | २०१२-१३ | ४,३७६ | ६,६९४ | २७,५२८ | ५०,२५६ | ४७,५७३ | १,०६,७४५ | २,४३,१७२ |
| १४ | २०१३-१४ | ५,८५८ | ६,३३७ | ३३,९६३ | ५०,२३२ | ५२,७६१ | १,१४,५५७ | २,६३,७०८ |
| १५ | २०१४-१५ | ४,७६६ | ६,१६३ | ३३,८६० | ५०,५८५ | ५८,११५ | १,४५,८७९ | २,९९,३६८ |
| १६ | २०१५-१६ | ७,४३८ | ५,१८० | ३३,३३० | ५०,८४४ | ५८,११६ | १,४५,८८१ | ३,००,७८९ |
| १७ | २०१६-१७ | १२,२७५ | ३,८६१ | ३०,५८९ | ५२,६३७ | ५८,११६ | १,४५,८८१ | ३,०३,३५९ |

*आधार* - सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन

टीप - (१) १९८७ पर्यंतच्या रस्ते लांबीची विभागणी १९६१-८१ रस्ते विकास योजनेनुसार आणि १९८७-८८ पासून ही विभागणी १९८१-२००१ रस्ते विकास योजनेनुसार केली आहे .

(२) सन १९६५-६६ ते २०११-१२ करिता राज्य महामार्गात प्रमुख राज्य महामार्गाचा समावेश आहे.

(३) सन २०१२-१३ पासून रस्ते लांबीची विभागणी २००१-२१ रस्ते विकास योजनेनुसार आहे.

## परिशिष्ट ९.३

## जिल्हानिहाय रस्त्यांच्या लांबीचे रुंदीनुसार वर्गीकरण
## (सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील)

(किमी)

| अ. क्र. | जिल्हा / रूंदी (मीटर) | साध्य लांबी २०१५-१६ ७.०० | ५.५ | ३.७५ | इतर | एकूण | साध्य लांबी २०१६-१७# ७.०० | ५.५ | ३.७५ | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) |
| १ | बृहन्मुंबई | ६० | -- | -- | -- | ६० | -- | -- | -- | -- | -- |
| २ | ठाणे | २५० | २१३ | ९०० | २,११४ | ३,४७७ | २७८ | २४८ | ३५७ | ७ | ८९० |
| ३ | पालघर | २५५ | ३९१ | ३,२५९ | २,०६५ | ५,९७० | ३४७ | ४४८ | ५९१ | ६१ | १,४४७ |
| ४ | रायगड | १,२०० | २६६ | २,२३७ | २,४१८ | ६,१२१ | १,३७७ | २९१ | ४९१ | १५८ | २,३१७ |
| ५ | रत्नागिरी | ४५७ | ९१४ | ८,०२१ | ० | ९,३९२ | ७५९ | ९११ | १,५४६ | -- | ३,२१६ |
| ६ | सिंधुदुर्ग | १२४ | ७८८ | ६,८८९ | ० | ७,८०१ | २१९ | ८१५ | १,२१४ | -- | २,२४८ |
| | **कोकण विभाग** | **२,३४६** | **२,५७२** | **२१,३०६** | **६,५९७** | **३२,८२१** | **२,९८०** | **२,७१३** | **४,१९९** | **२२६** | **१०,११८** |
| ७ | अहमदनगर | ७२३ | १,२३७ | ११,२४५ | ७,५८२ | २०,७८७ | ८७५ | २,२५५ | २,०४४ | १०२ | ५,२७६ |
| ८ | नाशिक | १,२२९ | १,५४३ | ११,६५४ | ४,७१० | १९,१३६ | १,१८६ | १,६१० | २,१३५ | ० | ४,९३१ |
| ९ | धुळे | ५५० | ५३३ | ५,४३३ | ८५ | ६,६०१ | ५६८ | ६२८ | ६३८ | ० | १,८३४ |
| १० | नंदुरबार | २४८ | ४९२ | ४,४७२ | १,७९३ | ७,००५ | २२४ | ५८५ | ७६३ | ० | १,५७२ |
| ११ | जळगाव | ५५६ | १,२५७ | ४,४३३ | ६,४२० | १२,६६६ | ५८२ | १,४२९ | २,०५४ | ६५४ | ४,७१९ |
| | **नाशिक विभाग** | **३,३०६** | **५,०६२** | **३७,२३७** | **२०,५९०** | **६६,१९५** | **३,४३५** | **६,५०७** | **७,६३४** | **७५६** | **१८,३३२** |
| १२ | पुणे | १,२७८ | १,२४६ | १६,४५४ | १२० | १९,०९८ | १,२८७ | १,३२२ | ३,९५७ | ११९ | ६,६८५ |
| १३ | सातारा | ४५१ | ९६३ | ८,८८९ | २,१५८ | १२,४६१ | ४६९ | १,०५० | १,९२३ | ३८ | ३,४८० |
| १४ | सांगली | ५७३ | १,०५५ | ६,३५५ | ४,२४७ | १२,२३० | ५२२ | १,४४८ | १,६०८ | ३ | ३,५८१ |
| १५ | कोल्हापुर | ५९० | ८६१ | ३,७४३ | ३,५०० | ८,६९४ | ६१७ | ९८५ | १,१९९ | ३४ | २,८३५ |
| १६ | सोलापूर | १,७१० | ९२७ | ११,८५१ | २,९०८ | १७,३९६ | १,५३४ | १,००८ | ३,६३९ | ३१३ | ६,४९४ |
| | **पुणे विभाग** | **४,६०२** | **५,०५२** | **४७,२९२** | **१२,९३३** | **६९,८७९** | **४,४२९** | **५,८१३** | **१२,३२६** | **५०७** | **२३,०७५** |
| १७ | औरंगाबाद | ६७१ | ७८७ | ७,०६१ | २,००६ | १०,५२५ | ५६५ | ६८७ | २,०९३ | ११४ | ३,४५९ |
| १८ | जालना | २७७ | ४२४ | ४,९३७ | १,७५६ | ७,३९४ | ३३५ | ३९२ | १,४९७ | ३६ | २,२६० |
| १९ | परभणी | १८० | ५१३ | ३,७८९ | ९२९ | ५,४११ | १६० | ३५२ | १,२७३ | ७१ | १,८५६ |
| २० | हिंगोली | ७५ | १६९ | ३,५०५ | १७ | ३,७६६ | १२८ | २५१ | ९१२ | २५ | १,३१६ |
| २१ | नांदेड | ३८४ | ७३३ | ८,३०६ | १,८४६ | ११,२६९ | ३११ | ८८३ | ३,०६५ | १५९ | ४,४१८ |
| २२ | बीड | ७८९ | ५९८ | ७,५१९ | ३,४७३ | १२,३७९ | ६९६ | ५२२ | १,९८४ | १५५ | ३,३५७ |
| २३ | उस्मानाबाद | ३६० | ८०१ | ४,८३१ | १,४६७ | ७,४५९ | ३७६ | ९३१ | १,२५४ | ५९ | २,६२० |
| २४ | लातूर | २७० | ९०१ | ४,६७१ | १,६४० | ७,४८२ | ३२८ | ८५५ | १,२१३ | १३३ | २,५२९ |
| | **औरंगाबाद विभाग** | **३,००६** | **४,९२६** | **४४,६१९** | **१३,१३४** | **६५,६८५** | **२,८९९** | **४,८७३** | **१३,२९१** | **७५२** | **२१,८१५** |
| २५ | बुलढाणा | ५६१ | ८२६ | २,६३५ | १,५८५ | ५,६०७ | ३८५ | ८६१ | १,०६४ | ० | २,३१० |
| २६ | अकोला | ३८८ | ५०३ | १,५३३ | ९३८ | ३,३९२ | २६० | ५२२ | ६३५ | ० | १,४१७ |
| २७ | वाशिम | २८६ | ४५० | १,११९ | १,११९ | २,९७४ | २४४ | ५०७ | ४९३ | ० | १,२४४ |
| २८ | अमरावती | ६७७ | ९६० | १,७९२ | ४,९०९ | ८,३३८ | ५७४ | १,०३७ | १,७४६ | २३२ | ३,५८९ |
| २९ | यवतमाळ | ४८७ | ९९७ | ४,२४१ | २,५१७ | ८,२४२ | ६५२ | १,००० | १,२८८ | १९० | ३,१३० |
| | **अमरावती विभाग** | **२,३९९** | **३,७३६** | **११,३२०** | **११,०९८** | **२८,५५३** | **२,११५** | **३,९२७** | **५,२२६** | **४२२** | **११,६९०** |
| ३० | वर्धा | २३४ | ४६९ | १,०९२ | २,२९८ | ४,०९३ | २२४ | ६०७ | ८६१ | १६५ | १,८५७ |
| ३१ | नागपूर | ७८४ | ६३१ | ३,११८ | ४,२३८ | ८,७७१ | ७५७ | ७८९ | १,५३७ | १०५८ | ४,१४१ |
| ३२ | भंडारा | १३७ | ३६० | ३,६७३ | १,०४० | ५,२१० | १४३ | ४१३ | ६५२ | १७५ | १,३८३ |
| ३३ | गोंदिया | १०३ | ४३३ | २,३०१ | २,८०३ | ५,६४० | १०६ | ५३४ | ६२३ | ३९५ | १,६५८ |
| ३४ | चंद्रपुर | ४१५ | ५०८ | ३,३०९ | ३,५९३ | ७,८२५ | २३७ | ५४० | १,६२८ | २८४ | २,६८९ |
| ३५ | गडचिरोली | २५२ | ६९४ | २,२५७ | २,९१४ | ६,११७ | २४८ | ८७६ | १,३१३ | १६७ | २,६०४ |
| | **नागपूर विभा** | **१,९२५** | **३,०९५** | **१५,७५०** | **१६,८८६** | **३७,६५६** | **१,७१५** | **३,७५९** | **६,६१४** | **२,२४४** | **१४,३३२** |
| | **महाराष्ट्र राज्य** | **१७५८४** | **२४,४४३** | **१,७७,५२४** | **८१,२३८** | **३,००,७८९** | **१७,५७३** | **२७,५९२** | **४९,२९०** | **४,९०७** | **९९,३६२** |

*आधार* - सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन

\# सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या देखभालीखालील

# परिशिष्ट ९.४

## महाराष्ट्र राज्यातील वापरात असलेली मोटार वाहने

(१ जानेवारी रोजी)

| अ.क्र. | वाहनांचा प्रकार | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ | २०१६ | २०१७ | २०१८* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | मोटार सायकली, स्कूटर व मोपेड | ८३,९३० | ३,४६,८२६ | १६,९६,१५७ | ४४,०९,९०६ | १,२०,६०,९९० | १,९८,८१,४९९ | २,१३,९०,३०४ | २,३०,०८,६९५ |
| २ | मोटार गाड्या, जीप आणि स्टेशन वॅगन्स् | १,२२,५०८ | २,२४,७५२ | ४,२३,५०५ | ९,०१,२७८ | २३,८२,७८९ | ३८,५०,५३० | ४१,७५,८७८ | ४५,१४,९२९ |
| ३ | टॅक्सी कॅब्ज | १७,८०६ | ३१,३०२ | ४३,१६८ | ८६,४३८ | १,८२,६७६ | २,२४,३०८ | २,७०,१६० | २,९५,३२१ |
| ४ | स्वयंचलित रिक्शा | ३,०४९ | २९,४७४ | १,२६,०४९ | ४,०७,६६० | ६,४४,०३७ | ७,२६,१२० | ७,२०,४३९ | ७,४७,३३७ |
| ५ | स्टेज कॅरेजेस् | १०,२५० | १३,७८९ | १८,२०३ | २७,२८६ | ३४,०६१ | ३८,३१८ | ३५,६८२ | ३५,७०६ |
| ६ | कॉन्ट्रॅक्ट कॅरेजेस | -- | १,४९८ | ३,९८० | १३,९७५ | ३१,४५९ | ४३,९८५ | ३६,४०७ | ४३,२३३ |
| ७ | मालमोटारी - | | | | | | | | |
| | (१) डिझेल इंजिन | ३४,९८७ | ८७,०७९ | १,८०,८८३ | ३,४१,३४४ | ८,७८,२३९ | १३,८८,२३१ | १४,०९,७४९ | १५,१३,६७८ |
| | (२) पेट्रोल इंजिन | २१,७९१ | १८,००५ | १३,७७४ | ५७,३१७ | ७७,१८९ | २८,५६३ | ९,४२७ | ९,२५५ |
| | (३) इतर (सीएनजी, एलपीजी, इ.) | -- | -- | -- | उ.ना. | उ.ना. | ५,९७९ | ५७,६९१ | ५९,८३३ |
| ८ | रुग्णवाहिका | ४४१ | ९२५ | २,२३३ | ४,०२५ | ९,६०० | १४,३१५ | १२,६८९ | १४,९७४ |
| ९ | शाळेच्या बसेस | ४९१ | ५९४ | १,०२५ | १,७१४ | ६,११७ | २१,५४१ | २२,०५१ | २२,८२८ |
| १० | खाजगी प्रवासी वाहने | ८१० | २,१७१ | ४,६२२ | ५,८१५ | ९,४२१ | ११,६२९ | २६,९४२ | २६,९६३ |
| ११ | जोड वाहने (ट्रेलर) | ७,०७५ | २३,१७३ | ६०,८५८ | १,६७,८५६ | २,८४,६९६ | ३,८४,४८२ | ३,४८,६१९ | ४,०९,३६५ |
| १२ | ट्रॅक्टर्स | ७,८२१ | २४,०७९ | ६१,०८८ | १,७२,५७८ | ३,५८,५५६ | ६,०३,६३२ | ६,१६,१६० | ६,५१,०६९ |
| १३ | इतर | ८१० | १,३१९ | ५,०४० | ९,८७२ | २९,८२९ | ४६,९९७ | ५३,६७० | ६१,८०५ |
| | **एकूण** | **३,११,७६९** | **८,०४,९८६** | **२६,४०,५८५** | **६६,०७,०६४** | **१,६९,८९,६५९** | **२,७२,७०,१२९** | **२,९१,८५,८६८** | **३,१४,१४,९११** |
| | दर लाख लोकसंख्येमागे मोटार वाहनांची संख्या | ६१८ | १,३०९ | ३,३५३ | ७,१८६ | १५,११९ | २२,९१६ | २४,०२४ | २५,८५९ |
| | सार्वजनिक बांधकाम व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील असलेल्या दर किमी रस्तेलांबीमागे मोटार वाहनांची संख्या | ५ | ६ | १५ | ३१ | ७१ | ९१ | ९७ | १०४ |
| | दर लाख लोकसंख्येमागे रुग्णवाहिकांची संख्या | ०.९ | १.५ | २.८ | ४.४ | ८.५ | १२ | १० | १२ |

*आधार* - परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र शासन    * अस्थायी    उ.ना. उपलब्ध नाही.

# 10

# ºÉÉ¨ÉÉÊVÉEò lÉjÉ









# १०. सामाजिक क्षेत्र

१०.१ समाजातील नागरिकांचे विशेषत: दुर्बल व पिडीत घटकांचे जीवनमान उंचावण्याची निश्चिती करणे हा नियोजनबद्ध विकासाचा मुख्य हेतू आहे. आर्थिक विकास अधिक परिणामकारकरित्या होण्यासाठी सक्षम, सुशिक्षित आणि कुशल मनुष्यबळ सहभागी होऊ शकते म्हणूनच सामाजिक क्षेत्राच्या विकासावर जास्त भर देण्यात येतो. जनतेच्या सहभागाने गुणात्मक सेवा मिळून सामाजिक क्षेत्राचा विकास होण्यासाठी उत्तम परिणाम मिळू शकतात. प्रतिकूल परिस्थीतीत असणाऱ्यांना, दिव्यांगांना तसेच, वंचितांना त्यांच्या आवश्यक गरजा भागविण्यासाठी राज्यनियोजनात महत्त्व दिले आहे. मानव विकासातील दुवा, *व्हिजन* २०३० व शाश्वत विकास ध्येये ही सामाजिक विकासाशी निगडीत आहेत.

## शिक्षण

१०.२ राज्यातील युवकांना ज्ञान, कौशल्य आणि व्यवसाय प्रशिक्षण देऊन त्यांना उत्पादक रोजगाराच्या संधी निर्माण करणे आणि पर्यायाने राज्याच्या आर्थिक विकासाला गतिमान करण्यासाठी तसेच, युवकांना सक्षम होण्यासाठी शिक्षण हे अत्यंत प्रभावी माध्यम आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात बदलत्या गरजांनुसार गुणवत्तापूर्ण शिक्षण, परवडण्याजोगे व्यावसायिक प्रशिक्षण, उच्च शिक्षणाची संधी, नवे शोध आणि संशोधन ही शिक्षण व्यवस्थेसमोरची आव्हाने आहेत. ही आव्हाने विचारात घेऊन केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने विविध शैक्षणिक कार्यक्रम राबवले जात आहेत. तसेच, तांत्रिक शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी राज्यात भारतीय सूचना प्राद्योगिकी संस्था (IIIT), भारतीय प्रबंध संस्था (IIM) यांची स्थापना केली आहे. उच्च शिक्षणाचा शैक्षणिक दर्जा आणि गुणवत्ता वाढविण्यासाठी राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, निवडप्रधान श्रेयांकन पद्धती, स्वयं-वित्त सहाय्यीत विद्यापीठे यासारख्या योजना शासनाने सुरु केल्या आहेत तसेच जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरणांच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी राज्याने नवीन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापिठ अधिनियम, २०१६ संमत केला आहे.

### शालेय शिक्षण

१०.३ राज्यातील ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांना मोफत आणि सक्तीने शिक्षण देण्यासाठी, शिक्षण हक्क कायदा अधिनियमित करण्यात आला आहे. 'सर्वांसाठी शिक्षण, गुणवत्ता शिक्षण' या धोरणास अनुसरुन सर्व बालकांसाठी शिक्षण हे आवश्यक आहे. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची पुरेशी प्रगती झाली आहे. मूलभूत शिक्षणाची प्रमुख जबाबदारी राज्य सरकारची असली तरी स्थानिक स्वराज्य संस्थादेखील ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागात शालेय शिक्षणाशी निगडीत आहेत. राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या संयुक्त उपक्रमाद्वारे विविध शैक्षणिक कार्यक्रम, विशेषतः प्राथमिक शिक्षणाचे, राबविले जातात. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर शैक्षणिक सेवा पुरविण्यासाठी केल्याने केवळ शिक्षणाच्या गुणवत्तेवरच नव्हे, तर शिक्षण ग्रामीण भागांपर्यंत पोहचणे सहज शक्य होत आहे. सन २०१६-१७ मध्ये राज्य शासनाचा प्राथमिक शिक्षणावरील खर्च ₹ १९,४८६ कोटी होता. प्राथमिक (इयत्ता १ ली ते ८ वी) शैक्षणिक संस्था आणि पटसंख्या तक्ता १०.१ मध्ये तर विभागनिहाय आकडेवारी परिशिष्ट १०.१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१ प्राथमिक (इयत्ता १ ली ते ८ वी) शैक्षणिक संस्था आणि पटसंख्या**

| वर्ष | प्राथमिक (१ ली ते ८ वी) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | शाळा (संख्या) | पटसंख्या ('०००') | | शिक्षकांची संख्या ('०००) | विद्यार्थी शिक्षक प्रमाण |
| | | एकूण | पैकी मुली | | |
| २०१६-१७ | १,०४,९७१ | १५,९८६ | ७,४९० | ५३० | ३०.१ |
| २०१७-१८* | १,०६,५२७ | १५,९०९ | ७,४५० | ५४२ | २९.३ |

*आधार* : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद * अस्थायी

### सर्व शिक्षा अभियान

१०.४ 'सर्व शिक्षा अभियान' हा केंद्र शासनाचा सर्वसमावेशक आणि एकत्रित *फ्लॅगशीप* कार्यक्रम असून यात कालबद्ध पद्धतीने ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीने शिक्षण दिले जाते. सर्व शिक्षा अभियानांतर्गत नवीन शाळा उघडणे, शाळा व अतिरिक्त वर्गखोल्या बांधणे, शौचालये आणि पिण्याच्या पाण्याची सुविधा पुरविणे, पाठ्यपुस्तके, नियमित प्रशिक्षण, आवश्यक शैक्षणिक साहित्य पुरविणे इ. विविध उपकार्यक्रमांद्वारे सार्वत्रिक उपलब्धता व गुणवत्तापूर्ण शिक्षणामध्ये भरीव प्रगती केली आहे. सर्व शाळांमध्ये *डीजीटल क्लासरूम* स्थापन करण्यासाठी विविध स्त्रोत जसे शासन, व्यावसायिक सामाजिक जबाबदारी, जनतेद्वारे निधी उपलब्ध करुन दिला जात आहे. सर्व शिक्षा अभियानावर २०१६-१७ मध्ये ₹ १९८१.४३ कोटी तर २०१७-१८ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ १,३४३.५८ कोटी खर्च झाला. प्राथमिक शिक्षणाबाबतचे (इयत्ता १ ली ते ८ वी) काही महत्वाचे निर्देशक तक्ता १०.२ मध्ये देण्यात आले आहेत.

**तक्ता १०.२ प्राथमिक (इयत्ता १ ली ते ८ वी) शिक्षणाबाबतचे काही महत्वाचे निर्देशक**

(३० सप्टेंबर रोजी)

| निर्देशक | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८* |
|---|---|---|---|
| शिक्षणविषयक जिल्हा माहिती प्रणाली (DISE) अंतर्गत नोंदविलेल्या प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळांची संख्या | ९८,२१९ | १,०४,९७१ | १,०६,५२७ |
| ग्रामीण भागातील शाळांची टक्केवारी | ७९.७ | ७८.१ | ७६.७ |
| दर १० चौ.किमी मागील शाळांची/ तुकड्यांची घनता (अ) प्राथमिक | २.८ | ३.२ | ३.२ |
| (ब) उच्च प्राथमिक | १.५ | १.७ | १.७ |
| दर हजार मुलांच्या लोकसंख्येमागे (६ ते ११ वर्ष) प्राथमिक शाळा/तुकड्यांची संख्या | ८ | ९.७ | ९.९ |
| दर हजार मुलांच्या लोकसंख्येमागे (११ ते १४ वर्ष) उच्च प्राथमिक शाळा/तुकड्यांची संख्या | ७ | ८.६ | ९.० |
| खाजगी शाळांची एकूण शाळांशी टक्केवारी | १२.४ | २०.६ | २१.१ |
| शाळेतील पटसंख्या (लाखात) | १६०.४ | १५९.६ | १५९.१ |
| पटसंख्येतील मुलींची टक्केवारी | ४६.९ | ४६.९ | ४६.८ |
| एकूण पटसंख्या प्रमाण (अ) प्राथमिक | १०४.० | १००.० | १००.१ |
| (ब) उच्च प्राथमिक | १०२.६ | ५९.५ | ५९.० |
| सरासरी विद्यार्थी-वर्ग प्रमाण (सर्व शाळा) | ३१ | ३१ | ३१ |
| शिक्षकांची संख्या (लाखात) | ५.२ | ५.२ | ५.४ |
| विद्यार्थी -शिक्षक प्रमाण | ३१.२ | ३०.१ | २९.३ |
| **सुविधा असलेल्या शाळांची टक्केवारी** | | | |
| पिण्याचे पाणी | ९९.७ | ९९.६ | ९८.५ |
| संरक्षक भिंत | ८२.३ | ८२.८ | ८२.७ |
| मुलींकरिता कार्यरत शौचालय | ९९.४ | ९९.० | ९६.८ |
| संगणक | ५६.९ | ६२.९ | ६८.८ |
| नि:शक्तांसाठी उतरता रस्ता @ | ८६.१ | ८५.२ | ८५.८ |
| खेळाचे मैदान | ८७.२ | ८७.३ | ८६.३ |
| ग्रंथालय | ९६.० | ९५.७ | ९४.९ |
| विद्युत जोडणी | ९३.९ | ९४.० | ९४.२ |
| गळतीचे प्रमाण (अ) प्राथमिक | १.२६ | ०.७० | ०.२४ |
| (ब) उच्च प्राथमिक | १.४५ | १.०६ | १.५७ |
| स्त्री पुरुष असमानता निर्देशांक (अ) प्राथमिक | ०.८८ | ०.८९ | ०.८७ |
| (ब) उच्च प्राथमिक | ०.८८ | ०.८७ | ०.८८ |

टीप : उच्च प्राथमिक - इयत्ता ६ वी ते ८ वी @ आवश्यक व उपलब्ध असलेले * अस्थायी

आधार : १) एलीमेंटरी एज्युकेशन इन इंडिया प्रोग्रेस टुवर्डस युईई फ्लॅश स्टॅटिस्टिक्स रिपोर्ट , भारत सरकार २) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

## सिस्टिमॅटिक ॲडमिनिस्टेटिव्ह रिफॉर्म्स फॉर ॲचिव्हमेंट *लर्निंग* (सरल)

१०.५ शैक्षणिक वर्षभरात शाळांकडून वेगवेगळया प्रकारच्या सांख्यिकी माहितीची शासनास गरज असते तर *यु-डायस* (U-DISE) *डेटाबेस* मर्यादित शैक्षणिक बाबींची माहिती पुरविते आणि शिक्षकांना *ई-गर्व्हनन्स* अंतर्गत वेळोवेळी आवश्यक असणारी माहिती पुरवावी लागते. त्याकरीता 'सरल' या विशेष प्रणालीमध्ये *ऑनलाइन* माहिती भरण्याचे निर्देश शाळांना देण्यात आले आहेत, ज्यामुळे आवश्यक ती माहिती व्यवस्थापन प्रणाली / सांख्यिकी माहितीचे अहवाल केव्हाही *ऑनलाईन* उपलब्ध होऊ शकतील.

## माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण

१०.६ राज्यात सन २०१७-१८ मध्ये माध्यमिक आणि उच्च माध्यमिक २६,८७९ शैक्षणिक संस्था असून त्यामध्ये ६६.४८ लाख पटसंख्या आहे. सन २०१६-१७ मध्ये राज्य शासनाचा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणावरील खर्च ₹ १६,०८९ कोटी होता. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १२ वी) शैक्षणिक संस्था आणि पटसंख्या तक्ता १०.३ मध्ये दिली आहे.

## दिव्यांग समावेशक शिक्षण

१०.७ विशेष गरज असलेल्या मुलांना सर्वसाधारण परिस्थितीत सर्वसाधारण मुलांसोबत चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळून त्यांची भावनिक उन्नती होण्यासाठी तसेच त्यांना सामाजिकदृष्ट्या सामावून घेण्यासाठी राज्यात 'दिव्यांग समावेशक शिक्षण' कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमामध्ये विशेष गरज असलेली मुले शोधून व त्यांची वैद्यकीय तपासणी करून आवश्यकतेनुसार *ब्रेल* लिपीतील पुस्तके, चष्मे, श्रवणयंत्रे व उपकरणे, वाचा प्रशिक्षक इत्यादी शैक्षणिक सहाय्यभूत सोईसुविधा पुरवून त्यांचे पुनर्वसन करणे याचा समावेश आहे. सन २०१६-१७ मध्ये २.५५ लाख मुलांना लाभ दिला असून ₹ ५८.९९ कोटी खर्च झाला तर सन २०१७-१८ मध्ये २.२७ लाख मुलांना लाभ दिला असून ₹ ४०.५७ कोटी खर्च झाला.

**तक्ता १०.३ माध्यमिक आणि उच्च माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १२ वी) शैक्षणिक संस्था आणि पटसंख्या**

| वर्ष | माध्यमिक व उच्च माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १२ वी) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | शाळा (संख्या) | पटसंख्या ('०००') एकूण | पटसंख्या ('०००') पैकी मुली | शिक्षकांची संख्या ('०००) | विद्यार्थी शिक्षक प्रमाण |
| २०१६-१७ | २५,७३७ | ६,६१५ | ३,०१३ | २१३ | ३१.१ |
| २०१७-१८* | २६,८७९ | ६,६४८ | ३,०४२ | २१८ | ३०.५ |

*आधार* : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद  * अस्थायी

## राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान

१०.८ 'राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान' ही योजना सन २००९ मध्ये माध्यमिक शिक्षणातील प्रवेश वाढविण्यासाठी व गुणवत्ता सुधारण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आली. सन २०१६-१७ मध्ये या योजनेअंतर्गत ₹ १९.१५ कोटी खर्च झाला तर २०१७-१८ मध्ये डिसेंबर अखेर ₹ ३६.९९ कोटी खर्च झाला. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाचे काही महत्वाचे निर्देशक तक्ता १०.४ मध्ये देण्यात आले आहेत.

**तक्ता १०.४ माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाबाबतचे काही महत्वाचे निर्देशक**

(३० सप्टेंबर रोजी)

| निर्देशक | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ |
|---|---|---|---|
| शिक्षणविषयक जिल्हा माहिती प्रणाली (U-DISE)अंतर्गत नोंदविलेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण देणाऱ्या शाळांची संख्या | २४,४९७ | २५,०२९ | २५,५२९ |
| ग्रामीण भागातील शाळांचे प्रमाण | ६३.७ | ६३.७ | ६३.० |
| दर १० चौ. किमी मागील शाळांची/तुकड्यांची घनता (अ) माध्यमिक | ०.७ | ०.८ | ०.८ |
| (ब) उच्च माध्यमिक | ०.३ | ०.३ | ०.३ |
| खाजगी शाळांची एकूण शाळांशी टक्केवारी | २८.१ | २७.९ | २८.४ |
| शाळेतील पटसंख्या (लाखात) | ६१.८ | ६४.२ | ६६.१ |
| पटसंख्येतील मुलींची टक्केवारी | ४५.७ | ४५.५ | ४५.६ |
| एकूण पटसंख्येचे प्रमाण (अ) माध्यमिक | ८९.१ | ९०.० | ९१.७ |
| (ब) उच्च माध्यमिक | ६२.१ | ६७.८ | ६९.८ |
| सरासरी विद्यार्थी-वर्ग प्रमाण (सर्व शाळा) | ५४ | ५४ | ५१ |
| शिक्षकांची संख्या (लाखात) | २.१९ | २.२० | २.१० |
| विद्यार्थी -शिक्षक प्रमाण | २८ | २९ | ३१ |
| **सुविधा असलेल्या शाळांची टक्केवारी** | | | |
| पिण्याचे पाणी | ९९.९ | ९९.९ | ९९.९ |
| संरक्षक भिंत | ८९.२ | ८९.२ | ८७.६ |
| मुलींकरिता कार्यरत शौचालय | ९९.६ | ९९.८ | ९९.५ |
| नि:शक्तांसाठी उतरता रस्ता @ | ८३.९ | ८६.६ | ७५.० |
| खेळाचे मैदान | ९६.० | ९६.१ | ९७.० |
| ग्रंथालय | ९७.६ | ९७.४ | ९८.३ |
| विद्युत जोडणी | ९६.९ | ९७.१ | ९७.१ |
| संगणक | ९२.० | ९३.३ | ९५.० |
| संगणक व इंटरनेट | ५६.४ | ६०.२ | ६४.९ |
| गळतीचे प्रमाण (अ) माध्यमिक | ११.२ | १२.४ | ११.६ |
| (ब) उच्च माध्यमिक | १.८ | १.८ | २.४ |
| स्त्री पुरुष असमानता निर्देशांक (अ) माध्यमिक | ०.९६ | ०.९५ | ०.९५ |
| (ब) उच्च माध्यमिक | ०.९७ | ०.९७ | ०.९७ |

@ आवश्यक व उपलब्ध असलेले

*आधार* : १) सेकंडरी एज्युकेशन इन इंडिया प्रोग्रेस टुवर्डस युईई फ्लॅश स्टॅटिस्टिक्स रिपोर्ट , भारत सरकार २) महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण परिषद

## प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम

१०.९ शालेय मुलांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी सन २०१५-१६ मध्ये राज्य शासनाने 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम' सुरू केला. एकही मूल शैक्षणिकदृष्ट्या अपेक्षेपेक्षा कमी असणार नाही यासाठी मुलांमधील मूलभूत क्षमता ओळखून प्रत्येक विद्यार्थ्याने वयोगटानुरूप अपेक्षित शैक्षणिक क्षमता संपादित केली आहे किंवा नाही याची पडताळणी करण्याकरिता या कार्यक्रमांतर्गत विशेष कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांमधील मूलभूत क्षमता व शैक्षणिक पातळी ओळखण्यासाठी 'राज्यस्तरीय अध्ययन संपादणूक सर्वेक्षण' घेण्यात येते. याकरिता इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांच्या वर्षातून तीन शैक्षणिक प्रगती चाचण्या घेण्यात येतात. ज्यामध्ये एक पायाभूत चाचणी व सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनामधील संकलित मूल्यमापनाच्या दोन चाचण्या आहेत. या चाचण्या महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांचेमार्फत घेण्यात येतात. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राचे ध्येय साध्य करण्यासाठी शासनाकडून शिक्षकांना आवश्यकतेनुसार व मागणीनुसार प्रशिक्षण देण्यात येत आहे. राज्यातील शैक्षणिक सुविधांना उत्तेजन देण्याकरिता शासन कंपन्यांना त्यांचा खाजगी सामाजिक दायित्व निधी (सीएसआर), शालेय प्रणालींमध्ये गुंतवणूक करण्यासाठी प्रोत्साहित करीत आहे आणि सन २०१७-१८ मध्ये ३,६८३ शाळांना याचा लाभ झाला आहे. 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमा' ची प्रगती तक्ता १०.५ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता १०.५ प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाची प्रगती**

(संख्या)

| विवरण | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८+ |
|---|---|---|---|
| प्रगत शाळा | ८,७९१ | २४,६८७ | ४७,९७३ |
| डिजिटल शाळा | ११,२२८ | २७,६८६ | ६३,४५८ |
| कार्य आधारीत शिक्षण देणाऱ्या शाळा | १२,४०९ | १३,४४८ | १५,४५२ |
| आयएसओ प्रमाणित शाळा | १,३६८ | २,६४६ | ३,३२५ |
| रचनावादाचा अवलंब करत असलेल्या शाळा | ४६,६०८ | ६३,५९५ | ६७,७५८ |
| आवश्यकतेनुसार व मागणीनुसार शिक्षकांना देण्यात येणारे प्रशिक्षण | १,८२,४२८ | ३,३७,३४८ | ५,०७,४४० |
| भाषा विषयात विद्यार्थ्यांचे सरासरी साध्य (टक्के) | ६७.० | ७७.१३ | ७४.३३ |
| गणित विषयात विद्यार्थ्यांचे सरासरी साध्य (टक्के) | ६८.० | ७७.०५ | ७४.३३ |

*आधार :* महाराष्ट्र प्रज्ञा प्राधिकरण + जानेवारी पर्यंत

## शाळाबाह्य मुले

१०.१० एकही मूल शाळाबाह्य किंवा शिक्षणापासून वंचित राहू नये याकरिता शिक्षण हक्क कायद्यानुसार राज्यातील ६-१४ वयोगटातील सर्व मुलांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. यामुळे शाळाबाह्य मुलांचा शोध घेऊन त्यांना शाळेत दाखल करून घेऊन नियमितपणे शिकविण्याची गरज आहे. सन २०१७-१८ मध्ये डिसेंबरपर्यंत ४८,३७९ मुले शाळाबाह्य होती. विशेष प्रशिक्षण ३६,१८५ मुलांना देण्याचे प्रस्तावित करण्यात आले असून त्यापैकी १५,५२९ मुलांची नोंदणी करण्यात आली आहे आणि उर्वरित मुलांची शाळेत नोंदणी करण्यासाठी प्रयत्न सूरू आहेत.

## शिक्षणासाठी प्रोत्साहनपर योजना

१०.११ मुलांना शिक्षणात सहभागी होण्यास प्रोत्साहन देण्यासाठी व पालकांचा आर्थिक भार कमी करण्यासाठी राज्य शासन विविध योजनांद्वारे विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर सवलती देत आहे. शिक्षणासाठी प्रोत्साहनपर निवडक योजनांची प्रगती तक्ता १०.६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६ शिक्षणासाठी प्रोत्साहनपर निवडक योजनांची प्रगती**

| योजना | २०१५-१६ | | २०१६-१७ | | २०१७-१८ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (लाख) | खर्च (₹कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) |
| १ ली ते ४ थी इयत्तेतील गरीब मुलांना मोफत गणवेश व लेखन साहित्य पुरविणे | ९.४० | ७.५२ | ४.६३ | ३.७० | ४.३५@ | ३.४०$ |
| १ ली ते १० वी च्या शासकीय अनुदानित व विनाअनुदानित शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्कात सवलत | २३.५२ | ३.४५ | ३०.०५ | ३.८१ | उ.ना. | ५.००$ |
| ११ वी व १२ वीत शिकणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील विद्यार्थ्यांना (मुले) मोफत शिक्षण | १.८९ | १.३५ | १.९७ | १.४३ | १.९७@ | १.७१$ |
| आदिवासी विद्यार्थ्यांना विद्यावेतन | ०.०२ | ०.१० | ०.०२ | ०.०८ | उ.ना. | ०.१०$ |

*आधार* : प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन $ मंजूर अनुदान @ अपेक्षित उ.ना. उपलब्ध नाही

## मुलींचे शिक्षण

१०.१२ मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी शासनाकडून विविध योजना राबविण्यात येत आहेत. ग्रामीण भागातील मुलींना मोफत बस सेवा आणि इयत्ता आठवी ते बारावीमध्ये शिक्षण घेत असलेल्या व शाळेपासून पाच किमी अंतरावर राहणाऱ्या गरजू मुलींना निवडक १२५ तालुक्यांमध्ये महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रमांतर्गत सायकलींचे वाटप करण्यात येते. निवडक योजनांची प्रगती तक्ता १०.७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७ मुलींच्या शिक्षणासाठीच्या निवडक योजनांची प्रगती**

| योजना | २०१५-१६ | | २०१६-१७ | | २०१७-१८+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (₹कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (₹कोटी) |
| उपस्थिती भत्ता योजना | ४.११ | ९.०५ | ३.७३ | ८.२१ | उ.ना. | ४.०७$ |
| अहिल्याबाई होळकर योजना | १६.५० | ६१.३७ | १९.५४ | ६२.६० | १९.७४@ | ६३.२०@ |
| ११ वी आणि १२ वी मध्ये शिकणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण | २.७६ | २.०१ | २.७८ | २.०९ | उ.ना. | २.५१$ |
| कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय | ०.०४ | २२.०९ | ०.०४ | २०.५७ | ०.०४@ | ६.६४ |

$ मंजूर अनुदान @ अंदाजित उ.ना. उपलब्ध नाही + डिसेंबर पर्यंत

*आधार* : प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

## शालेय पोषण आहार

१०.१३ इयत्ता १ ली ते ८ वी तील विद्यार्थ्यांची पटनोंदणी, उपस्थिती वाढविणे व टिकविणे याबरोबरच त्यांना पोषक आहार पुरविणे याकरिता भारत सरकारने 'शालेय पोषण आहार योजना' सुरू केली, ज्यामध्ये विद्यार्थ्यांना तयार भोजन पुरविण्यात येते. शालेय पोषण आहार योजनेची प्रगती तक्ता १०.८ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.८ शालेय पोषण आहार योजनेची प्रगती**

| इयत्ता | उष्मांक पोषण मूल्य (उष्मांक) | प्रथिने पोषण मूल्य (ग्रॅ.) | २०१५-१६ | | २०१६-१७ | | २०१७-१८+ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) |
| १ ली ते ५ वी | ४५० | १२ | ६४ | ९१३ | ६६ | ६८० | ७१ | ४६३ |
| ६ वी ते ८ वी | ७०० | २० | ४१ | ६७५ | ४३ | ५२२ | ४७ | ३४५ |

*आधार* : प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबर पर्यंत

## महाराष्ट्र छात्र सेना

१०.१४ विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व, बंधुत्व, खिलाडूवृत्ती, राष्ट्रीय ऐक्य, समाजसेवा, इ. गुण रुजविणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. इयत्ता ८ वी व ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी ही योजना वैकल्पिक आहे. सन २०१५-१६ मध्ये सुमारे १०.६८ लाख विद्यार्थ्यांनी या योजनेमध्ये सहभाग घेतला असून ₹ ३.५८ कोटी खर्च झाला तर सन २०१६-१७ मध्ये ₹ ३.०७ कोटी खर्च झाला.

## शिक्षणाची वार्षिक स्थिती दर्शक अहवाल-२०१७ (*असर*)

१०.१५ 'प्रथम' या संस्थेमार्फत *असर*-२०१७ ही पाहणी संपूर्ण भारतातील २४ राज्यांमधील २८ जिल्ह्यांतील १,६४१ गावांतील २५,७२६ कुटुंबामधून घेण्यात आली. त्यामध्ये १४ ते १८ वर्षे किशोरवयीन वयोगटातील १४,५७४ मुले व १५,९४१ मुली यांचा समावेश होता. *असर*ने यावेळी प्रथमत: किशोरवयीन १४ ते १८ वर्षे या वयोगटावर लक्ष केंद्रित केले आहे. या पाहणीत नमुना निवड करुन प्रत्येक राज्यातुन एक किंवा दोन जिल्ह्यांपर्यंत मर्यादित ठेवण्यात आला असुन राज्यातील अहमदनगर व सातारा या केवळ दोन निवडलेल्या जिल्ह्यांतील १२० गावांतील १,९०० कुटुंबांमधून २,३२९ किशोरवयीनांकडून शैक्षणिक क्रियाशिलता, क्षमता, जागरुकता आणि महत्त्वाकांक्षा या चार प्रमुख घटकांबाबत *असर*-२०१७ मध्ये माहिती घेण्यात आली. या पाहणीचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

**अहमदनगर जिल्हा**

- एकूण १४-१८ वयोगटातील सुमारे ९०.७ टक्के किशोरवयीन औपचारिक शिक्षणात बारावीपर्यंत शिक्षण घेत आहेत, तर ५ टक्के पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेशित असून, ४.३ टक्के किशोरवयीनांनी कोठेही प्रवेश घेतलेला नाही
- औपचारिक शिक्षणात वयानुसार मुला-मुलींच्या पट नोंदणी मध्ये वाढता फरक दिसतो. १४-१६ वयोगटातील किशोरवयीन मुले आणि मुलींमध्ये पटनोंदणीमध्ये फारशी तफावत आढळून येत नाही. परंतु १८ वर्षे वयोगटातील ५.८ टक्के किशोरवयीन मुलांच्या तुलनेत ८.२ टक्के मुलीनी कोठेही प्रवेश घेतलेला नाही
- सुमारे ६.१ टक्के किशोरवयीनांनी व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेला असून यात शालेय, महाविद्यालयात पटनोंदणी केलेल्या तसेच कोठेही प्रवेशित नसलेल्या किशोरवयीन मुले व मुलींचा समावेश होतो
- इयत्ता दुसरी स्तराचा मजकूर वाचू शकणाऱ्या किशोरवयीनांची टक्केवारी ८६.० होती
- सोप्या अंकगणिताच्या उदाहरणांद्वारे भागाकार करू शकणाऱ्या मुलांची टक्केवारी ३४ होती तर वजाबाकी करु शकणाऱ्या मुलांची टक्केवारी २६.६ होती
- इंग्रजीत संपूर्ण वाक्य वाचू शकणाऱ्या मुलांची टक्केवारी ६७.१, इंग्रजी शब्द वाचू शकणाऱ्या मुलांची टक्केवारी १७ व तुटक इंग्रजी अक्षरे वाचू शकणाऱ्यांची टक्केवारी १६ होती

**सातारा जिल्हा**

- एकूण १४-१८ वयोगटातील सुमारे ८७.६ टक्के किशोरवयीन औपचारिक शिक्षणात बारावीपर्यंत शिक्षण घेत आहेत, तर ६.४ टक्के पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेशित असून, ६.० टक्के किशोरवयीनांनी कोठेही प्रवेश घेतलेला नाही
- औपचारिक शिक्षणात वयानुसार स्त्री व पुरुषांच्या पट नोंदणी मध्ये फरक वाढतो. १४-१६ वयोगटातील किशोरवयीन मुले आणि मुलींमध्ये पटनोंदणीमध्ये फारसा फरक आढळून येत नाही. परंतु १८ वर्षे वयोगटातील सात टक्के किशोरवयीन मुलांच्या तुलनेत १८.१ टक्के मुलीनी कोठेही प्रवेश घेतलेला नाही
- सुमारे ६.२ टक्के किशोरवयीनांनी काही व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेला असून यात शालेय, महाविद्यालयात पटनोंदणी केलेल्या तसेच कोठेही प्रवेशित नसलेल्या किशोरवयीन मुले व मुलींचा समावेश होतो
- इयत्ता दुसरी स्तराचा मजकूर वाचू शकणाऱ्या किशोरवयीनांची टक्केवारी ८७.६ होती
- सोप्या अंकगणिताच्या उदाहरणांद्वारे भागाकार करू शकणाऱ्या मुलांची टक्केवारी ३९.१ होती तर वजाबाकी करू शकणाऱ्या मुलांची टक्केवारी २५.१ होती
- इंग्रजीत संपूर्ण वाक्य वाचू शकणाऱ्या मुलांची टक्केवारी ७३.४, इंग्रजी शब्द वाचू शकणाऱ्या मुलांची टक्केवारी १३.८ व तुटक इंग्रजी अक्षरे वाचू शकणाऱ्यांची टक्केवारी १२.८ इतकी होती

## सैनिकी शाळा

१०.१६ राज्यातील ३३ जिल्ह्यांमध्ये प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तराच्या ४२ सैनिकी शाळा असून त्यापैकी चार शाळा फक्त मुलींसाठी, ३४ शाळा फक्त मुलांसाठी आणि चार सह शिक्षणासाठी आहेत. सन २०१७-१८ मध्ये या शाळांमधील एकूण पटसंख्या १८,९२४ आहे.

## क्रीडा शिक्षण

१०.१७ खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी व क्रीडापटूंचे नैपुण्य विकसित करण्यासाठी राज्य शासनाने पुणे येथे 'शिव छत्रपती क्रीडापीठाची' स्थापना केली आहे. या क्रीडापीठाकडून ८ ते १४ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांकरिता क्रीडा कौशल्य चाचण्या घेतल्या जातात आणि १७ विविध खेळांसाठी निवडलेल्या विद्यार्थ्यांना सुमारे ८ ते १० वर्षे आवश्यक प्रशिक्षण दिले जाते. या क्रीडापीठा अंतर्गत ११ क्रीडा प्रबोधिनी कार्यरत आहेत. आतापर्यंत क्रीडाप्रबोधिनीतील २५ विद्यार्थ्यांना राज्य शासनाचा 'शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार' प्राप्त झाला आहे तसेच आंतरराष्ट्रीय क्रीडास्पर्धांमध्ये ७३ क्रीडापटूंनी/ खेळाडूंनी देशाचे प्रतिनिधीत्व केले आहे. शासन दरमहा प्रति प्रशिक्षणार्थी सरासरी ₹ ९,००० खर्च करते. सन २०१७-१८ मध्ये ६२७ प्रशिक्षणार्थींची निवड करण्यात आली आहे. क्रीडा प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या पदकांचा तक्ता १०.९ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.९ क्रीडा प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांनी मिळविलेली पदके**

| वर्ष | एकूण प्रशिक्षणार्थी | आंतरराष्ट्रीय स्तरावरील पदके | | | | राष्ट्रीय स्तरावरील पदके | | | | राज्य स्तरावरील पदके | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सुवर्ण | रजत | कांस्य | एकूण | सुवर्ण | रजत | कांस्य | एकूण | सुवर्ण | रजत | कांस्य | एकूण |
| २०१४-१५ | ५६३ | २ | २ | ३ | ७ | ६६ | ६३ | ४६ | १७५ | १४८ | ११६ | ११६ | ३८० |
| २०१५-१६ | ५९३ | २ | ७ | ९ | १८ | ४९ | ३४ | ५४ | १३७ | २०० | १७३ | १४५ | ५१८ |
| २०१६-१७ | ६०७ | ११ | २ | ९ | २२ | २८ | २२ | ३१ | ८१ | १०० | ७६ | ७५ | २५१ |

*आधार* : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन

## प्रौढ साक्षरता

१०.१८ जनगणना-२०११ नुसार राज्यात १.६३ कोटी प्रौढ (१५ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त वय असणाऱ्या व्यक्ती) निरक्षर आहेत. ज्या जिल्ह्यांमध्ये स्त्री साक्षरता दर राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे किंवा ५० टक्के पेक्षा कमी आहे अशा जिल्ह्यांमध्ये प्रौढ साक्षरता वाढविण्यासाठी 'साक्षर भारत योजना' राबविण्यात येते. राज्यात ही योजना १० जिल्ह्यांतील ९३ तालुक्यातील ७,३१५ ग्रामपंचायतींमध्ये राबविण्यात येत असून एकूण १४.४ लाख निरक्षरांचे उद्दीष्ट आहे. या योजनेअंतर्गत प्रौढ निरक्षर व्यक्तीस व्यावहारीक साक्षरतेचे ज्ञान देण्यात येते ज्यामध्ये अक्षर व अंक ओळख तसेच मूलभूत साक्षरता ज्यामध्ये नवसाक्षर व्यक्तीस इयत्ता ३ री, ५ वी किंवा ८ वी च्या स्तरावरील मूलभूत साक्षरता चाचणी देता येते व प्रत्येक उत्तीर्ण व्यक्तीस त्या स्तरानुरूप औपचारिक शिक्षण प्रमाणपत्र दिले जाते. तसेच या योजनेअंतर्गत व्यावसायिक प्रशिक्षणाद्वारे कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण दिले जाते. एकूण ७,३१५ ग्रामपंचायतींमधील प्रौढ शिक्षण केंद्रात १४,६३० प्रेरक व १३८ समन्वयकांची नियुक्ती करण्यात आली आहे. ऑगस्ट, २०१७ पर्यंत १५.८९ लाख नवसाक्षरांना औपचारिक शिक्षण प्रमाणपत्र देण्यात आले आहे. प्रौढ साक्षरतेसाठी सामाजिक सहभागाद्वारे काही नाविन्यपूर्ण योजना जसे की, 'शिकवू आपल्या घरी शेजारी', 'साक्षर भारत महोत्सव' राबविण्यात आल्या.

## उच्च व तंत्र शिक्षण

१०.१९ सर्वांगिण आर्थिक विकासासाठी आवश्यक असणारे तांत्रिक व कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यास उच्च शिक्षण सहाय्य करते. उच्च शिक्षणात कृषि, पशुवैद्यक, वैद्यकीय, औषध निर्माणशास्त्र, अभियांत्रिकी, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण, इत्यादिंचा समावेश सर्वसाधारण उच्च शिक्षणासह होतो. मूलभूत शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाबरोबरच, उच्च शिक्षणातील संधींचादेखील विस्तार करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. राज्यात एकूण २२ राज्य विद्यापीठे असून त्यापैकी चार कृषि विद्यापीठे, एक आरोग्य विज्ञान विद्यापीठ, एक पशुवैद्यक विद्यापीठ, एक तंत्रज्ञान विद्यापीठ आणि १५ अन्य सर्वसाधारण विद्यापीठे (ज्यामध्ये केवळ महिलांसाठी असणारे श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ, मुंबई, अनौपचारिक शिक्षणासाठी असलेले यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक आणि संस्कृत भाषेचा अभ्यास, संशोधन, विकास व प्रसार करण्यासाठी कवी कुलगुरू कालिदास विद्यापीठ, नागपूर) यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, राज्यात २१ अभिमत विद्यापीठे, एक केंद्रीय विद्यापीठ, चार खाजगी विद्यापीठे व पाच *इन्स्टिटयूट ऑफ नॅशनल इंपोर्टन्स* आहेत. विद्याशाखानिहाय एकूण संस्था, त्यांची प्रवेशक्षमता व सन २०१७-१८ मध्ये प्रथम वर्षात प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या परिशिष्ट १०.२ ते १०.५ मध्ये दिली आहे. अखिल भारतीय उच्च शिक्षण पाहणीवर आधारित उच्च शिक्षणाची राज्याशी संबंधित सांख्यिकी तक्ता १०.१० मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१०    राज्यातील उच्च शिक्षणाची सांख्यिकी**

(३० सप्टेंबर रोजी)

| निर्देशक | | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|
| विद्यापीठांची संख्या | | ४५ | ४५ | ४९ |
| महाविद्यालयांची संख्या | | ४,६४६ | ४,५६९ | ४,२८६ |
| स्वायत्त संस्थांची संख्या | | २,७०० | २,५०१ | १,९५९ |
| उच्च शिक्षणातील पटसंख्या $ (लाखात) | एकूण | ३७.३६ | ३९.८७ | ४०.१६ |
| | स्त्रियांची टक्केवारी | ४३.३ | ४३.६ | ४४.२ |
| विद्यापीठातील व इतर संस्थांतील पटसंख्या | एकूण | ७.१५ | ८.८० | ९.४० |
| | स्त्रियांची टक्केवारी | ३७.५ | ४०.८ | ४०.२ |
| एकूण पटसंख्येचे प्रमाण | सर्व प्रवर्ग | २७.९ | २९.९ | ३०.२ |
| (१८ - २३ वर्ष ) | अजा | २५.६ | २९.६ | ३०.१ |
| | अज | १२.६ | १४.७ | १४.८ |
| स्त्री पुरुष असमानता निर्देशांक | सर्व प्रवर्ग | ०.८६ | ०.८६ | ०.८८ |
| (१८ -२३ वर्ष) | अजा | ०.८५ | ०.८५ | ०.८८ |
| | अज | ०.६० | ०.६३ | ०.६५ |
| शिक्षकांची संख्या (लाखात) | एकूण | १.६४ | १.६६ | १.५१ |
| विद्यार्थी शिक्षक प्रमाण | सर्व संस्था | २३ | २४ | २७ |

*आधार* : अखिल भारतीय उच्च शिक्षण पाहणी अहवाल    $ अंदाजित

## महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६

१०.२०    जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरणांच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी, राज्य शासनाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ संमत केला असून, राज्यात मार्च, २०१७ पासून लागू झालेला आहे. राज्यातील ११ सार्वजनिक विद्यापीठे आणि ५,००० पेक्षा जास्त महाविद्यालयांना हा कायदा लागू झालेला आहे. या कायद्याचे मुख्य लक्ष हे शैक्षणिक स्वायत्तता आणि उत्कृष्ट, कौशल्यावर आधारित शिक्षण तसेच, उच्च शिक्षणासाठी लोकशाही प्रक्रियेद्वारे प्रोत्साहन देणे हा आहे. उच्च शिक्षण व विकास याकरिता महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण आणि विकास आयोग हे प्रमुख असतील व ते नियोजन, देखरेख, समन्वय व मूल्यमापन याकरिता जबाबदार राहतील. माहिती तंत्रज्ञानाच्या शिक्षणाचे महत्त्व जाणून या कायद्यामध्ये माहिती तंत्रज्ञान मंडळाचा समावेश करण्यात आलेला आहे, ज्यामुळे तंत्रज्ञान, *सॉफ्टवेअर, हार्डवेअर* तसेच, शैक्षणिक, वित्तीय व प्रशासकीय कामात संपर्क साधनांचा सुयोग्य वापर करण्यासाठी एकछत्री संरचना निर्माण करणे व या प्रयोजनासाठी आवश्यक असलेला निधी उभारणे याकरिता माहिती तंत्रज्ञान मंडळ मदत करेल.

## राष्ट्रीय विधी विद्यापीठे

१०.२१    शासनाने गुणवत्तापूर्ण विधी शिक्षण देण्यासाठी राज्यात मुंबई, नागपूर आणि औरंगाबाद येथे राष्ट्रीय विधी विद्यापीठांची स्थापना केली आहे. तीन राष्ट्रीय विधी विद्यापीठे असणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य असून राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई हे वर्ष २०१५ मध्ये स्थापन करण्यात आले. वर्ष २०१६ मध्ये नागपूर येथे व वर्ष २०१७ मध्ये औरंगाबाद येथे राष्ट्रीय विधी विद्यापीठे स्थापन करण्यात आली आहेत.

## स्वयं-वित्त सहाय्यीत विद्यापीठ

१०.२२    उच्च दर्जाचे शिक्षण प्रदान करणे, संशोधन आणि नवीन उपक्रमांसाठी सकारात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी शासनाने राज्यात स्वयं-वित्त सहाय्यित विद्यापीठे स्थापन करण्याचे ठरविले होते. आतापर्यंत ११ स्वयं-वित्त सहाय्यित विद्यापीठांची स्थापना झाली आहे. राज्यात *ॲमिटी, सिम्बॉयसिस*, डॉ.डी.वाय.पाटील, इत्यादी सारख्या अनेक प्रसिद्ध शैक्षणिक संस्थांनी शैक्षणिक संकुले स्थापन केली आहेत. खाजगी क्षेत्राचा सक्रिय सहभाग व गुंतवणुकीद्वारे उच्च शिक्षण क्षेत्रातील संधी सुधारण्यासाठी या उपक्रमास मोठ्या प्रमाणात मदत होईल.

## निवडप्रधान श्रेयांकन पद्धती

१०.२३ निवडप्रधान श्रेयांकन पद्धती या संकल्पनेत नियमित अभ्यासक्रम शिकत असतानाच विद्यार्थ्यांना विहित अभ्यासक्रमांतून मुख्य विषय, वैकल्पिक अभ्यासक्रम, कौशल्य विकास (*सॉफ्ट स्किल*) अभ्यासक्रम, यासारखे वर्गीकृत केलेले अभ्यासक्रम निवडण्याची संधी मिळते. यामुळे विद्यार्थ्यांना विविध शाखांमधील ज्ञान प्राप्त करुन घेण्यासाठी मदत होते. विद्यार्थी आपल्या पसंतीच्या अभ्यासक्रमांची निवड करू शकतात आणि रोजगारक्षमता वाढविण्यासाठी आवश्यक ते कौशल्य प्राप्त करुन घेऊ शकतात. राज्यातील जवळजवळ सर्व सार्वजनिक विद्यापीठे आणि संबंधित संलग्न महाविद्यालयांमध्ये पदवीपूर्व स्तरावर निवडप्रधान श्रेयांकन पद्धतीची अंमलबजावणी करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे व पदव्युत्तर स्तरावर याची अंमलबजावणी करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

## राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान

१०.२४ राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान ही केंद्र पुरस्कृत योजना सन २०१३ मध्ये राज्यातील पात्र उच्च शिक्षण संस्थांना धोरणात्मक निधी पुरविण्याच्या उद्देशाने सुरु करण्यात आली आहे. सदर योजना प्रमाण मानके व फलनिष्पत्तीवर अवलंबून आहे. संधी उपलब्धता, समानता आणि उच्चतम गुणवत्ता धारण करण्यासाठी उच्च शिक्षणात अधिक कार्यक्षमता, पारदर्शकता आणि जबाबदारी व प्रतिसाद हा या योजनेचा उद्देश आहे. उच्च शिक्षणामध्ये एकूण पटसंख्या प्रमाण कमी असणाऱ्या राज्यातील सात शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या जिल्ह्यांमध्ये, नवीन आदर्श पदवी महाविद्यालये स्थापन करण्यात आली असून सन २०१७-१८ पर्यंत एकूण ₹ १४३.५० कोटी निधी वितरीत करण्यात आला. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाची काही ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

- राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियानासाठी नवीन संशोधन आणि तंत्रज्ञान हस्तांतरण केंद्रे स्थापन करण्याकरिता 'संशोधन, नाविन्यपूर्ण शोध आणि गुणवत्ता वाढ' अंतर्गत ₹ २० कोटी अनुदान मिळालेले महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे
- व्याप्तीवाढ/तंत्रज्ञान हस्तांतरण/व्यावसायिकरण यासाठी १५ निवडक वैयक्तीक संशोधन प्रकल्प निवडण्यात आले असून त्यांना ₹ ४.१० कोटी निधी दिला आहे
- सहा विद्यापीठांमध्ये तंत्रज्ञान विकास व तंत्रज्ञान हस्तांतरणाची सहा केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत

## शैक्षणिक संस्थांची स्थापना

१०.२५ तांत्रिक शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी, भारत सरकारच्या सहाय्याने महाराष्ट्र शासनाने पुणे आणि नागपूर येथे दोन नवीन भारतीय सूचना प्राद्योगिकी संस्था (IIIT) स्थापन केल्या आहेत. या भारतीय सूचना प्राद्योगिकी संस्था माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील नवप्रवर्तन आणि उद्योजकतेची भावना जागृत करणारे ज्ञान व अनुभव देशातील तसेच राज्यातील युवावर्गामध्ये प्रदान करीत आहे. भारतीय प्रबंध संस्था (IIM), नागपूर ही स्वायत्त संस्था मानव संसाधन विकास मंत्रालयाअंतर्गत भारत सरकारतर्फे शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये कार्यरत झाली आहे.

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना

१०.२६ राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील विविध विद्यापीठे आणि महाविद्यालयांतील सुमारे ६०५ व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम समाविष्ट करण्यात आले आहेत. सन २०१६ मध्ये अर्जदाराच्या कुटुंबांची वार्षिक उत्पन्नाची मर्यादा ₹ एक लाखांवरून ₹ सहा लाखांपर्यंत वाढविण्यात आली आहे. सन २०१६-१७ मध्ये १.५४ लाख विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला व त्यासाठी ₹ ४७१.३९ कोटी खर्च झाले. सन २०१७-१८ मध्ये अंदाजीत १.६५ लाख विद्यार्थ्यांना लाभ देण्यात येईल व त्यासाठी ₹ ५१० कोटींची तरतूद केलेली आहे.

# सार्वजनिक आरोग्य

१०.२७ महाराष्ट्र राज्य आरोग्य सेवा विकसित करण्यामध्ये देशातील अग्रेसर राज्य आहे. सार्वजनिक, खाजगी तसेच स्वयंसेवी क्षेत्रांकडून प्राथमिक ते आधुनिक वैद्यकीय सेवा पुरविल्या जातात. विश्वासार्ह, जबाबदार, समाधानकारक, गुणात्मक, प्रतिबंधात्मक व रोगनिवारक आरोग्यसेवा जनतेला पुरविणे हा सार्वजनिक आरोग्य सेवेचा उद्देश असून माता व बालकांच्या आरोग्यात सुधारणा करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. याशिवाय स्थानिक गरजा विचारात घेऊन विशेषत: आदिवासी व ग्रामीण भागातील जनतेसाठी सार्वजनिक आरोग्य सुविधा पुरविल्या जातात. 'सर्व वयोगटातील लोकांचे कल्याण व निरोगी जीवनाची हमी' हे शाश्वत विकासातील एक महत्वाचे उद्दिष्ट आहे. निवडक राज्यांचे आरोग्य निर्देशक तक्ता १०.११ मध्ये दिले आहेत.

**तक्ता १०.११ निवडक राज्यांचे आरोग्य निर्देशक**

| निर्देशक | भारत | आंध्र प्रदेश | गुजरात | कर्नाटक | केरळ | मध्यप्रदेश | महाराष्ट्र | राजस्थान | उत्तरप्रदेश |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्थूल जन्म दर$ (२०१६) | **२०.४** | १६.४ | २०.१ | १७.६ | १४.३ | २५.१ | **१५.९** | २४.३ | २६.२ |
| स्थूल मृत्यू दर$ (२०१६) | **६.४** | ६.८ | ६.१ | ६.७ | ७.६ | ७.१ | **५.९** | ६.१ | ६.९ |
| जन्माच्या वेळेची आयुर्मर्यादा (वर्ष) (२०११-१५) | | | | | | | | | |
| एकूण | **६८.३** | ६९.० | ६९.१ | ६९.० | ७५.२ | ६४.८ | **७२.०** | ६७.९ | ६४.५ |
| पुरुष | **६६.९** | ६७.१ | ६६.९ | ६७.२ | ७२.२ | ६३.२ | **७०.३** | ६५.७ | ६३.४ |
| स्त्री | **७०.०** | ७१.२ | ७१.६ | ७०.९ | ७८.२ | ६६.५ | **७३.९** | ७०.४ | ६५.६ |

*आधार*: नमुना नोंदणी पद्धती, भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय

$ दर हजार लोकसंख्येमागे

१०.२८ सर्वसमावेशक आरोग्यसेवा पुरविण्यासाठी राज्य शासनाने त्रिस्तरीय पायाभूत सुविधा निर्माण केल्या आहेत. उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे व सामूहिक आरोग्य केंद्रे यांचा प्राथमिक स्तरावर समावेश होतो. द्वितीय स्तरावर उपजिल्हा रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालये यांचा समावेश होतो तर तृतीय स्तरावर प्रमुख शहरांमधील सुसज्ज वैद्यकीय महाविद्यालये व सुपर स्पेशालिटी रुग्णालयांचा समावेश होतो. राज्य शासनाच्या आरोग्य सुविधा तक्ता १०.१२ मध्ये तर त्यांची तपशीलवार मालिका परिशिष्ट १०.६ मध्ये दिली आहे.

१०.२९ उपकेंद्र हे सर्वात निम्नस्तरावरील सार्वजनिक आरोग्याच्या पायाभूत सुविधा पुरविणारे केंद्र असून त्यामध्ये माता व बालसंगोपन, किरकोळ आजारांवर औषधोपचार, संदर्भ आणि आरोग्य शिक्षण सेवा पुरविल्या जातात. शासन निकषानुसार आदिवासी क्षेत्रासाठी ३,००० लोकसंख्येस व बिगर आदिवासी क्षेत्रासाठी ५,००० लोकसंख्येस एक उपकेंद्र स्थापन केले जाते. तसेच २०,००० लोकसंख्या असलेल्या आदिवासी क्षेत्रासाठी आणि ३०,००० लोकसंख्या असलेल्या बिगर आदिवासी क्षेत्रासाठी एक प्राथमिक आरोग्य केंद्र व ८०,००० ते १.२ लाख लोकसंख्येचा अंतर्भाव असलेल्या चार ते पाच प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी संदर्भ सेवा केंद्र म्हणून एक सामूहिक आरोग्य केंद्र स्थापन केले जाते. सध्या राज्यात आदिवासी क्षेत्रात २,०५७ उपकेंद्रे, ३१५ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ६७ सामूहिक आरोग्य केंद्रे कार्यरत आहेत. निवडक राज्यांमध्ये कार्यरत उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे व सामूहिक आरोग्य केंद्रे तक्ता १०.१३ मध्ये दिली आहेत.

**तक्ता १०.१२ राज्य शासनाच्या आरोग्य सुविधा**

(३१ डिसेंबर, २०१७ रोजी)

| संस्थेचा प्रकार | संख्या |
|---|---|
| उपकेंद्रे | १०,५८० |
| प्राथमिक आरोग्य केंद्रे | १,८१४ |
| ग्रामीण रुग्णालये (सामुहिक आरोग्य केंद्रे) | ३६० |
| प्राथमिक आरोग्य पथके | १९३ |
| फिरती आरोग्य पथके | ४० |
| उपजिल्हा रुग्णालये | |
| अ) ५० खाटा | ५८ |
| ब) १०० खाटा | २८ |
| जिल्हा रुग्णालये | २३ |
| वैद्यकीय महाविद्यालयांना संलग्न रुग्णालये | १६ |
| सामान्य रुग्णालये (मालेगाव, खामगाव व उल्हासनगर प्रत्येकी २०० खाटा, मालाड-मालवणी ६० खाटा ) | ४ |
| स्त्री रुग्णालये | १३ |
| मनोरुग्णालये | ४ |
| कुष्ठरोग रुग्णालये | ४ |
| क्षयरोग रुग्णालये | ४ |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन

**तक्ता १०.१३ निवडक राज्यांमधील कार्यरत उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे व सामूहिक आरोग्य केंद्रे**

(३१ मार्च,२०१७ रोजी)

| राज्य | उपकेंद्रे | प्राथमिक आरोग्य केंद्रे | सामूहिक आरोग्य केंद्रे |
|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश | ७,४५८ | १,१४७ | १९३ |
| गुजरात | ९,०८२ | १,३९२ | ३६३ |
| कर्नाटक | ९,३८१ | २,३५९ | २०६ |
| केरळ | ५,३८० | ८४९ | २३२ |
| मध्यप्रदेश | ९,१९२ | १,१७१ | ३०९ |
| **महाराष्ट्र** | **१०,५८०** | **१,८१४** | **३६०** |
| राजस्थान | १४,४०६ | २,०७९ | ५७९ |
| तेलंगणा | ४,७९७ | ६८९ | ११४ |
| उत्तरप्रदेश | २०,५२१ | ३,६२१ | ८२२ |
| **भारत** | **१,५६,२३१** | **२५,६५०** | **५,६२४** |

*आधार*: राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, भारत सरकार

१०.३० वैद्यकीय व्यावसायिक निर्माण करण्यासाठी आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी, सिद्ध व होमिओपॅथी (आयुष) अशा अनेक वैद्यकीय व रुग्णसेवेशी संलग्न संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. पदवी प्राप्त केल्यानंतर ॲलोपॅथी वैद्यकीय व्यावसायिकांना (डॉक्टर) महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई यांचेकडे नोंदणी व दर पाच वर्षांनी परवाना नूतनीकरण करावे लागते. जानेवारी २०१८ पर्यंत एकूण १,४०,६१० (त्यापैकी ६२,८९१ पदव्युत्तर) ॲलोपॅथी डॉक्टरांनी नोंदणी केली असून ८६,६७८ डॉक्टरांनी परवाना नूतनीकरण केले आहे. राज्यातील नोंदणीकृत ॲलोपॅथी डॉक्टरांच्या आकडेवारीवर आधारित डॉक्टरांचे लोकसंख्येशी गुणोत्तर अंदाजे १:१,३६५ आहे.

## राष्ट्रीय आरोग्य अभियान

१०.३१ राष्ट्रीय आरोग्य अभियान हे जनतेला किफायतशीर, विश्वासार्ह आणि दर्जेदार सर्वसमावेशक आरोग्यसेवा उपलब्ध करुन देण्यासाठी सन २०१३ मध्ये सुरु करण्यात आले आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान हा एक फ्लॅगशिप कार्यक्रम असून त्या अंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य व राष्ट्रीय नागरी आरोग्य या दोन अभियानांचा समावेश आहे. ग्रामीण व नागरी आरोग्य सुविधांचे बळकटीकरण, प्रजनन, माता, नवजात शिशु, बालके व पौगंडावस्थेतील मुलामुलींचे आरोग्य, संसर्गजन्य व असंसर्गजन्य रोगांचे नियंत्रण हे या कार्यक्रमाचे प्रमुख घटक आहेत. *व्हिजन*-२०३० अंतर्गत खालील लक्ष्य निर्धारित केले आहेत.

- अर्भक मृत्यूदर १० पर्यंत कमी करणे
- माता मृत्यू प्रमाण १९ पर्यंत कमी करणे
- पाच वर्षाखालील बालकांचा मृत्यूदर १५ पेक्षा कमी करणे
- क्षयरोग प्रादुर्भाव दर (दर हजारी लोकसंख्येमागे) ०.३३ पर्यंत कमी करणे
- प्रति लाख लोकसंख्येमागे खाटांची संख्या १५० पर्यंत वाढविणे
- डॉक्टरांचे लोकसंख्येशी गुणोत्तर १ : १,००० पर्यंत कमी करणे

## राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान

१०.३१.१ ग्रामीण जनतेस विशेषत: अतिदुर्गम भागातील गरीब कुटुंबांना किफायतशीर व दर्जेदार आरोग्यसेवा सहजपणे उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान एप्रिल २००५ मध्ये सुरु करण्यात आले. प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम-दुसरा टप्पा, हिवताप, अंधत्व, आयोडिन कमतरता, हत्तीरोग, क्षयरोग, कुष्ठरोग व इतर आजार तपासणी इत्यादी आरोग्य व कुटुंब कल्याण कार्यक्रम राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यात येत आहेत. स्वच्छता व आरोग्यनिगा, पोषण आणि सुरक्षित पेयजल यासारख्या आरोग्याशी निगडीत सेवांच्या प्रभावी एकत्रिकरणावर राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान भर देत आहे.

१०.३१.१.१ राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियाना अंतर्गत राज्यातील दुर्गम व अतिदुर्गम भागातील जनतेसाठी ४० फिरत्या वैद्यकीय पथकांद्वारे आरोग्यविषयक सुविधा पुरविण्यात येतात. या वैद्यकीय पथकात प्रत्येकी एक वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, रेडीओलॉजिस्ट, लॅब अटेंडन्ट, फार्मासिस्ट , मदतनीस व चालक यांचा समावेश असतो. टेलिमेडीसीन सुविधा २३ जिल्हा रुग्णालये, ३९ उपजिल्हा/ ग्रामीण रुग्णालये व सहा वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये उपलब्ध आहे. या कार्यक्रमांतर्गत विशेषज्ञांसह ३,२६२ वैद्यकीय

अधिकारी ४३,९४३ खेडेगावात आरोग्य सुविधा पुरवित असून सुमारे १४५ लाख लोक या योजनेचे लाभार्थी आहेत. या योजने अंतर्गत राज्यात डिसेंबर, २०१७ पर्यंत ६०,५०० आशा स्वयंसेविकांची नियुक्ती केली आहे. राज्यातील सिकल सेल रोगाने प्रभावित २१ जिल्हयांमध्ये सिकल सेल रोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

१०.३१.१.२ राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत सन २०१६-१७ मध्ये केंद्र शासनाने राज्यासाठी ₹ १,८२८.४६ कोटी रक्कमेचा प्रकल्प अंमलबजावणी आराखडा मंजूर केला असून ₹ १,०६८.३३ कोटी खर्च झाला. सन २०१७-१८ मध्ये ₹ २,२२७.५२ कोटी रक्कमेचा प्रकल्प अंमलबजावणी आराखडा मंजूर केला असून डिसेंबर पर्यंत ₹ ७५५.२२ कोटी खर्च झाला. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत भौतिक प्रगती तक्ता १०.१४ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१४ राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत भौतिक प्रगती**

(संख्या)

| घटक | बाब | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८+ |
|---|---|---|---|---|
| आयुष | बाह्यरुग्ण | ७५,९७,६६० | ५४,०६,७१५ | ३२,५४,२८३ |
| | आंतररुग्ण | १,१५,२९३ | १,०३,२८० | ५९,५५४ |
| फिरते वैद्यकीय पथक | बाह्यरुग्ण | ११,८३,५९८ | १३,०४,१८९ | ११,१७,०३७ |
| | प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम (प्रसुतीपूर्व व प्रसुतीपश्चात आरोग्य निगा) | १,३५,६७६ | १,५१,७५१ | १,३२,०३३ |
| | प्रयोगशाळा तपासणी | ६,३१,९९४ | ६,८९,७९० | ५,७२,९७८ |
| | भेटी दिलेली गावे | २०,४६० | २०,९०० | १६,४६५ |
| संदर्भ सेवा सुविधा (वाहतूक) | गर्भवती महिला | | | |
| | रुग्णालयीन प्रसुती | ५,८९,४३० | ५,४९,८२३ | ४,१६,२०१ |
| | निवासस्थान ते रुग्णालय | ४,४२,२८३ | ४,११,९७९ | ३,४५,५०९ |
| | रुग्णालय ते रुग्णालय | १,४१,२३२ | १,३९,९६८ | १,३७,९५५ |
| | रुग्णालय ते निवासस्थान | ५,६४,१०४ | ५,०९,२०८ | ३,९३,०६३ |
| | आजारी बालके | | | |
| | आजारी बालके | ७३,७६८ | ७७,०८९ | ६०,७५७ |
| | निवासस्थान ते रुग्णालय | ३७,७६० | ३८,८४५ | ३४,४५५ |
| | रुग्णालय ते रुग्णालय | १७,३६६ | १८,३३९ | १६,७६६ |
| | रुग्णालय ते निवासस्थान | ६०,०५२ | ५४,११२ | ४६,३५४ |
| टेलिमेडीसीन | संदर्भित केलेले व तज्ञ सल्ला मिळालेले रुग्ण | ३१,९८० | २९,८८३ | २१,८०१ |
| सिकल सेल आजार नियंत्रण कार्यक्रम | एकूण तपासणी | ३७,१५,०७० | १३,६३,०३५ | १३,६३,०३५ |
| | रुग्ण | १,९१६ | ९४७ | ८१६ |
| | वाहक | २५,६९५ | ११,४५० | १०,३९९ |
| सार्वजनिक खाजगी भागिदारी | | | | |
| अ) आरोग्य सल्ला संपर्क केंद्र | एकूण कॉल्स | ८,३०,३१६ | ६,६९,५२० | ३,४७,७३० |
| ब) अपस्मार (इपिलेप्सी ) कार्यक्रम | आयोजित शिबिरे | ९ | १० | ५ |
| | रुग्ण संख्या | ३,२८८ | ३,२७२ | १,७८५ |
| | शिबिरे (ई. ई. जी. सुविधा असलेली ) | ४२५ | ४५० | १८५ |
| | ऑक्युपेशन थेरपी/ फिजीओथेरपी / स्पिच थेरपी घेतलेले | ९६८ | १,२४० | २४३ |
| क) वैद्यकीय व दंत शिबीरे | आयोजित शिबिरे | ४९ | ५० | ४ |
| | उपचार केलेले रुग्ण | ८२,४६४ | ८३,२२४ | १०,१४७ |
| | शस्त्रक्रियांची संख्या | ४,७६२ | ६,४६७ | ६७७ |
| ड) उपशमन निगा (पॅलिॲटिव्ह केअर) | रुग्ण संख्या | ९९८ | ८७२ | ५३३ |
| इ) माहेरघर | लाभार्थी माता | १,८७९ | १,९०० | २,४३५ |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन ई.ई.जी. - इलेक्ट्रो इन्सेफेलो ग्राम + डिसेंबर पर्यंत

## प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम - दुसरा टप्पा

१०.३१.२ प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम - दुसरा टप्पा हा कार्यक्रम बालकांच्या आरोग्याचा दर्जा उंचावून व लोकसंख्या स्थिर ठेवून त्याद्वारे माता मृत्यू प्रमाण, अर्भक मृत्यूदर व एकूण जननदर कमी करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाअंतर्गत सन २०१५-१६ मध्ये ₹ ४५३.२० कोटी , सन २०१६-१७ मध्ये ₹ ४५९.०१ कोटी तर सन २०१७-१८ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ २०७.८६ कोटी खर्च झाला आहे. आरोग्यविषयक निवडक निर्देशकांचा कल तक्ता १०.१५ मध्ये व त्यांची मालिका परिशिष्ट १०.७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१५ आरोग्य विषयक निवडक निर्देशकांचा कल**

| निर्देशक | २००५ | २०१० | २०१५ | २०१६ |
|---|---|---|---|---|
| अर्भक मृत्यूदर # | ३६ | २८ | २१ | १९ |
| नवजात अर्भक मृत्यूदर # | २५ | २२ | १५ | १३ |
| पाच वर्षा खालील बालकांचा मृत्यूदर # | ९ | ३३ | २४ | २१ |
| एकूण जननदर | २.२ | १.९ | १.८ | १.८ |
| माता मृत्यूप्रमाण @ | (२००४-०६) | (२००७-०९) | (२०१०-१२) | (२०११-१३) |
| | १३० | १०४ | ८७ | ६८ |

*आधार*: नमुना नोंदणी पद्धती, भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय # दर हजार जिवित जन्मामागे @ दर लाख जिवित जन्मामागे

## नवसंजीवनी योजना

१०.३१.२.१ आदिवासी भागातील माता मृत्यूप्रमाण व अर्भक मृत्यूदर कमी व्हावेत या उद्देशाने १६ जिल्ह्यांतील ८,४१९ गावांमध्ये नवसंजीवनी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत १७३ फिरती वैद्यकीय पथके तयार करण्यात आली असून त्यामध्ये एका वैद्यकीय अधिकाऱ्यासह प्रशिक्षित रुग्णसेवक व वाहन यांचा समावेश आहे. हे पथक प्रत्येक गावाला व वस्तीला भेट देऊन कुपोषित व आजारी बालके यांना घरपोच आरोग्य सेवा पुरवतात व आवश्यकता भासल्यास जवळच्या आरोग्य केंद्रात भरती करतात. नवसंजीवनी योजने अंतर्गत मातृत्व अनुदान योजना, दाई सभा, मान्सून पूर्व उपक्रम,अन्न व बुडीत मजूरी पुरविणे इत्यादी योजना राबविल्या जातात.

## मातृत्व अनुदान योजना

१०.३१.२.१.१ मातृत्व अनुदान योजना, नवीसंजीवनी योजने अंतर्गत राबविण्यात येत असून आदिवासी भागातील गर्भवती महिलेला प्रसुतीपूर्व नोंदणी, नियमित आरोग्य तपासणी व आवश्यक ती औषधे इत्यादी आरोग्य सेवा पुरविल्या जातात. या योजने अंतर्गत प्रसुतीपूर्व तपासणीकरीता वैद्यकीय केंद्रात जाण्यासाठी ₹ ४०० रोख देण्यात येतात व ₹ ४०० ची औषधे पुरविण्यात येतात. मातृत्व अनुदान योजनेची प्रगती तक्ता १०.१६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१६ मातृत्व अनुदान योजनेची प्रगती**

| वर्ष | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी |
|---|---|---|
| २०१५-१६ | ३.०२ | ७७,७९७ |
| २०१६-१७ | ४.३४ | ७४,५६४ |
| २०१७-१८+ | १.२१ | २०,९४२ |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबर पर्यंत

## जननी सुरक्षा योजना

१०.३१.२.२ ग्रामीण व नागरी भागात आरोग्य संस्थांमधील प्रसुतीला प्रोत्साहन देऊन दारिद्र्य रेषेखालील, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या कुटुंबातील माता व बालमृत्यूचे प्रमाण कमी करणे हा जननी सुरक्षा योजनेचा मुख्य उद्देश आहे. सर्व प्रसुती कुशल प्रसुती सेवकांमार्फत करण्याची खात्री करुन त्याद्वारे माता मृत्यु प्रमाण कमी करणे हे या योजनेचे ध्येय आहे.आरोग्य संस्थांमध्ये प्रसुती झाल्यानंतर सात दिवसांच्या आत नागरी भागात प्रति लाभार्थी ₹ ६०० व ग्रामीण भागात प्रति लाभार्थी ₹ ७०० लाभार्थ्याला दिले जातात, तर कुशल दाईच्या मदतीने घरी प्रसूत होणाऱ्या ग्रामीण व नागरी भागातील लाभार्थ्यास ₹ ५०० दिले जातात. सिझेरियन शस्त्रक्रियेद्वारे प्रसूती झालेल्या लाभार्थ्यास झालेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीपोटी ₹ १,५०० दिले जातात. जननी सुरक्षा योजनेची प्रगती तक्ता १०.१७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१७ जननी सुरक्षा योजनेची प्रगती**

| वर्ष | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाख) |
|---|---|---|
| २०१५-१६ | ४६.९६ | ३.३९ |
| २०१६-१७ | ४१.७७ | २.८१ |
| २०१७-१८+ | ३०.३० | १.५६ |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम

१०.३१.३ क्षयरोग, घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात, पोलिओ, काविळ-ब, गोवर इत्यादी लसीकरणाद्वारे प्रतिबंध करता येण्याजोग्या आजारांमुळे गर्भवती स्त्रिया, अर्भके व विविध वयोगटातील बालके यांच्या मृत्यूचे, रोगग्रस्ततेचे व अपंगत्वाचे प्रमाण कमी करण्यासाठी उच्च दर्जाच्या लसीकरण सेवा पुरविण्याच्या उद्देशाने सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमावर सन २०१५-१६ मध्ये ₹ ४१.६८ कोटी, सन २०१६-१७ मध्ये ₹ ३८ कोटी व सन २०१७-१८ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ २७.८८ कोटी खर्च झाला. सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.१८ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१८ सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमाची प्रगती**

(संख्या लाखात)

| लस | २०१५-१६ | | २०१६-१७ | | २०१७-१८⁺ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य |
| बीसीजी | २०.८७ | २०.२१ | १९.६७ | १९.३६ | १९.९१ | १५.७६ |
| घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात (डीपीटी) -III | २०.८७ | १६.६९ | १९.६७ | ०.२९ | ला.ना. | ला.ना. |
| पोलिओ III | २०.८७ | १८.८७ | १९.६७ | १९.०३ | १९.९१ | १३.७० |
| काविळ ब III | २०.८७ | १६.५७ | १९.६७ | ०.१९ | ला.ना. | ला.ना. |
| काविळ ब - 0 | २०.८७ | ९.८७ | ८.५४ | ८.४० | ६.८६ | ६.२८ |
| गोवर | २०.८७ | १९.०५ | १९.६७ | १९.११ | १९.९१ | १३.८३ |
| घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात (डीपीटी) - बुस्टर | २०.४६ | १८.४८ | १९.३३ | १८.१६ | १९.४९ | १२.४६ |
| पोलिओ (बुस्टर) | २०.४६ | १८.४७ | १९.३३ | १८.१७ | १९.४९ | १२.८३ |
| डीटी (५ वर्ष) | २०.४६ | १६.६९ | १९.३३ | १७.०२ | १९.४९ | ७.५९ |
| धनुर्वात (१० वर्ष) | २०.६७ | १८.०४ | २५.२४ | १८.५७ | २५.६६ | १२.५९ |
| धनुर्वात (१६ वर्ष) | २२.०३ | १८.७० | २२.९१ | १८.९६ | २३.२१ | १३.११ |
| धनुर्वात (गरोदर माता) | २२.१६ | १७.३७ | २१.६४ | १८.२७ | २१.९० | १४.३२ |
| पेंटावॅलेन्ट ३ | ३.४८ | २.७८ | १९.६७ | १९.०२ | १९.९१ | १३.७३ |

*आधार :* राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन ला.ना. लागू नाही + डिसेंबरपर्यंत

## पल्स पोलिओ कार्यक्रम

१०.३१.४ पाच वर्षाखालील मुलांना पूर्वी कितीही वेळा पोलिओ डोस दिला असला तरी देशभरात राष्ट्रीय लसीकरणाच्या दिवशी पोलिओ मात्रा देण्यात येते. राज्याने पोलिओ विषाणूचा प्रसार नियंत्रणात ठेवण्यासाठी उत्तम प्रगती केली असून २०१०-११ नंतर पोलिओचा एकही रुग्ण आढळला नाही. पल्स पोलिओ कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.१९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१९ पल्स पोलिओ कार्यक्रमाची प्रगती**

| वर्ष | लसीकरण केलेल्या मुलांची संख्या (लाख) | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|
| २०१५-१६ | १२०.७८ | ५.३७ |
| २०१६-१७ | १२१.२७ | १८.१३ |
| २०१७-१८⁺ | १२१.२० | १.७८ |

*आधार :* राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम

१०.३१.५ बालकांची आरोग्य तपासणी व आवश्यकतेनुसार वेळीच वैद्यकीय उपचार तसेच संदर्भ सेवा पुरविणे यासाठी राज्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.२० मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२० राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाची प्रगती**

(संख्या)

| वर्ष | शाळा/ अंगणवाडी | विद्यार्थी (लाख) | | | मोठ्या शस्त्रक्रिया | हृदय शस्त्रक्रिया |
|---|---|---|---|---|---|---|
| | | तपासलेले | उपचार केलेले | संदर्भित केलेले | | |
| २०१५-१६ | ८४,४१९ | १२३.८४ | १३.७७ | ०.९० | १४,६७१ | १,९८७ |
| | १,०४,४७९# | ६४.४८ | ६.१८ | ०.४० | | |
| | १,०२,६२३## | ६५.९९ | ५.८५ | ०.४४ | | |
| २०१६-१७ | ८४,८२८ | १२३.८३ | ११.५३ | ०.९२ | १३,१८८ | १,९५२ |
| | १,०३,१५८# | ६४.९२ | ५.०९ | ०.३७ | | |
| | १,०४,४३५## | ६५.५८ | ५.३२ | ०.४० | | |
| २०१७-१८+ | ८४,४७७ | ९२.८४ | ८.४४ | ०.९७ | ९,६३२ | १,३६६ |
| | १,०३,३४४# | ६२.२० | ४.६३ | ०.३७ | | |
| | १,०३,३८७## | २६.२६ | २.२० | ०.२६ | | |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन # अंगणवाडी सत्र १ ## अंगणवाडी सत्र २ + डिसेंबरपर्यंत

## राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम

१०.३१.६ किटकजन्य रोगांचा प्रतिबंध, रोगनिदान, उपचार व नियंत्रणासाठी राज्यात राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. रोगनिहाय नोंदणी झालेले रुग्ण व मृत्यू तक्ता १०.२१ मध्ये दिले आहे.

**तक्ता १०.२१ किटकजन्य रोगनिहाय नोंदणी झालेले रुग्ण व मृत्यू**

(संख्या)

| किटकजन्य रोग | २०१५-१६ | | २०१६-१७ | | २०१७-१८+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | रुग्ण | झालेले मृत्यू | रुग्ण | झालेले मृत्यू | रुग्ण | झालेले मृत्यू |
| हिवताप | ५३,७४७ | ५७ | २१,८५९ | २७ | १५,०७६ | १४ |
| स्वाईन फ्लू | ८,५८३ | ९०५ | ८२ | २६ | ६,१४४ | ७७८ |
| हत्तीरोग | २,३३६ | ० | २,१४० | ० | १,०७३ | ० |
| डेंग्यू | ५,२९४ | ३२ | ६,५८३ | ३३ | ७,६४८ | ५० |
| मेंदूज्वर | ७ | ० | १२ | १ | २८ | ० |
| चिकुनगुनिया | ३०९ | ० | २,९१२ | ० | १,३६३ | ० |
| एईएस/चंडीपुरा | १ | १ | २० | ४ | १ | १ |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन एईएस : अ‍ॅक्यूट एन्सेफॅलिटीस सिंड्रोम + डिसेंबरपर्यंत

## आयुर्वेद, योगा, निर्सगोपचार, युनानी, सिध्द आणि होमियोपॅथी

१०.३१.७ आयुषद्वारे पुरविल्या जाणा-या आरोग्य सुविधा प्रामुख्याने प्राथमिक आरोग्यावर लक्ष केंद्रित करतात. खाजगी तसेच ना-नफा क्षेत्रात आंतर रुग्णांसाठी व पंचकर्म सारख्या विशेष उपचारांसाठी अनेक चिकित्सालये, दवाखाने, रुग्णालये आणि शुश्रृषागृहे आहेत. राज्यात ६५ आयुर्वेदिक रुग्णालये, ४६६ आयुर्वेदिक दवाखाने, सहा युनानी रुग्णालये, २५ युनानी दवाखाने आणि ४८ होमिओपॅथी रुग्णालये आहेत. सन २०१७ पर्यंत, ७९,६२३ आयुर्वेदिक डॉक्टरांनी (त्यापैकी ३,५५३ पदव्युत्तर) व ७,०६० युनानी डॉक्टरांनी महाराष्ट्र काउंन्सिल ऑफ इंडियन मेडीसिन यांचेकडे तसेच ६७,२७६ होमियोपॅथी डॉक्टरांनी (त्यापैकी २,०९८ पदव्युत्तर) महाराष्ट्र होमियोपॅथी परिषदेकडे नोंदणी केली आहे .

## राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान

१०.३१.८ नागरी भागातील जनतेच्या आरोग्य विषयक गरजा पूर्ण करण्यासाठी सन २०१३ मध्ये राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान सुरु करण्यात आले. नागरी भागातील लोकांवर विशेषत: गरिबांवर लक्ष केंद्रित करुन आवश्यक प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करुन त्यांचा उपचारावरील खर्च कमी करणे हा या अभियानाचा उद्देश आहे. याकरिता अस्तित्वात असलेल्या आरोग्य सेवांचे बळकटीकरण करुन व झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांवर लक्ष केंद्रीत करुन, पिण्याचे पाणी, स्वच्छता, शालेय शिक्षण इत्यादी आरोग्य निर्धारकांशी निगडीत योजना एकत्रित करुन हे अभियान राबविले जात आहे. हे अभियान प्रामुख्याने ५०,००० पेक्षा जास्त लोकसंख्या असणारी शहरे/नगरे यातील झोपडपट्ट्या व इतर दुर्लक्षित घटक यांचेसाठी राबविले जात आहे. केंद्र शासनाने राज्यासाठी सन २०१६-१७ मध्ये ₹ ३११.५३ कोटी रक्कमेचा प्रकल्प अंमलबजावणी आराखडा मंजूर केला असुन ₹ ८४.५९ कोटी खर्च झाले. सन २०१७-१८ मध्ये ₹ २११.४३ कोटी रक्कमेचा प्रकल्प अंमलबजावणी आराखडा (मुंबई साठी ₹ ५९.२८ कोटी आणि उर्वरित ९४ शहरे/ नगरांसाठी ₹ १५२.१५ कोटी) मंजूर केले असून डिसेंबर पर्यंत ₹ ६६.८३ कोटी खर्च झाले आहेत.

## महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा

१०.३१.९ महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवेमार्फत रुग्णांना नजिकच्या रुग्णालयांमध्ये पुढील उपचारार्थ दाखल करण्यासाठी पुर्वरुग्णालयीन आरोग्यसेवेसह जीवरक्षक प्रणालीयुक्त रुग्णवाहिका उपलब्ध करण्यात येतात. अद्ययावत जीवरक्षक प्रणालीयुक्त २३३ रुग्णवाहिका आणि मूलभूत जीवरक्षक प्रणालीयुक्त ७०४ रुग्णवाहिका कार्यरत आहेत. ही आपत्कालीन सेवा १०८ या मोफत दूरध्वनी क्रमांकावर उपलब्ध होऊ शकते. आपत्कालीन सेवा पुरविलेल्या रुग्णांची संख्या तक्ता १०.२२ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२२ आपत्कालिन सेवा पुरविलेले रुग्ण**

(संख्या)

| प्रकार | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८+ |
|---|---|---|---|
| प्रसुती | ४,६११ | ५,५८० | ५,०२८ |
| गर्भवती | १,५९,९४९ | २,०७,७४१ | १,७५,०६८ |
| वैद्यकीय | १,६७,३७६ | २,८१,९६० | २,२२,१३० |
| अपघाती (वाहनांमुळे) | ६०,९३७ | ७३,८७८ | ५४,६८२ |
| प्राणघातक हल्ला | ७,५३१ | १०,३०१ | ८,४३३ |
| भाजणे | ४,२५७ | ४,५५० | २,६६७ |
| हृदयविकार | २,८२३ | २,४१८ | १,५३९ |
| पडणे | १६,३६० | २३,०३७ | १८,८१३ |
| विषद्रव्यप्राशन/ विषबाधा | २०,८२६ | २६,६२९ | २४,७६९ |
| मोठी दुर्घटना | ४,२२० | ३,६४९ | ३,२१० |
| आघात | २,४५६ | १,६१३ | १,०९२ |
| इतर | १६,१६० | ६३,४३३ | ५०,८६३ |
| **एकूण** | **४,६७,५०६** | **७,०४,७८९** | **५,६८,२९४** |

*आधार :* आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम

१०.३१.१० क्षयरोग हा संसर्गजन्य रोग असल्याने 'क्षयरोग मुक्त भारत' बनविणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. लागण झालेल्या क्षयरोग रुग्णांची डायरेक्टली ऑब्झवर्ड ट्रिटमेंट शॉर्ट कोर्स (डॉट्स) द्वारे तपासणी करुन ते पूर्ण बरे होईपर्यंत प्रभावीपणे उपचार देण्यात येतात. यामध्ये संपूर्ण कालावधीसाठी औषधांचा खात्रीशीर पुरवठा व औषधोपचाराला रुग्णांचा प्रतिसाद नियमितपणे नोंदविण्याची यंत्रणा आहे. दर लाख लोकसंख्येमागे संशयित क्षयरोग रुग्णांची संख्या २०१६ मध्ये २०३ होती व रोग मुक्ततेचे प्रमाण ८२ टक्के होते, तर सन २०१७ मध्ये डिसेंबर पर्यंत प्रति लाख लोकसंख्येमागे संशयित क्षयरोग रुग्णांची संख्या २०३ होती व रोग मुक्ततेचे प्रमाण ८४ टक्के होते.

## राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रम

१०.३१.११ मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया आणि शाळेत जाणाऱ्या मुलांची तपासणी करून दृष्टीदोष आढळणाऱ्या विद्यार्थ्यांना चष्मा पुरविण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. अंधत्व येण्याचे प्रमाण सन २०२० पर्यंत १.४ टक्क्यावरून ०.३ टक्क्यापर्यंत कमी करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. सन २०१६-१७ मध्ये निर्धारित ७.५० लाख मोतीबिंदू शस्त्रक्रियांपैकी ६.९६ लाख शस्त्रक्रिया तर सन २०१७-१८ मध्ये डिसेंबर अखेरपर्यंत तेवढयाच उद्दिष्टापैकी ४.८५ लाख शस्त्रक्रिया पार पाडल्या आहेत.

## राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रम

१०.३१.१२ कुष्ठरोगाचे निर्मुलन (सर्व जिल्हयांमध्ये १०,००० लोकसंख्येमागे १ पेक्षाही कमी कुष्ठरोगी आढळणे) करण्याच्या दृष्टीने कुष्ठरोग बाधित रुग्णाचे अपंगत्व प्रतिबंध व वैद्यकीय पुनर्वसन तसेच कुष्ठरोगाबाबतचे भय कमी करणे या उद्देशाने केंद्र शासनाने या कार्यक्रमाची निर्मिती केली आहे. सन २०१६-१७ मध्ये नवीन व ग्रस्त कुष्ठरुग्णांची संख्या अनुक्रमे १५,०१२ व ९,८८७ होती, तर सन २०१७-१८ मध्ये डिसेंबरअखेर तत्सम आकडेवारी अनुक्रमे १३,६९६ व १३,४०२ होती.

## कुटुंब कल्याण कार्यक्रम

१०.३१.१३ लोकसंख्या स्थिर करणे हे कुटुंब कल्याण कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. नसबंदी आणि दोन अपत्यांच्या जन्मात अंतर राखणे हे या कार्यक्रमाचे महत्वाचे पैलू असून हे अंतर राखण्यासाठी तांबी (आययुडी), पारंपारिक संतति प्रतिबंधक साधने, इत्यादींच्या प्रसारावर जास्त भर दिला जातो. कुटुंब कल्याण नसबंदी कार्यक्रमाची माहिती तक्ता १०.२३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२३ कुटुंब कल्याण नसबंदी कार्यक्रमाची माहिती**

('०००)

| वर्ष | नसबंदी | | | | तांबी | | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | | | लक्ष्य | साध्य | |
| | | पुरुष | स्त्री | एकूण | | | |
| २०१५-१६ | ५६५ | १४.८ | ४४६.८ | ४६१.६ (८१.६) | ४६० | ३९८.० (८६.५) | २७.८९ |
| २०१६-१७ | ५६५ | १३.९ | ४३८.८ | ४५२.७ (८०.१) | ४९० | ४४३.० (९०.४) | २९.८४ |
| २०१७-१८+ | ५६५ | ८.८६ | २८३.२ | २९२.१ (५२.०) | ४९० | ३०३.६ (६२.०) | १४.८१ |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन टीप : कंसातील आकडे साध्याची लक्ष्याशी टक्केवारी दर्शवितात. + डिसेंबरपर्यंत

## महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना

१०.३२ एप्रिल, २०१७ पासून तत्कालीन राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना या नावाने राबविण्यात येत आहे. ही योजना दारिद्र्य रेषेखालील पिवळे शिधापत्रिका धारक, अन्नपूर्णा व अंत्योदय शिधापत्रिका धारक, दारिद्र्य रेषेवरील केशरी शिधापत्रिका धारक आणि शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यातील (औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा) पांढरे शिधापत्रिका धारक शेतकरी कुटुंबातील रुग्णांना निवडक आजारांवरील उपचारांकरिता रोख रक्कम विरहीत वैद्यकीय सुविधा पुरविण्यासाठी राष्ट्रीय विमा कंपनीच्या सहयोगाने राबविण्यात येते. या योजनेमध्ये ३० निवडक विशेष सेवांतर्गत ९७१ प्रकारचे गंभीर व अधिक खर्चिक शस्त्रक्रिया/ उपचार व १२१ पश्चात सेवांचा समावेश आहे. या योजनें अंतर्गत लाभार्थी कुटुंबातील एक किंवा अधिक व्यक्तींना वार्षिक विमा संरक्षण रक्कम प्रति वर्ष प्रति कुटुंब ₹ १.५ लाख एवढ्या मर्यादेपर्यंत मोफत उपचार अनुज्ञेय असून मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी सदर मर्यादा ₹ २.५ लाख आहे. लाभार्थी रुग्णांना ४९२ सूचीबद्ध शासकीय व खाजगी रुग्णालयांमधून रोख रक्कम विरहीत वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्यात येतात. सदर योजना पूर्णत: संगणकीकृत असून वैध शिधापत्रिका धारक लाभार्थ्यास फोटो ओळखपत्राच्या आधारे सूचीबद्ध रुग्णालयांमधून उपचार अनुज्ञेय आहेत. या योजनेची विभागनिहाय प्रगती तक्ता १०.२४ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२४ महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी जन आरोग्य योजनेची विभागवार प्रगती**

(संख्या)

| विभाग | वर्ष | शस्त्रक्रिया | | | | | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुत्रपिंड | हृदय | मेंदू | कॅन्सर | एकूण | |
| कोकण | २०१५-१६ | २२,८३५ | १६,२१२ | १,३३८ | २१,३०२ | ६१,६८७ | १४३.५१ |
| | २०१६-१७ | २५,८६१ | १८,००८ | १,३९९ | २३,२७६ | ६८,५४४ | १६०.२९ |
| | २०१७-१८+ | २१,०१६ | १४,२१६ | १,०९५ | २०,२२६ | ५६,५५३ | १२९.३९ |
| नाशिक | २०१५-१६ | ६,६८८ | १३,६०४ | १,९८० | १८,८७२ | ४१,१४४ | १०३.०० |
| | २०१६-१७ | ८,०६५ | १६,४१४ | २,१४७ | २४,११५ | ५०,७४१ | १२९.०० |
| | २०१७-१८+ | ७,०१४ | १३,२६३ | १,९३६ | २२,९५० | ४५,१६३ | १०६.९१ |
| पुणे | २०१५-१६ | ८,४०८ | १३,६४२ | २,५८९ | २१,१०७ | ४५,७४६ | १०७.६९ |
| | २०१६-१७ | ११,४२२ | १६,३९२ | २,५६७ | ३१,४५४ | ६१,८३५ | १४९.१५ |
| | २०१७-१८+ | १०,६०४ | १३,१४६ | १,९३७ | २९,१०० | ५४,७८७ | १२२.२० |
| औरंगाबाद | २०१५-१६ | ६,८४६ | ९,०३३ | १,९११ | २६,५४८ | ४४,३३८ | ८८.०८ |
| | २०१६-१७ | ८,४८४ | १०,८९५ | २,००६ | २९,५२६ | ५०,९११ | ११२.१८ |
| | २०१७-१८+ | ७,४५५ | ९,१९७ | १,७१८ | २४,८६९ | ४३,२३९ | ९३.४९ |
| अमरावती | २०१५-१६ | ३,३१४ | ५,२५४ | १,५६९ | ११,९५३ | २२,०९० | ४५.७८ |
| | २०१६-१७ | ४,६३३ | ६,६७८ | १,५७० | १४,४४७ | २७,३२८ | ५७.५४ |
| | २०१७-१८+ | ४,४०७ | ५,४७७ | १,०४३ | १२,३३० | २३,२५७ | ४८.१६ |
| नागपूर | २०१५-१६ | २,५६३ | ३,२५५ | ८३५ | ८,८७२ | १५,५२५ | ३२.११ |
| | २०१६-१७ | २,९५० | ३,३४३ | ८९१ | १०,५३२ | १७,७१६ | ३४.९० |
| | २०१७-१८+ | २,४२७ | २,७८० | ७२९ | ९,३१६ | १५,२५२ | २८.६१ |
| **एकूण** | **२०१५-१६** | **५०,६५४** | **६१,०००** | **१०,२२२** | **१,०८,६५४** | **२,३०,५३०** | **५२०.१८** |
| | **२०१६-१७** | **६१,४१५** | **७१,७३०** | **१०,५८०** | **१,३३,३५०** | **२,७७,०७५** | **६४३.०७** |
| | **२०१७-१८+** | **५२,९२३** | **५८,०७९** | **८,४५८** | **१,१८,७९१** | **२,३८,२५१** | **५२८.७५** |

*आधार* : राज्य आरोग्य हमी सोसायटी, महाराष्ट्र शासन    + डिसेंबरपर्यंत

## राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम

१०.३३ राज्यात राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. जनजागृती मोहीम राबवून मार्गदर्शन करणे आणि विशिष्ट गटातील लोकांचे प्रबोधन व देखरेख यावर या कार्यक्रमाचा भर आहे. यामध्ये लैंगिक संसर्गजन्य रोग चिकित्सालयातील रुग्णांची व प्रसुतीपूर्व तपासणीसाठी आलेल्या गर्भवती महिलांच्या रक्ताच्या नमुना तपासणीद्वारे देखरेख केली जाते. एचआयव्ही / एड्सग्रस्त रुग्णांची संख्या तक्ता १०.२५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२५ एचआयव्ही / एड्स रुग्णांची संख्या**

('०००)

| बाब | २०१५ | २०१६ | २०१७ |
|---|---|---|---|
| जोखीम गटातील तपासणी केलेल्या व्यक्ती | ४,६५० | ४,८९१ | ५,३३२ |
| तीन चाचणी पद्धतीवरुन एचआयव्ही बाधित | ३६ | ३२ | २९ |
| एचआयव्ही बाधितांचे प्रमाण (टक्के) @ | ०.७ | ०.६ | ०.५ |
| एड्स रुग्ण | १९.५२ | १८.८६ | १९.७२ |
| एड्सने मृत्यू | ३.७३ | ४.६१ | ४.०६ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था    @ तपासणी केलेल्या जोखीम गटातील व्यक्तींशी

## राज्य रक्त संक्रमण परिषद

१०.३४ सुरक्षित रक्ताचा व त्याच्या घटकांचा पुरेसा पुरवठा वाजवी दरात करणे हे राज्य रक्त संक्रमण परिषदेचे मुख्य उद्दिष्ट आहे. सन २००० पासून सिकल सेल ग्रस्त बालके तसेच थॅलेसेमिया व हेमोफिलियाने पीडित रूग्णांना मोफत रक्तपुरवठा केला जातो. रक्त संकलनाची माहिती तक्ता १०.२६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२६ रक्त संकलनाची माहिती**

| वर्ष | रक्तपेढ्या संख्या | एकूण संकलन (लाख युनिट) | पैकी, स्वेच्छेने केलेले (लाख युनिट) | कार्ड वितरीत केलेल्या रुग्णांची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सिकल सेल | थॅलेसेमिया | हेमोफिलिया |
| २०१५ | ३१७ | १५.६६ | १५.१६ | १,७२७ | ६१२ | १०२ |
| २०१६ | ३२१ | १६.१७ | १५.७० | ९५८ | ६७८ | २८२ |
| २०१७ | ३३१ | १६.०२ | १५.६३ | १,१६९ | ६३० | १७७ |

*आधार* : राज्य रक्त संक्रमण परिषद, महाराष्ट्र शासन

## साथरोग नियंत्रण कार्यक्रम

१०.३५ या कार्यक्रमांतर्गत कॉलरा, गॅस्ट्रो, अतिसार, काविळ, विषमज्वर, इत्यादी जलजन्य आजारांच्या साथींचा उद्रेक तसेच अधूनमधून उद्भवणाऱ्या आजारांचे संनियंत्रण केले जाते. या आजारांमुळे होणारी लागण व मृत्यू कमी करणे याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जातात. साथींचा उद्रेक व अधूनमधून उद्भवणाऱ्या आजारांमुळे झालेली लागण व मृत्यूंची संख्या तक्ता १०.२७ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता १०.२७ जलजन्य आजारांमुळे झालेली लागण व मृत्यूंची संख्या**

| आजार | २०१५-१६ | | २०१६-१७ | | २०१७-१८+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लागण | मृत्यू | लागण | मृत्यू | लागण | मृत्यू |
| कॉलरा | १९५ | २ | ९६३ | ४ | ८३ | ० |
| गॅस्ट्रो | १,३०,०३७ | ४ | २,३२,९०३ | १४ | ७५,३६० | १ |
| अतिसार | ११,६९,३७७ | २ | ९,३२,०२१ | ७ | ७,१७,७९० | २ |
| काविळ | ७,२०८ | ६ | ६,६५५ | ५ | १९,८९५ | ० |
| विषमज्वर | ७२,५१६ | ० | १,२३,५७४ | ० | ४०,२९५ | ० |
| लेप्टोस्पायरोसिस | २४६ | २२ | ३६७ | १३ | १३९ | ७ |
| **एकूण** | **१३,७९,५७९** | **३६** | **१२,९६,४८३** | **४३** | **८,५३,५६२** | **१०** |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## मानवी अवयव प्रत्यारोपण

१०.३६ मानवी उपचारांकरिता मानवी अवयव काढणे, जतन करणे, प्रत्यारोपण करणे तसेच मानवी अवयवांचे व्यापारीकरण रोखणे याबाबत नियमन/नियंत्रण करण्याकरिता केंद्र शासनाने मानवी अवयव प्रत्यारोपण अधिनियम, १९९४ लागू केला आहे. राज्यात १८८ नोंदणीकृत केंद्रे असून त्यापैकी एक अवयव प्रत्यारोपणासाठी १५३ व एकापेक्षा जास्त अवयवांच्या प्रत्यारोपणासाठी ३५ केंद्रे आहेत. नेत्रदान, नेत्रपेढी व बुब्बुळ प्रत्यारोपणासाठी २७८ केंद्रे आहेत. प्रत्यारोपणांची संख्या तक्ता १०.२८ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२८ प्रत्यारोपणांची संख्या**

| प्रत्यारोपण | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८+ |
|---|---|---|---|
| जीवित | | | |
| अ) मूत्रपिंड | ६९२ | ५२९ | ४६३ |
| ब) यकृत | ११८ | ८१ | ६७ |
| मृतवत | | | |
| अ) मूत्रपिंड | ९७ | २०४ | १८७ |
| ब) यकृत | ४१ | ११७ | १०२ |
| क) हृदय | ५ | ३५ | ५० |
| ड) फुफ्फुस | ० | १ | २ |
| ई) बुब्बुळ प्रत्यारोपण | ३,२३० | २,९८९ | २,६२९ |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

# महिला व बाल विकास

१०.३७ सक्षम महिला केवळ कुटुंबाच्याच नव्हे तर समाजाच्या उत्पादकतेमध्ये देखील मौलिक भर घालते, ज्यामुळे भावी पिढीचे भवितव्य सुधारण्यास मदत होते. महिलांचे शिक्षण, आरोग्य आणि आर्थिक परिस्थिती सुधारल्यानंतर महिला सक्षमीकरण साध्य होईल. महाराष्ट्र हे देशातील महिला धोरण आखणारे पहिले राज्य असून हे धोरण १९९४ मध्ये जाहीर करण्यात आल्यानंतर ते २००१ मध्ये सुधारीत करण्यात आले व सन २०१४ मध्ये तिसरे महिला धोरण राज्याने जाहीर केले. त्याची काही उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

- महिलांना सर्व क्षेत्रात समान संधी उपलब्ध करुन देणे
- स्त्री पुरुष जन्मदर समान ठेवण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे
- शासकीय निर्णय प्रक्रियेच्या प्रत्येक स्तरावर समाजातील सर्व महिलांच्या हितांचे व हक्कांचे संवर्धन करणे
- महिलांवर अन्याय करणाऱ्या अनिष्ट प्रथेपासून त्यांची मुक्तता होण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजना करणे
- अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती या जातीतील व अल्पसंख्याक समुदायातील महिलांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे
- असंघटीत क्षेत्रातील कार्यरत महिलांच्या हक्कांसाठी प्रयत्न करणे
- स्त्रियांना त्यांच्या क्षमतांचा पुरेपूर उपयोग करता यावा यासाठी घरात तसेच कामाच्या ठिकाणी हिंसाचार विरहीत व सुरक्षित वातावरण निर्माण करणे

१०.३८ राज्यात राबविण्यात येत असलेल्या काही महत्वाच्या महिला विकास योजना:

१०.३८.१ **शासकीय महिला वसतिगृहे,महिला आधार गृहे,संरक्षण गृहे,राज्यगृहे :** १६ ते ६० वर्षे या वयोगटातील असहाय्य, निराधार, परित्यक्ता, संकटग्रस्त, अत्याचारीत महिला आणि कुमारीमाता यांना अन्न, वस्त्र, निवारा, संरक्षण आवश्यक असल्यास वैद्यकीय सुविधा व कायदेविषयक मदत यासारख्या मूलभूत सुविधा आणि रोजगाराच्या संधीं पुरवून त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी या गृहांची स्थापना करण्यात आली आहे. महिला ३० दिवसांपेक्षा अधिक काळ संस्थेमध्ये राहिल्यास तिला सुधारीत 'माहेर' या योजनेतंर्गत दरमहा ₹ १,००० अनुदान दिले जाते. महिला तिच्या लहान मुलांसोबत राहत असल्यास पहिल्या मुलासाठी ₹ ५०० व दुसऱ्या मुलासाठी ₹ ४०० अतिरिक्त अनुदान देण्यात येते. लाभार्थी महिला ९० दिवसांपेक्षा जास्त काळ संस्थेत राहिल्यास तिला शिवणकाम, विणकाम, सौंदर्यशास्त्र, फाईली व मसाले बनविणे, इत्यादी रोजगारासाठी उपयुक्त अशा व्यावसायिक कौशल्यांचे प्रशिक्षण देण्यात येते. अविवाहित किंवा घटस्फोटीत महिलांच्या विवाहासाठी प्रयत्न केले जातात. संस्थेत दाखल झालेल्या महिलेच्या विवाहासाठी ₹ २५,००० अनुदान देण्यात येते. राज्यात २० शासकीय महिला संरक्षण गृहे व स्वयंसेवी संस्थांची नऊ महिला आधारगृहे कार्यरत आहेत. या योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये १,७४३ लाभार्थ्यांवर ₹ ११.८४ कोटी खर्च झाला आणि सन २०१७-१८ मध्ये नोव्हेंबरपर्यंत १,८७५ लाभार्थ्यांवर ₹ ६.४६ कोटी खर्च झाला.

१०.३८.२ **महिला समुपदेशन केंद्रे** : राज्यात ३९ महिला समुपदेशन केंद्रे असून या केंद्रांमधून पीडित महिलांना मानसिक ताणापासून मुक्त होण्यासाठी समुपदेशन सहाय्य पुरविले जाते. याव्यतिरिक्त प्रत्येक जिल्ह्यातील तीन तालुक्यांमध्ये प्रत्येकी एक केंद्र याप्रमाणे ३५ जिल्ह्यांत १०५ समुपदेशन केंद्रे सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आतापर्यंत ९७ समुपदेशन केंद्रांना मान्यता देण्यात आली आहे. या योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये १०५ लाभार्थ्यांवर ₹ ३.४४ कोटी खर्च झाला आणि सन २०१७-१८ मध्ये नोव्हेंबरपर्यंत १०५ लाभार्थ्यांवर ₹ ३.२१ कोटी खर्च झाला.

१०.३८.३ **शुभ मंगल सामूहिक विवाह योजना :** सदर योजना राज्याच्या सर्व जिल्ह्यांतील ₹ एक लाखापर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या शेतकरी, शेतमजुर, विधवा आणि निराधार महिलांच्या मुलींसाठी लागू आहे. सामुदायिक विवाह सोहळ्यात अथवा नोंदणी कार्यालयात जाऊन नोंदणी पद्धतीने स्वतंत्र विवाह करणाऱ्या प्रत्येक जोडप्यास ₹ १०,००० अनुदान देण्यात येते. एका स्वयंसेवी संस्थेस वर्षात किमान पाच व कमाल १०० जोडप्यांचा समावेश असलेल्या केवळ दोन सामूहिक विवाह सोहळ्यांकरीता एका जोडप्यामागे ₹ २,००० प्रमाणे अनुदान देण्यात येते. या योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये ५४० लाभार्थ्यांवर ₹ ५४ लाख खर्च झाला आणि सन २०१७-१८ मध्ये नोव्हेंबरपर्यंत १४० लाभार्थ्यांवर ₹ १४ लाख खर्च झाला.

१०.३८.४ **मनोधैर्य योजना :** या योजनेचा मुख्य उद्देश लैंगिक अत्याचार व ॲसिड हल्यास बळी पडलेल्या पीडितांना (महिला व बाल), ₹ तीन लाख पर्यंत किंवा ₹ १० लाख पर्यंत आर्थिक मदत (पीडित व्यक्तीवर गुन्ह्यामुळे झालेल्या मानसिक व शारीरिक परिणामांच्या तीव्रतेनुसार), सर्व शासकीय, निमशासकीय, खाजगी रुग्णालयांत आणि महानगर पालिका व नगरपालिकांच्या रुग्णालयांत मोफत वैद्यकीय सुविधा तसेच या दुर्दैवी घटनांमुळे एच.आय.व्ही./एड्स बाधीत झालेल्या पीडितांना सर्व शासकीय व निमशासकीय रुग्णालयांत मोफत वैद्यकीय सुविधा, प्रशिक्षित ट्रॉमा पथकामार्फत समुपदेशन व कायदेविषयक मदत, व्यावसायिक प्रशिक्षण व रोजगार, इत्यादी सुविधा पुरवून पुनर्वसन करणे हा होय. कागदपत्रे प्राप्त झाल्यापासून सात दिवसांच्या आत पीडित व्यक्तीस वैद्यकीय उपचारांकरीता ₹ ३०,००० अर्थसहाय्य देण्यात येते. जिल्हा किंवा राज्य विधी सेवा प्राधिकरणामार्फत सखोल चौकशी केल्यानंतर १२० दिवसांच्या आत, पीडित व्यक्तीस किंवा पीडित व्यक्तीच्या नातेवाईकांस मंजूर अर्थसहाय्यापैकी २५ टक्के अर्थसहाय्य रोखस्वरुपात (वैद्यकीय उपचारांकरीता दिलेले ₹ ३०,००० वगळून) दिले जाते आणि उर्वरीत ७५ टक्के अर्थसहाय्य पीडित व्यक्तीच्या नावे बँकेत मुदत ठेव म्हणून १० वर्षांच्या कालावधी करीता ठेवण्यात येते. या योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये २,३५६ बाधित व्यक्तींवर ₹ ४३.२२ कोटी खर्च झाला आणि सन २०१७-१८ मध्ये नोव्हेंबरपर्यंत ८२३ बाधीत व्यक्तींवर ₹ १६.६५ कोटी खर्च झाला.

१०.३८.५ **कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ अंतर्गत संरक्षण अधिकारी :** सन २००६ पासून राज्यात, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ आणि अनुषंगिक नियम, २००६ राबविण्यात येत आहेत. या कायद्यातील तरतुदींनुसार, कौटुंबिक हिंसाचारग्रस्त महिलांना संरक्षण, निवारा, मुलांचा ताबा, आर्थिक मदत आणि झालेल्या हानीसाठी नुकसान भरपाई यांचे आदेश मिळू शकतात. पीडितांना मोफत कायदेविषयक आणि वैद्यकीय मदत, समुपदेशन इ. सुविधा देखील आधारगृह आणि विधी सेवा प्राधिकरण यांच्या मार्फत पुरविल्या जातात. या योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये १,१८५ बाधित महिलांवर ₹ १३.३० कोटी खर्च झाला आणि सन २०१७-१८ मध्ये नोव्हेंबरपर्यंत १,१८५ बाधित महिलांवर ₹ १४.२५ कोटी खर्च झाला.

१०.३९ राज्यात राबविण्यात येत असलेल्या महिलांविषयक विविध केंद्र शासन पुरस्कृत योजना:

१०.३९.१ **नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृहे :** या योजनेंतर्गत, एकूण मासिक उत्पन्न महानगरांसाठी ₹ ५०,००० किंवा इतर ठिकाणांसाठी ₹ ३५,००० पेक्षा जास्त नाही अशा नोकरी करणाऱ्या अविवाहित, विधवा, घटस्फोटित, विभक्त, विवाहित परंतु ज्यांचे पती किंवा जवळचे कुटुंबीय त्याच भागात राहत नसणाऱ्या आणि नोकरीसाठी प्रशिक्षण सुरू असलेल्या महिलांसाठी वसतिगृहाची इमारत बांधणे किंवा भाड्याच्या जागेत वसतिगृह चालविणे या बाबींसाठी अर्थसहाय्य पुरविले जाते. वसतिगृहातील महिलांच्या मुलांसाठी दिवसाच्या संगोपन केंद्राची सुविधा हे या योजनेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. वसतिगृहातील महिलांना त्यांच्या निवासासाठी भाडे आकारले जाते. राज्यात अशी ८७ वसतिगृहे कार्यरत आहेत. या योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये ९,४८४ आणि सन २०१७-१८ मध्ये डिसेंबर पर्यंत ८,३५१ महिलांना लाभ देण्यात आला.

१०.३९.२ **प्रशिक्षण व रोजगार कार्यक्रमासाठी आधार :** १६ वर्ष आणि त्यापेक्षा जास्त वयोगटातील गरीब महिलांना रोजगार आणि उद्योजकता यांच्याशी संबंधित व्यावसायिक कौशल्य व क्षमता प्रदान करणे ही या योजनेची उद्दिष्टे आहेत. या योजनेंतर्गत महिलांना कृषी, फलोत्पादन, मत्स्यव्यवसाय, दुग्धव्यवसाय, पशुसंवर्धन, रेशीम निर्मिती, अन्नप्रक्रिया, हातमाग, शिवणकाम, शिलाई, नक्षीकाम, जरी, हस्तकला, संगणक आणि माहिती तंत्रज्ञान संबंधित सेवा, इंग्रजी संभाषण, रत्ने आणि दागिने, प्रवास आणि पर्यटन, आदरातिथ्य, इत्यादी विविध क्षेत्रांतील व्यावसायिक कौशल्यांचे प्रशिक्षण देण्यात येते. राज्यात असे तीन प्रकल्प कार्यरत आहेत. या योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये ११५ महिलांना आणि सन २०१७-१८ मध्ये डिसेंबरपर्यंत ३० महिलांना लाभ देण्यात आला.

१०.३९.३ **स्वाधार :** या योजनेंतर्गत निराधार, बेघर, विधवा, परित्यक्ता, कुटुंबाने सोडून दिलेल्या, तुरुंगातून सुटका झालेल्या परंतु कुटुंबांचा आधार नसलेल्या महिला कैदी, कुंटणखान्यांतून सुटका केलेल्या महिला, इत्यादी कठीण परिस्थितीतील महिलांचे संरक्षण, निवारा, संगोपन, शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षण पुरवून पुनर्वसन करण्यात येते. राज्यात २८ स्वाधारगृहे कार्यरत आहेत. या योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये १,१२६ महिलांना आणि सन २०१७-१८ मध्ये डिसेंबरपर्यंत ८६३ महिलांना लाभ देण्यात आला.

१०.३९.४ **उज्वला :** लैंगिक शोषणासाठी केल्या जाणाऱ्या महिलांच्या अवैध तस्करीचा सामना करणे, पीडित महिलांना सुटकेसाठी मदत करणे, त्यांना समाजामध्ये पुन्हा सामावून घेणे आणि संरक्षण, सुरक्षित निवारा, वैद्यकीय मदत, कायदेविषयक मदत, शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण पुरवून त्यांचे पुनर्वसन करणे ही या योजनेची उद्दिष्टे आहेत. राज्यात अशा २० संस्था कार्यरत आहेत. या योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये ९०४ महिलांना आणि सन २०१७-१८ मध्ये डिसेंबरपर्यंत ६०२ महिलांना लाभ देण्यात आला.

१०.३९.५ **प्रधानमंत्री मातृ वंदना योजना :** माता व बाल मृत्यूदर कमी करणे आणि गर्भवती व स्तनदा मातांना पोषणयुक्त आहार घेण्यास प्रोत्साहित करुन माता व नवजात बालकांचे आरोग्य सुधारणे ही या योजनेची उद्दिष्टे आहेत. या योजनेंतर्गत गर्भवती महिलेस तीन हप्त्यांत ₹ ५,००० अर्थसहाय्य दिले जाते.

## निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग

१०.४० केंद्र शासनाने महिलांना स्थानिक संस्थांमध्ये एक-तृतीयांश आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. तथापि, राज्य शासनाने हे आरक्षण ५० टक्क्यांपर्यंत वाढविले आहे. राज्यातील स्थानिक संस्थांमधील महिलांसाठीच्या राखीव जागांची संख्या तक्ता १०.२९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२९ राज्यातील स्थानिक संस्थांमध्ये महिलांसाठी राखीव जागा**

(३१ डिसेंबर, २०१७ रोजी)

| स्थानिक संस्था (संख्या) | एकूण जागा | महिलांसाठी राखीव जागा |
|---|---|---|
| महानगरपालिका (२७) | २,७३२ | १,३७२ |
| नगरपरिषद (२३६) | ५,३३९ | २,७४४ |
| नगरपंचायत (१२४) | २,०९१ | १,१०७ |
| जिल्हा परिषद (३४) | २,००० | १,००९ |
| पंचायत समिती (३५१) | ४,००० | २,००० |
| ग्रामपंचायत (२७,८५४)$ | २,५३,३६१ | १,२६,६८० |
| **एकूण** | **२,६९,५२३** | **१,३४,९१२** |

*आधार* :राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र शासन, $ ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन

## महिला आर्थिक विकास महामंडळ

१०.४१ स्व-सहाय्यता गटांमार्फत महिलांविषयक विविध विकास योजना राबविण्याकरिता, राज्य शासनाने महिला आर्थिक विकास महामंडळास (माविम) राज्याची नोडल संस्था म्हणून घोषित केले आहे. माविमला विविध योजनांखाली सन २०१७-१८ मध्ये ₹ ३९.१७ कोटी निधी प्राप्त झाला असून डिसेंबरपर्यंत ₹ २८.२७ कोटी खर्च झाला.

१०.४१.१ **तेजस्विनी :** महिलांच्या सक्रीय सहभागाद्वारे स्व-सहाय्यता गटांची निर्मिती करुन महिला सक्षमीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता राज्यात ३३ जिल्ह्यांतील १०,४९५ खेड्यांमध्ये ही योजना सन २००७ पासून राबविली जाते. स्व-सहाय्यता बचत गटांच्या स्थानिक पातळीवरील लोकसंस्था उभारणे, स्व-सहाय्यता बचत गटांना सूक्ष्म पतपुरवठा सेवा उपलब्ध करुन देणे, उपजीविका व उद्योजकता विकास आणि महिला सक्षमीकरण व सामाजिक समानता यांवर सदर कार्यक्रमाचा प्रमुख भर आहे. या कार्यक्रमाद्वारे माविमने गरीब कुटुंबांतील ९,३९,८१६ महिलांचा सक्रिय सहभाग असलेले ७८,३१८ स्व-सहाय्यता गट आणि ३६१ लोक संचालित साधन केंद्रांचे जाळे यशस्वीपणे स्थापन केले आहे. या योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये ४१,६४२ लाभार्थ्यांवर ₹ २०.१२ कोटी खर्च झाला आणि सन २०१७-१८ मध्ये डिसेंबरपर्यंत ४७,४६० लाभार्थ्यांवर ₹ २२.२३ कोटी खर्च झाला.

१०.४१.२ **अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत महिला सक्षमीकरण :** तेजस्विनी योजनेप्रमाणे उद्दिष्टे असलेली ही योजना अनुसूचित जातीच्या महिलांकरिता राबविली जाते. या योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये १०,३०३ लाभार्थ्यांवर ₹ ६४ लाख खर्च झाला आणि सन २०१७-१८ मध्ये डिसेंबरपर्यंत ८,१२५ लाभार्थ्यांवर ₹ १७ लाख खर्च झाला.

१०.४१.३ महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी स्व-सहाय्यता गट हे चांगले माध्यम आहे. सन २०१७-१८ मध्ये डिसेंबरपर्यंत स्व-सहाय्यता गटांची एकूण बचत सुमारे ₹ १३६.४८ कोटी होती तर एकूण अंतर्गत वितरीत कर्ज ₹ २०४.४६ कोटी होते. सन २०१७-१८ मध्ये डिसेंबरपर्यंत स्व-सहाय्यता गटांना विविध वित्तीय संस्थांकडून ₹ २८३.०८ कोटी कर्ज प्राप्त झाले. महिला स्व-सहाय्यता गटांची माहिती तक्ता १०.३० मध्ये दिली आहे.

**आलेख १०.१ : महिला स्व-सहाय्यता गटांची बचत व त्यांना वितरीत अंतर्गत कर्ज**




(डिसेंबर, २०१७पर्यंत)

**तक्ता १०.३०  राज्यातील महिला स्व-सहाय्यता गटांची माहिती**

(संख्या)

| विभाग | क्षेत्र | गावे/शहरे | २०१५-१६ | | २०१६-१७ | | २०१७-१८+ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | स्व-सहाय्यता गट | सदस्य | स्व-सहाय्यता गट | सदस्य | स्व-सहाय्यता गट | सदस्य |
| कोकण | ग्रामीण | ९६८ | ६,८२७ | ८१,०४६ | ९,१९७ | १,०४,९६१ | ९,४९९ | १,१५,७०८ |
| | नागरी | २ | ९४० | १२,९४० | १,२७७ | १२,५४२ | २,१९५ | २५,५६१ |
| | एकूण | - | ७,७६७ | ९३,९८६ | १०,४७४ | १,१७,५०३ | ११,६९४ | १,४१,२६९ |
| नाशिक | ग्रामीण | १,६०० | १०,२८५ | १,५४,२४३ | ८,४७१ | १,०४,६५८ | ८,९०९ | १,०७,६२५ |
| | नागरी | १ | २४९ | ३,४१२ | ९०८ | ७,७७८ | २,०५३ | २०,९९८ |
| | एकूण | - | १०,५३४ | १,५७,६५५ | ९,३७९ | १,१२,४३६ | १०,९६२ | १,२८,६२३ |
| पुणे | ग्रामीण | १,०३९ | १०,३३५ | १,३८,९६५ | १०,४९२ | १,३१,३५६ | १०,९७० | १,५७,०६७ |
| | नागरी | २ | ४३० | ५,९०५ | ९०२ | १०,२६९ | १,७४२ | २३,७६० |
| | एकूण | - | १०,७६५ | १,४४,८७० | ११,३९४ | १,४१,६२५ | १२,७१२ | १,८०,८२७ |
| औरंगाबाद | ग्रामीण | २,५१० | १२,३५५ | १,९८,१२२ | १२,९८० | १,४६,६०० | १३,७५२ | १,६५,१४५ |
| | नागरी | ३ | ७३७ | १०,१२३ | १,५५२ | १४,२६८ | २,४१४ | २८,३६२ |
| | एकूण | - | १३,०९२ | २,०८,२४५ | १४,५३२ | १,६०,८६८ | १६,१६६ | १,९३,५०७ |
| अमरावती | ग्रामीण | १,९४२ | ११,१९६ | १,४०,८१५ | १२,४९५ | १,३०,७६० | १६,०३२ | १,७४,९०५ |
| | नागरी | १ | २१३ | २,७५८ | ६५४ | ४,८९६ | १,३१७ | १३,९०१ |
| | एकूण | - | ११,४०९ | १,४३,५७३ | १३,१४९ | १,३५,६५६ | १७,३४९ | १,८८,८०६ |
| नागपूर | ग्रामीण | २,४३६ | १५,०७० | २,१९,१८७ | १४,५८० | १,७९,२९७ | १५,०२३ | १,८८,०४५ |
| | नागरी | १ | २०१ | २,७१४ | ९१० | ७,१५५ | १,४९७ | १६,२३८ |
| | एकूण | - | १५,२७१ | २,२१,९०१ | १५,४९० | १,८६,४५२ | १६,५२० | २,०४,२८३ |
| प्रादेशिक स्वयंसेवी संस्था | - | - | १२,९५२ | १,६०,३९१ | १२,८०६ | १,४९,१९९ | १३,६२१ | १,६९,७८१ |
| **एकूण** | **ग्रामीण** | **१०,४९५** | **७९,०२०** | **१०,९२,७६९** | **८१,०२१** | **९,४६,८३१** | **८७,८०६** | **१०,७८,२७६** |
| | **नागरी** | **१०** | **२,७७०** | **३७,८५२** | **६,२०३** | **५६,९०८** | **११,२१८** | **१,२८,८२०** |
| | **एकूण** | - | **८१,७९०** | **११,३०,६२१** | **८७,२२४** | **१०,०३,७३९** | **९९,०२४** | **१२,०७,०९६** |

*आधार* : माविम, महाराष्ट्र शासन

+ डिसेंबरपर्यंत

१०.४१.४ **लोक संचालित साधन केंद्र:** १५ ते २० कि.मी. त्रिज्येच्या परिसरात असलेल्या २०० ते २५० स्व-सहाय्यता गटांच्या समुहाची गरज भागविणारी सामुदायिक मालकी व व्यवस्थापन असलेली ही एक नोंदणीकृत संस्था आहे. स्व-सहाय्यता गटांच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या अतिरिक्त सेवा या केंद्रांकडून पुरविल्या जातात. पतपुरवठ्यासाठी बँकांशी दुवा साधण्यासारख्या मूलभूत सेवेपासून सुरूवात करून या केंद्रांनी कृषि सेवा केंद्र, कृषि उपयोगी सामग्री संग्रह केंद्र, पशुखाद्य उत्पादन आणि व्यवसाय प्रशिक्षण केंद्र या सारख्या सामाजिक आस्थापना देखील सुरु केल्या आहेत. गेल्या आठ वर्षात, या केंद्रांनी गरीब महिलांना बँकांशी संपर्क साधून  देण्यात आणि ₹ १,६३३ कोटी कर्ज स्व-सहाय्यता गटांना मिळवून देण्यात यश मिळविले आहे. सदर कर्जाच्या परतफेडीचे प्रमाण ९८ टक्क्यांपर्यंत राखण्यात यशस्वी ठरले आहे. बँकांकडून मिळणारे कर्ज  व्यवहारावरील कमिशन, स्व-सहाय्यता गटांकरीता विविध विकास कार्यक्रम राबविल्याबद्दल त्यांच्याकडून मिळणारे सेवाशुल्क आणि सामाजिक आस्थापना उपक्रमांतून मिळणारे उत्पन्न या सारख्या आर्थिक स्त्रोतांद्वारे मिळणाऱ्या उत्पन्नामुळे माविम ने स्थापन केलेली सुमारे ८० टक्के लोक संचालित साधन केंद्रे आर्थिकदृष्ट्या स्वावंलबी  झाली आहेत.

## महिलांवरील अत्याचार

१०.४२ महिलांवर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष शारीरिक किंवा मानसिकरित्या केल्या जाणाऱ्या क्रूर कृत्यांना 'महिलांवरील अत्याचार' असे संबोधले जाते. अत्याचार झालेल्या महिलांबाबत नोंदवलेले गुन्हे तक्ता १०.३१ मध्ये दिले आहेत.

**आलेख १०.२ : निवडक राज्यांतील अत्याचार झालेल्या महिलांबाबत नोंदवलेले गुन्हे २०१६**




**तक्ता १०.३१ अत्याचार झालेल्या महिलांबाबत नोंदवलेले गुन्हे**

(संख्या)

| गुन्ह्याचा प्रकार | २०१५ | २०१६ | २०१७* |
|---|---|---|---|
| बलात्कार | ४,१४४ | ४,१८९ | ४,३५६ |
| अपहरण व पळवून नेणे | ५,०९६ | ६,१६९ | ७,११३ |
| हुंडाबळी | २६८ | २४८ | २३४ |
| पती व नातेवाईकांकडून झालेली क्रूर कृत्ये | ७,६४० | ७,२१५ | ६,२४२ |
| विनयभंग | ११,७१३ | ११,३९६ | १२,२३८ |
| लैंगिक अत्याचार | १,११९ | ९२४ | ८६४ |
| अनैतिक व्यापार | ३८१ | ३०३ | २८१ |
| इतर | ७६५ | ८३१ | ७७२ |
| **एकूण** | **३१,१२६** | **३१,२७५** | **३२,१००** |

*आधार* : गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र शासन * अस्थायी

## महाराष्ट्र राज्य महिला आयोग

१०.४३ महाराष्ट्र राज्य महिला आयोग ही एक वैधानिक संस्था असून आयोग नियमितपणे पीडित महिलांनी दाखल केलेल्या तक्रारींवर सुनावण्या / सार्वजनिक सुनावण्या घेते आणि मोफत कायदेविषयक सेवा व समुपदेशन पुरविते. पीडित महिलांना त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी व नि:संकोचपणे संवाद साधण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करुन देणे या प्राथमिक उद्दिष्टासाठी विभागवार व जिल्हावार सार्वजनिक सुनावण्यांचे आयोजन करुन 'महिला आयोग आपल्या दारी' नावाचा एक अभिनव उपक्रम व्यापकपणे राज्यभर राबविण्यात आला. यामुळे आयोगाला शक्य तितक्या लवकर व मोठ्या संख्येने प्रकरणांचा निपटारा करण्यास मदत झाली आहे. आयोग राज्यात सर्वत्र स्व-संरक्षण कार्यक्रम, लैंगिक समानतेविषयी जागरुकता, कायदेविषयक साक्षरता, सायबर गुन्हे, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ व कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम २०१३ यांची अंमलबजावणी, ॲसिड हल्ल्याने पीडित महिलांचे पुनर्वसन, पाळणाघरासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे, इत्यादी महिलांसबंधीच्या विविध मुद्यांवर कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रम आणि चर्चासत्रे आयोजित करते. या उपक्रमांवर सन २०१६-१७ मध्ये ₹ १.५२ कोटी खर्च झाला आणि सन २०१७-१८ मध्ये डिसेंबरपर्यंत ₹ १.७९ कोटी खर्च झाला.

## बाल विकास

१०.४४ मुले ही देशाचे भवितव्य असेलेली प्रमुख साधनसंपत्ती आहेत. त्यामुळे बाल्यावस्थेत विशेष लक्ष आणि संगोपनाची त्यांना गरज असते. बाल विकासाच्या विविध योजना राज्यात राबविण्यात येत आहेत.

१०.४४.१ **एकात्मिक बाल संरक्षण योजना :** आधार गृहे, विशेष दत्तक स्त्रोत संस्था, बाल कल्याण समिती, बाल न्याय मंडळ, जिल्हा बाल संरक्षण संस्था, राज्य बाल संरक्षण संस्था, शासकीय/स्वयंसेवी संस्थांची बाल गृहे,निरीक्षण गृहे,अनुरक्षण गृहे इत्यादी कार्यक्रम आता एकात्मिक बाल सरंक्षण योजनेंतर्गत समाविष्ट करण्यात आले आहेत. या योजनेंतर्गत लाभार्थ्यांवर झालेला घटकनिहाय खर्च तक्ता १०.३२ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.३२ एकात्मिक बाल विकास संरक्षण योजनेंतर्गत लाभार्थ्यांवर झालेला घटकनिहाय खर्च**

(₹ लाख)

| घटक | संस्थांची संख्या | खर्च २०१६-१७ | लाभार्थी संख्या | खर्च २०१७-१८+ | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| खुले निवारा गृह | ०३ | ३९.०० | ९८ | ८.६७ | १०५ |
| दत्तक संस्था | १७ | १२५.८८ | १८७ | ६१.७४ | १८७ |
| शासकीय बाल गृहे | २५ | २०६.७१ | ३९८ | ६४.०९ | ६५९ |
| शासकीय निरीक्षण गृहे | १२ | | १९७ | | २०९ |
| शासकीय अनुरक्षण गृहे | ०६ | | १४४ | | १२३ |
| स्वयंसेवी संस्थांची निरीक्षण गृहे | ४८ | १,५०८.०८ | १,७२४ | १,१२०.८२ | १,४५० |
| **एकूण** | **१११** | **१,८७९.६७** | **२,७४८** | **१,२५५.३२** | **२,७३३** |

*आधार* : महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे + नोव्हेंबरपर्यंत

१०.४४.२ **निरीक्षण गृहे** : विधी संघर्षग्रस्त आणि न्यायिक चौकशीसाठी पोलिसांनी ताब्यात घेतलेली मुले बाल न्याय मंडळांच्या आदेशानुसार निरीक्षण गृहात दाखल केली जातात. राज्यात ११ जिल्ह्यांत १२ शासकीय निरीक्षण गृहे असून त्यांची प्रवेश क्षमता ६०० आहे. याशिवाय स्वयंसेवी संस्थांची ४८ निरीक्षण गृहे (१९ मुलींसाठी व २९ मुलांसाठी) असून त्यांची प्रवेश क्षमता ४,२७५ आहे. शासनाकडून प्रति लाभार्थी दरमहा ₹ ९०० सहाय्यक अनुदान दिले जाते.

१०.४४.३ **बाल गृहे** : संगोपन आणि संरक्षणाची गरज असलेल्या १८ वर्षांपर्यंतच्या अनाथ, सोडलेल्या, हरवलेल्या, विशेष काळजीची गरज असलेल्या एच.आय.व्ही./एड्स बाधित, संकटग्रस्त आणि अत्याचारित मुलांना बाल गृहांत प्रवेश दिला जातो. त्यांना अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकीय मदत, समुपदेशन, शिक्षण, प्रशिक्षण आणि मनोरंजन यांसारख्या सुविधा पुरवून त्यांचे पुनर्वसन केले जाते. राज्यात २५ शासकीय बाल गृहे असून त्यांची प्रवेश क्षमता २,६६५ आहे. याशिवाय स्वयंसेवी संस्थांची ७१,७४७ प्रवेश क्षमता असलेली ८४८ अनुदानित बाल गृहे आणि ३,८४० प्रवेश क्षमता असलेली ६३ विनाअनुदानित बाल गृहे आहेत. शासनाकडून प्रति लाभार्थी दरमहा ₹ १,२१५ व एच.आय.व्ही./एड्स बाधित मुलासाठी दरमहा ₹ १,३०५ याप्रमाणे या बाल गृहांना सहायक अनुदान देण्यात येते. या योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये ८,६८९ लाभार्थ्यांवर ₹ २५.६६ कोटी खर्च झाला आणि सन २०१७-१८ मध्ये डिसेंबरपर्यंत १०,९८३ लाभार्थ्यांवर ₹ १८.२७ कोटी खर्च झाला.

१०.४४.४ **अनुरक्षण गृहे** : वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यावर बाल गृहातील मुलांना बाल गृह सोडावे लागते. तथापि प्रशिक्षण किंवा शिक्षण अपूर्ण राहिल्यामुळे त्यांच्यापैकी काही मुलांचे पूर्णपणे पुनर्वसन झालेले नसते आणि त्यांना अन्न, वस्त्र व निवाऱ्याची आवश्यकता असते. अशा मुलांचे अनुरक्षण गृहांत पुनर्वसन केले जाते. शिक्षण पूर्ण होईपर्यंत किंवा रोजगार मिळेपर्यंत प्रवेशितांना अनुरक्षण गृहांत अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, वैद्यकिय सुविधा, समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन, इत्यादी सुविधा पुरविण्यात येतात. राज्यात सहा शासकीय व तीन स्वयंसेवी संस्थांची अनुरक्षण गृहे असून त्यांची प्रवेश क्षमता अनुक्रमे ६०० व ११० आहे. राज्य शासनाकडून प्रति लाभार्थी दरमहा ₹ १,२१५ सहायक अनुदान या अनुरक्षण गृहांना देण्यात येते.

१०.४४.५ **बाल संगोपन योजना** : राज्यातील अनाथ, निराधार, गरजू व बेघर मुलांना कौटुंबिक जीवन प्रदान करण्यासाठी ही योजना राबविण्यात येत आहे. राज्यात १३७ स्वयंसेवी संस्थांमार्फत १३,००४ बालकांचे संगोपन केले जाते. या योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये १३,८६३ लाभार्थ्यांवर ₹ ७.७५ कोटी खर्च झाला आणि सन २०१७-१८ मध्ये नोव्हेंबरपर्यंत ११,०४३ लाभार्थ्यांवर ₹ १.१९ कोटी खर्च झाला.

१०.४४.६ **चाचा नेहरू बाल महोत्सव योजना** : राज्यातील सर्व मुले आणि प्राधान्याने पुनर्वसनासाठी शासकीय/स्वयंसेवी संस्थांमध्ये दाखल केलेल्या अनाथ, निराधार, गरजू व बेघर मुलांच्या सुप्तगुणांना वाव देऊन त्यांच्यात बंधुत्व व संघभावना निर्माण व्हावी यासाठी चाचा नेहरू बाल महोत्सव राज्यातल्या ३६ जिल्ह्यांत व सहा प्रादेशिक विभागांत दरवर्षी नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात आयोजित करण्यात येतो. क्रीडा, खेळ, वक्तृत्व, इत्यादी विविध प्रकारच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात आणि विजेत्यांना बक्षीसे दिली जातात. जिल्हास्तरीय कार्यक्रमासाठी ₹ पाच लाख तर विभागीय स्तरावरील कार्यक्रमाकरिता ₹ ५.८२ लाख अनुदान मंजूर करण्यात येते. या योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये ₹ ३२.८२ लाख खर्च झाला आणि सन २०१७-१८ मध्ये नोव्हेंबरपर्यंत ₹ ६१.१३ लाख खर्च झाला.

## एकात्मिक बाल विकास सेवा

१०.४५ ग्रामीण,आदिवासी व झोपडपट्टी भागातील शालेयपूर्व बालकांची योग्य वाढ व विकास साधण्यासाठी एकात्मिक पद्धतीने सेवा पुरविणे हे एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे उद्दिष्ट आहे. हा कार्यक्रम ९७,४७५ अंगणवाड्या, १३,०११ मिनी अंगणवाड्या आणि ५५३ बाल विकास प्रकल्पांमार्फत राबविला जातो.

## पोषण कार्यक्रम

१०.४५.१ बालके, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता यांच्या पोषणविषयक किमान गरजा भागविण्यासाठी व त्यांना आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी पूरक पोषण आहार कार्यक्रम एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत राबविण्यात येतो. समाजातील वंचित घटकांतील सहा वर्षापेक्षा कमी वयाच्या बालकांना पोषण आहार देणे, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता यांचे आरोग्य सुधारणे हे पूरक पोषण कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. दुर्गम व संवेदनशील भागातील कुपोषण नियंत्रित करुन अर्भक मृत्यू कमी करणे हे सुध्दा या योजनेचे एक उद्दिष्ट आहे. या योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये, ६५.९८ लाख लाभार्थ्यांवर ₹ ७८७ कोटी खर्च झाला आणि सन २०१७-१८ मध्ये नोव्हेंबरपर्यंत ६२.२० लाख लाभार्थ्यांवर ₹ ४७९ कोटी खर्च झाला.

१०.४५.२ सन २०१०-११ पासून बालकांचे योग्य वजनाची, कमी वजनाची व अतिकमी वजनाची बालके असे वर्गीकरण जागतिक आरोग्य संघटनेच्या मानकांनुसार करण्यात येते. बालकांची (० ते ५ वर्षे) पोषण श्रेणीनिहाय टक्केवारी तक्ता १०.३३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३३ बालकांची (० ते ५ वर्षे) पोषणश्रेणीनिहाय टक्केवारी**

(टक्के)

| वर्ष | क्षेत्र | वजन केलेली बालके (संख्या) | योग्य वजनाची बालके | कमी वजनाची बालके | अतिकमी वजनाची बालके |
|---|---|---|---|---|---|
| २०१५-१६ | ग्रामीण | ४२,९५,९६३ | ९२.५ | ६.४ | १.०४ |
| | आदिवासी | ८,८९,२५१ | ८२.४ | १४.४ | ३.०८ |
| | नागरी | १०,६८,७२५ | ८३.८ | १५.१ | १.०४ |
| | **एकूण** | **६२,५३,९३९** | **८९.६** | **९.०** | **१.३** |
| २०१६-१७ | ग्रामीण | ४१,६३,१७२ | ९२.९ | ६.१ | १.० |
| | आदिवासी | ८,९२,०६८ | ८१.७ | १५.१ | ३.२ |
| | नागरी | १०,५६,२१० | ८३.८ | १५.२ | १.० |
| | **एकूण** | **६१,११,४५०** | **८९.७** | **९.०** | **१.३** |
| २०१७-१८+ | ग्रामीण | ४०,४७,१३३ | ९२.५ | ६.५ | १.१ |
| | आदिवासी | ८,६१,६४४ | ८१.२ | १५.३ | ३.५ |
| | नागरी | ९,९७,३२६ | ८३.७ | १५.४ | ०.९ |
| | **एकूण** | **५९,०६,१०३** | **८९.३** | **९.३** | **१.४** |

*आधार* : एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + नोव्हेंबरपर्यंत

१०.४६ राज्यात राबविल्या जाणाऱ्या बालकांविषयक काही महत्वाच्या राज्य व केंद्र पुरस्कृत योजना:

१०.४६.१ **राजीव गांधी किशोर वयीन मुलींचे सक्षमीकरण (सबला) :** ११ ते १८ वर्षे वयोगटातील किशोरवयीन मुलींना आरोग्य, स्वच्छता, पोषण, कुटुंब व बाल संगोपन, पौगंडावस्थेतील प्रजनन व लैंगिक आरोग्य, गृह कौशल्ये, जीवन कौशल्ये व व्यावसायिक कौशल्ये, इत्यादी प्रशिक्षण देऊन त्यांचे सक्षमीकरण करणे या योजनेचे उद्दिष्ट आहे. या योजनेंतर्गत मुलींना अंगणवाडी केंद्रात सुक्ष्म पोषण तत्वयुक्त घरपोच आहार, लोहयुक्त व जंतनाशक गोळ्या, आरोग्य तपासण्या आणि संदर्भ वैद्यकीय सेवा पुरविल्या जातात. सदर योजना ११ जिल्ह्यांमध्ये २०७ प्रकल्पांमार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये ७.८३ लाख लाभार्थ्यांवार ₹ ६९.७४ कोटी खर्च झाला आणि सन २०१७-१८ मध्ये जानेवारीपर्यंत ८.०४ लाख लाभार्थ्यांवर ₹ ५९.९२ कोटी खर्च झाला.

१०.४६.२ **किशोरी शक्ती योजना :** सबला योजना राबविण्यात येत नसलेल्या जिल्ह्यांमध्ये ही योजना राबविण्यात येत आहे. ११ ते १८ वर्षे वयोगटातील मुलींना पूरक पोषण आहार, लोहयुक्त गोळ्या व जंतनाशक गोळ्या आणि नियमित आरोग्य तपासण्या पुरविल्या जातात. या मुलींना आरोग्य, स्वच्छता, पोषण, कुटुंब कल्याण, गृहव्यवस्थापन, बालसंगोपन, वैयक्तिक व परिसर स्वच्छता, गृह कौशल्ये व व्यावसायिक कौशल्ये या बाबींचे प्रशिक्षण देखील दिले जाते. या योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये २.०८ लाख लाभार्थ्यांवर ₹ ४०.३९ लाख खर्च झाला आणि सन २०१७-१८ मध्ये जानेवारीपर्यंत १.३४ लाख लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.

१०.४६.३ **भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना :** अनुसूचित आणि अतिरिक्त आदिवासी घटक कार्यक्रम क्षेत्रात, उष्मांक व प्रथिने यांच्या अभावामुळे निर्माण झालेल्या कुपोषणाच्या समस्येचा सामना करण्याच्या उद्देशाने ही योजना राबविली जात आहे. गर्भधारणेनंतर प्राथमिक आरोग्य केंद्रात आणि जवळच्या अंगणवाडी / मिनी अंगणवाडी केंद्रात नोंदणी केल्यापासून गर्भवती महिला व स्तनदा माता यांना सहा महिने पूर्ण होईपर्यंत आठवड्यातील प्रत्येक दिवशी (रविवार वगळता), एका वेळेचा पूर्ण चौरस आहार देण्यात येतो. अंगणवाडी केंद्रात नाव नोंदविलेल्या सात महिने ते सहा वर्षे वयोगटातील शाकाहारी मुलास दोन केळी आणि मांसाहारी मुलास एक उकडलेले अंडे आठवड्यात चार वेळा म्हणजेच महिन्यातून १६ दिवस दिले जाते. या योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये ४.८३ लाख गर्भवती व स्तनदा माता आणि २१.९६ लाख मुले यांच्याकरिता ₹ १३२.५८ कोटी खर्च झाला आणि सन २०१७-१८ मध्ये जानेवारीपर्यंत ४.०६ लाख गर्भवती व स्तनदा मातांना आणि २२.३८ लाख मुलांना लाभ देण्यात आला.

१०.४६.४ **राजीव गांधी राष्ट्रीय पाळणाघर योजना :** कुटुंबाचे मासिक उत्पन्न ₹ १२,००० पर्यंत असलेल्या ग्रामीण व नागरी भागातील नोकरी करणाऱ्या महिलांच्या सहा महिने ते सहा वर्षे वयोगटातील बालकांना या योजनेंतर्गत पाळणाघराची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. बालकांना दररोज साडे सात तास याप्रमाणे महिन्यातील २६ दिवस या पाळणाघरांत ठेवण्याची सुविधा आहे. त्यांना पूर्वशालेय शिक्षण, पूरक पोषण आहार, आरोग्य तपासणी, लसीकरण, इत्यादी सेवा पुरविण्यात येतात. या योजनेंतर्गत राज्यातील १,६७० पाळणाघरे समाविष्ट आहेत.

१०.४६.५ **बेटी बचाओ बेटी पढाओ योजना :** मुलींच्या जीविताची, सुरक्षिततेची व शिक्षणाची हमी किंवा खात्री देणे आणि लिंगभेदावर आधारीत लिंग निवड प्रथेचे निर्मूलन करणे ही या योजनेची उद्दिष्टे आहेत. ही योजना बीड, जळगाव, अहमदनगर, बुलढाणा, औरंगाबाद, वाशिम, कोल्हापूर, उस्मानाबाद, सांगली, जालना, हिंगोली, सोलापूर, पुणे, परभणी, नाशिक आणि लातूर या जिल्ह्यांत राबविण्यात येत आहे.

१०.४६.६ **माझी कन्या भाग्यश्री योजना :** मुलींच्या जन्मदरात वाढ करणे, गर्भजल परिक्षण रोखणे, मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन व हमी देणे आणि मुलींच्या आरोग्याचा दर्जा सुधारणे ही या योजनेची उद्दिष्टे असून ही योजना समाजाच्या सर्व घटकांतील मुलगी असलेल्या व कौटुंबिक वार्षिक उत्पन्न ₹ ७.५० लाखापर्यंत असलेल्या कुटुंबाना लागू करण्यात आली आहे. या योजनेतंर्गत एका मुलीच्या जन्मानंतर मातेने/पित्याने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यानंतर मुलीच्या नावे ₹ ५०,००० रक्कम बँकेत मुदत ठेव योजनेत गुंतविण्यात येते. दोन मुलींच्या जन्मांनंतर मातेने/पित्याने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यास प्रत्येक मुलीच्या नावे ₹ २५,००० रक्कम बँकेत मुदत ठेव योजनेत गुंतविण्यात येते. मुलीच्या वयाच्या सहाव्या व बाराव्या वर्षी केवळ सदर रकमेवरील व्याज काढता येते आणि मुलीच्या वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर पूर्ण रक्कम (मुद्दल व व्याज) काढता येते.

## बालकांवरील अत्याचार

१०.४७ बालकांवरील अत्याचाराचे जे गुन्हे घडतात किंवा ज्या गुन्ह्यात बालके पीडित असतात असे गुन्हे 'बालकांवरील अत्याचाराचे गुन्हे' म्हणून संबोधले जातात. अत्याचार झालेल्या बालकांबाबत नोंदवलेले गुन्हे तक्ता १०.३४ मध्ये दिले आहेत.

**आलेख १०.३ : निवडक राज्यांतील अत्याचार झालेल्या बालकांबाबत नोंदवलेले गुन्हे २०१६**




**तक्ता १०.३४ अत्याचार झालेल्या बालकांबाबत नोंदवलेले गुन्हे**

(संख्या)

| गुन्ह्याचा प्रकार | २०१५ | २०१६ | २०१७* |
|---|---|---|---|
| खून | २१४ | १३२ | १४७ |
| पैकी, | | | |
| गर्भातील जीव | ७ | ४४ | २४ |
| इतर | २०७ | ८८ | १२३ |
| बालकांवरील बलात्कार | २,२३१ | २,०८६ | २,३०५ |
| अपहरण व पळवून नेणे | ६,९६० | ८,०१६ | ८,८५० |
| परित्याग | १३ | २६ | १२३ |
| इतर | ४,५२३ | ३,३३१ | ४,१०९ |
| **एकूण** | **१३,९४१** | **१३,५९१** | **१५,५३४** |

आधार : गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र शासन * अस्थायी

# रोजगार व दारिद्र्य

१०.४८ रोजगाराचा स्तर, त्याची संरचना आणि रोजगाराच्या संधीमध्ये वाढ हा अर्थ व्यवस्थेच्या विकास प्रक्रियेचा एक महत्वाचा संकेत आहे. राज्यातील श्रमशक्तीला रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध होण्यासाठी पोषक वातावरण तयार करणे हे शासनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. 'शाश्वत विकास ध्येये' अंतर्गत सर्व प्रकारची गरीबी नष्ट करणे आणि गुणवत्ता पूर्ण व सुयोग्य रोजगार निर्मिती यावर भर देण्यात आला आहे. उत्पादनशील व निरंतर रोजगाराबरोबर दारिद्र्य निर्मुलन कार्यक्रम हा नेहमीच शासनाचा आघाडीचा उपक्रम राहिला आहे.

## रोजगार

१०.४९ रोजगाराबाबतची स्थिती दर्शविणाऱ्या आकडेवारीचे मुख्य स्रोत जनगणना, आर्थिक गणना, श्रम केंद्र यांनी घेतलेल्या 'रोजगार व बेरोजगारविषयक' पाहण्या आणि राष्ट्रीय नमुना पाहण्या हे आहेत. कारखान्यांमधील (कारखाने अधिनियम-१९४८ खालील नोंदणीकृत) रोजगार विषयक माहिती वैधानिक विवरणपत्राव्दारे उपलब्ध होते. याव्यतिरिक्त सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील आस्थापनांमधील रोजगार विषयक माहिती रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रम अंतर्गत गोळा केली जाते.

### जनगणना २०११ नुसार रोजगार विषयक माहिती

१०.५० जनगणना २०११ नुसार, राज्यात ४.९४ कोटी कामगार होते, त्यामध्ये स्त्रीयांचे प्रमाण ३४ टक्के आहे. देशाचा कार्य सहभाग दर ३९.८ टक्के आहे. कार्य सहभाग दरानुसार देशातील प्रमुख राज्यांमध्ये आंध्रप्रदेश, तामीळनाडू, कर्नाटक नंतर महाराष्ट्र चौथ्या स्थानावर असून राज्याचा कार्य सहभाग दर ४४ टक्के आहे. महाराष्ट्रात साक्षर व्यक्तींचा कार्य सहभाग दर ४७.९ टक्के तर निरक्षर व्यक्तींचा ३३.७ टक्के आहे. जनगणना २०११ नुसार, कृषी व संलग्न क्षेत्रामध्ये कार्यरत कामगारांची टक्केवारी ४६.१ आहे तर जनगणना २००१ नुसार ती ४५.१ टक्के आहे. जनगणना १९७१ ते २०११ मधील उद्योग प्रकारानुसार कामगारांची टक्केवारी तक्ता १०.३५ मध्ये व शैक्षणिक स्तरानुसार कामगारांचे प्रमाण व कार्य सहभाग दर तक्ता १०.३६ मध्ये दिले आहे. जनगणना २०११ नुसार कामगारांचे आर्थिक कार्यानुसार वर्गीकरण परिशिष्ट १०.८ मध्ये दिले आहे.

**तक्ता १०.३५ उद्योग प्रकारानुसार राज्यातील कामगारांची टक्केवारी**

(टक्के)

| कामगारांचे वर्गीकरण | १९७१@ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ |
|---|---|---|---|---|---|
| **मुख्य कामगार** | **१००.०** | **९१.०** | **९१.४** | **८४.३** | **८८.५** |
| अ) **कृषी व संलग्न कार्ये** | | | | | |
| शेतकरी | ३५.५ | ३१.९ | ३०.० | २४.८ | २३.२ |
| शेतमजूर व मासेमारी | ३०.९ | २६.० | २५.९ | २०.३ | २२.९ |
| ब) **बिगर कृषी कार्ये** | | | | | |
| खाणकाम व दगडकाम | ०.३ | ०.३ | ०.३ | ०.४ | ०.२ |
| वस्तूनिर्माण (घरगुती व घरगुती उद्योगांव्यतिरिक्त इतर उद्योग) | १३.१ | १२.७ | १२.१ | ११.० | १०.५ |
| बांधकाम | १.५ | २.० | २.४ | ३.४ | ४.१ |
| व्यापार | ६.७ | ६.५ | ७.८ | ७.१ | ६.४ |
| वाहतूक, साठवण आणि दळणवळण | ३.० | ३.० | ३.४ | ४.३ | ५.८ |
| इतर | ९.० | ८.६ | ९.५ | १३.० | १५.५ |
| **सीमांतिक कामगार** | | ९.० | ८.६ | १५.७ | ११.५ |
| **एकूण कामगार (कोटी)** | **१.८४** | **२.६७** | **३.३९** | **४.१२** | **४.९४** |

*आधार*: भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय.

@ सीमांतिक कामगार असे वर्गीकरण उपलब्ध नाही

## तक्ता १०.३६ शैक्षणिक स्तरानुसार राज्यातील कामगारांचे प्रमाण व कार्य सहभाग दर - जनगणना २०११

(टक्के)

| शैक्षणिक स्तर | कामगारांचे प्रमाण | | | | | | कार्य सहभाग दर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुख्य कामगार | | | सीमांतिक कामगार | | | | | |
| | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण |
| निरक्षर | १३.३ | ३५.४ | २०.३ | १६.८ | ३६.० | २७.१ | ३४.१ | ३३.५ | ३३.७ |
| साक्षर | ८६.७ | ६४.६ | ७९.७ | ८३.२ | ६४.० | ७२.९ | ६२.३ | २९.९ | ४७.९ |
१०.९१ सन २०१६-१७ मध्ये २७ महानगरपालिका क्षेत्रांमध्ये प्रति दिन अंदाजित ६,२६५ दशलक्ष लिटर्स सांडपाण्याची निर्मिती झाली असून त्यापैकी अंदाजे ३,८९७ (६२.२ टक्के) दशलक्ष लिटर्स सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात आली. मप्रनिमं राज्यातील नद्यांच्या काठावरील शहरामध्ये सांडपाणी प्रक्रीया यंत्रणा प्राध्यान्याने उभारित आहे. मप्रनिमं कोणत्याही उद्योगास विनाप्रक्रीया सांडपाण्याचा विसर्ग करण्यास परवानगी देत नाही. सन २०१६-१७ मधील राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील सांडपाण्याची निर्मिती व प्रक्रियेबाबतची माहिती तक्ता १०.६६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६६ सन २०१६-१७ मधील नागरी स्थानिक संस्थांच्या क्षेत्रातील सांडपाणी निर्मिती व प्रक्रियेची माहिती**

| स्थानिक संस्था | माहिती देणाऱ्या संस्था | सांडपाणी निर्मिती (दशलक्ष लिटर प्रतिदिन) | सांडपाणी प्रक्रिया (दशलक्ष लिटर प्रतिदिन) | प्रक्रिया टक्के वारी |
|---|---|---|---|---|
| महानगर पालिका | २७ | ६,२६५ | ३,८९७ | ६२.२ |
| अ वर्ग नगर पालिका | १२ | १८९ | ९७ | ५१.३ |
| ब वर्ग नगर पालिका | ५१ | ३६८ | २५ | ६.७ |
| क वर्ग नगर पालिका | १५८ | ४२१ | २१ | ५.० |
| कटक मंडळे | ६ | ३९ | ७ | १८.० |
| नगर पंचायत | ६ | १६ | ३ | १८.८ |
| **एकूण** | **२६०** | **७,२९८** | **४,०५०** | **५५.५** |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

१०.९२ महापालिका घन कचरा प्रक्रियेमध्ये यांत्रिकी व जैविक प्रक्रियेचा समावेश केला आहे. नागरी भागात निर्माण होणाऱ्या एकूण सांडपाणी व घन कचरा पैकी ८६ टक्के ची निर्मिती राज्यांच्या महानगरपालिका क्षेत्रात होते व उर्वरित १४ टक्के सांडपाणी व घनकचरा निर्मिती उर्वरित नागरी स्थानिक संस्थांच्या क्षेत्रात होत असल्याने राज्यतील २७ महानगरपालिकांना त्यांच्या वार्षिक अंदाजपत्रकाच्या २५ टक्के रक्कमेची तरतूद सांडपाणी व नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. राज्यातील सन २०१६-१७ मधील नागरी स्थानिक संस्थांच्या क्षेत्रातील घनकचरा निर्मिती व प्रक्रियेची माहिती तक्ता १०.६७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६७ सन २०१६-१७ मधील नागरी स्थानिक संस्थांच्या क्षेत्रातील घनकचरा निर्मिती व प्रक्रियेची माहिती**

| स्थानिक संस्था | माहिती देणाऱ्या संस्था | घन कचरा निर्मिती (प्रति दिन मे.टन) | घन कचरा प्रक्रिया (प्रति दिन मे.टन) | प्रक्रिया टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| महानगर पालिका | २७ | २०,३३४ | ७,१२० | ३५.० |
| अ वर्ग नगर पालिका | १६ | ८९० | १४० | १५.७ |
| ब वर्ग नगर पालिका | ५४ | १,०४९ | १३३ | १२.७ |
| क वर्ग नगर पालिका | १५० | १,०३१ | ९७ | ९.४ |
| नगर पंचायत/कटक मंडळे | १५ | १४६ | ५४ | ३७.० |
| **एकूण** | **२६२** | **२३,४५०** | **७,५४४** | **३२.२** |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## ध्वनी प्रदूषण

१०.९३ ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम-२००० नुसार क्षेत्रनिहाय ध्वनी स्तर मर्यादा प्रमाणके तक्ता १०.६८ मध्ये दिले आहेत.

१०.९४ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत ध्वनी प्रदूषणाचा परिणाम तपासण्याकरिता प्रमुख शहरांमध्ये सलग दोन दिवस (एक कामकाजाचा व एक सुट्टीचा दिवस) ४८ तासांच्या कालावधीकरिता परिसर ध्वनी-स्तर संनियंत्रण कार्यक्रम दरवर्षी आयोजित केला जातो. दोन्ही दिवशी त्याच ठिकाणी समान कालावधीकरिता ध्वनी-स्तर मोजला जातो. निवडक शहरांमधील दिवस-रात्रीचे ध्वनी-स्तराचे प्रमाण तक्ता १०.६९ मध्ये दिले आहे.

**तक्ता १०.६८ क्षेत्रनिहाय ध्वनी स्तर मर्यादा प्रमाणके**

(डेसिबल)

| क्षेत्र संकेतांक | क्षेत्राचा प्रकार | मर्यादा | |
|---|---|---|---|
| | | दिवसा | रात्री |
| अ | औद्योगिक | ७५ | ७० |
| ब | वाणिज्यिक | ६५ | ५५ |
| क | निवासी | ५५ | ४५ |
| ड | शांतता प्रभाग | ५० | ४० |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

**तक्ता १०.६९ निवडक शहरांमधील दिवस-रात्रीचे ध्वनी-स्तराचे प्रमाण**

(डेसिबल)

| ठिकाण | सुट्टीचा दिवस २४-१२-२०१७ | | कामकाजाचा दिवस २६-१२-२०१७ | |
|---|---|---|---|---|
| | दिवसा | रात्री | दिवसा | रात्री |
| मुंबई (शिवाजी पार्क – दादर) | ७२.१ | ६९.३ | ८५.५ | ७०.२ |
| मुंबई (वाशी नाका – चेंबूर) | ७३.२ | ७४.२ | ८२.२ | ६३.२ |
| ठाणे (गोखले रोड) | ६९.८ | ५६.२ | ८२.७ | ६२.९ |
| ठाणे (वागळे इस्टेट) | ७२.२ | ६४.८ | ८१.७ | ५९.९ |
| पुणे (स्वारगेट) | ७७.५ | ५८.७ | ७७.६ | ५९.४ |
| पुणे (हडपसर) | ७७.७ | ५९.९ | ७७.४ | ६०.४ |
| नाशिक (द्वारका सर्कल) | ७४.९ | ६६.६ | ७४.२ | ६७.१ |
| नाशिक (उद्योग भवन, सातपुर) | ६९.३ | ५९.१ | ७१.४ | ६१.९ |
| औरंगाबाद (निराला बजार) | ७१.९ | ६०.५ | ६६.० | ५४.१ |
| नांदेड- वाघोला (विष्णुपुरी) | ६९.२ | ५९.७ | ७०.१ | ५२.६ |
| नागपूर (सीताबर्डी पोलीस स्टेशन) | ७२.५ | ५८.० | ७४.३ | ६४.१ |
| चंद्रपूर (जटपुरा गेट) | ७४.० | ७१.१ | ७८.१ | ६३.९ |
| अमरावती (राजकमल चौक) | ७२.९ | ६०.६ | ७४.३ | ६२.२ |
| अकोला (जिल्हाधिकारी कार्यालय) | ६९.० | ५०.० | ७०.१ | ४८.६ |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## औद्योगिक प्रदूषण

१०.९५ मार्च, २०१७ अखेर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अख्यत्यारित एकूण ८५,८८२ उद्योग होते. सामायिक सांडपाणी प्रक्रिया संयंत्र योजने अंतर्गत लघु उद्योगांमध्ये निर्माण होणाऱ्या घातक घनकचऱ्यावर प्रक्रिया करणे आणि विल्हेवाट लावण्यासाठी प्रदूषण नियंत्रण उपकरणे बसविण्यासाठी आर्थिक मदत दिली जाते. सामायिक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रे २५ औद्योगिक वसाहतीतील ७,९२७ कारखान्यांसाठी कार्यान्वित करण्यात आली आहेत. सन २०१६-१७ मध्ये प्रति दिन सरासरी २१५.८५ दशलक्ष लिटर्स सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात आली. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सन २०१६-१७ मधील उद्योगांचे प्रदूषण निर्देशांकानुसार केलेले वर्गीकरण तक्ता १०.७० मध्ये दिले आहे.

**तक्ता १०.७० प्रदूषण निर्देशांकावर आधारित सन २०१६-१७ मधील उद्योगांचे वर्गीकरण**

(संख्या)

| नियंत्रण मंडळाचे विभाग | उद्योग | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लाल | | | नारंगी | | | हिरवा | | |
| | मोठा | मध्यम | लहान | मोठा | मध्यम | लहान | मोठा | मध्यम | लहान |
| मुंबई | २३१ | ५९ | ५४७ | ४२१ | ३०० | ६६३ | - | २७ | १,८४६ |
| ठाणे | २०४ | ३३ | ९७६ | २५१ | २४ | ४५१ | १ | १३ | १,२७३ |
| कल्याण | १४१ | १०९ | १,७८४ | ७९ | ५८ | ९३२ | - | २२ | १,४७२ |
| नवी मुंबई | १८३ | ३३ | १,१३३ | १३६ | १७८ | ९५४ | ६ | ५९ | १,५४२ |
| रायगड | १७५ | ३१ | ४२८ | ८८ | ३४ | ३५५ | - | २० | ४४७ |
| पुणे | १,१८५ | २३८ | ३,४०३ | १,०८३ | ५०९ | ४,४३१ | ८५ | २६५ | ६,७२० |
| कोल्हापूर | २५० | ७५ | १,६८८ | ३२ | ४८ | ३,६५६ | १ | २२ | ९,१०६ |
| नाशिक | ४३२ | ८५ | ३,२४९ | १०९ | ५५ | २,३१५ | ४४ | ३५ | ६,११८ |
| औरंगाबाद | २०४ | ७३ | ८८१ | ३४ | ७० | २,००४ | ११ | १४ | ५,३९१ |
| अमरावती | ५५ | १३ | ३२१ | ८ | १० | १,९३३ | - | ४ | ४,३१५ |
| नागपूर | ४१३ | १८ | १,८९८ | ६२ | २१ | २,२१८ | ३ | ३ | १,६६६ |
| चंद्रपुर | १५६ | - | २६८ | १५ | - | ४१० | - | २ | ४३० |
| **एकूण** | **३,६२९** | **७६७** | **१६,५७६** | **२,३१८** | **१,३०७** | **२०,३२२** | **१५१** | **४८६** | **४०,३२६** |

लाल - ६० किंवा अधिक प्रदूषण निर्देशांक असलेल्या उद्योगांची संख्या
नारंगी - ४१ ते ५९ च्या दरम्यान प्रदूषण निर्देशांक असलेल्या उद्योगांची संख्या
हिरवा - २१ ते ४० च्या दरम्यान प्रदूषण निर्देशांक असलेल्या उद्योगांची संख्या

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## घातक कचरा

१०.९६ राज्यात ६,४९६ उद्योगातून घातक कचरा तयार होतो. राज्यातील ठाणे येथील तळोजा व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे ठाणे खाडी किनारपट्टीवरील औद्योगिक क्षेत्र, पुणे येथील रांजणगाव आणि नागपूर येथील बुटीबोरी या चार प्रमुख ठिकाणी घातक कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी सामायिक सुविधा असणाऱ्या केंद्रांची उभारणी करण्यात आली आहे. सामायिक सुविधा केंद्रामध्ये प्रक्रिया केलेल्या घातक कचऱ्याबाबतची माहिती तक्ता १०.७१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७१ सामाईक सुविधा केंद्राव्दारे प्रक्रिया केलेल्या घातक कचऱ्याबाबतची माहिती**

(लाख मे टन)

| वर्ष | प्रक्रियेचा प्रकार | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | थेट जमिनीत पुरणे | प्रक्रिया केल्यानंतर जमिनीत पुरणे | भस्मीकरण करण्याजोगे | |
| २०१४-१५ | ०.८९ | १.१९ | ०.४९ | २.५९ |
| २०१५-१६ | ०.७९ | १.६० | ०.५८ | २.९८ |
| २०१६-१७ | १.२२ | १.७३ | ०.५५ | ३.५१ |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

१०.९७ घातक कचरा वाहून नेणाऱ्या वाहनांचा मागोवा घेण्यासाठी वाहनांवर ग्लोबल पोझिशनिंग सिस्टीम (जीपीएस) स्थापित करणे राज्यात अनिवार्य करण्यात आले आहे. डिसेंबर, २०१७ अखेर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने १२७ घातक कचरा वाहतूकदारांना प्राधिकृत केले आहे.

## ई-कचरा

१०.९८ ई-कचऱ्याचे व्यवस्थापन ही जागतिक चिंतेची बाब आहे. सन २०१६-१७ मध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ई-कचऱ्याची पुर्नप्रक्रिया करता यावी यासाठी ६४ ई-कचरा संकलन केंद्रांना आणि ई-कचरा (व्यवस्थापन) नियम, २०१६ नुसार पर्यावरणास अनुकुल पुर्नप्रक्रिया / विघटन तंत्रज्ञान असलेल्या ६४ उद्योगांना मान्यता दिली असून त्यांची एकूण क्षमता प्रतिवर्ष ७४,६५० मे. टन आहे.

## जैव-वैद्यकीय कचरा

१०.९९ जैव-वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम-२०१६ नुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आरोग्य सेवा आस्थापनांना जैव-वैद्यकीय कचरा विल्हेवाट करण्याचे प्राधिकार प्रदान करण्यास सुरुवात केली आहे. राज्यात एकूण ५२,७०४ आरोग्य सेवा आस्थापना आहेत. या आस्थापनांमध्ये निर्माण होणारा जैव-वैद्यकीय कचऱ्यावर राज्यात एकूण ३४ सामुहिक जैव-वैद्यकीय कचरा प्रकिया व विल्हेवाट केंद्रांद्वारे प्रक्रिया केली जाते त्यापैकी ३२ केंद्रे भस्मीकरण व उर्वरीत केंद्रे जमिनीत खोलवर पुरणे या पद्धतीची आहेत. सन २०१६-१७ मध्ये सरासरी प्रति दिन ७१,५१२ किलो जैव-वैद्यकीय कचऱ्यावर प्रक्रिया करुन विल्हेवाट लावण्यात आली.

## प्लास्टिक कचरा

१०.१०० प्लास्टिक उत्पादने ही दैनिक जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहेत. प्लास्टिक कचऱ्याचा अयोग्य संग्रह, विभक्तीकरण व विल्हेवाट लावण्याच्या पद्धतीमुळे अनेक पर्यावरणविषयक समस्या निर्माण होतात असे निदर्शनास येते. सन २०१६-१७ मध्ये, दरमहा अंदाजित १,२८५ मे.ट. प्लास्टिक कचरा निर्माण झाला होता. महाराष्ट्र प्लास्टिक कॅरी बॅग (निर्माण व वापर) नियम-२००६ आणि प्लास्टिक कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम-२०११ अन्वये २७६ उद्योग घटकांची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे नोंदणी झालेली आहे. या नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने १२ प्रादेशिक अधिकाऱ्यांचे दक्षता पथक तयार केले असून प्लास्टिक कॅरीबॅग उत्पादकांचे सर्वेक्षण करण्यात आले. नोंदणीकृत नसलेल्या ८८ उद्योगांना नोटीस निर्गमित करण्यात आली. महाराष्ट्र प्लास्टिक कॅरी बॅग (निर्माण व वापर) नियम-२००६ अन्वये कॅरी बॅगची कमीत कमी जाडी ५० $\mu$ असणे बंधनकारक आहे.

## पर्यावरणविषयक मान्यता

१०.१०१ पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ अंतर्गत केंद्र शासनाने महाराष्ट्र तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (१९९८), राज्य स्तर पर्यावरण प्रभाव मूल्यमापन प्राधिकरण (२००८) व राज्य स्तर तज्ञ मूल्यांकन समिती अनुक्रमे तटीय नियमन क्षेत्र व पर्यावरणविषयक मान्यता प्रदान करण्यासाठी गठीत केल्या आहेत. राज्यामध्ये पर्यावरणविषयक मान्यतेच्या कामांना गती येण्यासाठी तीन राज्यस्तरीय तज्ञ मूल्यांकन समिती स्थापित करण्यात आल्या आहेत.

१०.१०२ पर्यवरणविषयक मान्यता जानेवारी, २०१६ पासून ऑनलाईन सेवेद्वारे प्रदान करण्यात येते. डिसेंबर, २०१७ पर्यंत १६१ प्रकरणांना शासनाने ऑनलाईन प्रक्रीयेद्वारे पर्यवरणविषयक मान्यता देण्यात आल्या आहेत. सन २०१७-१८ मध्ये महाराष्ट्र तटीय व्यवस्थापन प्राधिकरणाकडून सागरी किनारपट्टी नियमन क्षेत्र (सीआरझेड) अधिसूचना, २०११ नुसार ३०१ प्रकल्पांना डिसेंबर, २०१७ पर्यंत शिफारसी देण्यात आल्या आहेत.

## सरोवर संवर्धन योजना

१०.१०३ तलावांची अवनती रोखणे हा या योजनेचा उद्देश आहे. तलावांची अवनती रोखण्यासाठी राज्य शासनाने " राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना - अवनत तलावांसाठी " अंतर्गत सन २००७ पासून ५१ तलावांचा समावेश केला आहे. सदर तलावांच्या संवर्धनासाठी सन २०१७-१८ मध्ये ₹ ६३० लाख निधी मंजूर करण्यात आला असून ₹ ४८५ लाख निधी डिसेंबर, २०१७ अखेरपर्यंत संवितरीत करण्यात आला आहे.

## कांदळवन संवर्धन

१०.१०४ कांदळवन हे समुद्र व जमिन यांना जोडणारा भाग आहे. जगभरातील किनारपट्टीला वाढणाऱ्या जागतिक तापमानामुळे किनारपट्टूची होणारी धूप तसेच वाढणारी समुद्र पातळी ह्या गंभीर समस्या भेडसावत आहे. कांदळवने फक्त मातीची झीजच रोखतात असे नाही तर जमिनीचा भागाचे समुद्रात रूपांतर होण्यापासून बचाव करण्यासाठी उत्प्रेरकाचे काम करतात. वातावरणातील बदलांशी लढा देण्यासाठी तसेच चांगल्या राहणीमानासाठी सागरी किनारपट्टीवरील वन संसाधनाचे शाश्वत व्यवस्थापनात कांदळवन संवर्धनाचे महत्वपूर्ण योगदान आहे.

१०.१०५ भारतीय वन सर्वेक्षण- २०१७ च्या अहवालानुसार महाराष्ट्राच्या ७२० कि.मी. च्या सागरी किनारपट्टीपैकी ३०४ चौ. कि.मी. वर कांदळवनाचे आच्छादन आहे. महाराष्ट्रातील सागरी किनाऱ्यावर कांदळवनाच्या वीस दुर्मिळ प्रजाती आढळून आल्या आहेत. कांदळवने अनेक सागरी जीव त्यातही व्यावसायीकदृष्ट्या महत्वाच्या कोलंबी, खेकडा, मासे इ. च्या पैदास व वाढीसाठी महत्वपूर्ण आहे. यास्तव कांदळवनाच्या हानीमुळे फक्त अप्रत्यक्षरित्याच प्रभाव पडतो असे नाही तर मत्स्य उद्योगातील नुकसानीमुळे अर्थव्यवस्थेवरही परिणाम होतो.

१०.१०६ सन २०१७-१८ मध्ये शासनाने ₹ २४ कोटी निधीची तरतूद कांदळवनावर आधारित उपजीविकेची कार्ये विकसित करण्यासाठी केली आहे. कांदळवनाच्या शाश्वत संवर्धनासाठी खेकडा पालन शेती, कालव व शिंपले मशागत याद्वारे कांदळवनातून उत्पन्न कमाई क्षमता वाढविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. भारतीय वन सर्वेक्षण-२०१७ नुसार, राज्यातील कांदळवनाच्या क्षेत्रात २०१५ च्या तुलनेत ३७ टक्के वाढ दिसून आली आहे.

## समृद्ध गाव - ग्राम विकास योजना

१०.१०७ पर्यावरणाचे संवर्धन, जतन व संरक्षण करून समृद्ध व संपन्न गावाची निर्मिती करण्यासाठी शासनाने पर्यावरण संतुलित "समृद्ध ग्राम - ग्राम विकास योजना" सन २०१०-११ मध्ये सुरू केली. पर्यावरणाचे संतुलन राखून गावांचा शाश्वत विकास हा या योजनेचा उद्देश आहे. २०१६-१७ मध्ये ह्या योजनेअंतर्गत ३५१ ग्रामपंचायतींची निवड करण्यात आली व सदर ग्रामपंचायतींसाठी सन २०१७-१८ मध्ये पुरस्कार, प्रचार व प्रसिद्धी साठी शासनाने ₹ ४०.२० कोटी निधी संवितरीत केला.

# सामाजिक न्याय

१०.१०८ सामाजिक न्याय म्हणजे सर्व समावेशक समाजाच्या निर्मितीची संकल्पना असून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग, अल्पसंख्यांक, दिव्यांग व जेष्ठ नागरीक इत्यादी या निर्धारित समूहाच्या विकासासाठी आवश्यक सहाय्य करुन त्यांना उत्पादनक्षम, सुरक्षित आणि सन्माननीय जीवन जगण्यास मदत करणे होय. स्वातंत्र्य, समता व बंधुता यावर आधारित समाजाची रचना करणे हे समाजिक न्यायाचे तत्व आहे. भारतीय राज्यघटनेत समाविष्ट असलेल्या राज्य धोरणाच्या निदेशक तत्त्वांनुसार दुर्बल घटकांना समाजातील इतर घटकांच्या समान पातळीवर आणण्यासाठी विविध शैक्षणिक,आर्थिक व सामाजिक विकास कार्यक्रम हाती घेतले आहेत. राज्य शासनाने 'अनुसूचित जाती घटक कार्यक्रम' व 'आदिवासी घटक कार्यक्रम' असे दोन कार्यक्रम तयार केले आहेत.

## अनुसूचित जाती घटक कार्यक्रम

१०.१०९ अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत विकास क्षेत्रनिहाय नियतव्यय व खर्च तक्ता १०.७२ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.७२ अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत विकास क्षेत्रनिहाय नियतव्यय व खर्च**

(₹ कोटी)

| क्षेत्र | २०१५-१६ | | २०१६-१७ | | २०१७-१८ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | नियतव्यय | खर्च | नियतव्यय | खर्च | नियतव्यय | खर्च + |
| **अ) राज्यस्तरीय योजना** | **४,०९०.००** | **१,५५७.७६** | **४,३२५.६५** | **२,५९३.९८** | **४,५३१. ००** | **१,५९४.८२** |
| कृषि व संलग्न कार्ये | ६१.३० | ५४.८६ | १२८.४० | ५५.७१ | १९८. ०६ | ५७.०८ |
| ग्राम विकास | २०.०० | १४.५६ | ६९.५६ | ७२.८७ | १३९. ९२ | १५.०८ |
| उद्योग व खनिजे | ३०.०३ | ३०.०० | ० | ० | ३२. ११ | ८९.३३ |
| सामान्य आर्थिक सेवा | ० | ० | २३.३७ | ९.५४ | ६. २० | १.५० |
| सामाजिक व सामूहिक सेवा | ३,९७८.६६ | १,४५८.३२ | ५०.०२ | ३२.७४ | ४,१५४.७१ | १,४३१.८३ |
| सामान्य सेवा | ० | ० | ४,०५४.२९ | २,५२०.२८ | ० | ० |
| **ब) जिल्हास्तरीय योजना** | **२,४००.००** | **२,२९८.५६** | **२,४००.००** | **२,३४७.५६** | **२,७००.००** | **१,१७९.७३** |
| कृषि व संलग्न कार्ये | २९३.९८ | ७९.७५ | ३०५.१९ | २८१.६३ | २७९.१४ | १५०.४१ |
| ग्राम विकास | ० | ० | ० | ० | २६३.८२ | १८०.३९ |
| ऊर्जा | ७६.६८ | २१२.३२ | ९२.५६ | ९२.५६ | १२२.०६ | ६७.७५ |
| उद्योग व खनिजे | ११.९९ | ११.४३ | १२.२२ | १०.३३ | १२.५१ | १.८७ |
| वाहतूक | ५५.५९ | ४७.६४ | ५४.९५ | ५७.८३ | ५९.४७ | २४.८३ |
| सामाजिक व सामूहिक सेवा | १,९६१.७३ | १,९४७.३९ | १,९३५.०७ | १,९०५.२० | १,८८२.०० | ७५४.४६ |
| तीन टक्के नाविन्यपूर्ण योजना | ० | ० | ० | ० | ८१.०० | ० |
| **एकूण (अ + ब)** | **६,४९०.००** | **३,८५६.३२** | **६,७२५. ६५** | **४,९४१.५४** | **७,२३१.००** | **२,७७४.५५** |

टिप: आकडेवारी संक्षिप्तात दिल्यामुळे काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत. + डिसेंबर अखेर

*आधार* : सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन

## अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण घेण्यासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना

१०.११० अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र शासनाने ही शिष्यवृत्ती योजना सुरू केली आहे. सदर योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये १३२ लाभार्थ्यांना ₹ २२.२६ कोटी वितरित करण्यात आले असून सन २०१७-१८ मध्ये जानेवारी पर्यंत ७० लाभार्थ्यांना ₹ १४ कोटी वितरित करण्यात आले आहेत.

### विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग आणि विशेष मागासवर्गीय यांचे कल्याण

१०.१११ विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग या समाजातील लोकांच्या कल्याणासाठी शासनाने स्वतंत्र विभाग स्थापन केला आहे. या सर्व दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी विविध विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. सन २०१६-१७ मध्ये ₹ २,६३३ कोटी नियतव्यय उपलब्ध करून देण्यात आला असून ₹ २,५०८ कोटी खर्च झाला आहे. सन २०१७-१८ करिता ₹ १,९०७ कोटी नियतव्यय उपलब्ध करुन दिला असून डिसेंबर अखेर ₹ १,१४५ कोटी खर्च झाला आहे.

## विकास महामंडळे

१०.११२ अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग यांच्या आर्थिक उन्नतीसाठी महाराष्ट्र शासनाने विविध विकास महामंडळे स्थापन केली असून त्याद्वारे विविध योजना राबविण्यात येत आहेत. या महामंडळाद्वारे वीस टक्के अनुदान, बीज भांडवल, पन्नास टक्के अनुदान, मुदत कर्ज, सूक्ष्म वित्तपुरवठा, महिला समृद्धी, शैक्षणिक कर्ज इत्यादी विविध योजना राबविल्या जातात. राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ, राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ, राष्ट्रीय मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ, इत्यादी महामंडळांच्या विविध योजना राबविण्यासाठी या महामंडळांना राज्याची अधिकृत यंत्रणा म्हणून प्राधिकृत केले आहे. विकास महामंडळांमार्फत वितरित केलेली रक्कम तक्ता १०.७३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७३ विकास महामंडळांमार्फत वितरित रक्कम**

(₹ लाख)

| विकास महामंडळ | २०१५-१६ | | २०१६-१७ | | २०१७-१८+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी संख्या | वितरित रक्कम | लाभार्थी संख्या | वितरित रक्कम | लाभार्थी संख्या | वितरित रक्कम |
| संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्या. | १,४८० | १७०.३९ | १,८५४ | २३१.०३ | २९९ | २७.७० |
| साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या. | ३,४८७ | २,४४२.१४ | २,१०७ | १,३१२.३५ | १,२२५ | ३४५.४३ |
| महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ मर्या. | ९,२०५ | २,३५२.२५ | ४,३३७ | १,४२४.९२ | २,१४० | ८९३.६९ |
| वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्या. | ६,४६२ | १,८८२.०० | २७६ | ३५४.७२ | निरंक | निरंक |
| महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ मर्या. | १,६७३ | ७४०.८० | १,५३८ | ४८७.१५ | ७१३ | २०७.५३ |

*आधार* : संबंधित महामंडळे + डिसेंबर अखेर

## अनुसूचित जाती आणि विमुक्त जाती, भटक्या जमातीसाठी वस्ती / क्षेत्र विकास योजना

१०.११३ राज्यात वस्ती/ क्षेत्र विकासाच्या विविध योजना राबविण्यात येत आहेत. वस्ती/ क्षेत्र विकासाच्या प्रमुख योजनांचा नियतव्यय व खर्च तक्ता १०.७४ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.७४ वस्ती/ क्षेत्र विकासाच्या प्रमुख योजनांचा नियतव्यय व खर्च**

(₹ कोटी)

| योजना | २०१५-१६ | | २०१६-१७ | | २०१७-१८ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | नियतव्यय | खर्च | नियतव्यय | खर्च | नियतव्यय | खर्च + |
| अनुसूचित जाती व नव बौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे ++ | ७५३.४६ | ७५३.४६ | ७५६.४५ | ७५६.४५ | ७६४.४१ | ३५९.८३ |
| तांडा/वस्ती सुधार # | २१.०० | १४.६९ | २५.०० | १९.९८ | ४७.०० | ३.१६ |
| नागरी दलित वस्ती सुधार @ | ४६७.७६ | ४४३.९९ | ४७२.६६ | ३४१.४१ | ० | ० |
| नागरी आदिवासी वस्ती सुधार @ | ६.०० | ४.२० | ७.०० | ५.६० | ६.०० | ० |

+ डिसेंबर अखेर

*आधार:* ++सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन # विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास विभाग, महाराष्ट्र शासन @ नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन

## आदिवासी घटक कार्यक्रम

१०.११४ सन २०१७-१८ करिता ₹ ६,७५४ कोटी नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात आला असून त्यापैकी अनुसूचित क्षेत्रांवरील पंचायत विस्तारअंतर्गत (पेसा) ग्रामपंचायतींसाठी ₹ २६७.८८ कोटी, राज्यस्तरीय योजनांकरिता ₹ ३,४३२.२१ कोटी तर जिल्हास्तरीय योजनांकरिता ₹ ३,०५३.८९ कोटी आहे. सन २०१७-१८ मध्ये आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत एकूण ३२५ योजना (८४ राज्यस्तरीय, १८९ जिल्हास्तरीय व ५२ केंद्र पुरस्कृत योजना) राबविण्यात येत आहेत. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत आदिवासी समाजाला थेट लाभ होणाऱ्या तसेच वैयक्तिक लाभाच्या योजना राबविल्या जातात. आदिवासी उपयोजनेंतर्गत क्षेत्रनिहाय अर्थसंकल्पीय तरतूद व खर्च तक्ता १०.७५ मध्ये व आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत विभागनिहाय नियतव्यय व खर्च तक्ता १०.७६ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.७५ आदिवासी उपयोजनेंतर्गत क्षेत्रनिहाय अर्थसंकल्पीय तरतूद व खर्च**

(₹ कोटी)

| क्षेत्र | २०१५-१६ | | २०१६-१७ | |
|---|---|---|---|---|
| | अर्थसंकल्पीय तरतूद | खर्च | अर्थसंकल्पीय तरतूद | खर्च |
| कृषी व संलग्न कार्ये | ३१८.२९ | ३११.०६ | २९२.०५ | २८१.१४ |
| ग्राम विकास | ९१५.०८ | ८७२.४८ | ६३८.५४ | ५७९.३५ |
| पाटबंधारे व पूर नियंत्रण | २१०.१२ | १५०.५५ | १७६.१० | १७७.८२ |
| ऊर्जा | २६०.६४ | २४९.२४ | १०९.१४ | १०७.०९ |
| उद्योग व खनिजे | १.४५ | १.२० | १.५० | १.३९ |
| वाहतूक | ५४५.१४ | ५३५.०२ | ५३२.२७ | ६९२.१५ |
| सामान्य आर्थिक सेवा | १७.२२ | १३.९७ | १.८८ | १.६३ |
| सामाजिक व सामूहिक सेवा | ३,५८४.०६ | ३,०७५.३९ | ३,३२४.१५ | २,८२८.९१ |
| इतर कार्यक्रम | ५१.२५ | ३५.२० | ५०.४२ | ४४.२३ |
| **एकूण** | **५,९०३.००** | **४,९९४.८७** | **४,४८७.५१** | **४,७९१.७१** |

*आधार :* आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन

**तक्ता १०.७६ आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत विभागनिहाय नियतव्यय व खर्च**

(₹ कोटी)

| विभाग | २०१७-१८ | |
|---|---|---|
| | नियतव्यय | खर्च + |
| महसूल व वन | ५१.४१ | १७.२९ |
| कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय | १९६.५५ | ६४.५२ |
| शालेय शिक्षण | १५७.८४ | ८८.८९ |
| नगर विकास | २१.२५ | ११.४७ |
| सार्वजनिक बांधकाम | २०७.४३ | २७.८१ |
| जलसंपदा | ५०.४० | ० |
| उद्योग, ऊर्जा व कामगार | १३९.९७ | ३२.४० |
| ग्रामविकास व जलसंधारण | ६७५.८० | २८६.६० |
| सार्वजनिक आरोग्य | २६६.९३ | ८३.८४ |
| वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये | ०.८० | ०.५० |
| आदिवासी विकास | ४,५९७.६४ | २,२४०.०८ |
| सहकार व वस्त्रोद्योग | ५.०१ | १.८७ |
| उच्च व तंत्र शिक्षण, रोजगार व स्वयंरोजगार | ६२.६३ | १९.२४ |
| महिला व बालविकास | २४४.६४ | १११.४९ |
| पाणी पुरवठा व स्वच्छता | ७५.७० | १२.३१ |
| **एकूण** | **६,७५४.००** | **२,९९८.३१** |

*आधार :* आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन + जानेवारी अखेर

## शासकीय आश्रमशाळा

१०.११५ राज्यातील डोंगरी आणि दुर्गम भागात आदिवासी मुलांसाठी शासनामार्फत निवासी आश्रमशाळा चालविण्यात येतात. सन २०१७-१८ पासून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक साहित्य तसेच साधनसामग्री खरेदीकरिता आवश्यक रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा केली जात आहे. सन २०१७-१८ करिता ₹ ८५९.७९ कोटी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली असून जानेवारी अखेर ₹ ५८२.१७ कोटी खर्च झाला.

## अनुदानित आश्रमशाळा

१०.११६ अनुदानित आश्रमशाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेश, शैक्षणिक साहित्य व इतर सवलती मोफत उपलब्ध करून देण्यात येतात. राज्यात ५५६ अनुदानित आश्रमशाळा कार्यरत आहेत. सन २०१७-१८ करिता ₹ ८०५.१३ कोटी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली असून जानेवारी अखेर ₹ ६६७.७६ कोटी खर्च झाला.

## आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह

१०.११७ आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्याकरिता प्रोत्साहित करण्यासाठी विभाग, जिल्हा व तालुका स्तरावर शासकीय वसतिगृहांची सुविधा पुरविण्यात येते. या वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेश, शैक्षणिक साहित्य व इतर सवलती मोफत पुरविण्यात येतात. राज्यात ४९५ शासकीय वसतिगृहे कार्यरत असून त्यांमध्ये एकूण ५६,९१८ विद्यार्थ्यांना (३५,१५८ मुले व २१,७६० मुली) प्रवेश देण्यात आला आहे. सन २०१७-१८ पासून बिछाना, पुस्तके, शैक्षणिक साहित्य, इत्यादी विकत घेण्याकरिता विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर निधी थेट जमा करण्यात येत आहे. सन २०१७-१८ करिता ₹ ३६४.८७ कोटी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली असून जानेवारी अखेर ₹ १७५.१४ कोटी खर्च झाला.

## इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये शिक्षण

१०.११८ अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी माध्यमांच्या निवासी शाळांमध्ये शिक्षण घेण्यास प्रोत्साहित करण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक व निवासी सुविधा पुरविण्यात येतात. सन २०१७-१८ मध्ये सुमारे ९,००० विद्यार्थ्यांना अश्या शाळेत प्रवेश देण्यात आला असून, आजतागायत सुमारे ५४,५०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सन २०१७-१८ करिता ₹ ३१० कोटी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली असून जानेवारी अखेर ₹ २४४.५४ कोटी खर्च झाला.

## पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयम् योजना

१०.११९ या योजनेतर्गत आदिवासी विकास विभागाच्या शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळणाऱ्या विद्यार्थ्यांना इयत्ता बारावी नंतरच्या उच्च शिक्षणा दरम्यान शैक्षणिक तसेच भोजन व निवासाच्या सुविधा उपलब्ध करून घेण्यासाठी आर्थिक सहाय्य पुरविण्यात येते. सन २०१७-१८ करिता ₹ ८० कोटी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली असून जानेवारी अखेर ₹ एक कोटी खर्च झाला.

## पेसा ग्रामपंचायतींना थेट निधी

१०.१२० पेसा कायदा अंमलबजावणी अंतर्गत अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना विकासाची कामे करण्यासाठी आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत प्राप्त होणाऱ्या एकूण नियतव्ययाच्या ५ टक्के नियतव्यय वितरीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या करिता ग्रामपंचायतींना थेट निधी उपलब्ध करुन देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. या निधीतून मूळ पायाभूत सुविधा, वनहक्क व पेसा कायद्याची अंमलबजावणी, आरोग्य, स्वच्छता, शिक्षण, वन्य जीव संवर्धन, जलसंधारण, वनीकरण, वन्य जीव पर्यटन व वनउत्पादने या प्रकारची कामे ग्रामसभांना घेता येतात. सन २०१७-१८ करिता ₹ २६७.८८ कोटी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली असून जानेवारी अखेर ₹ २१४.३० कोटी खर्च झाला.

## डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना

१०.१२१ अनुसुचित क्षेत्रातील १६ जिल्ह्यांमध्ये अनुसुचित जमातीच्या गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांना ‘ एक वेळचा चौरस आहार’ पुरविण्याकरिता राज्याने ही योजना सुरु केली आहे. तसेच सदर योजनेंतर्गत ७ महिने ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना सुद्धा आठवड्यातून चार वेळा अंडी किंवा केळी देण्यात येतात. सन २०१७-१८ करिता ₹ १८४.१० कोटी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली असून जानेवारी अखेर ₹ ९८.८७ कोटी खर्च झाला.

## ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा एकात्मिक कार्यक्रम

१०.१२२ या योजनेंतर्गत अनुसूचित क्षेत्रामध्ये लहान व कायमस्वरुपी सामूहिक विकास सुविधा निर्माण करण्यात येतात. सन २०१७-१८ करिता ₹ १६३ कोटी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली असून जानेवारी अखेर ₹ १०.२० कोटी खर्च झाला.

## दिव्यांग व्यक्तींचे कल्याण

१०.१२३ दिव्यांग व्यक्तींच्या क्षमता ओळखणे, त्यांचा कौशल्य विकास करणे, समान संधी देणे, अधिकारांचे रक्षण करून सक्षमीकरण करणे, तसेच त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेणे यासाठी राज्य शासनाकडून विविध योजना राबविल्या जात आहेत. सन २०१६-१७ मध्ये ₹ २५.८३ कोटी नियतव्ययाच्या तुलनेत ₹ २३.१९ कोटी खर्च झाला आहे. सन २०१७-१८ करिता ₹ ५५९.३३ कोटी नियतव्यय उपलब्ध करण्यात आला असून माहे जानेवारी अखेर ₹ ३६१.६८ कोटी खर्च झाला.

## महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादित

१०.१२४ दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी राज्यात महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. हे महामंडळ राष्ट्रीय अपंग वित्त व विकास महामंडळाची राज्यासाठी अधिकृत यंत्रणा म्हणून कार्य करते. या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ ५० कोटी असून, भरणा केलेले भाग भांडवल ₹ ४७.५१ कोटी आहे. या महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रमुख योजनांची प्रगती तक्ता १०.७७ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

**तक्ता १०.७७ महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रमुख योजनांची प्रगती**

(₹ लाख)

| योजना | २०१५-१६ | | २०१६-१७ | | २०१७-१८+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी संख्या | वितरित रक्कम | लाभार्थी संख्या | वितरित रक्कम | लाभार्थी संख्या | वितरित रक्कम |
| थेट कर्ज | १,५२६ | ३०५.२० | २२ | ४.४० | ६ | १.२० |
| मुदत कर्ज | ७८७ | १,६५६.१९ | ८९४ | १,८०५.२२ | १९१ | ३२९.४३ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादित — + डिसेंबर अखेर

## अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित

१०.१२५ राज्यातील आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील सुशिक्षित बेरोजगार तरूणांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ ५० कोटी असून भरणा केलेले भाग भांडवल ₹ ५० कोटी आहे. सन २०१५-१६ या वर्षात ७५ लाभधारकांना ₹ १०४.३९ लाख वितरित करण्यात आले तर सन २०१६-१७ या वर्षात १०२ लाभधारकांना ₹ १३२.५८ लाख वितरित करण्यात आले. सन २०१७-१८ मध्ये सप्टेंबर अखेर २८ लाभधारकांना ₹ ४१.२६ लाख वितरीत करण्यात आले.

# अल्पसंख्यांक विकास

१०.१२६ अल्पसंख्याकांच्या विकासासाठी विविध योजना राज्यात राबविण्यात येत आहे. सन २०१६-१७ मध्ये ₹ ४०५.०५ कोटी नियतव्ययच्या तुलनेत ₹ ३१०.८६ कोटी खर्च झाला आहे. सन २०१७-१८ मध्ये ₹ ४०७ कोटी नियतव्यय उपलब्ध करण्यात आला असून जानेवारी अखेर ₹ ८५.३२ कोटी खर्च झाला.

## मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित

१०.१२७ अल्पसंख्यांकांच्या कल्याणासाठी मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाची राज्यात स्थापना करण्यात आली आहे. या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ ५०० कोटी असून भरणा केलेले भाग भांडवल ₹ ४००.६९ कोटी आहे. हे महामंडळ राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास व वित्त महामंडळाची राज्यासाठी अधिकृत यंत्रणा म्हणून कार्य करते. या महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रमुख योजनांची प्रगती तक्ता १०.७८ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७८ मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रमुख योजनांची प्रगती**

(₹ लाख)

| योजना | २०१५-१६ | | २०१६-१७ | | २०१७-१८+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम | लाभार्थ्यांची संख्या | वितरित रक्कम |
| थेट कर्ज | २,८३७ | १,१३४.४० | ४२ | १८.९७ | ० | ० |
| शैक्षणिक कर्ज | २,१४१ | १,६१५.६४ | ३,०३८ | २,३७२.०९ | १,१९३ | ८८४.०३ |
| इतर कर्ज (स्वय सहाय्यता गट) | १५४ | २९३.२० | ० | ० | ० | ० |
| मुदत कर्ज | ३६८ | ३४७.९९ | ३७ | ३५.१५ | १ | ०.९५ |

*आधार* : मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ + ऑक्टोबर अखेर

## अल्पसंख्याकांसाठी वस्ती / क्षेत्र विकास योजना

१०.१२८ राज्यात अल्पसंख्याकांसाठी वस्ती / क्षेत्र विकासासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. अल्पसंख्याकांसाठी वस्ती/ क्षेत्र विकासाच्या प्रमुख योजनांचा नियतव्यय व झालेला खर्च तक्ता १०.७९ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.७९ अल्पसंख्याकांसाठी वस्ती/ क्षेत्र विकासाच्या प्रमुख योजनांचा नियतव्यय व झालेला खर्च**

(₹ कोटी)

| योजना | २०१५-१६ | | २०१६-१७ | | २०१७-१८ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | नियतव्यय | खर्च | नियतव्यय | खर्च | नियतव्यय | खर्च + |
| अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्रविकास कार्यक्रम | ६२.५० | ३२.१२ | २५.०० | १९.९९ | २५.०० | १.६० |
| अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण क्षेत्रविकास कार्यक्रम | ६२.५० | ४९.८८ | ३५.५५ | ३४.६९ | ३५.५० | ६.१३ |

*आधार*: अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासन + जानेवारी अखेर

# सामाजिक सुरक्षेच्या महत्त्वपूर्ण योजना

१०.१२९ राज्य सामाजिक सुरक्षेच्या विविध योजना राबविते. महत्त्वाच्या सामाजिक सुरक्षा योजनांचे लाभार्थी व झालेला खर्च तक्ता १०.८० मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.८० महत्वाच्या सामाजिक सुरक्षा योजनांचे लाभार्थी व झालेला खर्च**

| योजना | २०१५-१६ | | २०१६-१७ | | २०१७-१८+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थ्यांची संख्या (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थ्यांची संख्या (लाख) | खर्च (₹ कोटी) |
| संजय गांधी निराधार अनुदान | ८.६० | ६३७.१८ | ९.०५ | ७०५.८७ | ८.९७ | ५३५.५१ |
| श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन | १९.२९ | १,०९२.०० | १९.८२ | १,१७०.०८ | १९.६२ | ८९२.७४ |
| इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन | ११.९३ | २९०.९२ | ११.७० | २८५.०२ | १०.८४ | २०१.०१ |
| इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन | ०.४८ | ११.२६ | ०.५१ | १३.०७ | ०.५७ | ११.०५ |
| इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन | ०.०७ | १.५६ | ०.०७ | १.६८ | ०.०७ | १.६५ |
| राष्ट्रीय कुटुंब लाभ | ०.१८ | ३६.१८ | ०.०९ | ३०.५६ | ०.०८ | १८.४६ |
| आम आदमी विमा | ५२.३४ | २५.३५ | ५२.३४ | ११.४४ | ५२.३४ | १.०० |

*आधार* : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबर अखेर

# मानव विकास आणि शाश्वत विकास ध्येये

१०.१३० नागरिक आपली क्षमता विकसित करतील, त्यांच्या गरजा व आवडीनुसार सृजनशील व सर्जनशील जीवन जगतील आणि समाजाच्या कल्याणासाठी निर्णय प्रक्रियेत भाग घेतील, अशा प्रकारची वातावरण निर्मिती म्हणजेच मानव विकास होय. मानव विकास निर्देशांक (माविनि) हा आरोग्यदायी व दीर्घायुष्य, ज्ञानार्जनाची संधी व दर्जेदार राहणीमान या तीन मानव विकासाचे दीर्घकालीन प्रगतीचे मोजमाप करुन मूल्यांकन करण्याचा संयुक्त निर्देशांक आहे. मानव विकास अहवाल-२०१६ हा संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम यांनी प्रकाशित केला असून 'सर्वांसाठी मानव विकास' या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित आहे. त्यानुसार नॉर्वे माविनि (०.९४९) सह यादीत प्रथम स्थानावर, तर भारत माविनि (०.६२४) सह १३१ व्या स्थानावर आहे. दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटना (सार्क) देशांमध्ये श्रीलंका (०.७६६) व मालदीव (०.७०१) हे भारताच्या पुढे आहेत.

१०.१३१ भारत मानव विकास अहवाल-२०११ नुसार केरळ (०.७९०) प्रथम स्थानावर असून महाराष्ट्र (०.५७२) सहाव्या स्थानावर आहे.

१०.१३२ राज्याने प्रकाशित केलेल्या महाराष्ट्र मानव विकास अहवाल-२०१२ नुसार मुंबई (मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे एकत्रित) माविनि (०.८४१) सह पहिल्या क्रमांकावर, त्यापाठोपाठ पुणे (०.८१४) तर, नंदुरबार माविनि (०.६०४) सह शेवटच्या क्रमांकावर आहे. जिल्हानिहाय माविनि - २०११ परिशिष्ट १०.१५ मध्ये दिले आहे.

## महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रम

१०.१३३ महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रम राज्यातील अतिमागास १२५ तालुक्यांमधील ग्रामीण भाग व त्या तालुक्यातील 'क' वर्ग नगरपालिकांमध्ये राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत शिक्षण, आरोग्य व उत्पन्न यांचा स्तर उंचविणाऱ्या योजना राबविण्यात येतात. तालुक्यांच्या सामाजिक, आर्थिक व भौगोलिक परिस्थिती आणि स्थानिक गरजांनुसार जिल्हा/तालुका विवक्षित योजना तयार करण्यात येतात. तालुक्यासाठी मिळणाऱ्या एकूण निधीच्या २० टक्के निधी याकरिता राखून ठेवण्यात येतो. या कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ साठी ₹ ३५५ कोटीची अर्थसंकल्पीय तरतुद करण्यात आली असून डिसेंबरपर्यंत ₹ १३७.७० कोटी खर्च झाला आहे. महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रमातंर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांची भौतिक व आर्थिक प्रगती तक्ता १०.८१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.८१ महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांची भौतिक व आर्थिक प्रगती**

(संख्या)

| योजना | लाभार्थ्यांचा प्रकार | भौतिक प्रगती | | |
|---|---|---|---|---|
| | | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८+ |
| **शिक्षण** | | | | |
| अ) माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील अभ्यासिका (२,८८९ अभ्यासिका) | विद्यार्थी | १,४१,५४१ | १,१६,४१८ | १,१८,७४६ |
| ब) ग्रामीण भागातील मुलींना मोफत बस सेवा (८६९ बस) | मुली | ९६,९४६@ | ९३,९८९@ | ९७,७०९# |
| क) बालभवन विज्ञान केंद्र (१२४ केंद्रे) | भेट दिलेले विद्यार्थी | २,१०,९३२ | २,००,०६१ | १,३४,३०१ |
| ड) कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय योजनेची व्याप्ती इयत्ता १० वी पर्यंत वाढविणे (३९ शाळा) | मुली | १,८७९ | १,९३४ | १,९३७ |
| ई) इयत्ता आठवी ते बारावी मध्ये शिक्षण घेत असलेल्या व शाळेपासून पाच किमी अंतरापर्यंत राहाणाऱ्या गरजू मुलींना सायकलींचे वाटप | मुली | ३३,०११ | ३४,२९६ | ९,०४५ |
| फ) अंगणवाड्यांचे बांधकाम | | | | ६११$ |
| **आरोग्य** | | | | |
| अ) गर्भवती महिला, स्तनदा माता व ० ते ६ महिने वयोगटातील बालकांकरिता आरोग्य शिबिरे | गर्भवती महिला, स्तनदा माता व बालके | ३,७८,०५६ | ७,१५,२५२ | ६,५२,०८२ |
| ब) किशोरवयीन मुलींना आरोग्यविषयक प्रशिक्षण | किशोरवयीन मुली | १,६९,९५४ | १,२६,६३८ | ## |
| क) अजा, अज, दारिद्र्य रेषेखालील गर्भवती महिलांना बुडीत मजूरी देणे | गर्भवती महिला | ९६,६२५ | १,३९,६९९ | ६२,३३६ |
| ड) आरोग्य उपकेंद्रांचे बांधकाम | | | | २१$ |
| **उत्पन्न निर्मिती** | | | | |
| अ) माती परिक्षण फिरती प्रयोगशाळा | मातीचे तपासलेले नमुने | ३१,३३१ | ४१,१३१ | ३०,९१० |
| ब) गौण वनोपजे गोळा करणे/मत्स्य व्यवसायासाठी ग्रामसभेला बीज भांडवल देणे | ग्रामसभेचे प्रस्ताव | ३२८ | ४५६ | १०७ |
| | | **आर्थिक प्रगती** | | |
| तरतूद (₹ कोटी) | | २०२.०० | ३०२.०० | ३५५.०० |
| खर्च (₹ कोटी) | | १३५.४२ | २६६.८३ | १३७.७० |

$ योजनेच्या अंमलबजावणी पासून बांधकाम पूर्ण    ## सन २०१६-१७ पासून योजना अंमलबजावणी बंद.    # माहे डिसेंबरकरिता

@ माहे मार्चकरिता    + डिसेंबरपर्यंत

*आधार* : आयुक्तालय, महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रम

## *ॲक्शन रूम टू रिड्यूस पॉवर्टी*

१०.१३४ मानव विकास कार्यक्रमांतर्गत राज्यातील १२५ तालुक्यांपैकी निवडक २७ तालुक्यांमध्ये मुख्यत्वे उपजीविका, गुणवत्तापूर्ण शिक्षण व आरोग्यसेवा यावर लक्ष केंद्रीत करून सार्वत्रिक विकास करण्यासाठी '*ॲक्शन रूम टू रिड्यूस पॉवर्टी*' स्थापन करण्याच्या दृष्टीने संयुक्त राष्ट्रे व राज्य शासन यांच्यात ऑगस्ट, २०१७ मध्ये सामंजस्य करार करण्यात आला. यामुळे जिल्हा व तालुक्यापर्यंत शाश्वत विकासाची ध्येये साध्य करण्यासही मदत होईल. कृषी व्यवसाय, सामाजिक क्षेत्र, माहिती विश्लेषण आणि शाश्वत विकासाची ध्येये सनियंत्रण आणि मुल्य साखळी या चार क्षेत्रातील तज्ञांच्या सहाय्याने संयुक्त राष्ट्रे *ॲक्शन रूम*ला मदत करतील. कृषी व संलग्न कार्ये, हस्तकला, पर्यावरणपूरक पर्यटन, इ. विविध क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी मार्गदर्शन व मदत करणे हे *ॲक्शन रूम*चे मुख्य उद्दीष्ट आहे. या निवडक २७ तालुक्यामध्ये 'भविष्यासाठी कौशल्य' ही संकल्पना विचारात घेऊन रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी विविध संस्था व राज्य यंत्रणांचे समन्वयन व सनियंत्रण करण्यासही हा *ॲक्शन रूम* सहाय्य करेल.

## शाश्वत विकास ध्येये

१०.१३५ संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य देशांनी सप्टेंबर, २०१५ मध्ये पार पडलेल्या सर्वसाधारण शिखर परिषदेत 'आपल्या विश्वाचे परिवर्तन' असा ठराव पारीत केला. या विषय पत्रिकेत समावेश असलेल्या शाश्वत विकासाची १७ ध्येये आणि १६९ उद्दिष्ट्ये २०३० पर्यंत साध्य करावयाची असून, त्याची सुरूवात जानेवारी, २०१६ पासून झाली आहे. शाश्वत विकासाची ध्येये आणि त्याची उद्दिष्ट्ये साध्य करण्याकरिता महाराष्ट्र शासनाने *व्हिजन* २०३० *डॉक्युमेंट* तयार केले आहे. कृषी व संलग्न कार्ये, उद्योग, पायाभूत सुविधा, सामाजिक क्षेत्र व सुशासन हे *व्हिजन* २०३० चे मुख्य आधारस्तंभ आहेत. *व्हिजन* २०३० नुसार काही महत्वाच्या आरोग्य निर्देशकांबाबतची सद्यस्थिती व उद्दिष्टे तक्ता १०.८२ मध्ये दिली आहेत.




**तक्ता १०.८२ *व्हिजन* २०३० नुसार काही महत्वाच्या आरोग्य निर्देशकांबाबतची सद्यस्थिती व उद्दिष्टे**

(संख्या)

| निर्देशक | २०१६-१७ ची स्थिती | उद्दिष्टे | |
|---|---|---|---|
| | | २०२० | २०३० |
| **सामाजिक** | | | |
| मानव विकास निर्देशांक | ०.७५२[$] | ०.८ | ०.९ |
| जन्माच्या वेळेची आयुर्मर्यादा (वर्षांमध्ये) | ७१.६[#] | ७२ | ७७ |
| अर्भक मृत्यू दर | २१[#] | १७ | १० |
| माता मृत्यू प्रमाण | ६८[@] | ३० | १९ |
| ५ वर्षाखालील मृत्यू दर | २४ | २२ | <१५ |
| नवजात मृत्यू दर | १५ | १५ | <१० |
| जन्मत: मृत्यू दर | ४ | <४ | <४ |
| क्षयरोग प्रादुर्भाव दर (दर हजारी) | १.६७ | १.१७ | ०.३३ |

*आधार : व्हिजन २०३० डॉक्युमेंट* $ २०११ # २०१५ @ २०११-१३

* * * * *

## परिशिष्ट १०.१

## विभागनिहाय व शैक्षणिक स्तरनिहाय संस्था, पटसंख्या व शिक्षकांची संख्या

| बाब | वर्ष | विभाग | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कोकण | पुणे | नाशिक | औरंगाबाद | अमरावती | नागपूर | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| | | | | प्राथमिक (१ ली ते ८ वी ) | | | | |
| शाळांची संख्या | २०१५-१६ | १८,८१५ | २०,२९५ | १६,९१९ | १९,५२७ | १०,६७४ | ११,९८९ | ९८,२१९ |
| | २०१६-१७* | २०,४५९ | २१,९६८ | १७,७७५ | २०,८१० | ११,३१३ | १२,६४५ | १,०४,९७० |
| | २०१७-१८* | २०,७१४ | २२,१६१ | १७,९९३ | २१,२६३ | ११,५९३ | १२,८०३ | १,०६,५२७ |
| एकूण पटसंख्या (हजारात) | २०१५-१६ | ३,८६९.६ | ३,१८१.२ | २,८४२.० | ३,०७८.६ | १,५६४.३ | १,५०८.४ | १६,०४४.० |
| | २०१६-१७* | ३,८४०.८ | ३,१९७.४ | २,८४८.१ | ३,०५७.० | १,५४८.१ | १,४९४.४ | १५,९८५.७ |
| | २०१७-१८* | ३,८६०.७ | ३,२११.५ | २,८२०.८ | ३,०१६.५ | १,५२४.३ | १,४७५.३ | १५,९०९.१ |
| मुलींची पटसंख्या (हजारात) | २०१५-१६ | १,८३२.१ | १,४७१.९ | १,३११.९ | १,४३८.६ | ७४०.२ | ७२७.७ | ७,५२२.३ |
| | २०१६-१७* | १,८१७.१ | १,४८१.० | १,३१६.५ | १,४२४.२ | ७३२.२ | ७१९.० | ७,४९०.० |
| | २०१७-१८* | १,८२८.२ | १,४८६.९ | १,३०४.० | १,४०१.३ | ७२०.४ | ७०९.५ | ७,४५०.२ |
| शिक्षकांची संख्या (हजारात) | २०१५-१६ | १११.३ | १०६.३ | ८२.२ | १०१.५ | ५४.४ | ५९.७ | ५१५.३ |
| | २०१६-१७* | ११६.० | १०९.७ | ८४.४ | १०४.८ | ५५.६ | ६०.० | ५३०.५ |
| | २०१७-१८* | ११९.३ | ११२.३ | ८६.६ | १०७.२ | ५६.३ | ६०.६ | ५४२.४ |
| विद्यार्थी शिक्षक प्रमाण | २०१५-१६ | ३४.८ | २९.९ | ३४.६ | ३०.३ | २८.८ | २५.३ | ३१.२ |
| | २०१६-१७* | ३३.० | २९.० | ३३.६ | २९.० | २७.७ | २४.८ | ३०.१ |
| | २०१७-१८* | ३२.४ | २८.६ | ३२.६ | २८.१ | २७.१ | २४.३ | २९.३ |
| | | | | माध्यमिक व उच्च माध्यमिक (९ वी ते १२ वी ) | | | | |
| शाळांची संख्या | २०१५-१६ | ५,०५२ | ५,१५९ | ३,९८० | ४,८६८ | २,८६९ | ३,१०१ | २५,०२९ |
| | २०१६-१७* | ५,१८८ | ५,३३६ | ४,०७० | ५,०४४ | २,९४१ | ३,१५८ | २५,७३७ |
| | २०१७-१८* | ५,५४५ | ५,५७२ | ४,२३० | ५,२६० | ३,०४२ | ३,२३० | २६,८७९ |
| एकूण पटसंख्या (हजारात) | २०१५-१६ | १,५३१.८ | १,३२७.३ | १,०४१.७ | १,१२०.७ | ६७०.१ | ७३२.२ | ६,४२३.७ |
| | २०१६-१७* | १,५६६.९ | १,३५८.४ | १,०६९.१ | १,१९२.४ | ६८८.० | ७३९.८ | ६,६१४.७ |
| | २०१७-१८* | १,५७०.७ | १,३७५.२ | १,०९१.३ | १,२१४.३ | ६७६.४ | ७१९.७ | ६,६४७.६ |
| मुलींची पटसंख्या (हजारात) | २०१५-१६ | ७२२.६ | ५९३.१ | ४५८.२ | ४८०.९ | ३११.९ | ३५७.४ | २,९२४.० |
| | २०१६-१७* | ७३६.८ | ६०८.६ | ४७१.७ | ५१८.३ | ३१८.९ | ३५८.६ | ३,०१३.० |
| | २०१७-१८* | ७४०.९ | ६१९.४ | ४८४.० | ५३५.० | ३१४.९ | ३४८.१ | ३,०४२.२ |
| शिक्षकांची संख्या (हजारात) | २०१५-१६ | ५०.५ | ४८.१ | ३३.६ | ३८.७ | २१.८ | २७.३ | २२०.० |
| | २०१६-१७* | ४७.४ | ४६.७ | ३३.२ | ३८.१ | २१.२ | २६.३ | २१२.८ |
| | २०१७-१८* | ४९.२ | ४८.० | ३४.५ | ३९.१ | २१.१ | २६.२ | २१८.० |
| विद्यार्थी शिक्षक प्रमाण | २०१५-१६ | ३०.३ | २७.६ | ३१.० | २९.० | ३०.८ | २६.८ | २९.२ |
| | २०१६-१७* | ३३.० | २९.१ | ३२.२ | ३१.३ | ३२.५ | २८.१ | ३१.१ |
| | २०१७-१८* | ३१.९ | २८.७ | ३१.६ | ३१.१ | ३२.१ | २७.५ | ३०.५ |

*आधार:* महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई

* अस्थायी

## परिशिष्ट १०.२

## सन २०१७-१८ मधील आरोग्य विज्ञान संस्थांची संख्या, प्रवेश क्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या

| विद्याशाखा | शासकीय | | | शासन अनुदानित | | | विना अनुदानित | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| **ॲलोपॅथी** | | | | | | | | | | | | |
| पदवी | २२ | ३,१०० | ३,०८० | १ | १०० | १०० | १६ | १,९०८ | १,९०२ | ३९ | ५,१०८ | ५,०८२ |
| पदव्युत्तर | २० | १,८६८ | १,७२५ | १ | ७२ | ५० | १५ | ४३५ | ३२१ | ३६ | २,३७५ | २,०९६ |
| **आयुर्वेदीक** | | | | | | | | | | | | |
| पदवी | ४ | ३५० | ३५० | १६ | ८८० | ८७९ | ४९ | ३,११० | ३,१०८ | ६९ | ४,३४० | ४,३३७ |
| पदव्युत्तर | ४ | १९८ | १९० | ९ | १५७ | १५४ | २५ | ९५६ | ८९२ | ३८ | १,३११ | १,२३६ |
| **होमिओपॅथी** | | | | | | | | | | | | |
| पदवी | -- | -- | -- | -- | -- | -- | ४८ | ३,७९५ | ३,३५८ | ४८ | ३,७९५ | ३,३५८ |
| पदव्युत्तर | -- | -- | -- | -- | -- | -- | १६ | ३४७ | २९५ | १६ | ३४७ | २९५ |
| **युनानी** | | | | | | | | | | | | |
| पदवी | -- | -- | -- | ३ | १८० | १८० | ३ | १६० | १६० | ६ | ३४० | ३४० |
| पदव्युत्तर | -- | -- | -- | १ | १७ | १६ | ० | ० | ० | १ | १७ | १६ |
| **दंतचिकित्सा** | | | | | | | | | | | | |
| पदवी | ४ | २६० | २४२ | -- | -- | -- | २५ | २,३५० | २,२४६ | २९ | २,६१० | २,४८८ |
| पदव्युत्तर | ५ | ७६ | ६९ | -- | -- | -- | २१ | ४३७ | ३७७ | २६ | ५१३ | ४४६ |
| **फिजीओथेरपी** | | | | | | | | | | | | |
| पदवी | ४ | ९० | ८७ | -- | -- | -- | २७ | १,१२० | १,०६८ | ३१ | १,२१० | १,१५५ |
| पदव्युत्तर | ५ | ५० | ५० | -- | -- | -- | १७ | १७६ | १७२ | २२ | २२६ | २२२ |
| **ऑक्युपेशनल थेरपी** | | | | | | | | | | | | |
| पदवी | ४ | ९० | ६५ | -- | -- | -- | -- | -- | -- | ४ | ९० | ६५ |
| पदव्युत्तर | ५ | २९ | २६ | -- | -- | -- | -- | -- | -- | ५ | २९ | २६ |
| **ऑडीओलॉजी व स्पीच लँग्वेज पॅथोलॉजी** | | | | | | | | | | | | |
| पदवी | २ | ५३ | ३८ | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | ५३ | ३८ |
| पदव्युत्तर | १ | २० | १९ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | २० | १९ |
| **प्रोस्थेटीक्स व ऑरथोटीक्स** | | | | | | | | | | | | |
| पदवी | १ | ३० | १८ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | ३० | १८ |
| पदव्युत्तर | १ | ४ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | ४ | १ |
| **नर्सिंग** | | | | | | | | | | | | |
| पदवी | ६ | २९० | २६३ | -- | -- | -- | ७६ | ३,१८० | २,७४७ | ८२ | ३,४७० | ३,०१० |
| पदव्युत्तर | २ | ३७ | ३५ | -- | -- | -- | १७ | २६६ | १४१ | १९ | ३०३ | १७६ |
| **बी.पी.एम.टी.** | | | | | | | | | | | | |
| पदवी | १८ | १,२७९ | ८४६ | -- | -- | -- | २ | १४९ | ११ | २० | १,४२८ | ८५७ |

*आधार:* महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

# परिशिष्ट १०.३

## सन २०१७-१८ मधील तंत्रशिक्षण संस्थांची संख्या, त्यांची प्रवेशक्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या

| विद्याशाखा | शासकीय | | | शासन अनुदानित | | | विना अनुदानित | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| **अभियांत्रिकी** | | | | | | | | | | | | |
| पदविका | ४३ | १८,५१० | १४,३५७ | १७ | ४,५९० | ३,१९१ | ३८७ | १,१९,६१९ | ४४,३३६ | ४४७ | १,४२,७१९ | ६१,८८४ |
| पदवी | ८ | ३,०४० | २,९१८ | १२ | ३,३५७ | ३,२०९ | ३४० | १,३१,८२९ | ७५,६०९ | ३६० | १,३८,२२६ | ८१,७३६ |
| पदव्युत्तर | ५ | ९०७ | ८३१ | १० | १,३७२ | १,०९६ | २०३ | १४,२८० | ६,१०४ | २१८ | १६,५५९ | ८,०३१ |
| **वास्तुशास्त्र** | | | | | | | | | | | | |
| पदवी | -- | -- | -- | २ | १६७ | १६७ | ७९ | ५,०८८ | ४,३५४ | ८१ | ५,२५५ | ४,५२१ |
| पदव्युत्तर | -- | -- | -- | -- | -- | -- | १६ | ४२० | ३३६ | १६ | ४२० | ३३६ |
| **व्यवस्थापन शास्त्र** | | | | | | | | | | | | |
| एमएमएस / एमबीए | २ | १८० | १५८ | १३ | १,०८० | ८३५ | ३१४ | ३३,६०३ | २९,०२८ | ३२९ | ३४,८६३ | ३०,०२१ |
| पीजीडीएम | १ | ६० | ६० | -- | -- | -- | ० | ० | ० | १ | ६० | ६० |
| **हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान** | | | | | | | | | | | | |
| पदविका | २ | १२६ | १२५ | -- | -- | -- | १ | ६३ | ५९ | ३ | १८९ | १८४ |
| पदवी | -- | -- | -- | १ | ४२ | २४ | ८ | ४५२ | ४३६ | ९ | ४९४ | ४६० |
| पदव्युत्तर | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | २४ | ४ | १ | २४ | ४ |
| **औषध निर्माणशास्त्र** | | | | | | | | | | | | |
| पदविका | ४ | २१० | २१० | २० | १,२४० | १,२२९ | २५१ | १५,५०३ | १५,४८८ | २७५ | १६,९५३ | १६,९२७ |
| पदवी | ४ | २२० | २०७ | ७ | ३३० | ३०८ | १७७ | १२,८०३ | १२,५३९ | १८८ | १३,३५३ | १३,०५४ |
| पदव्युत्तर | ३ | ७३ | ७२ | ६ | २६४ | २५० | ९८ | ३,१४३ | २,१७४ | १०७ | ३,४८० | २,४९६ |
| फार्मा. डी. | २ | ६० | ५५ | -- | -- | -- | ४ | १२० | ४० | ६ | १८० | ९५ |
| **मास्टर इन कॉम्प्युटर ॲप्लिकेशन** | २ | ९० | ८९ | ९ | ५१० | ३४५ | ८८ | ६,७४० | ३,८७८ | ९९ | ७,३४० | ४,३१२ |
| **औद्योगिक प्रशिक्षण संस्था** | ४१७ | ९३,४८१ | ८६,२११ | -- | -- | -- | ४६४ | ४२,९०५ | ३२,३८४ | ८८१ | १,३६,३८६ | १,१८,५९५ |

*आधार:* १) तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई
२) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई

## परिशिष्ट १०.४

## सन २०१७-१८ मधील कला, विज्ञान, वाणिज्य, इतर बिगर- कृषि अभ्यासक्रम, विधी, शिक्षणशास्त्र व ललित कला अभ्यासक्रमांकरीता एकूण संस्था, त्यांची प्रवेशक्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या

| विद्याशाखा | शासकीय | | | शासन अनुदानित | | | विना अनुदानित | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| **कला*** | | | | | | | | | | | | |
| पदवी | | १,७१९ | १,३६२ | | २,६९,०८८ | २,२७,९०७ | | ६५,२०१ | ४४,३५२ | | ३,३६,००८ | २,७३,६२१ |
| पदव्युत्तर | | १,४७० | ९३७ | | ७८,५९७ | ३४,५६० | | ३,६७१ | १,५१८ | | ८३,७३८ | ३७,०१५ |
| **विज्ञान*** | | | | | | | | | | | | |
| पदवी | | २,०४३ | १,५७७ | | १,६७,९७९ | १,४३,९६४ | | ५८,४५७ | ३६,७२० | | २,२८,४७९ | १,८२,२६१ |
| पदव्युत्तर | | ६८८ | ५९८ | | २६,६५० | २१,०६२ | | ४,६३० | ३,०२३ | | ३१,९६८ | २४,६८३ |
| **वाणिज्य*** | | | | | | | | | | | | |
| पदवी | १५ | १,०८० | १,०१० | १,०८० | २,२७,४३० | १,९१,८३३ | १,१२६ | १,०४,६४४ | ७४,७५५ | २,२२१ | ३,३३,१५४ | २,६७,५९८ |
| पदव्युत्तर | | १८० | ६९ | | ३२,३३५ | २५,१४१ | | ४,५८६ | २,३७४ | | ३७,१०१ | २७,५८४ |
| **नॉन-एआयसीटीई अभ्यासक्रम*** | | | | | | | | | | | | |
| पदवी | | -- | -- | | १६,७४९ | १२,२९३ | | २२,०५१ | १३,०९० | | ३८,८०० | २५,३८३ |
| पदव्युत्तर | | -- | -- | | ७१५ | १७४ | | १,३९० | १५८ | | २,१०५ | ३३२ |
| **विधी*** | | | | | | | | | | | | |
| पदवी | १ | २४० | २४० | ४५ | ६,६३३ | ४,७७८ | ७४ | ४,४२० | ३,०२१ | १२० | ११,२९३ | ८,०३९ |
| पदव्युत्तर | -- | -- | -- | | १,५१७ | ८६१ | | ४९० | २६९ | | २,००७ | १,१३० |
| **शिक्षणशास्त्र*** | | | | | | | | | | | | |
| **डी.एड** | ४८ | २,७०१ | ५३२ | ९७ | ४,५४५ | २,००५ | ८०४ | ५१,८६० | १५,११० | ९४९ | ५९,१०६ | १७,६४७ |
| **बी.एड** | १२ | ५७१ | ४३० | ४३ | २,५४८ | १,९६० | ४९५ | २५,१५८ | १६,१४२ | ५५० | २८,२७७ | १८,५३२ |
| **एम.एड** | | २०० | २७ | | ४५० | १२७ | | १,७७३ | ५१२ | | २,४२३ | ६६६ |
| **ललितकला** | | | | | | | | | | | | |
| पदविका | ३ | ११५ | १०९ | ३१ | १,९३० | १,४९४ | १७२ | ११,३८५ | ३,५३८ | २०६ | १३,४३० | ५,१४१ |
| पदवी | ४ | ३०० | २९५ | -- | -- | -- | -- | -- | -- | ४ | ३०० | २९५ |
| पदव्युत्तर | ४ | १३० | ५३ | -- | -- | -- | -- | -- | -- | ४ | १३० | ५३ |

*आधार* : १) उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.

२) कला संचालनालय, मुंबई

३) महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे

* अस्थायी

## परिशिष्ट १०.५

## सन २०१७-१८ मध्ये कृषि, पशु व मत्स्य विज्ञान अभ्यासक्रमांकरीता संस्था, त्यांची प्रवेशक्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या

| विद्याशाखा | शासकीय | | | शासन अनुदानित | | | विना अनुदानित | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी@ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| **कृषि** | | | | | | | | | | | | |
| पदवी | १६ | १,७०८ | १,७७७ | २ | २४४ | २४३ | ७५ | ७,९५० | ७,८९९ | ९३ | ९,९०२ | ९,९१९ |
| पदव्युत्तर | ११ | ८८५ | ९३० | -- | -- | -- | -- | -- | -- | ११ | ८८५ | ९३० |
| आचार्य पदवी | ४ | १६६ | १२५ | -- | -- | -- | -- | -- | -- | ४ | १६६ | १२५ |
| **फलोत्पादन** | | | | | | | | | | | | |
| पदवी | ४ | २०० | १९८ | -- | -- | -- | १० | ५६० | ५६० | १४ | ७६० | ७५८ |
| पदव्युत्तर | १० | १३४ | १२७ | -- | -- | -- | -- | -- | -- | १० | १३४ | १२७ |
| **वन संवर्धन** | | | | | | | | | | | | |
| पदवी | २ | ६४ | ६४ | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | ६४ | ६४ |
| पदव्युत्तर | २ | २१ | २१ | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | २१ | २१ |
| **मत्स्य विज्ञान** | | | | | | | | | | | | |
| पदवी | ३ | ११६ | १०२ | -- | -- | -- | -- | -- | -- | ३ | ११६ | १०२ |
| पदव्युत्तर | १ | २८ | २७ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | २८ | २७ |
| आचार्य पदवी | १ | ११ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | ११ | १ |
| **अन्न तंत्रज्ञान** | | | | | | | | | | | | |
